**श्री. हसन मुश्रीफ :** अध्यक्ष महोदय, " शेतमजूर " हा शब्द वगळण्याबद्दल चर्चा सुरू आहे. इंदिरा गांधी भूमिहीन निराधार शेजमजूर महिलेच्या संदर्भात सन २००४ मध्ये शासन निर्णय काढण्यात आला होता. त्यानंतर सन २००८ मध्ये नजरचुकीने "शेतमजूर महिला" हा शब्द आलेला आहे. शेतमजूर महिला कमविती असेल तर तिला द्यावे किंवा कसे यासंदर्भातील व्हेरिफिकेशन करावयाचे आहे. शेतमजूर महिलेला नवरा, मुले आहेत. तसेच ती कमविती आहे. यासंदर्भातील चर्चा झाली होती. म्हणून " शेतमजूर महिला " हा शब्द वगळण्याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेतलेला होता.

**श्री. बाबा सिद्दिकी :** अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये " घरेलू कामगार " आहेत. संजय गांधी निराधार योजनेमध्ये " घरेलू कामगारांचा " समावेश करण्यात यावा, ही विनंती.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. या लक्षवेधी सूचनेचे दोन महत्त्वाचे ॲचिव्हमेंट आहेत. सन्माननीय सदस्य श्री. बाबासाहेब कुपेकर आणि इतर सन्माननीय सदस्यांच्या जिल्ह्यात जी योजना यशस्वीपणे दाखला देण्यासाठी राबविली, ती पूर्ण महाराष्ट्रात राबविणार अशी माननीय मंत्री महोदयांनी अतिशय सकारात्मक भूमिका घेतलेली आहे. वित्त व नियोजन विभागाची बंधने लक्षात घेता येत्या ८ दिवसांच्या आत माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठक आयोजित करण्याबाबत माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री. हसन मुश्रीफ :** अध्यक्ष महोदय, ठीक आहे. या विषयाच्या संदर्भात येत्या ८ दिवसांच्या आत माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठक आयोजित केली जाईल.

---

## सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाकरिता मागण्या

**(१) सामान्य प्रशासन विभाग,**

**(२) नगर विकास विभाग,**

**(३) गृहनिर्माण विभाग**

**(४) मराठी भाषा विभाग**

**उपाध्यक्ष :** आता (१) सामान्य प्रशासन विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक ए-१, ए-२, ए-३, ए-५, ए-६, ए-७, ए-८, ए-९, (२) नगर विकास विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक एफ-२, एफ-३, एफ-४, एफ-५, एफ-७, एफ-८, (३) गृह निर्माण विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक क्यू-२, क्यू-३, क्यू-४, क्यू-६, आणि (४) मराठी भाषा विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक झेडएफ-१, झेडएफ-२, झेडएफ-३, झेडएफ-४ चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरित केला आहे.

## अनुदानाकरिता मागण्या

## महाराष्ट्र विधानसभा

### मंगळवार, दिनांक ५ एप्रिल २०१० रोजीच्या दिवसाच्या कामकाजाचे जोडपत्र

सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पातील मागण्यांवर चर्चा व मतदान प्राथम्यक्रमानुसार अर्थसंकल्पातील मागण्यांवर चर्चा झाल्यानंतर मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची

| अ. क्र. (१) | मागणी क्रमांक (२) | प्रभारी मंत्री (३) | मुख्य लेखाशीर्ष (४) | रक्कम (५) |
|---|---|---|---|---|
| | | | **सामान्य प्रशासन विभाग** | रुपये |
| १ | ए-१ | मा. मुख्यमंत्री | २०१२, राष्ट्रपती/उपराष्ट्रपती, राज्यपाल/ संघराज्य क्षेत्रांचे प्रशासक<br>२०१३, मंत्रिपरिषद | ... १३,१५,१२,००० |
| २ | ए-२ | -कित्ता- | २०१५, निवडणुका | ... ५१,०५,२६,००० |
| ३ | ए-३ | -कित्ता- | २०५१, लोकसेवा आयोग<br>२०५२ सेक्रेटरिएट सर्वसाधारण सेवा<br>२०५९, सार्वजनिक बांधकामे | ... ७,२१,००० |
| ४ | ए-४ | -कित्ता- | २०७०, इतर प्रशासनिक सेवा<br>२०७५, संकीर्ण सर्वसाधारण सेवा<br>२२१६, गृह निर्माण | ... २,२३,३७,९९,००० |
| ५ | ए-५ | -कित्ता- | २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण<br>२२५० इतर सामाजिक सेवा<br>२२५१, सेक्रेटरियट-सामाजिक सेवा | ... १,१९,६३,५२,००० |
| ६ | ए-६ | -कित्ता- | २२२०, माहिती व प्रसिद्धी | ... ४२,०२,०९,००० |
| ७ | ए-७ | -कित्ता- | ३०५३, नागरी विमानचालन | ... १,६५,५७,२८,००० |
| ८ | ए-८ | -कित्ता- | ३४५४, जनगणना, सर्वेक्षण व सांख्यिकी | ... १,६१,७३,००,००० |
| ९ | ए-९ | -कित्ता- | ७६१०, शासकीय कर्मचारी, इत्यादींना कर्जे | ... ९४,८०,००० |
| | | | **नगरविकास विभाग** | रुपये |
| ४३ | एफ-२ | मा. मुख्यमंत्री | २०५३, जिल्हा प्रशासन<br>२०७०, इतर प्रशासनिक सेवा<br>२२१७, नगरविकास<br>३०५४, मार्ग व पूल<br>२२३०, कामगार व सेवायोजन<br>२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण | ... ४४,१७,९४,१८,००० |

प्राथम्यक्रमानुसार अर्थसंकल्पातील मागण्यांवर चर्चा झाल्यानंतर मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची

| (१) | (२) | (३) | (४) | | (५) |
|---|---|---|---|---|---|
| | | | **नगरविकास विभाग** | | रुपये |
| ४४ | एफ-३ | -कित्ता- | २२५१, सेक्रेटरिएट-सामाजिक सेवा<br>३४७५, इतर सर्वसाधारण आर्थिक सेवा | … | ४०,१५,४८,०००० |
| ४५ | एफ-४ | -कित्ता- | ३६०४, स्थानिक संस्था व पंचायत राज्य संस्था यांना नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे.<br>४२१७, नगरविकासावरील भांडवली खर्च | … | १,६१,०३,५३,००० |
| ४६ | एफ-५ | -कित्ता- | ५४७५, इतर सर्वसाधारण आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च | … | १२,५०,००० |
| ४७ | एफ-७ | -कित्ता- | ६२१७, नगरविकासासाठी कर्जे | … | ९८,३३,३३,००० |
| ४८ | एफ-८ | -कित्ता- | ७६१०, शासकीय कर्मचारी, इत्यादींना कर्जे | … | १,६४,५०,००० |
| | | | **गृहनिर्माण विभाग** | | रुपये |
| १९१ | क्यू-२ | मा. मुख्यमंत्री | २०७०, इतर प्रशासनिक सेवा<br>२२१६, गृहनिर्माण | … | ४८,४२,००० |
| १९२ | क्यू-३ | -कित्ता- | २२१७, नगरविकास<br>२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण | … | १५,७७,६५,८४,००० |
| १९३ | क्यू-४ | -कित्ता- | ३४५१, सेक्रेटरिएट--आर्थिक सेवा | … | ३,८४,१२,००० |
| १९४ | क्यू-६ | -कित्ता- | ७६१०, शासकीय कर्मचारी, इत्यादींना कर्जे | … | २९,३५,००० |
| | | | **मराठी भाषा विभाग** | | रुपये |
| २५३ | झेडएफ-१ | मा. मुख्यमंत्री | २०५२, सेक्रेटरिएट--सर्वसाधारण सेवा | … | ४,५६,२४,००० |
| २५४ | झेडएफ-२ | -कित्ता- | २२०५, कला व संस्कृती | … | ३,५४,७३,००० |
| २५५ | झेडएफ-३ | -कित्ता- | २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण | … | ८,३३,००० |
| २५६ | झेडएफ-४ | -कित्ता- | ७६१०, शासकीय कर्मचारी, इत्यादींना कर्जे | … | ९,५९,००० |

**उपाध्यक्ष :** मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांच्या विभागनिहाय याद्या सदस्यांना टपालखणाद्वारे (पिजन होल ) वितरित करण्यात आल्या आहेत. या विभागांच्या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेसोबत जोडला आहे. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा आहे. माहे जुलै, २०१० पासून मान्य झाली असल्यामुळे आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे मी गृहीत धरतो.

**[ उपाध्यक्ष ]**

या चर्चेसाठी तीन तास वेळ देण्यात येईल. या तीन तासांपैकी सत्तारुढ पक्षास संबंधित मंत्र्यांच्या उत्तरासह निम्मा वेळ व विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील अशी मी अपेक्षा करतो. आता चर्चेला सुरुवात होईल.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी आम्हाला तीन तास एवढा वेळ पुरेसा नसल्यामुळे किमान सहा तासांचा तरी वेळ मिळाला पाहिजे. खरे तर मागण्यांवर १८ दिवस चर्चा झाली पाहिजे. मात्र या नंतर शासनाने हे दिवस कमी केले. नंतरच्या कालावधीमध्ये चर्चेकरिता ८ दिवस निश्चित केले गेले. आम्ही मुद्दा उपस्थित केल्यामुळे, मागण्यांवरील चर्चेकरिता चार दिवस दाखविण्यात आले आहेत. मात्र पूर्वी असे ठरले नव्हते. एका दिवशी ४ ते ५ विभाग चर्चेला घ्यायचे व त्यावर केवळ तीन तासांचा वेळ ठरवायचा, हे आम्हाला कदापि मान्य होणार नाही. माननीय अध्यक्षांनी आम्हाला असे सांगितले होते की, आपण माझ्या दालनात या, तिथे मागण्यांवरील विभाग मागे-पुढे करू. माझी मागणी आहे की, आजच्या चर्चेला सहा ते साडेसहा तास मिळाले पाहिजेत. आज नगर विकास विभाग सारख्या महत्त्वाच्या विभागावर चर्चा होणार आहे. त्यामुळे आपण मागण्यांवरील चर्चेच्या वेळेबाबत फेर विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

**उपाध्यक्ष :** वेळ वाढवून देऊ. आज ४ विभाग आहेत. त्यामुळे ६ तासांचा वेळ ठरवू.

**श्री. हर्षवर्धन पाटील :** अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते यांनी सांगितल्याप्रमाणे कोणत्या विभागांवर चर्चा करावी, हा विरोधी पक्षाचा अधिकार आहे. आता ३ तासांचा वेळ जाहीर केलेला आहे. महत्त्वाच्या ४ विभागांवर चर्चा होणार आहे. त्या प्रमाणे वेळ वाढवावी. वेळ वाढविण्यास हरकत नाही. माझी विनंती आहे की, मात्र पक्षाच्या प्रमुखांनी दिलेल्या वेळेचे नियोजन करणे आवश्यक आहे. जास्त सदस्यांची नावे देण्याऐवजी कमी नावे दिली तर त्यांना जास्त वेळ मिळू शकेल. त्यामुळे या वेळेत ते अधिक प्रभावीपणे आपले मुद्दे मांडू शकतील. त्या प्रमाणे आता ही चर्चा सुरू करावी व वेळ वाढवून देण्यात यावा.

**श्री. प्रवीण दरेकर :** अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या ठिकाणी सूचना केली आहे. ४ विभागांवर बोलण्यासाठी ५ मिनिटांतील केवळ एक मिनिट एका विभागावर बोलण्यासाठी मिळणार आहे. त्यामुळे माझी अशी सूचना आहे की, आज दोन विभागांवर चर्चा करावी व उर्वरित २ विभागांवर नंतर चर्चा घेण्यात यावी. असे झाले तरच सर्व विभागांना न्याय देता येईल. सदस्यांना बोलण्याकरिता वेळ वाढवून द्यावा.

**उपाध्यक्ष :** प्रत्येक सदस्याला ५ मिनिटांपेक्षा अधिक वेळ मिळणार आहे. चर्चेकरिता वेळ वाढवून देण्यात येईल मात्र आजच चारही विभागांवर चर्चा होईल.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, सन २०१०-११ च्या अनुदानाच्या मागण्यांवर गृह निर्माण, सामान्य प्रशासन विभाग, नगरविकास विभाग, मराठी भाषा विभाग या विभागांवर आता चर्चा होणार आहे. मात्र या चर्चेस ६ तासांपेक्षा अधिक वेळ दिला पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

**श्री. देवेंद्र फडणवीस :** अध्यक्ष महाराज, सभागृहामध्ये गृहनिर्माण विभागाचे मंत्री व राज्यमंत्रीही उपस्थित नाहीत.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** त्याच बरोबर सामान्य प्रशासन विभागाचे माननीय मुख्यमंत्रीही उपस्थित नाहीत.

**उपाध्यक्ष :** मी या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी ज्या सन्माननीय सदस्यांची नावे माझ्याकडे आलेली आहेत ती नावे वाचून दाखवतो. भारतीय राष्ट्रीय काँगेस पक्षातर्फे सर्वश्री. बाबा सिद्दिकी, मधु चव्हाण, अस्लम शेख, अमिन पटेल, ओमप्रकाश गोकर्णा, रमेशसिंह ठाकूर, गोपालदास अग्रवाल, प्रशांत ठाकूर, अशोक जाधव, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. कृष्णा हेगडे, दिनानाथ पडोळे, कैलास गोरंटयाल, सुनील केदार या सन्माननीय सदस्यांची नावे प्राप्त झालेली आहेत. ज्या सन्माननीय सदस्यांनी नावे चर्चेसाठी दिलेली आहेत, त्यांनी वेळेवर सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे. भारतीय रिपब्लिक पक्षातर्फे सर्वश्री. हरिदास भदे, डॉ. अनिल बोंडे, यांची नावे प्राप्त झालेली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे सर्वश्री. नवाब मलिक, संजय सावकारे, जितेंद्र आव्हाड, यांची नावे प्राप्त झालेली आहेत. भारतीय जनता पक्षाकडून सर्वश्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील), प्रकाश महेता, मंगलप्रभात लोढा, गोपाल शेट्टी, विजय देशमुख, सुरेश हाळवणकर गिरीश बापट यांची नावे प्राप्त झालेली आहेत. शिवसेना पक्षातर्फे सर्वश्री. सुरेशदादा जैन, सुभाष देसाई, एकनाथ शिंदे, रूपेश म्हात्रे, विजय शिवतारे, प्रताप सरनाईक, विनोद घोसाळकर, रवींद्र वायकर, विजयराज शिंदे, यांची नावे प्राप्त झालेली आहेत. अपक्षांतर्फे श्री. कृषिभूषण साहेबराव पाटील, सर्वश्री बच्चू कडू, सुरेश जेथलिया, विवेक पंडित यांची नावे प्राप्त झालेली आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण पक्षातर्फे सर्वश्री बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, रमेश वांजळे यांची नावे प्राप्त झालेली आहेत. शेतकरी कामगार पक्षातर्फे श्रीमती मिनाक्षी पाटील, सर्वश्री. धैर्यशील पाटील, ग. आ. देशमुख यांची नावे प्राप्त झालेली आहेत. समाजवादी पक्षातर्फे सर्वश्री. अबु आझमी, रशिद ताहिर मोमिन ही सर्व नावे प्राप्त झालेली आहेत. आता चर्चेला सुरुवात करावी.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे** (पाटील) : अध्यक्ष महाराज, अजून येथे माननीय सामान्य प्रशासन विभाग, नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभागाचे मंत्री उपस्थित नाहीत.

**उपाध्यक्ष :** नगरविकास विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस :** अध्यक्ष महाराज, या पुरवणी मागण्या नाहीत. मूळ बजेटच्या मागण्यांवर चर्चा केली जात आहे. सभागृहापुढे याच्यापेक्षा दुसरा गंभीर विषय नसतो. वित्तीय कामकाज हे महत्त्वाचे कामकाज आहे. अशावेळी खरे तर मागण्यांच्या वेळी माननीय कॅबिनेट मंत्रीच उपस्थित असले पाहिजेत, पुरवणी मागण्यांच्या वेळी माननीय राज्यमंत्री उपस्थित राहिले तर ठीक आहे. पण येथे गृहनिर्माण विभागाचे मंत्रीही उपस्थित नाहीत. वित्तीय कामकाज चालविण्याची जबाबदारी केवळ विरोधी पक्षाची आहे का, ती सत्ताधारी पक्षाची जबाबदारी नाही का ? माझी विनंती आहे की, आपण सभागृहाचे कामकाज थांबवावे, आम्ही अशाप्रकारे कामकाज करणार नाही.

**उपाध्यक्ष :** सर्व सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्री आता सभागृहात आले असून चारही खात्यांचे कामकाज त्यांच्याकडे आहे. त्यामुळे आता चर्चेला सुरुवात करण्यास हरकत नाही.

---

**अभिनंदनाचा प्रस्ताव**

**श्री. विजय शिवतारे :** अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य, श्री. दादाराव केचे यांचा आज वाढदिवस आहे त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्यात यावा.

**उपाध्यक्ष :** या सभागृहाचे सन्माननीय सदस्य, श्री. दादाराव केचे यांचा आज वाढदिवस आहे, त्या निमित्त आपण त्यांना सर्वांतर्फे शुभेच्छा देऊया.

आता आपण मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करूया.

---

**सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्या**

**(१) सामान्य प्रशासन विभाग,**

**(२) नगरविकास विभाग,**

**(३) गृहनिर्माण विभाग,**

**(४) मराठी भाषा विभाग**

(चर्चा पुढे सुरू...

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महाराज, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील सामान्य प्रशासन विभाग, नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग, मराठी भाषा विभाग या विभागांच्या मागण्यांवर चर्चेसाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आज मला सन्माननीय सदस्य, श्री. गिरीश बापट यांनी या मागण्यांवर बोलण्यासाठी फक्त १५ मिनिटांचाच वेळ दिलेला असल्याने माझे भाषण लवकर संपणार आहे. त्यामुळे मी माननीय मंत्री प्रमुख आहेत त्यांच्याकडे कागदपत्रे देऊन त्याबाबत चौकशी करण्यास सांगणार आहे. सामान्य प्रशासन विभागावर आज चर्चा आहे. राज्य २१ व्या शतकाकडे वाटचाल करत असताना, राज्य शासनाने सांगितले आहे की, शासनाचा कारभार पारदर्शक असेल. स्वच्छ कारभाराची हमी माननीय मुख्यमंत्र्यांनी दिली. सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून अनेक योजना फार पूर्वीपासून घेतल्या आहेत. प्रशासनामध्ये संगणकीकरण करण्याची योजना करण्यात आली. सर्व क्षेत्रामध्ये, सर्व विभागांमध्ये ई-टेंडरिंगची व्यवस्था करणे, या योजना अधिकाधिक लोकाभिमुख होऊन जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी या योजनांची माहिती संगणकाच्या माध्यमातून आणि नेटच्या माध्यमातून देणे, तसेच शासन जे निर्णय घेते, या निर्णयाची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र डॉट कॉम अशा स्वरूपाची सेवा सुरू केली. सरकार फक्त घोषणा करते परंतु त्यासंदर्भातील अंमलबजावणी मात्र शून्य आहे, अशा स्वरूपाचा सरकारचा कारभार सुरू आहे. मी या ठिकाणी सरकारला विचारू इच्छितो की, सरकारने जी वेबसाईट सुरू केलेली आहे, ती सुरू आहे काय ? कारण ती वेबसाईट अजून अद्ययावत केलेली नाही. त्या वेबसाईटवर अजून

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

मुख्यमंत्री म्हणून श्री. विलासराव देशमुख यांचे नाव आहे. तसेच त्यावेळच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांची नावे आहेत. माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी दिल्लीवरून येऊन मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारलेल्याला चार महिन्यांचा कालावधी उलटून गेलेला आहे. असे असताना त्या वेबसाईटवर तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांचे नाव कसे काय आले ? खरे म्हणजे वेबसाईटवरील माहिती दररोज अपडेट केली पाहिजे. मधल्या कालावधीत आपली वेबसाईट हायजॅक झाली होती. ही हायजॅक झालेली वेबसाईट परत सुरू झाली काय ? यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. फक्त लोकप्रिय घोषणा करावयाच्या परंतु त्याची अंमलबजावणी करावयाची नाही असा प्रकार सुरू आहे.

अध्यक्ष महाराज, आपण वाळू उपसा संदर्भात देखील ई-टेंडरींग केले पाहिजे. वाळू उपसा संदर्भात कोणालाही टेंडर भरता आले पाहिजे, असे केल्यास वाळू माफियांची सत्ता संपुष्टात येईल. तेव्हा या संदर्भातील कार्यवाही सरकारने करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, आपण माहितीच्या अधिकाराचा कायदा केला. त्यानुसार या कायद्यानुसार आम्हाला अनेक ठिकाणची माहिती उपलब्ध होऊ शकली. माहितीच्या अधिकाराद्वारे मिळणारी माहिती वस्तुनिष्ठ आहे असे समजून प्रत्येकजण त्यावर विश्वास ठेवू लागला. माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झालेली अनेक कागदपत्रे मी पाहिलेली आहेत. परंतु पुणे शहरातून माहितीच्या अधिकाराखाली जी कागदपत्रे प्राप्त झाली त्या प्रत्येक कागदपत्रावर लिहिले आहे असे म्हणण्यापेक्षा शिक्का मारलेला आहे की, " माहितीच्या अधिकाराखाली मागितलेली माहिती फक्त माहितीसाठी आहे. कायदेशीर बाबीसाठी याचा उपयोग करता येणार नाही." आम्हाला माहितीच्या अधिकाराखाली मिळालेल्या कागदपत्रांचा उपयोग कोर्टाच्या कामासाठी करता येणार नसेल तर आम्ही फक्त त्याचा उपयोग वाचण्यासाठी करायचा काय ? महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातून आम्ही जी कागदपत्रे मिळविली त्यावर असा कुठेही शिक्का मारलेला आढळून आला नाही. परंतु पुणे शहरामध्ये आम्ही अलीकडच्या काळात जेवढी माहिती मागविली त्यावर असा शिक्का मारल्याचे आढळून आले. अशा प्रकारचा शिक्का मारून कागदपत्रे मिळत असल्यामुळे माहितीच्या अधिकाराला काही महत्त्व राहिलेले नाही. तेव्हा यासंदर्भात सुधारणा होणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महाराज, सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून फाईलच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला की, ४५ दिवसांच्या आत फाईलवर निर्णय झाला पाहिजे आणि कोणत्याही अधिकाऱ्याकडे ७ दिवसांच्यावर फाईल राहता कामा नये. कक्ष अधिकाऱ्यापासून फाईल पुढे पाठविण्यास सुरुवात होते प्रथम अवर सचिव, उप सचिव, सह सचिव, सचिव व त्यानंतर मंत्री असा फाईलचा प्रवास होतो. अधिकाऱ्यांकडून ७ दिवसांच्या नियमांचे पालन केले जाते. परंतु ही मर्यादा राज्यमंत्री आणि मंत्री यांचेसाठी नाही. इतर अधिकाऱ्यांनी स्वत:कडे ७ दिवसांपेक्षा जास्त दिवस फाईल ठेवली तर त्यांचेवर कारवाई होऊ शकते. परंतु राज्यमंत्री व मंत्री यांनी स्वत:कडे सात महिने किंवा आणखी किती तरी महिने फाईल

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

स्वत:कडे ठेवली तर त्यांच्यावर कारवाई होणार नाही. अधिकाऱ्यांप्रमाणे मंत्री महोदयांनी देखील ७ दिवसांत फाईलवर निर्णय घेतला पाहिजे अशाप्रकारचे बंधन त्यांचेवर घातले पाहिजे. आपण अशाप्रकारचे बंधन सर्वांवर घातल्यास या निर्णयाची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे होऊ शकेल. मंत्री महोदयांकडे शेकडो फाईल्स अनेक महिने प्रलंबित राहिल्यास त्याचा फायदा संबंधितांना मिळणार नाही.

अध्यक्ष महाराज, आज मंत्रालयामध्ये उप सचिव, सह सचिव पदाच्या अनेक जागा रिक्त आहेत. त्यामुळे प्रशासनाच्या कामकाजावर परिणाम होत आहे. या रिक्त जागा तातडीने भरल्यास आपली जी गतिमान प्रशासनाची भूमिका त्याला वेग येऊ शकेल. राज्यामध्ये ५० टक्के कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त असल्यामुळे एकेका कर्मचाऱ्याकडे पाच-पाच तालुक्यांचा कार्यभार दिलेला आहे. तो त्या तालुक्याला फक्त एक दिवस देऊ शकतो. तो रजेवर गेला तर हे पाचही तालुके ओस पडतात, अशी स्थिती आहे. राज्यातील रिक्त पदे तातडीने भरून, प्रशासन अजून मजबूत व लोकाभिमुख करताना, जनतेच्या कामांना वेग देण्यासंदर्भातील कार्यवाही तातडीने करावी, अशी माझी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांना आयपीएस नॉमिनेशनमध्ये संधी मिळत असते. २ वर्षे झाली, आयपीएस नॉमिनेशनच्या संदर्भातील प्रक्रिया पूर्ण होऊ शकलेली नाही. त्यामुळे हा एक प्रकारे त्यांच्यावर अन्याय आहे. आपण एका बाजूला मराठी भाषेसाठी स्वतंत्र खाते निर्माण केले आहे आणि दुसऱ्या बाजूला महाराष्ट्रातील, मुंबई पोलीस सेवेमधील अधिकाऱ्यांवर जाणीवपूर्वक, हेतूपूरस्सर अन्याय करायचा, हे योग्य नाही. आपण ही पदे किती कालावधीमध्ये भरणार आहात, यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणातून सांगितले पाहिजे. अध्यक्ष महोदय, त्यांना २-३ वर्षे न्याय मिळणार नसेल तर ते योग्य नाही कारण वयोमर्यादा संपते. अधिकारी ५५ वर्षांच्या वर नॉमिनेशनला पात्र नसतात. आपणाला २ वर्षे विलंब का झाला ? या २ वर्षांमध्ये अनेक अधिकारी आयपीएस नॉमिनेशनची वाट पाहत असतील. अधिकाऱ्यांना संधी मिळाली नाही, शेवटी ते सेवानिवृत्त झाले. डायरेक्ट आयपीएस अधिकारी डायरेक्ट पुढे जातो.

अध्यक्ष महोदय, राज्यभरातील पोलीस अधिकाऱ्यांना आयपीएस नॉमिनेशनासाठी जाईपर्यंत उभे आयुष्य जाते. उत्कृष्ट शेरे असलेले अधिकारीच आयपीएस नॉमिनेशनला पात्र असतात आणि त्याचा अर्थ ते अधिकारी चांगले असतात. परंतु, अधिकाऱ्यांवर अन्याय होतो. त्यामुळे आपणाकडून यासंदर्भातील कार्यवाही तातडीने झाली पाहिजे. आयएएसच्या नॉमिनेशनसंदर्भात ज्याप्रमाणे तातडीने निर्णय घेऊन वरिष्ठ पातळीवर पाठविले जातात, दरवर्षी आयएएस नॉमिनेशनसंदर्भात मिटिंग तातडीने घेतल्या जातात, ताबडतोबीने निर्णय होतात, त्याप्रमाणे आयपीएस नॉमिनेशनसंदर्भात देखील झाले पाहिजे. आयएएसचे एकही वर्ष रिकामे गेलेले नाही. मग आयपीएस नॉमिनेशनसाठी विलंब लागण्याची कारणे काय आहेत ? आपण यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी.

अध्यक्ष महोदय, आपण मराठी भाषेच्या संदर्भात स्वतंत्र खाते निर्माण केले आहे, याच वर्षी हे स्वतंत्र खाते निर्माण झाल्यामुळे ही तरतूद कमी आहे, असे मी म्हणणार नाही. आपण त्यामध्ये थोड्या थोडक्या तरतुदी केल्या आहेत. न्यायालयात मराठी भाषेचा वापर झाला पाहिजे, या संदर्भात वारंवार या सभागृहात

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

ठराव केला गेला, अशा स्वरूपाचा कायदा केला गेला. पण आजही असे चित्र आहे की, माननीय उच्च न्यायालयामध्ये किंवा सेशन कोर्टात मराठी भाषेचा वापर होत नाही. मराठी भाषेचा वापर करण्यासंदर्भात न्यायालयाचे म्हणणे असे आहे की, राज्य सरकारकडून आम्हाला टंकलेखक, लघुलेखक उपलब्ध झाले पाहिजेत, ते उपलब्ध न झाल्यामुळे मराठी भाषेचा वापर करणे आम्हाला अवघड जात आहे. महाराष्ट्र हा मराठी भाषेचा प्रांत आहे. महाराष्ट्र राज्याला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत, हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. त्यामुळे या कालखंडात येत्या वर्षभरात सर्व न्यायालयांमध्ये मराठी भाषेचा वापर झाला पाहिजे, अशा स्वरूपाची पावले राज्य सरकारने उचलली पाहिजेत. सभागृहामध्ये असाही विषय निघाला की, राज्यात मराठी माध्यमाच्या शाळांना प्राधान्य नाही, इंग्रजी माध्यमाच्या शाळांना प्राधान्य आहे, अन्य भाषिक शाळांना प्राधान्य आहे. राज्यात अनुदान तत्त्वावर मराठी शाळा मिळत नसतील ते काही योग्य नाही. हे राज्य मराठीचे आहे की अन्य कोणाचे आहे ? गेली १० वर्षे झाली, मराठी माध्यमाच्या शाळांना मान्यता दिलेली नाही. आपण मराठी भाषेच्या संदर्भातील विचार तातडीने व प्राधान्याने केला पाहिजे, तरच मराठी भाषा विकसित होईल. मराठी जपली पाहिजे, मराठी वाढली पाहिजे. मराठी मधील साहित्य, संस्कृती यांचा विस्तार होण्यासाठी मोठ्या प्रमाणात त्यांना अनुदान मिळाले पाहिजे. राज्यात मराठीच्या संदर्भातील असणाऱ्या संस्था मराठीचा विकास करतील. मराठीतील पुरातन ग्रंथ, हजारो वर्षांची मराठीची परंपरा जी मोडी लिपीपासून मराठीपर्यंत आहे, अशांची जपणूक करण्यासाठी आणि त्याची वाढ करण्यासाठी, मराठीला आणखी चांगले स्वरुप येण्यासाठी ज्या व्यवस्था आहेत, त्या निधीअभावी कमी पडत आहेत. त्यासाठी निधीची कमतरता असता कामा नये, याबद्दल आपणाला प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. सदाशिवराव पाटील)**

हे राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. गेली अनेक वर्षे आपण राज्यात सुवर्ण वर्षाच्या संदर्भात गाजावाजा करीत आहात. मला आठवते की, मागील वर्षी आपण हुतात्मा स्मारकाकडे गेलो, तेवढाच दिवस पालन केले. आता त्यास एक वर्ष होत आले आहे. त्यावेळेस फोटो काढण्यात आले आणि टी.व्ही. वर याबाबतची बातमीही प्रसिध्द झाली. माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते रोपटे लावण्यात आले, ते रोपटे जगले किंवा नाही मला माहीत नाही. महाराष्ट्र शासनाने सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त व्यापक प्रमाणावर प्रसिध्दी दिली नाही, ही मात्र वस्तुस्थिती आहे. गेल्या ५० वर्षाच्या कालखंडात शासनाने कोणकोणत्या सुधारणा घडवून आणल्या, यासंदर्भातील महाराष्ट्राचा इतिहास, मराठ्यांचा इतिहास, महाराष्ट्राची संस्कृती जनतेपर्यंत पोचण्यासंदर्भात प्रदर्शने, मेळावे, यासंदर्भातील व्यवस्था शासनाकडून झालेली नाही.

अध्यक्ष महोदय, शेजारच्या गुजरात राज्याला ५० वर्षे पूर्ण झाली म्हणून वर्षभर सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे केले. त्या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते मोठमोठे कार्यक्रम झाले. आम्हाला, आपणांस या महाराष्ट्राची माहिती असेल, परंतु पुढच्या पिढीला या महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती त्यांच्यापर्यंत पोचविण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीपासून ते आतापर्यंतचा इतिहास पुढच्या पिढीपर्यंत जाण्यासाठी गेल्या ५० वर्षांत भाषणापलिकडे या शासनाने काहीही केलेले दिसत नाही. सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या माध्यमातून नवनवीन दालने काढण्याची आवश्यकता आहे, अशी माझी मागणी आहे.

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

अध्यक्ष महोदय, मंत्रालयातील कामकाज अधिक व्यवस्थित झाले पाहिजे, अधिक गतीने झाले पाहिजे, राज्य अधिक प्रगतीशील झाले पाहिजे, याबाबत अनेकदा चर्चा झाली. परंतु त्याची अंमलबजावणी मात्र झालेली दिसत नाही. मंत्रालयात संगणकीकरण करण्याच्या बाबतीत अनेकदा बैठका झाल्या, घोषणा झाल्या, परंतु तरीही शासनाच्या विभागातील नस्तींचे गठ्ठेच्या गठ्ठे अजूनही आपणास पहावयास मिळतात. पेपरलेस वर्क करावयाचे अशी घोषणा माजी मुख्यमंत्री महोदयांनी या सभागृहात केली होती. महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने मंत्रालयात पेपरलेस वर्क करण्याचा चंग बांधण्यात आला होता, परंतु अजूनही ती गोष्ट मात्र अंमलात आणता आली नाही. मंत्रालयात संगणकीकरण झाले पाहिजे, याबाबत आमचे दुमत नाही.

अध्यक्ष महोदय, स्वातंत्र्य सैनिकांच्या मानधनाचा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. याबाबतही अनेक अडचणी आहेत. स्वातंत्र्य सैनिकांचे मानधन देण्याबाबतची बाब ही सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारित येते. स्वातंत्र्य सैनिकांचे मानधन देण्याबाबत तातडीने पाऊले उचलण्याची गरज आहे. जी काही जुनी प्रकरणे प्रलंबित आहेत त्याबाबतही शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. हैद्राबाद मुक्ती संग्राम, गोवा मुक्ती संग्राम तसेच सन १९४७ अगोदरचे जे स्वातंत्र्य सैनिक आहेत त्यांच्या संदर्भातील निर्णयही प्रलंबित आहेत. त्यांच्या संदर्भात एक आढावा बैठक घेऊन तातडीने निर्णय घेण्यात यावा व जे स्वातंत्र्य सैनिक आहेत त्यांना मानधन मिळाले पाहिजे, अशी माझी मागणी आहे. आजच्या घडीला ८० ते ८५ वर्षे वय झालेले स्वातंत्र्य सैनिक असतील, ही माहिती फार जुनी आहे. कदाचित यातील काही स्वातंत्र्य सैनिक मयतही झालेले असतील. हैद्राबादच्या मुक्ती संग्रामासंदर्भातही शासनाने तातडीने निर्णय घेण्यात यावा, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य सरकारने शहिदांची स्मारके उभी केलेली आहेत, त्यांची तर अतिशय वाईट दुरवस्था पहावयास मिळत आहे. त्या स्मारकांना वॉल कम्पाऊंड नाही, अतिशय घाणेरडी अशी अवस्था त्या स्मारकांची झालेली आहे. ती स्मारके ग्रामपंचायती किंवा नगरपालिकांच्या अखत्यारित देण्यात यावी की, जेणेकरून ती स्वच्छ राहतील आणि त्यांचे पावित्र्य जपले जाईल. अशा स्मारकांची रंगरंगोटी करणे, स्वच्छता करणे, या संदर्भात राज्य सरकारच्या माध्यमातून महत्त्व जपले गेले पाहिजे, याकडेही शासनाने लक्ष द्यावे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, सरकारवर २ लाख ३१ हजार कोटी रुपयांचा कर्जाचा बोजा आहे. हा बोजा एकीकडे वाढत असताना दुसरीकडे एन. पी. ए. वर मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून बाकीच्या इतर खर्चामध्ये कपात करण्याची आवश्यकता आहे. मंत्रालयामध्ये माननीय मंत्र्यांच्या दालनांवर, बंगल्यांवर, वीज बिलांवर, पाणीपट्टी अशा विविध बाबींवर मोठ्या प्रमाणावर खर्च वाढत चाललेला आहे. अनाठायी खर्चाला कात्री लावण्यात आली पाहिजे, अशी माझी मागणी आहे. आवश्यकता असेल तरच खर्च करावा, अशी माझी सूचना आहे. माननीय मंत्री महोदय सांगतात की, माझ्या दालनाचा खर्च सरकारच्या तिजोरीतून केला नाही तर अमुक एका महामंडळाकडून केला. माननीय मंत्री महोदयांनी केलेला खर्च हा महामंडळाकडून केला असला तरी येणारा भार हा शासनाच्या

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

तिजोरीवरच आलेला असेल, हे मात्र विसरता कामा नये. शासनाकडून अशा खर्चांना कात्री लावण्याची आवश्यकता आहे. शासनाने आपला स्वत:चा आदर्श ठेवावा तरच जनता आदर्शवादी होईल. यामध्ये ज्या काही त्रुटी आहेत त्या त्रुटींमुळे आदर्श बदनाम होत राहील, याकडेही शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, नगर विकास विभागावर बोलत असताना गेल्या अनेक वर्षांपासून या सभागृहात सन्माननीय सदस्यांनी अशी मागणी केली आहे की, नगरपालिका क्षेत्र वाढत असून ग्रामपंचायत क्षेत्र कमी होत आहे. नगरपालिकेच्या जवळील शहरे वाढत चालली आहेत. नगरपालिकांची वस्ती मोठ्या प्रमाणात वाढते आहे. लहानलहान 'ड' व 'क' वर्ग नगरपालिका आहेत त्या नगरपालिकांची वस्ती मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या नगरपालिकांची वस्ती वाढत असल्यामुळे गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून हद्दवाढीचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत. राज्यातील सर्वच नगरपालिकांचे हद्दवाढीचे प्रस्ताव अनेक वर्षे प्रलंबित आहेत. नगरपालिकेच्या बाहेरील क्षेत्रात जी शहरे वसत आहेत त्यांना नगरपालिका सोईसुविधा देत नाहीत, तसेच ग्रामपंचायत सोईसुविधा देत नाही. अशा प्रकारची या शहराची अवस्था असताना हद्दवाढीचे प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे पडून आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून हे प्रस्ताव प्रलंबित आहेत, या प्रस्तावांना टप्प्याटप्प्याने मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता द्यावी. छोट्या नगरपालिकांना उत्पन्नाची साधने मर्यादित आहेत. मोठ्या नगरपालिकांना अन्य मार्गाने किंवा केंद्र व राज्य सरकारकडून अनुदान मिळते. लहान नगरपालिकांचे अनुदाने कमी झाले आहेत.

अध्यक्ष महोदय, अनेक राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू झालेला आहे. पंरतु शासनाच्या अखत्यारित असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना किंवा शासनाच्या अंगिकृत व्यवसायांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला नाही. या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना सहावा वेतन आयोग लागू केला पाहिजे. त्याचप्रमाणे मागील १५ दिवसांच्या अगोदर सहा टक्के वाढीव महागाई भत्ता देण्याची घोषणा केंद्र सरकारने केली आहे. तो सहा टक्के वाढीव महागाई भत्ता त्याच तारखेपासून राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना मिळाला पाहिजे. यासाठी त्यांना रस्त्यांवर का यावे लागत आहे. मागील काळात एक असा अलिखित नियम झालेला आहे की, ज्या वेळी केंद्र सरकार वेतन आयोग लागू करेल तेव्हा तो वेतन आयोग राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येईल. केंद्र सरकारने महागाई भत्ता वाढ दिली तर ती राज्य सरकारने त्यांच्या कर्मचाऱ्यांना दिली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, नगरपालिकांच्या संदर्भात विषय उपस्थित करीत असताना अनेक नगरपालिकांना मुख्याधिकारी नाहीत. राज्यामध्ये २२६ नगरपालिका आहेत, बऱ्याच नगरपालिकांमध्ये मुख्याधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. किंवा प्रभारी मुख्याधिकारी आहेत. या संदर्भात वारंवार विनंती करूनही पदे भरण्यात येत नाही. त्याचप्रमाणे 'क' व 'ड' वर्ग ज्या महानगरपालिका आहेत, यामध्ये कल्याण डोंबिवली, मिरा-भाईंदर, औरंगाबाद या महानगरपालिका 'ड' वर्गात मोडत आहेत. त्या महानगरपालिकांनी विनंती केली आहे की, आम्हाला 'क' वर्गामध्ये सामावून घेण्यात यावे. 'क' वर्गात जर या महानगरपालिका आल्या तर त्यांना शासनाकडून काही प्रमाणात अनुदानात वाढ मिळेल. 'ड' वर्ग महानगरपालिकेमध्ये एलबीटीचा निर्णय घेण्यात आलेला आहे. एलबीटीचा काही महानगरपालिकांमध्ये फायदा झाला तर काही

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

महानगरपालिकांचे नुकसान झाले आहे. एलबीटीचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्या बैठकीला मी स्वत: उपस्थित होतो. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी असे सांगितले होते की, मागील दोन वर्षातील महानगरपालिकांचे उत्पन्न पाहून एलबीटीमुळे जर महानगरपालिकांना नुकसान होत असेल तर ती नुकसानभरपाई राज्य सरकार देईन, अशा प्रकारचे आश्वासन मुख्यमंत्री महोदयांनी दिले होते. 'ड' वर्ग महानगरपालिकांना एलबीटी लागू केल्यानंतर अद्यापपर्यंत महानगरपालिकांना जी तूट आलेली आहे त्या तुटीची रक्कम शासनाने महानगरपालिकांना दिलेली नाही. याकडे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांना कोणत्याही सुविधा देता येत नाहीत. लहान लहान महानगरपालिकांना त्यांच्या विकासासाठी केंद्र सरकारकडून अनुदान मिळत नाही. ज्या छोट्या नगरपालिका आहेत, त्यांना सुविधा देण्यासाठी पैसा उपलब्ध होत नाही. ज्या नगरपालिका, महानगरपालिका काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यात आहेत, त्यांनाच शासन नागरी सुविधांमधून पैसे देते. महानगरपालिकेमध्ये शिवसेना, भाजप किंवा अन्य कोणत्याही पक्षाची सत्ता असली तरी तेथे नागरिक राहात नाहीत काय ? विरोधी पक्षाच्या ताब्यात असलेल्या महानगरपालिकांसाठी पैसे दिले जात नाहीत. मला माहिती आहे की, अमुक नगरपालिकेमध्ये कोणत्या पक्षाची सत्ता आहे असा फोन मंत्रालयातून येत असतो. त्या नगरपालिकेत श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) यांच्या पक्षाची सत्ता असेल तर त्या नगरपालिकेला निधी दिला जात नाही. एखाद्या नगरपालिकेत, महानगरपालिकेत शिवसेना, भाजप पक्षाची सत्ता असेल तर त्या नगरपालिकेला, महानगरपालिकेला निधी द्यावयाचा नाही काय ? जी नगरपालिका काँग्रेस, राष्ट्रवादी काँगेस पक्षाच्या ताब्यात आहे त्या नगरपालिकेला पैसे दिले जातात. तुम्ही आमच्या पक्षाच्या ताब्यात असलेल्या एकातरी नगरपालिकेला पैसा दिलेला असेल तर तसे सांगावे ? जर अशा रितीने पैशाचे वाटप होत असेल तर, ते बरोबर नाही. नगरपालिकांना पैसा देत असताना जर पक्षपात होत असेल आणि आम्ही एखाद्या वेळी सभागृहात गोंधळ केला किंवा एखाद्या वेळी आमच्या भावना अनावर झाल्या तर आम्ही नालायक ठरतो. नगर विकास राज्यमंत्री श्री. भास्कर जाधवसाहेब, आपण मला सांगा की, तुम्ही विरोधी पक्षाच्या ताब्यात असलेल्या एकातरी नगरपालिकेला पैसे दिलेले आहेत काय ? तुम्ही सत्ताधारी पक्षाच्या ताब्यात असलेल्या नगरपालिकांना पैसे उपलब्ध करून देता. मग या राज्याच्या तिजोरीवर फक्त तुमचाच अधिकार आहे काय ? आम्ही कर भरत नाही काय ? नावाला दाखविण्यासाठी सुद्धा विरोधी पक्षाच्या ताब्यात असलेल्या नगरपालिकेला पैसे दिलेले नाहीत. मग आम्हाला संताप येणार नाही काय ? शासनाचे हे वागणे बरोबर नाही. म्हणून आम्ही या संदर्भात तीव्र नाराजी व्यक्त करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, नगरपालिका अधिक मजबूत करण्यासाठी अधिक प्रयत्न करणे आवश्यक आहेत. मुंबई महानगरपालिकेला शासनाकडून २०१० पर्यंत आमचे १ हजार ६५ कोटी रुपये येणे आहेत. मुंबई महानगरपालिका फक्त नावाला आहे. इतर सर्व कामे एमएमआरडीएकडे आहेत. मुंबई महानगरपालिकेतील निम्मी कामे एमएमआरडीएमार्फत केली जातात. सर्व योजना तुमच्या, सर्व खोदकामे तुमची, खड्डे तुम्ही खोदायचे आणि नगरपालिकेला दोषी ठरवावयाचे. बाहेरून येणाऱ्या लोकांचे फ्लोटिंग पॉप्युलेशन मोठ्या प्रमाणार आहे, नगरपालिका पाणी का पुरवत नाही, महानगरपालिका पाणी का पुरवत नाही म्हणून

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

महानगरपालिकेला दोष दिला जातो. आज मुंबई महानगरपालिकेची स्वायत्ता धोक्यात आलेली आहे. मला आपण सांगा की, मुंबई महागनरपालिकेचे अधिकार काय आहेत ? फक्त मर्यादित बैठका घेणे आणि त्या संदर्भात कार्यवाही करणे एवढेच अधिकार मुंबई महानगरपालिकेला आहेत. मुंबई शहरामध्ये काहीही घडले तर मुंबई महानरगपालिकेला जबाबदार घरले जाते आणि एमएमआरडीए असो, रेल्वेच्या संदर्भातील कामे असोत किंवा स्काय वॉकच्या संदर्भातील कामे असोत ज्या काही योजना असतील, त्याचे सर्व अधिकार मंत्रालयामध्ये आहेत. सर्व अधिकार तुमच्या नगर विकास खात्याकडे आहेत. तुम्ही महानगरपालिकेला विचारत सुद्धा नाही. आरक्षणाच्या संदर्भातील सर्व अधिकार मंत्रालयामध्ये घेतलेले आहेत. तो अधिकार तुम्ही आता नगरपालिका, महानगरपालिकेला दिलेला नाही. मुंबई शहराच्या विकासाच्या संदर्भातील ज्या योजना तुम्ही आम्हाला सांगत आहात त्या योजनांचा शंभर टक्के लाभ होत नाही, असे चित्र आहे. भ्रष्टाचारासाठी योजना राबविणे एवढेच राज्य सरकारचे काम सुरू आहे. एमएमआरडीएमधील भ्रष्टाचार काढावयाचे म्हटले तर त्या संदर्भात वेगळी चर्चा करावी लागेल.

अध्यक्ष महोदय, एमएसएसआरडीसी आणि एमएमआरडीए या दोन विभागांसाठी राज्याच्या अर्थसंकल्पातील अर्धे पैसे जात असतील आणि एवढी उधळपट्टी होत असेल तर ते बरोबर नाही. हा विषय आज नाही, याची मला कल्पना आहे. आज सकाळी नगर विकास विभागाची लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती. त्यावेळी नगर विकास राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांनी अभ्यास करून उत्तर दिलेले आहे. परंतु अशा प्रकारे गैरव्यवहार होत असतील तर ते दुर्दैवी आहे. मागील अधिवेशनामध्ये सिडकोमध्ये झालेल्या ५० हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराबाबत चर्चा झाली होती. त्या संदर्भातील सर्व कागदपत्रे मी आपल्याकडे दिलेली आहेत. मी बोलल्यानंतर त्या संदर्भातील सर्व कागदपत्रे आपल्या ताब्यामध्ये देत असतो. नगर विकास राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांनी लक्षवेधी सूचनेच्या वेळी बऱ्याचशा गोष्टी मान्य केलेल्या आहेत. घोटाळे झाले, अनियमितता झाली, अनेक अधिकाऱ्यांना निलंबित करतो, अनेकांच्या जागा परत घेतो, ज्यांनी गैरवापर केला त्यांची एनओसी आम्ही रद्द करणार असे त्यांनी सांगितलेले आहे. मग सिडकोसारखी स्वायत्त संस्था शेतकऱ्यांच्या जमिनी घेऊन तेथे इमारती बांधून त्या माध्यमातून असे नफा कमवित असते. त्यातून जर गैरव्यवहार, भ्रष्टाचार होत असतील, त्यामध्ये लिकेजेस असतील तर मला असे वाटते, माननीय मुख्यमंत्री महोदय या ४-५ संस्थांकडे विशेषकरून लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, एमएमआरडीएच्या ज्या प्रकरणांमध्ये अनियमितता झालेली आहे ती ५० प्रकरणे मी तुम्हाला देऊ शकतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वाक्षरी झाल्यानंतर विषय संपतो. मुख्यमंत्र्यांची स्वाक्षरी झाल्यानंतर ना मंत्रिमंडळासमोर जायचे, ना अन्य कोठे जायचे. सर्वोच्च व उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, २५ लक्ष रुपयांपेक्षा जास्त रकमेचा असलेला कोणताही प्रस्ताव मंजुरीसाठी मंत्रिमंडळाकडे गेला पाहिजे. अशा प्रकारे स्वायत्त संस्थांचे २५ लक्ष रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या असलेल्या प्रस्तावासाठी मंत्रिमंडळाकडे न जाता मुख्यमंत्री महोदयांकडे जाणे किंवा संबंधित मंत्री महोदयांनी त्या प्रस्तावाला मान्यता देणे ही बाब चुकीची आहे. यासंबंधी शासनाच्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करून होत असलेला गैरव्यवहार व भ्रष्टाचार थांबवला पाहिजे.

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

अध्यक्ष महोदय, मी यापूर्वी २-३ वेळा सिडकोला भेटी दिल्या होत्या. गेल्या १२ ते १५ वर्षांपूर्वी तेथे अत्यल्प किमतीमध्ये अल्प उत्पन्न गटातील लोकांना घरे देण्यात आली. गेल्या ३ ते ४ वर्षांपासून तेथील घरे पडायला लागली आहेत. गेल्या दीड वर्षात घरांचे स्लॅब पडण्याच्या २३ घटना घडल्या आहेत. अशा प्रकारच्या घटना घडत असल्यामुळे तेथील लोकांना रात्री झोप लागत नाही. त्यांचा जीव धोक्यात आहे. या प्रकरणी माननीय राज्यमंत्री श्री. भास्कर जाधवसाहेब यांनी त्या लोकांची बैठक घ्यावी. लो हाऊसिंग कॉस्ट अंतर्गत तेथील लोकांना मालकी हक्काने घरे दिलेली आहेत. त्या कालखंडात गोरगरीब माणसांनी संपूर्ण आयुष्याची कमाई खर्च करून ५ ते १० लक्ष रुपयांना ती घरे घेतली असणार. अध्यक्ष महोदय, सदर घरे जास्त काळ टिकणार नाहीत. माझी शासनाला विनंती आहे की, शासनाने तेथील घरे पाडून टाकावीत आणि त्याच ठिकाणी २.५ एफएसआय देऊन त्या लोकांना पुन्हा घरे बांधून द्यावीत. १२ ते १५ वर्षांच्या कालावधीत इमारती नादुरुस्त होणार असल्यास, त्यात तेथील लोकांचा कोणताही दोष नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या संदर्भात माहिती घ्यावी. मी या बाबत आपल्याकडे पत्रव्यवहार केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईसारख्या शहरात एसआरए व ३-के घोटाळे झाले. मी या संदर्भात माननीय राज्यपाल व आपल्याकडे ३३ प्रकरणांची यादी दिलेली आहे. यासंबंधी आपण सभागृहात आश्वासन दिले होते. त्यानंतर मी नव्याने २० प्रकरणांची यादी आपल्याकडे दिली. त्या सर्व प्रकरणांची चौकशी सुरू असल्याचे शासनाकडून सभागृहाला सांगण्यात आले होते. या सर्व प्रकरणांची चौकशी वेगाने होणे गरजेचे आहे. याबाबत शासनाकडून कार्यवाही होत असल्याचे दिसत आहे. परंतु वेगाने चौकशी न झाल्यास वर्षानुवर्षे चौकशी प्रलंबित राहते, त्यामधील अनेक अधिकारी सेवानिवृत्त होतात, त्यात सहभागी असलेले अनेक माणसे फरार होतात. परिणामी त्या प्रकरणात सहभागी असलेल्या लोकांविरुद्ध कारवाई करणे अवघड जाते. म्हणून कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्यासंबंधी शासनाने वेगाने चौकशी करण्याची गरज आहे. अध्यक्ष महोदय, मी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे दररोज घोटाळ्यांची प्रकरणे दिली, तरी ती कमीच पडणार आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर राज्यात घोटाळे होत आहेत.

अध्यक्ष महोदय, पोलिसांना देण्यात येणाऱ्या घरांच्यासंदर्भात त्यांचा किती छळ होतो याची काही उदाहरणे मी सभागृहाला देतो. येरवडा येथे पोलिसांच्या घरांसाठी जागा देण्यात आली होती. त्याचप्रमाणे मुंबई येथे वसुंधरा हौसिंग सोसायटीमध्ये सामान्य पोलिसांसाठी जागा आरक्षित होती. ही मध्यवस्तीतली जागा होती. ती आयपीएस अधिकाऱ्यांच्या नजरेत भरली. परिणामी तेथील जागेवर पोलिसांचे आरक्षण रद्द होऊन त्या जागी आयपीएस व आयएएस अधिकाऱ्यांसाठी इमारती बांधण्यात आल्या. यासंबंधी सर्वसामान्य पोलीस शासनाकडे आशेने बघत आहे. शासनाने पोलीस हौसिंग सोसायटीसाठी आरक्षित प्लॉट ठेवला होता. त्यांच्यासाठी घर असावे अशी त्या कालखंडात शासनाची भावना होती. असे असताना सुद्धा पोलीस अधिकाऱ्यांनीच सर्वसामान्य पोलिसांसाठी आरक्षित असलेल्या जागेवर स्वत:साठी इमारती बांधल्या. अध्यक्ष महोदय, तेथील एक-एक फ्लॅट ३,५०० ते ६,००० चौरस फुटांपर्यंत आहे. तेथे मोठमोठे

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

दोन प्लॉट एकत्र केलेले आहेत. यासाठी कोणाकडून परवानगी दिली जाते ? या प्रकरणी आयएएस व आयपीएस अधिकारी असल्यामुळे त्यात कोण हात घालणार ? या प्रकरणी मांजराच्या गळ्यात कोणी घंटा बांधायची ? असा महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रकरणी चौकशी करायची झाल्यास, त्यांच्यामार्फतच केली जाणार.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरातील पोलीस वर्षानुवर्षे बीडीडी चाळीत राहत आहेत. तेथील घरांची स्थिती अतिशय वाईट आहे. लाथ मारली की, तेथील भिंती पडायला लागल्या आहेत. माझी अशी मागणी आहे की, या संदर्भात पुनर्विकासाचे प्रस्ताव तयार करणे आवश्यक आहे. तसेच ज्या ठिकाणी वर्षानुवर्षे पोलीस वसाहती आहेत, त्यांच्यासाठी पुनर्विकासाचे प्रस्ताव तयार करून त्यांच्या हौसिंग सोसायट्यांसाठी शासनाने जागा उपलब्ध करून देणे, त्यातील एफएसआय वाढवून त्यांना शासकीय खर्चाने किंवा कमी खर्चात घरे बांधून देणे आवश्यक आहे. या संदर्भात अत्यल्प गटासाठी घरे बांधून त्यात पोलिसांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. सध्या पोलिसांना राहण्यासाठी जागा नाही. सामान्य प्रशासन विभागाचे प्रमुख या नात्याने मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विचारू इच्छितो की, शासनाने विविध योजनेच्या माध्यमातून ज्या लोकांना जागा दिली, तेथे त्यांनी हौसिंग सोसायटी तयार करून फ्लॅट बांधले. परंतु तेथे ते राहण्यास गेले नाहीत. सदर फ्लॅट शासनाच्या योजनेतून घेतलेला असेल तर तो अधिकारी सरकारी क्वॉर्टरमध्ये कसा काय राहू शकतो ? जर त्याला स्वत:चे घर असेल तर त्याने विनाकारण सरकारी क्वॉर्टर अडकवू नये. असे कितीतरी अधिकारी आहेत की, ज्यांनी शासनाची जमीन घेऊन सोसायट्या बांधलेल्या आहेत. त्या सोसायट्यांमधील घरे त्यांनी इतरांना भाड्याने दिलेली आहेत. असे अनेक अधिकारी सरकारी क्वॉर्टरमध्ये वास्तव्य करीत आहेत. वसुंधरा सोसाटमधील काही अधिकाऱ्यांनी ३ लाख रुपयांच्या भाड्यावर आपली घरे इतरांना दिलेली आहेत आणि तेच अधिकारी सरकारच्या क्वॉर्टरमध्ये राहत आहेत. असे अधिकारी शोधून काढून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई केली पाहिजे. अशा अधिकाऱ्यांच्या विरोधात कोणी बोलायला तयार होत नाही. त्यामुळे त्यांचे आज फोफावत चालले आहे. एखाद्या कनिष्ठ दर्जाचा अधिकारी, क्लार्क किंवा शिपाईची अशा प्रकारची तक्रार आली तर त्याला लगेच निलंबित केले जाते. परंतु मोठ्या अधिकाऱ्यांविरुद्ध हात लावायला कोणी तयार होत नाही. या संदर्भात शासनाचे नुकसान होऊ नये याकरिता योग्य ती पाऊले उचलण्याची गरज आहे. या संदर्भात नियम असतील तर अधिकाऱ्यांनी त्याचे काटेकोरपणाने पालन करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, मी दोन प्रकरणांची माहिती माननीय मुख्यमंत्री महोदयांना देणार आहे. येरवडा शांतीरक्षक पोलीस कर्मचारी सहकारी गृहरचना ही पुण्यातील संस्था आहे. त्या ठिकाणी पोलिसांसाठी घरे बांधून देण्याचे ठरविण्यात आलेले आहे. येरवडा, पुणे येथील सर्व्हे क्रमांक १९१ या शासकीय जमिनीवर १२ एकर जमीन ७०४ पोलीस कर्मचाऱ्यांसाठी येरवडा शांतीरक्षक पोलीस कर्मचारी सहकारी येथील जमीन देण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी गृह प्रकल्प उभा करण्यात आलेला आहे. त्या ठिकाणी पोलीस राहण्यासाठी सुद्धा गेलेले आहेत. या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पूर्वेस असलेल्या सर्व्हे नंबर १८६ ही जमीन श्री. होमी डल्लास नावाच्या इसमाची होती. युलसीअंतर्गत १९७६ मध्ये त्यातील बरेचसे मोठे अतिरिक्त क्षेत्र घोषित करण्यात आले होते. श्री. होमी डल्लास यांनी दिनांक ९ जुलै १९८२ रोजी

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

सदर मिळकतीचे कूळ मुखत्यारपत्र... हे मी पूर्ण वाचून सभागृहाचा वेळ घेणार नाही. हे प्रकरण खूप मोठे आहे. या प्रकरणामध्ये २.५ हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार त्यांनी केलेला आहे. या संदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे, उतारे, प्लॅन, नकाशे वगैरे माहिती मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना देणार आहे. या लोकांनी युएलसीची बनावट कागदपत्रे तयार केलेले आहेत. ती माहिती सुद्धा मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना देणार आहे. संबंधितांनी त्या ठिकाणी अवैध आणि नियमबाह्य बांधकामे केलेली आहेत. त्या ठिकाणी एक नाला होता. एखादा प्लॅन करताना किमान ९ मीटरचा रस्ता असला पाहिजे असा नियम आहे. परंतु त्या ठिकाणी ९ मिटरचा रस्ता नव्हता. चारही बाजूस कोणताही रस्ता नव्हता, त्या ठिकाणी नव्याने रस्ता निर्माण करावयाचा होता.

अध्यक्ष महोदय, पुणे महानगरपालिकेतील श्री. प्रशांत वाघमारे यांचा एकूण २१ प्रकरणांमध्ये सरळ सरळ संबंध आहे. त्याची सर्व माहिती माझ्याकडे आहे. पण त्याला हात लावण्याची कोणाचीच हिंमत होत नाही. संबंधित अधिकाऱ्याने नैसर्गिक नाला बुजाविण्यात मोठी भूमिका बजावलेली आहे. हौसिंग सोसाटीला जोडून जागा उपलब्ध नाही, पण ९ मिटरच्या रस्त्यातून त्याने प्लॅन मंजूर केलेला आहे. परिणामी शेजारच्या सोसायटीने नाला बुजविला म्हणून कोर्टात धाव घेतली होती. माननीय न्यायालयाने सदर नाला पूर्ववत करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे आता पुन्हा तो नाला पूर्ववत करण्याची वेळ महानगरपालिकेवर आलेली आहे. परिणामी आता पोलिसांची घरे तोडण्याची पाळी महानगरपालिकेवर येणार आहे. हे प्रकरण खूप मोठे आहे. या प्रकरणामध्ये २.५ हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार त्यांनी केलेला आहे. यामध्ये फक्त १२ एकर जमिनीवर पोलिसांसाठी घरे बांधलेली आहेत. त्याच्या शेजारची जमीन युएलसीअंतर्गत दाखवून अतिरिक्त जमीन घोषित करून बनावट कागदपत्रे तयार केलेली आहेत. हे प्रकरण मी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे पाठविणार आहे. या संदर्भातील १९९३ पासूनची आवश्यक ती कागदपत्रे माझ्याकडे असून मी त्यांना देणार आहे. माझे म्हणणे असे आहे की, या संदर्भात चौकशी करणे आवश्यक आहे. आता जी कामे सुरू आहेत, ती ताबडतोब थांबवली गेली पाहिजेत. तसेच आपली इच्छा असेल तर श्री. प्रशांत वाघमारे या अधिकाऱ्याची चौकशी करावी. पुण्यातील येरवडा जेलच्या जागेच्या संदर्भात देखील मी यापूर्वी पुराव्यानिशी माहिती दिली आहे. त्याचप्रमाणे मी या प्रकरणाची देखील पुराव्यानिशी माहिती दिली आहे. ज्या ठिकाणी जमिनीच नाही, त्या ठिकाणी प्लॅन मंजूर कसे होतात ? या अधिकाऱ्यांना केवळ सस्पेंड न करता बडतर्फ केले पाहिजे. त्यांना जेलमध्ये टाकले पाहिजे. त्यांना असलेले राजकीय संरक्षण मोठे आहे. कवचकुंडले असणारी ही माणसे आहेत. कवचकुंडलांशिवाय पुणे शहरामध्ये अधिकारी काम करू शकत नाहीत. कोणा मोठ्या माणसाचा आशीर्वाद असल्याशिवाय तेथे अधिकारी टिकत नाहीत. पुण्यामध्ये कोणाच्या इच्छेविरुद्ध अधिकारी वागायला लागले तर तत्काळ त्यांना घरी जावे लागते. हे मी सांगत नाही. संपूर्ण पुणे शहरात अशीच परिस्थिती आहे. तेथील लोक हे सांगत आहेत. तेथील अधिकारी मुजोर झाले आहेत. त्यांच्यावर शासनाने कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]

अध्यक्ष महोदय, ज्या ठिकाणी नियमबाह्य काम झाले असेल, कमर्शियल इमारती बांधल्या असतील, विकासकाने सभासदांना गृहनिर्माण संस्था स्थापन करून दिली नसेल, तर त्या संदर्भात तातडीने कारवाई करण्याच्या सूचना शासनान दिल्या पाहिजेत. अध्यक्ष महोदय, मी आपल्याला या प्रकरणाच्या संदर्भातील सर्व कागदपत्रे व पुरावा यांचे पेपर्स पाठवतो. त्याबाबत आपण तातडीने चौकशी करावी व सर्वसामान्यांचे होणारे नुकसान थांबवावे. बनावट कागदपत्रे तयार करून ज्यांनी घोटाळा केलेला आहे. त्यांच्यावर तत्काळ कारवाई करावी, अशी मी या ठिकाणी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये अशाच प्रकारचा जमीन घोटाळा झालेला आहे. श्रीपती ग्रुप ऑफ मुंबई, लोअर परेल डिव्हिजन, १४४ टेनंटस येथील मुंबई विकास नियमावली, ३३(९) अन्वये पुनर्विकासाचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेतील उच्चाधिकार समितीसमोर सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव उच्चाधिकार समिती, म्हाडा, नगर विकास विभाग यांच्याकडे आला. सर्वांनी त्या संदर्भात निगेटिव्ह मत व्यक्त करून अधिक माहिती सादर करण्यात यावी, असे शेरे दिले. माझ्याकडे या संदर्भात माहिती उपलब्ध आहे. सही, शिक्क्यानुसार ही सर्व माहिती मी आपल्याला देणार आहे. तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांच्या कार्यालयातील सचिवांनी या प्रस्तावाच्या संदर्भात अधिक माहिती देण्याची आवश्यकता आहे, असे लिहिले. हा मोठा घोटाळा आहे. मात्र वेळ कमी असल्यामुळे, मी सर्व डिटेल्स या ठिकाणी सांगणार नाही. तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांच्या कार्यालयात हा प्रस्ताव आला, त्यावेळी त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते. '३-के' संदर्भात परवानगी देता येणार नाही. यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री कार्यालयाकडे प्रस्ताव आल्यानंतर नगर विकास विभागाचे उपसचिव यांनी " संख्यानिहाय ४४ टक्के व क्षेत्रनिहाय असून ३५ टक्के जमीनमालकांनी संमती असून उर्वरित मालमत्ता मुंबई महानगरपालिका व म्हाडा यांच्या मालकीची आहे. त्यांची संमती प्राप्त झाल्यानंतर ७० टक्के संमतीबाबतची पूर्तता करणे शक्य आहे." असे त्यावर नमूद केले. मात्र यामध्ये ७० टक्के संमतीपत्र नव्हते. जे होते त्या पैकी काही बनावट संमतीपत्र होते. ते एलओआयची मागणी करीत होते. ७० टक्के संमतीपत्र असल्याशिवाय एलओआय देता येत नाही. त्यादृष्टीने ही सर्व कागदपत्रे पूर्ण नव्हती. जी जमीन होती, तेथे काही वाद होता. मुख्यमंत्री कार्यालयाकडे हे प्रकरण आले. मुख्यमंत्री कार्यालयातील सचिवांनी त्यावर असे नमूद केले होते की, या संदर्भात अधिक माहिती मागविण्यात यावी. अधिक माहिती मागविण्याकरिता ही फाईल मुख्यमंत्री कार्यालयातून परत गेली. हा सर्व आताचा विषय नाही. मागील कार्यकाळातील हा विषय आहे. यानंतर नगर विकास विभागाच्या सचिवांनी अधिक माहिती जमा करण्यासाठी एक पत्र दिले. त्या वेळात काय झाले माहीत नाही. पुन्हा नगर विकास विभागाच्या सचिवांकडून सदर फाईल मुख्यमंत्री कार्यालयाकडे मागविण्यात आली. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, "कागदपत्रे येत राहतील. जी त्रुटी आहे, ती पूर्ण करता येईल. आता एलओआयकरिता परवानगी देण्यात यावी." म्हणजेच कोणत्याही कागदपत्रांची पूर्तता केलेली नसताना, त्रुटी पूर्ण केलेल्या नसताना देखील मुख्यमंत्री कार्यालयातून एलओआयकरिता परवानगी देण्यात आली. ७० टक्के संमतीचे पत्र नाही, तसेच ३-केच्या संदर्भात नेमके किती जमिनींवर रिझर्व्हेशन आहे, तेथे किती घरे आहेत, किती व्यक्ती आहेत, हे जोपर्यंत ठरत नाही तोपर्यंत एलओआय देता येत नाही. मात्र या प्रकरणामध्ये एलओआय

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

देण्यात आला. हा एलओआय कसा देण्यात आला ? "सदर बाबीची तसेच मालमत्तेच्या पात्रतेविषयीच्या बाबींची पूर्तता करून घेणे आवश्यक राहील " या अटींवर एलओआय देण्यात आला. माझ्या पाहण्यामध्ये अशा प्रकारे अटींची पूर्तता न करताच एलओआय देण्यात आल्याचे हे एकमेव उदाहरण आहे. तू आज एलओआय घेऊन जा व नंतर अटींची पूर्तता करत बस, असे कधी होत नाही. असे नियमात व कायद्यातही नाही. परंतु, ७० टक्के मालकांची संमती, क्लस्टरमध्ये समाविष्ट असलेल्या इमारतींची पात्रता, उच्चस्तरीय समितीचे स्पष्ट अभिप्राय, क्लस्टरमध्ये समाविष्ट महानगरपालिका, म्हाडाच्या जमिनीबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र याविषयी काहीही न करता अभिप्राय दिला. दिनांक २१ मे २०१० रोजी माननीय मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेसाठी तो प्रस्ताव गेला होता. यामध्ये माजी माननीय मुख्यमंत्र्यांनी काही अटी व शर्तींच्या अधीन राहून त्यास मान्यता देऊन, नविवि पत्र क्रमांक टीडीबी-४३०९/२९८४/सीआर/२८२/०९/युडी-११ नुसार हा एलओआय देण्यात आला. पण त्या भाडेकरूंना श्रीपती बिल्डरचा फार वाईट अनुभव आला. गिरगाव येथे पिंपळवाडीच्या संदभार्मध्ये अशा स्वरूपाच्या प्रस्तावाला त्याला मान्यता दिली होती. मागच्या कालखंडामध्ये एक वर्षापूर्वी पिंपळवाडीचा विषय या सभागृहात मांडण्यात आला होता. इमारती वगैरे तेथे बांधण्यात आल्या. परंतु, तेथील रहिवाशांना याने घरे दिली नाहीत. सभागृहात याबाबत असा निर्णय झाला होता की, तेथील १३४ गाळेधारकांना प्रत्यक्ष घरे दिल्याशिवाय त्याला ऑक्युपन्सी सर्टिफिकेट देण्यात येऊ नये. १३४ गाळेधारकांना त्याने या क्षणापर्यंत घरे न देता हाकलून दिले. उलट दांडगाई केली, गुंड आणले, त्यामुळे मारामाऱ्या झाल्या, पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी झाल्या. अशा प्रकारे तो ब्लॅकलिस्टेड बिल्डर आहे. तेथील गरीब लोकांना तो घरे देईल यावर विश्वास कितपत ठेवायचा. तुमच्या रेकॉर्डला जर त्याचा अनुभव वाईट आहे तर त्याला कामे का दिली जावीत ?

माझी आजही विनंती आहे की, अशा स्वरूपाच्या व्यक्तींना ऑक्युपेशन सर्टिफिकेट देऊ नये की, जे भाडेकरुंना त्रास देतात. त्याच्यापेक्षा वादाचा मुद्दा म्हणजे यातून जवळपास ४,००० कोटी रुपयांची हानी राज्य शासनाची होणार आहे. अजून हा प्रकल्प अर्धवट आहे, अजून तो पूर्णत्वास आलेला नाही. माझी विनंती आहे की, अशाप्रकारच्या प्रकल्पांना स्टे दिला पाहिजे. एवढा मोठा आकडा मी सांगतो आहे, त्यामुळे यामध्ये आठ दिवस आणखी उशीर झाला तरी चालेल. पण या संदर्भात चौकशी करून प्रथमदर्शनी तथ्य आढळले तर तो ताबडतोब बंद केला पाहिजे. सरकारचे यामध्ये जे काही नुकसान होते आहे ते थांबले पाहिजे. हा जो श्रीपती ग्रुप ऑफ बिल्डर हा तेथील लोकांना सदनिका देईलच याची गॅरंटी राहिलेली नाही, कारण मागचा अनुभव पाहता तेथील लोकांनाही त्याने सदनिका दिलेल्या नाहीत. त्या त्याला द्यायला लावल्या पाहिजेत. गिरगावातील पिंपळवाडी, झाववाबाडी हा मराठी वस्ती असलेला भाग आहे. मराठी लोकांचा आहे. तेथे यांच्या ज्या चाळी होत्या, त्या चाळींच्या जागेवर हे बांधकाम होते आहे.

हळूहळू मुंबईसारख्या शहरामध्ये मराठी माणूस मुंबईच्याबाहेर जात आहे. मुंबई शहरामध्ये मराठी माणसाचे अस्तित्व राहिलेले नाही. मलबार हिलमध्ये शिवमंदिरापर्यंत खाली मराठी लोकांच्या चाळी होत्या. तेथे मराठी लोक राहत होते. हळूहळू मराठी लोक चाळी काढत गेले, तेथे बिल्डर येत गेले.

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

तेथील लोक काही पैशांचे प्रलोभन दिल्यामुळे गेले तर काही आमच्यामुळे गेले. पण आज मुंबई शहरामध्ये जर अशा ठिकाणी तुम्ही आमच्या हक्काच्या मालकीचा एकएक गाळाही त्यांना देणार असाल तर सगळया बिल्डरांचे भले करण्यासाठी आमची मुंबई आहे, की मराठी माणसांसाठी आहे असा प्रश्न निर्माण होतो.

महाराष्ट्रामध्ये सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मराठी माणसाचे अस्तित्व राहिले पाहिजे ही काळजी घेतली पाहिजे. नुसत्या मराठी भाषेचा विस्तार करून चालणार नाही. या महाराष्ट्रातील व प्रामुख्याने मुंबईतील मराठी माणूस जीवंत राहिला पाहिजे, एवढेतरी आपल्याला करावे लागेल. कापड गिरण्या बंद पडल्या, गिरणी कामगार मेला, चाळी ओसाड पडल्या, रोजगारासाठी बाहेर जायला लागला, अशा प्रकारे मराठी माणूस जर हद्दपार होत राहिला, तर उद्याच्या कालखंडामध्ये हुतात्मा स्मारकाजवळ छोटीशी जागा शोधावी लागेल व तेथे महाराष्ट्रीय मराठी माणसाचा एखादा पुतळा उभारून त्याच्या खाली एक पाटी लावावी लागेल, " हा मराठी माणूस या मुंबईमध्ये कधी तरी राहत होता."

अध्यक्ष महाराज, अशी वेळ येऊ नये महाराष्ट्रात मराठी म्हणून जगत असताना मराठीपणा जपला पाहिजे, याची शासनाने जबाबदारी घेतली पाहिजे. हे जे व्यक्ती आहेत, त्याबाबत माझी विनंती आहे की, क्लस्टर डेव्हलपमेंटच्या प्रस्तावामध्ये अशी कुठेतरी शंका आली, तरी त्याला स्थगिती दिली पाहिजे. मी हे असेच बोलत नाही, माझा असा विश्वास आहे आणि मी याबाबत पूर्ण अभ्यास करूनच बोलतो आहे. कुणाही उत्कृष्ट, योग्य व्यक्तीला हे काम देण्यात यावे आणि ही दोन्ही प्रकरणे मी आपल्याकडे पाठवित आहे. माझी या संदर्भात विनंती आहे की, आपण याविषयी तातडीने चौकशी करून या राज्यातील होणारे घोटाळे व नुकसान टाळले पाहिजे. येथे फार मोठ्या प्रमाणावर घोटाळे होत आहेत, हे घोटाळे टाळण्यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, सामान्य प्रशासन विभाग आणि नगर विकास विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना माझी अशी अपेक्षा आहे की, गाव व जिल्हा पातळीवरील यंत्रणा मजबूत करण्याची आवश्यकता आहे. जिल्हा कार्यालयामध्ये मराठी भाषेची अंमलबजावणी करण्यासाठी एखादे छोटे टेबल असावे. हे टेबल जिल्हा कार्यालयामध्ये मराठी भाषेची अंमलबजावणी होते किंवा कसे, याची पाहणी करील. कारण आमच्यापर्यंत जी कागदपत्रे उपलब्ध होतात ती इंग्रजीमधून असतात. ही कागदपत्रे इंग्रजीतून असल्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना ती समजत नाहीत. आपण सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून काही चांगल्या गोष्टी केलेल्या आहेत. आपण मोबाईलवर शेतकऱ्यांना माहिती देण्याची भूमिका घेतली. परंतु ही यंत्रणा चांगल्या प्रकारे राबविली न गेल्यामुळे शेतकऱ्यांना माहिती उपलब्ध होत नाही. तेव्हा या संदर्भात कार्यवाही व्हावी.

अध्यक्ष महाराज, मी आपल्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मी आपल्याकडे दोन-तीन प्रकरणे दिलेली आहेत, त्याबाबत योग्य ती कारवाई करावी. मी या ठिकाणी दररोज प्रकरणे काढण्यापेक्षा ती मी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे देतो. माझ्याकडे मुंबई आणि पुणे शहरातील २६ मोठी प्रकरणे आहेत. त्यावर किती बोलायचे, किती सांगायचे, शेवटी माझ्यावर शिक्का बसेल.

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

मी या संदर्भातील सर्व कागदपत्रे माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे देतो. मी दिलेल्या माहितीमध्ये काही चूक असेल तर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आमच्या निदर्शनास आणावे. मी आपणाकडे जी कागदपत्रे देणार आहे, ती सर्व कागदपत्रे माहितीच्या अधिकाराखाली मिळविली आहेत. या कागदपत्रांवर सरकारची सही व शिक्का आहे. त्यामध्ये एकही ओळ मी स्वत: लिहिलेली नाही. तेव्हा या संदर्भातील चौकशी माननीय मुख्यमंत्र्यांनी करावी आणि हे घोटाळे कुठेतरी थांबवावेत, अशी विनंती करून माझे भाषण पूर्ण करतो.

**श्री. बाबा सिद्दिकी** (बांद्रा-पश्चिम) : अध्यक्ष महोदय, मैं सन २०११-२०१२ के बजट पर बोलते हुए सामान्य प्रशासन विभाग, नगर विकास विभाग और गृहनिर्माण विभाग की अनुदान मांगों पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हुआ हूं. अध्यक्ष महोदय, मैं सर्वप्रथम मुख्यमंत्री महोदय से कहना चाहूंगा कि "Justice delayed is Justice denied." मुझे याद है कि पिछले साल यही बजट अधिवेशन था और मैंने मुंबई महानगरपालिका में कचरे के संबंध में हुए भ्रष्टाचार की बात उठाई थी. इसकी कुछ अधिक जानकारी मेरे पास है, वह मैं इस सदन के सामने रखना चाहूंगा. अध्यक्ष महोदय, मैंने मुख्यमंत्री जी को इस संबंध में ७ दिसम्बर को पूरी जानकारी दी थी एवं संबंधित सचिव को भी इसकी पूरी जानकारी दी थी. मैंने यह भी कहा था कि अगर आपको इसकी जांच में मेरी मदद चाहिए तो आप मुझे बुला सकते हैं. मैं कहना चाहूंगा कि आज एक साल हो गया है लेकिन मुंबई के नागरिकों को न्याय नहीं मिला है. मैंने पहले कहा था कि यह मामला ४ हजार ४०८ करोड़ रुपये का है, वह अब बढ़कर ९ हजार करोड़ रुपये का हो गया है. इसकी जानकारी मैं आपको देना चाहता हूं. इसमें सिस्टमेटिकली भ्रष्टाचार किया गया है.

अध्यक्ष महोदय, सम्माननीय सदस्य श्री शशिकांत शिंदे जी भी उस समय बता रहे थे कि आईएलएफएस ने शुरु में कहा कि इसमें टिपिंग फी नहीं होगी लेकिन बाद में इस टिपिंग फी को बढ़ाया गया. श्री जयराज फाटक उस समय म्युनिसिपल कमिश्नर थे, उन्होंने एवं स्टेंडिंग कमिटी ने इस बात को रिजेक्ट किया था. मैं भी दो बार नगर सेवक रह चुका हूं. मैं भी स्टेंडिंग कमिटी में रह चुका हूं. यह आईपीएल से भी बड़ा घपला है. पहले आटे में नमक की बात की जाती थी परन्तु यहां तो नमक में आटा हो गया है. स्टेंडिंग कमिटी में एक आदमी अनुपस्थित होता है और इस अनुपस्थिति के संबंध में कानून में यह प्रोवीजन है कि आप उसका मुद्दा दोबारा उठा सकते हैं और उस मामले को रिओपन कर सकते हैं. इस प्रकार से यह मामला रिओपन किया गया. यह किस शख्स ने किया और उसकी क्या मंशा थी, इसकी जानकारी मैंने पहले ही इस सदन को दी है. अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री जी प्रधान मंत्री ऑफिस में मंत्री रहे हैं. सौभाग्य से इनका नाम पृथ्वीराज जी है, इसका मतलब आप पृथ्वी पर राज करेंगे. मुंबई की जनता को आपसे बहुत अपेक्षायें है. मैं मुख्यमंत्री जी से कहना चाहूंगा कि पिछले एक साल से ९ हजार करोड़ रुपये के भ्रष्टाचार का मामला प्रलंबित है. मेरी ऐसी जानकारी है कि श्री. अजय सक्सेना नाम के आदमी के पास इस मामले को जांच करने के लिए दिया गया है जो एशिया डेवलपमेंट बैंक का मुखिया है. मैं समझता हूं कि जो म्युनिसिपल कॉर्पोरेशन होती है, उसका व्यवहार भी होता है और हमारे बाबुओं के साथ में भी उनका व्यवहार होता है, इसलिए इसमें कॉन्फ्लिक्ट्स ऑफ इंट्रेस्ट आ सकता

[ श्री. बाबा सिद्दिकी ]

है, ऐसा मुझे लगता है. मेरी मुख्यमंत्री जी से मांग है कि यह जो ९ हजार करोड़ रुपये का घपला है इसकी एसआईटी के द्वारा जांच होनी चाहिए. इस मामले की जब तक एसआईटी के द्वारा जांच नहीं होगी तब तक इसका कोई फायदा नहीं होगा. मैं समझता हूं कि माननीय विरोधी पक्ष नेता श्री खडसे साहब भी इसकी सहमति देंगे क्योंकि वह भी भ्रष्टाचार को खत्म करने की बात करते हैं. भ्रष्टाचार कहीं पर भी हो परन्तु उसको उजागर करना जितना मेरा काम है उतना ही उनका भी काम है. सम्माननीय खडसे साहब ने इस मुद्दे पर कभी कुछ नहीं कहा है, इसका मुझे अफसोस रहेगा.

अध्यक्ष महोदय, मैं यहां पर एक बात और बताना चाहता हूं कि एमसीजीएम में रेम्की नाम की एक संस्था ने भी टेंडर भरा था. उसको डिस्क्वालिफाई कर दिया गया. उससे कहा गया कि आप गेंट्रीकेन्स यूज कर रहे हो आपको विंट्रोटर्नर यूज करना चाहिए था मगर आरएफक्यू में यह बात कहीं भी नहीं लिखी गई थी. मैं यहां कहना चाहूंगा कि जब कोई कांड होता है तो जो मुजरिम होता है वह अपना कोई न कोई सुराग छोड़ जाता है. म्युनिसिपल कॉर्पोरेशन ने २० करोड़ रुपये में यह मशीन इम्पोर्ट की थी. जब यह मशीन इम्पोर्ट की थी तो यह बात आरएफक्यू में क्यों नहीं लिखी गई. इसके साथ ही रेम्की से इस बारे में चर्चा भी नहीं की गई. रेम्की से कहा गया क्योंकि टेक्नीकल स्टैन्डर्ड की कंडीशन थी कि २६ प्रतिशत टेक्नीकल बिडर के पास होना चाहिए तो जो सेन दिएगो की कंपनी थी उसके पास वह १५ प्रतिशत था, उसको कहा गया कि ४ दिन में इसकी इक्विटी २६ प्रतिशत करके आईए. यह कहावत ऐसी थी कि न वह यह कर सकेंगे और न यह काम होगा. जब उन्होंने १६ मई को यह करके दिया तो उनसे कहा गया कि आप नॉन रेस्पॉंसिव हो और अब यूपीएल कंपनी का एक ही टेंडर बचा है. मैं यहां बताना चाहता हूं कि जब कोई बाबू या अन्य कोई आदमी भ्रष्टाचार करता है या कोई कांड करता है तो उसकी दिलेरी की भी दाद देनी चाहिए. यह जो कॉंट्रेक्ट है वह यूपीएल, एमबीएसी, पीओएबीएस कंसोटियम को मिला और उसको कहा जाता था एसपीवी. मगर मेरे पास लेटर है कि उसको लेटर ऑफ एक्सेप्टेंस नहीं मिला है. लेटर ऑफ एक्सेप्टेंस तडवा ग्लोबल एन्वायर्नमेंट को मिला है. मैं मुख्यमंत्री जी से कहना चाहूंगा कि मेरी ऐसी जानकारी है कि आपने दो-चार दिन पहले पूना के किसी केस में कोई स्टे दिया है कि इसके पीछे कौन है, जैसे २-जी के पीछे कौन है और आगे कौन है ? इसी तरह का यह कांड है. तडवा ग्लोबल एन्वायर्नमेंट को लेटर उसमें ऑफ एक्सेप्टेंस दिया गया. पीओएबीएस और एमबीएसी नाम की कोई कंपनी नहीं है तो स्पेशल परपज वेहिकल का उसमें महत्त्व ही खत्म हो गया. यह देवनार की बात हो गई.

अध्यक्ष महोदय, मैं अब मुलुंड के बारे में बताना चाहूंगा. मुलुंड में विनी नाम की कंपनी से महानगरपालिका का एमओयू हुआ था. इसमें टिपिंग फी नहीं थी. मैं सदन को यह अधिक जानकारी देना चाहता हूं. इस कंपनी को हटाया गया और वह काम यूपीएल को दिया गया और ६५० करोड़ रुपये भी उनको दिये गये. एमओयू होने के बावजूद भी उस कंपनी का काम रद्द किया गया. मैं जानना चाहता हूं कि ऐसा किस अधिकारी ने किया और इसकी भी जांच होनी चाहिए.

**[ श्री. बाबा सिद्दिकी ]**

अध्यक्ष महोदय, आईएलएफएस के बारे में बोलते हुए कहना चाहूंगा कि मुंबई महानगरपालिका में सबसे बड़ा भ्रष्टाचार कंसल्टेंसी का है. आईएलएफएस ने टिपिंग फी के नाम पर ४० रुपये मेट्रिक टन की बात की. उसके बाद में १५१ रुपये की बात की. हमारा कहना है कि टिपिंग फी नहीं होनी चाहिए और यह बात मैंने पहले भी कही है. इसके बाद स्टेंडिंग कमिटी में २७६ रुपये प्रपोज हुए और ५१५ रुपये के हिसाब से पेमेन्ट किया गया. यहां पर दिलेरी की भी हद हो गई. कहां से शुरु हुआ और कहां पर खत्म हुआ. हम बिहार और यू.पी. की बात करते हैं लेकिन मुझे लगता है कि हमें अब शर्म आनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, कांजुरमार्ग के मामले में ४ हजार ४०८ करोड़ रुपये का भ्रष्टाचार हुआ है. Builder Technology is not approved by Central Pollution Control Board *i.e.* CPCB. आज तक सीपीसीबी एवं महाराष्ट्र पोल्यूशन कंट्रोल बोर्ड ने इसको एप्रूव नहीं किया है और यह काम एंटोनी नाम की कंपनी को टिपिंग फी के साथ दिया गया है. मैं मुख्यमंत्री महोदय से मांग करता हूं कि वह तुरन्त इस टेंडर को रद्द करें और एसआईटी के मार्फत इसकी जांच करवायें.

अध्यक्ष महोदय, आज हम सभी लोगों ने मिलकर एक प्रस्ताव पास किया. भारत ने वर्ल्डकप जीता तो हम सभी को खुशी हुई. लेकिन एक छोटी सी बात सम्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस जी ने और अन्य वरिष्ठ सम्माननीय सदस्यों ने भी उस बात को यहां रखी है. मैं आपको बताना चाहता हूं कि कुछ बाबु लोगों के सेडीझम की बात हुई है. श्री. सचिन तेंदुलकर जी ने जो काम वर्ल्डकप के संबंध में किया उसके लिए पूरा विश्व ने वाह वाह कर रहा था. श्री. सचिन तेंदुलकर को चाहे वह चीज दे दो. लेकिन जो चीज उसको चाहिए, वह चीज यदि आप उसको नहीं दोगे तो उसका दिल टूट जाएगा. आपको उसके लिए जो करना है, वह चीज कानून में है. ऐसी बात नहीं है कि कानून का उल्लंघन हो रहा है. श्री. सचिन तेंदुलकरने केवल २०० स्क्वेअर फीट फ्री एफएसआई जगह मांगी है. दिनांक १७ जून २००४ का जो मूल आदेश है, वह मैं आपको पढ़कर दिखाता हूं. " रहिवासी वापरास इमारतींना फिटनेस सेंटर वितरित होण्याच्या दृष्टीने सदर वापर फ्री ऑफ एफएसआई सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार अनुज्ञेय करण्यात यावा." मगर हमारे जो बाबू लोग होते है, वे कहते है, हम सुप्रीम है. "Area of fitness centre should be in Co-operative Housing Societies or Apartment Owners Association." माननीय मुख्यमंत्री जी, इस विषय में ज्यादा फेरबदल करने की आवश्यकता नहीं है. क्योंकि यह दो प्रतिशत या २०० स्क्वेअर फीट की बात है. मैं समझता हूं कि यह तो कंडोमोनियम को भी दिया जाता है. अगर आवश्यक हो तो एक छोटा सा अमेंडमेंट कर के कि प्लॉट के एरिया का होगा... तो मैं समझता हूं कि श्री. सचिन तेंदुलकर की छोटी सी मांग है, इस बारे में वे स्वयं कहेंगे भी नहीं. लेकिन हम सब को भी कुछ शर्म आनी चाहिए. आप इस बारे में अमेंडमेंट कर लोगे तो मैं आपका आभार मानूंगा.

**[ श्री. बाबा सिद्दिकी ]**

अध्यक्ष महोदय, एक विषय हमारे सहयोगी सम्माननीय सदस्य ने उठाया. यह विषय इतना अच्छा है और इससे पता चलता है कि इसमें कैसी सांठगांठ होती है. कुछ पेपर्स आपको दिए जाते है. कुछ पेपर्स हमको दिए जाते है और हम लोग आपस में लड़ते रहते है और लोग मजा लेते है. यह सोचने का विषय है. आज मैं यह सोचता हूं कि हम लोगों को कानून पास करना है या नहीं ? यह एक गंभीर और चिंता का विषय है. तत्कालीन मुख्यमंत्री श्री अशोक चव्हाण जी के कार्यकाल में जब हमने एमआरटीपी ॲक्ट में अमेंडमेंट किया कि ०.३३ एफएसआई उपनगरों को देना चाहिए. उसको किस तरह से घूमा-फिरा कर क्वेरी निकालना... मैं आपसे पूछना चाहता हूं कि जब एफएसआई दो ही है, उसका कॅप दो ही है तो क्या कोई बाबू... आज टाईम्स ऑफ इंडिया के अखबार में भी खबर है. मैं चाहूंगा कि इसकी इन्क्वायरी होनी चाहिए. कोई बाबू है जो टीडीआर के लॉबी के साथ खेल रहा है ताकि उनका भाव बरकरार रहे. एक साल में कितने टीडीआर का भाव बरकरार रहा है ? इससे शासन को एक से डेढ़ हजार करोड़ रुपये मिलेंगे और आपका एफएसआई का कॅप दो ही रहेगा. केवल फर्क इतना ही है कि ६७ प्रतिशत टीडीआर होगा और ३३ प्रतिशत गवर्नमेंट देगी. इस पर किसी को ऑब्जेक्शन होगा और क्वेरी होगी, मैं समझता हूं कि जैसे अमेरीका में ऑफिशियल लॉबिस्ट होते है, उस तरह यहां पर कुछ बाबू लोगों ने ऑफिशियल लॉबिस्ट बनकर, क्वेरी के नाम पर एक एक साल प्रलंबित रखना ताकि उनका भाव बरकरार रहे... माननीय मुख्यमंत्री जी, मैं समझता हूं कि यह कोई बहुत बड़ा आईएएस की जरुरत नहीं. आप तीसरी क्लास के कक्षा से आप पूछ लो कि यहां २८८ एमएलए बनते है. अब ये किसी भी पार्टी से आए हो. २८८ का तो कॅप है ही. उसी तरह जब दो का कॅप है और यदि ०.३३ शासन बेचना चाहती है और शासन सस्ते भाव में बेचना चाहती है, शासन को उसका पैसा मिलेगा. टीडीआर के दो लोग है. उनकी मोनोपोली टूटेगी. मैं समझता हूं कि यह ॲक्ट यदि हमने बनाया है तो उसकी अमलबजावणी आज से ही होनी चाहिए. कब तक हम इनके पीछे घूमते रहेंगे ? जो २८८ लोग पब्लिक से चुनकर आते है... ऐसी बहुत सारी योजनाएं होती है.

अध्यक्ष महोदय, सेक्शन ३३ (२४) की बात आयी. हमने अपना माईंड अप्लाय नहीं किया. किसी बाबू ने कहा, किसी विकासक से मिला तो वह महाराष्ट्र में अप्लीकेबल हो गया. मीडिया में इस बारे में बहुत कुछ आया तो हम इसको बंद कर देंगे. आपने शुरु ही क्यों किया ? शुरु किया ही है तो सही मायने में उसको शुरु रखना चाहिए, ऐसा मेरा कहना है. मगर किस तरह ? उपनगर में बोरीवली स्टेशन है तो वहां पर सेक्शन ३३ (२४) का अमल होना चाहिए. माहिम में है, खार में है, जहां जहां स्टेशन है, वहां वहां सेक्शन ३३ (२४) की आवश्यकता है. लेकिन आपने क्या किया ? २४ लोगों को एक ही जगह पर दे दिया, प्रभादेवी-वरळी में ३३ (२४) का फायदा कर दिया. उससे सेक्शन ३३ (२४) का जो फायदा था, वह फायदा देने के लिए शासन घबरा जाती है. शासन ने उस चीज को (Review) करना चाहिए. आदमी यदि बोरीवली से आता है, ट्राफिक का मसला मुंबई में बहुत बड़ा है. समजो वह जहां कहीं से आएगा तो बोरीवली स्टेशन पर अपनी गाड़ी रखेगा और ट्रेन से आएगा. ऐसी जगहों पर सेक्शन ३३ (२४) की आवश्यकता है. शासन ने ऐसी जगहों

**[ श्री. बाबा सिद्दिकी ]**

का अच्छी तरह से अभ्यास करना चाहिए. एक कॉमनसेन्स की बात है. क्राऊडेड एरिया हो और जहां भी सेक्शन ३३ (२४) अप्लाईड हो, उस स्कीम में मॉल नहीं होना चाहिए. आप आईनॉक्स में जाकर देखिए. It's a mockery of traffic parking. जहां मॉल और थिएटर होगा तो वहां सेक्शन ३३ (२४) की कोई वॅल्यू नहीं है. रेसिडेंशियल एरिया है तो ठीक है. वह भी कुछ सिस्टिम में हो तो सेक्शन ३३ (२४) रद्द नहीं होना चाहिए बल्कि उसका रिव्ह्यू होना चाहिए. जहां हकिकत में कंजेशन है...

अध्यक्ष महोदय, मैं मुंबई में मेट्रो के बारे में बहुत सारी बातें सुनता हूं. इसका पहला टप्पा पूरा हुआ और दूसरा टप्पा शुरु होने की बात हुई... मेरे क्षेत्र में भी शास्त्रीनगर था, महाराष्ट्रनगर था. उन्होंने कहा कि यह बांद्रा में भी आएगा. तो मैंने कहा कि मेरा घर जलाकर मैं दिवाली तो मना नहीं सकता. यहां दो हजार घर है. दो साल से, वहां के श्री मूर्ति जी से, एसआरए स्कीम के जितने भी आर्किटेक्चर है, उनसे बैठक लेकर कहा गया कि रिअलायमेंट हो. रिअलायमेंट होने के बाद...ताकि वे लोग भी वहां बस सके और वहां मेट्रो भी आ सके. माननीय मुख्यमंत्री जी, इस चीज के बारे में एक सीटीजन इनिशिएटीव्ह शुरु हुआ. उन्होंने कहा कि अंडर ग्राऊंड मेट्रो रेलवे होनी चाहिए. एक-दो बार इस बारे में मिटींग भी हुई. मगर हमको ऐसा लगा अंडर ग्राऊंड नहीं होना चाहिए. क्योंकि शासन कहती थी....लेकिन उनकी स्टडी जब मैंने पूरी तरह से समझ लिया तो मैं समझता हूं....श्री. रत्नाकर गायकवाड जी की मैं बड़ी इज्जत करता हूं. कुछ ऐसे अधिकारी है जो इज्जत के लायक है. मैं एक नम्र विनंती करना चाहता हूं कि अपने राज्य के सामने अपना ईगो नहीं लाना चाहिए. ईगो मनुष्य के लिए सब से हानिकारक चीज है. श्रीमती शामा कुलकर्णी और श्री हंसल, श्रीमती प्रिया दत्त से और मुझसे मिले. पहले मुझे ऐसा लगा कि बड़े बड़े लोग ये मेट्रो प्रोजेक्ट अंडर ग्राऊंड चाह रहे है. उनकी जो बुक है, उसकी मैं दाद देना चाहूंगा. मैं आज इस पक्ष में हूं कि आज वहां पर अंडर ग्राऊंड मेट्रो रेलवे करनी चाहिए. उसके बारे में कुछ चीजें मैं आपको बताना चाहता हूं. आप चारकोप से मानखुर्द ३२.५ किलोमीटर में करेंगे ? आपका, आईआईटी का स्टडी बता रहा है. २०३१ तक, मानखुर्द तक १६ प्रतिशत ही पापूलेशन रहेगी. आपका २०.५ किलोमीटर बचता है. ७ हजार स्क्वेअर मीटर फुटपाथ, स्टेअरकेस और लिफ्ट में जाएंगे. १२.५ लाख पेडिस्ट्रीयन, २७ रेलवे स्टेशन से उतरोगे, उसके बाद आप कहां से जाओगे ? आपके पास कोई सुविधाएं नहीं है. आपके पास कोई सुविधा नहीं है. गाड़ियों की ६ लाईन हैं. वह अब ४ लाईन हो जायेंगी. अब जैसे हम यहां पर दो लोग बैठे हुए हैं परन्तु अगर यहां बीच में पिलर आ जायेगा तो एक ही आदमी बैठ पायेगा. हमारा कहने का मतलब यह है कि ऊपर मेट्रो ट्रेन चलेगी लेकिन नीचे गाड़ियों के लिए जगह कम हो जायेगी. इस तरह की एक बुक बनाई गई है. मैं समझता हूं कि इस बारे में विचार करने की जरुरत है. We have to go through it. इस बारे में मुंबई के नागरिकों ने इनिसियेटिव लिया है.

अध्यक्ष महोदय, हम सब लोग यहां चुनकर आते हैं. मैं यहां बताना चाहता हूं कि इसमें २७ स्टेशन हैं. हर ७५० मीटर पर एक स्टेशन है. इन २७ स्टेशनों में कोई २७ मीटर का है, कोई ३६ मीटर का है. इससे पूरा मुंबई शहर ही खत्म हो जायेगा. जहां पर स्काईवॉक बनाया है वहां पर मेट्रो

**[ श्री. बाबा सिद्दिकी ]**

रेल का प्रोजेक्ट कम कर दिया. मेट्रो रेल का ५२ प्रतिशत रास्ता घुमावदार है. इससे एक्सीडेंट हो सकता है. यहां पर ईगो का प्रश्न है. I am always supreme. अध्यक्ष महोदय, इससे पहले कि जन आंदोलन हो, इसका रिव्यू होना चाहिए. अगर जन आंदोलन के बाद में इसमें कोई बदल किया गया तो इससे सरकार की किरकिरी होगी. We should look into it with clear mind.

अध्यक्ष महोदय, इसमें हर स्टेशन पर ४५ हजार वर्ग फुट कॉमर्शियल जगह दी जायेगी. अगर ४५ हजार वर्ग फुट जगह कॉमर्शियल में जायेगी तो गाड़ियां कहां पर पार्क होंगी. गाड़ी क्या हवा में पार्क होगी ? रिलायंस कंपनी को ऑप्शन दिया जाता है कि २७ स्टेशनों में से वह कोई भी स्टेशन चुन सकता है और हर स्टेशन की ४५ हजार वर्ग फुट जगह का फायदा एक जगह पर उठा सकता है. यह क्या है ?

अध्यक्ष महोदय, मैं आगे और बताऊंगा तो पांव के नीचे की जमीन निकल जायेगी. आज अंडर ग्राऊंड की टेक्नोलॉजी आसान हो गई है. Seaol makes the city by itself. अगर अंडर ग्राऊंड मेट्रो रेल की योजना बनायेंगे तो काफी जगह मिल सकती है और इसमें कोई दिक्कत भी नहीं होगी. नीचे पूरी सिटी बन सकती है. सियोल में अंडर ग्राऊंड पार्क हैं, शॉपिंग सेंटर हैं. सिंगापुर में अंडर ग्राऊंड मेट्रो रेल है. मैं यहां कहना चाहता हूं कि अगर आपको ओवर ग्राऊंड मेट्रो रेल का प्रोजेक्ट करना है तो आप वह कीजिए मगर जहां १२० या १८० फुट का रोड हो वहां पर कीजिए. दुबई में २५० से ३०० फुट का रोड रहता है. वहां पर मेट्रो रेल अलग से जाती है. मुंबई में अगर सड़क के बीच में मेट्रो रेल का प्रोजेक्ट करेंगे तो गाड़ियां के लिए जो ६ लेन हैं, वह केवल ४ लेन रह जायेंगी. रिलायंस कंपनी को इसका ऑर्डर दिया है.

अध्यक्ष महोदय, मैं इस प्रोजेक्ट के रेट बताना चाहूंगा. चेन्नई में मेट्रो रेल के ३२ स्टेशन हैं, ४५ किलोमीटर का डिस्टेंस है, इस एलिवेटेड मेट्रो रेल के प्रोजेक्ट की कॉस्ट १०० करोड़ रुपये है. बंगलौर में ४२.३ किलोमीटर का डिस्टेंस है, उसकी कॉस्ट ८० करोड़ रुपये है. चेन्नई में अंडर ग्राऊंड मेट्रो रेल प्रोजेक्ट की कॉस्ट ३०० करोड़ रुपये है और बंगलौर में इसकी कॉस्ट २५० करोड़ रुपये है. मुंबई में एलिवेटेड मेट्रो रेल के प्रोजेक्ट की कॉस्ट ३५४ करोड़ रुपये है. इसमें डबल का फर्क है. रिलायंस कंपनी इस काम को कर रही है. इसमें साढ़े पांच हजार करोड़ रुपये का डिफरेंस है. मैं समझता हूं कि जिस सिटीजन ने यह बुक बनाई है, उसको हमें जबाब देना पड़ेगा. हैदराबाद और यहां के कॉंट्रेक्ट में सिर्फ १ महीने का फर्क है. हैदराबाद में एलिवेटेड मेट्रो रेल के प्रोजेक्ट की कॉस्ट १७१ करोड़ रुपये आ रही है और मुंबई में यही काम ३५४ करोड़ रुपये में होगा. यह सारी जानकारी आपको इंटरनेट पर मिल जायेगी. इससे पहले कि यह मामला सुप्रीम कोर्ट में जाए, पीएसी में यह मैटर उठे, १० साल बाद कोई दूसरे मुख्यमंत्री जी के सामने यह मामला आये और हमारे बच्चे इस मामले की चर्चा करें, उससे पहले इस मामले में रिव्यू करना पड़ेगा.

**[ श्री. बाबा सिद्दिकी ]**

अध्यक्ष महोदय, मैं एयरपोर्ट के रिहेबिलिटेशन की बात करना चाहता हूं. मुझे याद है कि पूर्व मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख जी ने एक मीटिंग ली थी और उस मीटिंग में एमएमआरडीए के श्री. चंद्रशेखर थे एवं श्री गुरुदास कामत जी भी थे.

अध्यक्ष महोदय, मैंने कहा था कि एअरपोर्ट का डेवलपमेंट इस नंदीग्राम ऑफ मुंबई जैसा है. मैं आज भी मुंबई के नंदीग्राम के बारे में कह रहा हूं. इट इज द मदर ऑफ स्कॅम्स. सम्माननीय सदस्य श्री. कृष्णा हेगडे जी वहां से चुनकर आते है. हमारे खासदार श्रीमती प्रिया दत्त जी का मतदार क्षेत्र है. एमएमआरडीए जब भी नोटीस निकालती है, पता ही नही चलता है कि कब नोटीस निकल गई है. आपका एसआरए का रेग्युलेशन यह कहता है कि "इट शुड बी इनसाइट टू डेवलपमेंट." आप यदि एअरपोर्ट के लिए लॅण्ड दे रहे है तो उसमें सब का स्वागत है. लेकिन एअरपोर्ट की लॅण्ड को कहीं और दे देंगे और उस जगह पर मॉल और होटल आएगा तो मुंबई की जनता को हम क्या जवाब देंगे ? यह भी सुना गया है कि तीन किलोमीटर दूर, पेरीफेरी में जो एअरपोर्ट डेवलपमेंट कर रहा है, कहीं पर भी जमीन ले ले तो उसको चार एफएसआई दिया जाएगा. माननीय मुख्यमंत्री जी, मेरी समझ में नहीं आ रहा है कि यह क्या हो रहा है ? इन सब चीजों की ओर आपको ध्यान देना पड़ेगा. जिस झाड़ में फल उगते है, उनको पत्थरों का तो सामना करना ही पड़ता है. लेकिन मुझे यकिन है कि आप निर्णायक है और आप निर्णायक निर्णय लेंगे.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगर पालिका में नये कमिश्नर की नियुक्ति हुई है. उनके आने के साथ ही मंदिर, क्रुस और मस्जिद के बारे में जो मामला उभर कर सामने आया. मैं आपका आभारी हूं कि आपने इस हाऊस में उस मामले में स्टे दिया. हर काम कमिश्नर ठीक नहीं करते, ऐसा कहना भी ठीक नहीं होगा. कुछ रेग्युलेशन के काम उन्होंने अच्छे किये है. फ्लावर बेड को उन्होंने रिस्ट्रीक किया. एक बात उनके समझ में नहीं आ रही है या वे समझना नहीं चाहते है. १९६७ में डीसीआर बने. १९९२ में डीसी रेग्युलेशन बने, उसमें टीडीआर का प्रावधान आया. आपने हाईट के हिसाब से वन थर्ड ओपन स्पेस रखा था. आप यदि ओपन स्पेस डेफीशियन्स १०० प्रतिशत तक कन्डोन करने का सेक्शन ६४ (सी) के जरिए कमिश्नर को अधिकार दिया, मैं समझता हूं कि आपने १९९१ में ही इसको डीसी रुल में इनकारपोरेट करना चाहिए था. हमने यदि किसी बड़े डेवलपर से सुपारी ली है कि वे ओपन स्पेस डेफीशियन्सी न करे. मगर उससे दक्षिण मुंबई में, बांद्रा से बोरीवली तक पूरा डेवलपमेंट रुक जाएगा. क्योंकि जो छोटी छोटी बिल्डिंग्स है, भाडेकरु है. ६-७ विकासकों ने मुंबई शहर को लूटा है, इसका यह मतलब नहीं कि मैं विकासक की नहीं तो भाडेकरु की बात कर रहा हूं. मैं हमारे यहां के सोसायटी की बात कर रहा हूं. वह बिल्डिंग गिरेगी, यदि वहां दुकानें है तो ओपन स्पेस कन्डोन १०० प्रतिशत होना चाहिए. अब एक नई बात सामने आयी है, वह बात है नेबरहूड एनओसी की. इससे एक्सटॉरशन का एक नया फंडा शुरु हो जाएगा. यह न्यू फंडा ऑफ एक्सटॉरशन होगा.

[ श्री. बाबा सिद्दिकी ]

अध्यक्ष महोदय, मेरी मुख्यमंत्री जी से विनती है कि इस बारे में मुंबई के आमदारों के साथ चर्चा की जानी चाहिए. आपने ३३ (७) तो खोल दिया है. मुंबई के सम्माननीय सदस्य श्री अमिन पटेल है, श्री मधु चव्हाण जी है. वे बड़े खुश है. बदकिस्मती से बिल्डिंग गिरती है तो हम उनके पास जाकर उनको कुछ मुआवजा देते है. आप कहेंगे कि ९ मीटर ओपन स्पेस दो. डेढ़ मीटर तो हमने ॲप्रूव्ह किया है. दक्षिण मुंबई में ९ मीटर का ओपन स्पेस रख रहे है तो वहां बिल्डिंग कैसे बनेगी. इट इज गोईंग वर्टीकल. सिर्फ हमको यही पर प्रॉब्लम है. इतने कमिश्नर अब तक करते आए है, इसका मतलब वह सब गलत कर रहे थे. प्लीज, इन कॉरपोरेट इट इज इन दी डीसी रुल्स इमेजेटली. ताकि कामों को गति मिले.

अध्यक्ष महोदय, एक और चीज मैं आपको बताना चाहता हूं. रेंटल हाऊसिंग का मुद्या है. आपको इस बारे में आज नहीं तो पांच साल बाद पता चलेगा. इसमें भी स्कॅम हो सकता है. क्योंकि आप १८० फीट की रेंटल हाऊसिंग पनवेल में दे रहे हो. १८० फीट की रेंटल हाऊसिंग विरार में, वसई में बदलापूर में यु ट्युब बना रहे हो. जिन बड़े डेवलपरों ने लॅण्ड लिया था, जिन्होंने बैठकर सांठगांठ रचा था, प्लॅनिंग की थी. तो मेहरबानी कर के आज उसका रिव्ह्यू करोगे तो रेट्रोस्फेक्टवली उसको कॅन्सल करना होगा. क्योंकि आप .७५ पर इनको सवा दो एफएसआई और चार एफएसआई दे रहे हो. जहां सात-आठ लाख का फ्लॅट है, वहां कौन सा रेंटल होगा ? क्या वह मुंबई में काम करने के लिए आयेगा ? वह झुग्गी झोपड़ी में रहकर लोगों के घरों में काम करता है. It is a total fraud to facilitate the builders who have taken vast land. मेरा यहां कहना है कि बिल्डरों को जो परमीशन दी गई हैं, उनकी भी जांच होनी चाहिए. रेंटल हाऊसिंग के ऊपर गंभीरता से ध्यान देने की जरुरत है.

अध्यक्ष महोदय, एकोमोडेशन रिजर्वेशन के बारे में मैं कहना चाहूंगा कि डीपी से रिलीज लेटर मिलता है. मेरे एरिया में लायब्रेरी, मार्केट, हॉस्पिटल को आज तक डेवलपरों ने हेंड ओवर नहीं किया है. सरकार ने इस बारे में क्या कानून बनाया है ? मैं यहां कहना चाहूंगा कि जिन्होंने डीपी से एकोमोडेशन का रिलीज लेटर लिया है, उनको तुरन्त ब्लैक लिस्ट किया जाय. उन संस्थाओं को यह दीजिए जो इसका उपयोग लायब्रेरी, हॉस्पिटल और मार्केट रिजर्वेशन के हिसाब से करेंगी. यह कमिश्नर का काम है. मुंबई सबर्ब में हॉस्पिटल नहीं बनाया. नर्सिग होम पर चार्ज लगाकर उसको रेग्यूलराईज किया जा रहा है मगर चार्ज कितना है ? कुछ भी चार्ज लगाया जा रहा है. पूरा विश्व देखता आया है कि तानाशाही का क्या अंजाम हुआ है. कोई भी चीज की एक हद होती है.

अध्यक्ष महोदय, यहां पर ऑक्यूपेशन सर्टिफिकेट की चर्चा होती है. आज आम आदमी की यह समस्या है. बिल्डर ऑक्यूपेशन सर्टिफिकेट लेता नहीं है. क्या सरकार के पास इसके कंट्रोल के लिए कोई यंत्रणा नहीं है ? मुंबई में ५ हजार बिल्डिंग का ऑक्यूपेशन सर्टिफिकेट नहीं लिया गया है. हम जब भी बाबुओं के पास जाते हैं तो वे कोई न कोई क्वेरी निकालते हैं क्योंकि अगर क्वेरी रहेगी तो करप्शन रहेगा. कौन-कौन से डेवलपर ने ऑक्यूपेशन सर्टिफिकेट नहीं लिया है ? इसमें

**[ श्री. बाबा सिद्दिकी ]**

कौन-कौन से आर्किटेक थे ? इन लोगों के लिए एक समय सीमा निश्चित कीजिए और उसके बाद में इनको ब्लैक लिस्ट कीजिए. ऑक्यूपेशन सर्टिफिकेट देना सरकार की जिम्मेदारी है. लोगों को सही मायनों में घर मिले. ऑक्यूपेशन सर्टिफिकेट न होने के कारण घर का असेसमेंट डबल होता है और पानी मानवीयता के आधार पर मिलता है.

अध्यक्ष महोदय, मुंबई में डेटम लाईन १९६४ की ही चली आ रही है. माननीय मुख्यमंत्री जी दिल्ली में थे और उनको मालूम होगा कि चेन्नई में डेटम लाईन को बढ़ाया गया है. यहां के बाबू लोग कहेंगे कि यह तो इल्लीगल को एक्स्टेंड करने की बात है. क्या हम में तोड़ने की ताकत है. मैं यह कहता हूं कि आप १९६४ को २००० कर दीजिए. वहां रोज नया वार्ड ऑफिसर आता है और नया इंजीनियर आता है और वहां के लोग करप्शन के बीच में घिरे रहते हैं. मेरा कहना है कि १९६४ की डेटम लाईन के बारे में एक सहमति बनाईए और इसको १९८०, १९८५, १९९० या १९९५ कीजिए. मेरी मुख्यमंत्री महोदय से विनती है कि आप डेटम लाईन को एक्स्टेंड कीजिए. ऐसा करने से सरकार के पास पैसा जमा होगा.

अध्यक्ष महोदय, डेवलपमेंट प्लान रिवाईज हो रहा है और यह सुनने में आया है कि यह काम फोरेन कंसलटेंट को दिया गया है. हमारे यहां हैदराबाद की नेशनल रिमोट सेंसिंग एजेंसी है जो मालदीव में जाकर काम करती है तो फिर फोरेन कंसलटेंट की क्या जरुरत है. मुझे लगता है कि यहीं का कोई आदमी फोरेन कंसलटेंट को लाया होगा. मैं मुख्यमंत्री महोदय से कहना चाहता हूं कि मेहरबानी करके यह धंधा बंद करवाईए. देवनार, कांजुरमार्ग और मुलुंड के संबंध में मैंने यहां पर जानकारी दी है. मैं माननीय मुख्यमंत्रीजीसे मांग करता हूं और यहां की जनता भी उनसे अपेक्षा करती है कि जो ९-१० हजार करोड़ रुपये का भ्रष्टाचार हुआ है, उसकी एसआईटी के द्वारा जांच करवाई जाय ताकि दूध का दूध और पानी का पानी हो जाय.

अध्यक्ष महोदय, मैं गृहनिर्माण विभाग के बारे में कहना चाहूंगा कि "स्ट्रक्चर प्रोटेक्ट" का मुद्दा सब के दिलों से जुड़ा हुआ है. मैं १९९५ के स्ट्रक्चर प्रोटेक्ट के बारे में नहीं, बल्कि मैं सन २००० के ऊपर ही बात करुंगा. यदि आप एक फ्लॅट लेते है और उसको बेचते है, क्योंकि आप अमीर हो तो आपका फ्लॅट बेच कर ट्रान्सफर हो जाएगा. गरीब का झोपड़ा, यदि वह बेचना चाहे तो खरीदने वाले के नाम पर ट्रान्सफर नहीं होगा. यह कौन सा न्याय है ? यह अन्याय है. जब मैं १९९९ में आमदार बना था, उस वक्त श्री बुध्दीराजा उस विभाग के सेक्रेटरी थे. यह कानून इस हाऊस में पास हुआ है. मैंने इसको प्रपोज किया था और श्री. सुरेश शेट्टी जी ने समर्थन दिया था. यह बहुत बड़ा मुद्दा है. यह क्यों नहीं हो रहा है ? क्योंकि आपको एसआरए स्कीम में गति नहीं मिलेगी और करप्शन बरकरार रहेगा. बड़े बिल्डरों को इसका फायदा होता है. क्योंकि वे ब्लॅकमेल करते है. कहते है कि आपका नाम नहीं आया. वे पूराने पेपर्स बनाते है. सब कुछ होता है. लेकिन गरीब का झोपड़ा ट्रान्सफर नहीं होता है.

[ श्री. बाबा सिद्दिकी ]

अध्यक्ष महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख जी के कार्यकाल में एक मिटींग हुई थी. उसमें एक निर्णय लिया गया था कि बाहर के लोगों को इसका फायदा न हो. सब लोगों की सहमति हो गई कि साठ साल तक, जो मुंबई शहर में आया है, उसके पास पुरावा है, ऐसा शख्स यदि वह झोपड़ा लेता है, और वह झोपड़ा कानूनी तौर पर प्रोटेक्टेड है तो हम उसको ट्रान्सफर करेंगे. इस कानून की कोई अमलबजावणी नहीं हुई. इससे ज्यादा और क्या पारदर्शकता होगी ? एक शेर मैं आपको सुनाना चाहता हूं.

" क्यों हम अपने जीने का अंदाज छोड़ दे
क्या है हमारे पास, इस अंदाज के सिवाय ?

माननीय मुख्यमंत्री जी, एसआईटी के बारे में लोगों की आपसे बहुत अपेक्षाएं है. जितनी चीजें मैंने यहां पर कही है, उस पर ध्यान देना जरुरी है. एसआईटी होना बहुत जरुरी है. क्योंकि ये चीज और न जाने कहां उठेगी ? और कोर्ट हमको समन्स देगी, इससे पहले हमको ॲक्ट करना चाहिए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं. धन्यवाद.

**श्री. सुरेशकुमार जैन** (जळगाव शहर) **:** अध्यक्ष महाराज, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील सामान्य प्रशासन विभाग, नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग, मराठी भाषा विभाग या विभागांच्या मागण्यांवरील चर्चेसाठी मी उभा आहे.

मघाशी मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे भाषण ऐकले, आमचे जेष्ठ सहकारी, श्री. बाबा सिद्दिकी यांचेही भाषण ऐकले आणि मी विचार करत होतो की, आपण ज्या सभागृहात बसलो आहोत, त्या सभागृहात नगरविकासाच्या संदर्भातील गोष्टींवर चर्चा होते आहे की, हाउसिंग डेव्हलपमेंटच्या संदर्भातील गोष्टींवर चर्चा होते आहे की, सगळ्या स्कॅमच्या संदर्भातच येथे आपल्याला ऐकावे लागणार आहे. मला असे वाटते की, बदलत्या परिस्थितीमध्ये मागच्या ३०-३५ वर्षांत हळूहळू लोकांच्या हिताचे प्रश्न बाजूला राहिले आणि स्कॅमच्या संदर्भातच येथे जास्त बोलले जात आहे. हा भ्रष्टाचार ४०००, १५०००, २५०००, ५०००० करोड रुपयांचा झाला आणि त्याबाबतचे सगळे पेपर्स माननीय मुख्यमंत्र्यांना किंवा शासनाच्या संबंधित मंत्र्यांना दिले जातात. असे साधारण चित्र या सगळ्या गोष्टींवरून समोर येत आहे.

अध्यक्ष महाराज, मी याबाबतीत जास्त बोलणार नाही. मी फक्त डेव्हलपमेंटच्या संदर्भात आपल्या या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो, प्रामुख्याने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. कारण नवीन मुख्यमंत्री आलेले आहेत आणि ते हे ब्रीद घेऊन आलेले आहेत की, ते ट्रान्सपरन्सीने चांगला कारभार करणार आहेत, लोकांना न्याय देणार आहेत व विकासाचे प्रश्न त्वरित चांगल्यारितीने सोडविण्यास ते वचनबद्ध आहेत. मला असे वाटते की, जर ते खरोखर ऑनेस्ट व या संदर्भात वचनबद्ध असतील तर, मग मी काही गोष्टी त्यांच्या समोर नम्रपणे मांडू इच्छितो की, ज्या त्यांना करण्यासाठी आवश्यक सगळ्या पॉवर्स असतानाही, ते निर्णय घेण्याबाबतीतील नैतिक क्षमता त्यांना वापरावी लागेल आणि त्यासाठी वेळप्रसंगी आपल्या लोकांचा विरोध आला तरी, त्या विरोधाला बाजूला सारून त्यांना ते निर्णय घ्यावे

**[ श्री. सुरेशकुमार जैन ]**

लागतील. तरच महाराष्ट्रामध्ये मला असे वाटते की, खऱ्या अर्थाने आपण सुधारणेच्या किंवा विकासाच्या संदर्भातील गोष्टी करू शकू. आपण परवाच्या जनगणनेच्या माध्यमातून या देशाची १२१ कोटी लोकसंख्या झाल्याबाबत आपण ऐकले. त्यात जवळपास ४७ टक्के महाराष्ट्रात अर्बनायझेशन आहे किंवा पॉप्युलेशन हे सिटीमध्ये आलेले आहे. महाराष्ट्राच्या अकरा, सव्वा अकरा कोटी पॉपुलेशनच्या ४७ टक्के, देशाच्या टोटल अर्बनायझेशनची गती ३७ ते ३८ टक्के इतकी असेल. परंतु, महाराष्ट्राची अर्बनायझेशनची जी परिस्थिती आहे ती देशाच्या फार पुढे असल्या कारणाने जवळपास ११ टक्के आपण सगळ्या देशाच्या अर्बनायझेशन बाबतचे आकडे मांडतो त्यावेळेस सबंध देशाची अर्बनायझेशनची परिस्थिती २०११ च्या जनगणनेनुसार ३७-३८ टक्क्यांच्या आसपास आहे. आपण याबाबतीत ४७ टक्क्यांच्या आसपास आलो आहोत व कदाचित वर्षा दोन वर्षात आपण ५० टक्के ही पार करू. याचाच अर्थ असा की, फार मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र हा अर्बनाईझ होत चालला आहे. अर्बनाईझ होत असताना आजच्या या पर्टिक्यूलर विषयाबाबत मी ग्रामीण विभागासंदर्भात, शेती संदर्भात बोलत नाही कारण तो विषय आज त्याच्याशी संबंधित नाही. परंतु ओव्हर ऑल विकास करीत असताना एक गोष्ट आपणा सर्वांना मान्य करावी लागेल की, महाराष्ट्राचा विकास करीत असताना जवळपास ५० टक्के लोकसंख्या ही अर्बन भागामध्ये रहायला येऊ लागली आहे. त्यामुळे अर्बन भागाचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर वाढायला लागले आहेत. हे प्रश्न आपण वेळीच सोडविले नाहीत तर ग्रामीण भागात ज्या समस्या निर्माण झालेल्या आहेत तशाच स्वरूपाच्या समस्या अर्बन भागात देखील झाल्याशिवाय राहणार नाही. आज आपण पाहतो की सर्व अर्बन भागामध्ये स्लम मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे. आपणास उदाहरण सांगावयाचे झाले तर मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक व माझा जळगाव जिल्हा याठिकाणच्या अर्बन भागात मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या वाढत आहे. ग्रेटर मुंबईमध्ये जवळपास २ कोटी लोकसंख्या आहे. त्यापैकी ६० ते ६५ टक्के लोकसंख्या ही झोपडपट्टीमध्ये राहत आहे. अशाप्रकारे मोठ्या प्रमाणावर लोक अर्बन भागात येऊन राहत असल्यास अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. तेव्हा या संदर्भात आपल्याला कायदा बनविण्याची भूमिका घ्यावी लागेल.

अध्यक्ष महाराज, आज एक लाख रुपयांची चारचाकी नॅनो कार आली. जेव्हा आपली समृद्धी होते त्यावेळी प्रत्येकाला असे वाटते की, सायकल असणाऱ्या व्यक्तीला वाटते मोटार सायकल घेऊ, मोटार सायकलवाल्याला वाटते की आपण चार चाकी गाडी घ्यावी. अशाप्रकारे जर रस्त्यावर चार चाकी आणि दु-चाकी वाहनांची संख्या वाढत असेल तर त्यासाठी आपणास चांगले रस्ते केले पाहिजेत. परंतु आज आपण मुंबई शहरातील रस्त्याची काय अवस्था झालेली आहे ते पाहतो. युतीच्या काळात मुंबईतील वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी उड्डाणपूल बांधण्याची भूमिका घेण्यात आली. आता हे उड्डाणपूल देखील कमी पडत आहेत. तेव्हा अर्बनायझेशन चांगल्या पद्धतीने होण्याच्या दृष्टीने आपल्याला भूमिका घ्यावी लागेल.

अध्यक्ष महाराज, मी युतीच्या काळात दीड वर्षे गृह निर्माण विभागाचा मंत्री होतो. त्यावेळी आम्ही एस.आर.ए.ची स्कीम राबविली होती. शिवेसना प्रमुख आदरणीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न होते, आपल्या सर्वांचे स्वप्न होते की, मुंबई स्वच्छ व्हावी. मुंबईमध्ये झोपडपट्टी राहू नये यादृष्टीने

**[ श्री. सुरेशकुमार जैन ]**

एसआरए स्कीम राबविण्यात आली. जेणेकरून मुंबई जगातील सुंदर शहर झाले पाहिजे, मुंबई शहर जगातील सुंदर फायनान्शिअल सेंटर व्हावे अशी आपणा सर्वांची इच्छा होती. ही आपल्या सर्वांच्या मनातील कल्पना होती, ती आम्ही स्वीकारून त्याप्रमाणे प्रयत्न केला होता. परंतु आज आहे तशीच परिस्थिती आहे त्यामध्ये फार काही बदल झालेला नाही. आज ड्रेनेज आणि पिण्याच्या पाण्याची काय व्यवस्था आहे, डेव्हलपमेंट प्लान संदर्भात काय परिस्थिती आहे ? आज कॉर्पोरेशन्स फक्त देखाव्यासाठी राहिलेली आहेत. त्याचे सरकारीकरण झालेले आहे. जे लोकप्रतिनिधी निवडून जातात ते खऱ्या अर्थाने आपले अधिकार वापरतात काय हा प्रश्न आपल्यासमोर आलेला आहे. ही वस्तुस्थिती आपणास नाकारता येणार नाही. आपण असे अनुभवले आहे की, लोकप्रतिनिधी गैरकारभार करतात आणि बाबू देखील गैरकारभार करतात. परंतु सर्वसामान्य जनतेला जो न्याय मिळावयास पाहिजे तो न्याय मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. या लोकशाहीच्या संस्था फक्त नावालाच राहिलेल्या आहेत. त्याचे सरकारीकरण झालेले आहे. मी याठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो की, एखाद्या कॉर्पोरेशनने ५० ठराव पास केले. परंतु त्याची अंमलबजावणी आयुक्तांना करायची नसेल तर त्या आयुक्तांचे आम्ही काहीही वाकडे करू शकत नाही. मग आम्ही या संदर्भात कोणाकडे तक्रार करायची. ज्याकडे तक्रार करायची तो प्रथम चष्मा लावणार ही बॉडी कोणाची आहे, सुरेश दादा कोणत्या पार्टीचे आहेत, मुंबई कॉर्पोरेशन शिवसेनेचे आहे का, पुण्याचे कॉर्पोरेशन काँग्रेसचे आहे का, असे प्रश्न उपस्थित केले जातात. युती असेल तर तो म्हणेल काँग्रेस आहे, त्यांना आपल्याला न्याय द्यायचा नाही, काँग्रेस असेल तर तो म्हणेल युती असल्यामुळे त्यांना आपल्याला न्याय द्यायचा नाही. राज्यकर्त्यांनी लोकांच्या समोर जाताना या पद्धतीने लोकांना न्याय देण्याच्या संदर्भातील भूमिका घेतली असेल तर ते बरोबर नाही. मी त्याची काही उदाहरणे आपल्याला देतो. महाराष्ट्रातील सगळ्या डेव्हलपमेंट प्लॅनच्या संदर्भात आपण पहा. मी अर्बन डेव्हलपमेंट संदर्भात प्रामुख्याने बोलणार आहे. कारण माझा तो विषय आहे. मी १०-१२ वर्षे त्या फिल्डमध्ये काम केले आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रातील अर्बन डेव्हलपमेंटच्या २२५ नगरपालिकांच्या डेव्हलपमेंट प्लॅनबद्दल मी सांगू इच्छितो. आपण छातीवर हात ठेवून सांगा की, आपल्याकडे डेव्हलपमेंट प्लॅन आल्यानंतर आपण तो ३, ६ महिन्यांत किंवा किती महिन्यांत सँक्शन करता ? माननीय मुख्यमंत्र्यांना मी विचारू इच्छितो की, एखाद्या कॉर्पोरेशनने आपणाकडे डीसी रुल पाठविला तर त्याला आपण किती दिवसांत मान्यता देता ? मी जळगाव महागनरपालिकेचेच उदाहरण देतो. मी डायरेक्टली यासाठी बोलत आहे, कारण मला तेथील माहिती आहे. हे संपूर्ण महाराष्ट्राला लागू आहे. आपण महाराष्ट्रातील २२५ नगरपालिकांसंदर्भात एकदा जाहीर करा की, मुख्यमंत्री पदाच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील डेव्हलपमेंट प्लॅन आल्यानंतर ३ महिन्यांच्या आत पास होतील. डेव्हलपमेंट प्लॅन पास झाल्यानंतर डेव्हलपमेंटच्या प्रगतीच्या संदर्भातील भूमिका आणि त्याचा आलेख तुम्ही काढा. अध्यक्ष महोदय, ११.५ टक्के प्रगती आहे. संपूर्ण महाराष्ट्रात मागील ५० वर्षांमध्ये डेव्हलपमेंट प्लॅनची प्रगती काय झाली आहे ? ११.७ टक्क्यांच्या वर तुम्ही हे रिझर्व्हेशन प्लॅनमध्ये टाकता, त्यामुळे डेव्हलपमेंटसाठी असलेल्या त्या संस्था डेव्हलपमेंट करू शकलेल्या नाहीत. मग हे डेव्हलपमेंट प्लॅन कशासाठी पाहिजेत ? या संदर्भात

**[ श्री. सुरेशकुमार जैन ]**

अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सरकारने घेतली असेल किंवा नगरपालिकांना दिली असेल आणि नगरपालिकांची आर्थिक क्षमता नसेल तर ते प्लॉट घेऊ शकत नाहीत. अध्यक्ष महोदय, ज्यांच्या जमिनी अडकलेल्या आहेत, त्यांना तुम्ही २०-२० वर्षे भरपाई देऊ शकत नाही. सदर जमिनीवर झोपडपट्टी वसत आहे. झोपडपट्टीमुळे ती जमीन तुम्हाला मिळू शकत नाही. अध्यक्ष महोदय, हीच अवस्था मुंबई कॉर्पोरेशनची झाली आहे. आपण मुंबई कॉर्पोरेशन डेव्हलपमेंट प्लॅन काढा आणि बघा की, आपल्याला या एसआरए स्कीमसाठी का यावे लागले ? टोटल जमिनीची व्हॅल्यू शून्य धरून आपण या झोपडपट्टीला एसआरए स्कीमच्या माध्यमातून करीत आहोत. माझे सहकारी येथे बसलेले आहेत. आपण देखील सगळ्या गोष्टी जाणता. अब्जावधी, करोडो रुपयांची किंमत असे आपण बोलतो. ५० हजार करोड रुपयांची जमीन असे आपण बोलतो. टोटल जमिनीची व्हॅल्यू शून्य पकडून ही स्कीम का करावी लागली ? अध्यक्ष महोदय, याचे मूळ कारण हे होते की, डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये आपण ज्या जमिनी रिझर्व्हेशनमध्ये टाकल्या होत्या, त्या सरकारच्या असो वा म्हाडाच्या असो, तुम्ही ताब्यात घेऊ शकलेला नाही, त्यांची भरपाई देऊ शकलेला नाही. फेन्सिंग करण्यापेक्षा त्यांचे संरक्षण झाले असते. पैशाच्या रूपात भरपाई दिली असती तर ते करत नाहीत. आपण बाबुगिरीच्या माध्यमातून फक्त पेपरवर नियम ठेवता, एमआरटीपी ॲक्ट हे सगळे जंक झालेले आहे. तुम्हाला डेली या संदर्भात सर्व प्रॉब्लेमवर उत्तर काढावे लागेल. सर्व कायदे रिफाईन करावे लागतील, तुमचा एमआरटीपी ॲक्ट, तुमचे रस्ते, तुमचे ले-आऊट सँक्शन करण्याची पद्धत सर्व बाबतीत सुधारणा करावी लागेल. तुम्ही ले-आऊट तयार करताना ८ मीटर रोड ठेवता. तुम्ही सहज विचार करा की, १० वर्षानंतर, २० वर्षानंतर शेकडोंनी, लाखोंनी मोटारी त्या रस्त्यावरून जाणार आहेत, त्यामुळे हे रस्ते कमी पडतील.

अध्यक्ष महोदय, आपण ब्रिटिशांचे प्लॅन थोडेसे लक्षात ठेवा. नेहमी प्लॅन करताना शंभर वर्षाचे प्लॅनिंग करावे. ब्रिटिशांच्या काळात त्या दृष्टीने रस्ते होते, ड्रेनेजच्या, पिण्याच्या पाण्याच्या स्कीम्स होत्या, डेव्हलपमेंट प्लॅन होते, गार्डन्स होते. त्यावेळी हे सगळे चांगल्या पद्धतीने होत होते. आपल्याला या सगळ्या जुन्या कल्पना, विषय डीसीआर, जुने रुल्स फार मोठ्या प्रमाणात चांगल्या पद्धतीने रिफाईन, रिफॉर्म करावे लागतील. तुम्हाला सुंदर नगरविकासाच्या संदर्भातील कल्पना अभिप्रेत आहे, ते हे केल्यानंतरच शक्य होईल. मी तर आपल्याला म्हणेन की, आपण हे सगळे करीत असताना दूरदृष्टी ठेवून सिटीवर बंधन घातले पाहिजे. मी ही नगरविकासामध्ये काम करतो. मी या सर्व बाबतीत चिंतन केले आहे. आपण किती दिवस या मुंबईवर ताण वाढविणार आहात ? किती दिवस आपण पुणे, नाशिक, ठाणे या शहरांवरील ताण वाढविणार आहोत ? You will have to consider. याचा विचार एकदा शासनाला करावा लागणार आहे. आपल्याला याबाबत या शहरांना रिस्ट्रिक्ट करून सॅटेलाईट सिटीज तयार कराव्या लागतील. या शहरांमध्ये " नो मोअर फरदर इम्प्रुव्हमेंट ", अशी भूमिका किंवा त्या ठिकाणच्या इन्फ्रास्ट्रक्चरवर बर्डन टाकण्याच्या संदर्भात भूमिका न घेता नवीन सिटीज आपल्याला तयार कराव्या लागतील. जगामध्ये काही देशांनी नवीन सिटीज डेव्हलप करण्यासंबंधीची संकल्पना स्वीकारली आहे आणि त्याप्रमाणे नवीन सिटीज स्थापन केल्याही आहेत. याच पद्धतीने आपणही पुढील दिवसांमध्ये निर्णय घेतल्याशिवाय गत्यंतर नाही. खऱ्या अर्थाने, डिसेंट्रलायझेशन करून आणि इन्फ्रास्ट्रक्चरवर येणारा

[ श्री. सुरेशकुमार जैन ]

ताण कमी करून योग्य प्लॅनिंग करण्याची भूमिका शासनाने स्वीकारली पाहिजे. अशा पद्धतीने भूमिका घेऊन आपण चांगल्या पद्धतीने अर्बन डेव्हलपमेंटच्या माध्यमातून कामे करू शकाल, हाउसिंगच्या माध्यमातून करू शकाल, असे मला वाटते. मात्र हे करण्यासाठी सरकारकडे हिंमत असावी लागेल, जिद्द असावी लागेल आणि प्लॅनिंगच्या संदर्भात लाँगटर्म दृष्टिकोन असावा लागेल. कारण शेवटी कोणतीही सिटी किंवा अर्बनायझेन करावयाचे झाले तर त्यासाठी सुंदर हॉस्पिटल्स, स्कूल, कॉलेजेस निर्माण करावे लागतील. आजची परिस्थिती बघितली तर साऊथ मुंबईमध्ये किंवा उर्वरित मुंबईमध्ये कॉलेजेस, हॉस्पिटलसाठी जागा नाही. जागा नाही म्हणून आपण एफएसआय वाढवून देतो. ४ एफएसआय, ५ एफएसआय, ६ एफएसआय दिला जातो. यापेक्षा चांगले प्लॅनिंग करण्यासंबंधी या प्रश्नाच्या मुळात शिरण्याचे शासनाने ठरविले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आज जी काही परिस्थिती निर्माण झाली आहे, त्यामध्ये बदल घडवून आणण्यासाठी, विकास करण्यासाठी जे जे करणे शासनाला शक्य असेल, ते शासनाने अवश्य करावे. परंतु, जे काही नवीन करणार असाल ते पुढील १०० वर्षांचा विचार करून करावे, अशी माझी विनंती आहे. कारण, आज आपला भारत देश, आहे त्या ठिकाणीच थांबणार नाही. एकविसाव्या शतकात, पुढच्या काही वर्षांमध्ये भारताला सुपर पॉवर बनायचे आहे. त्यामुळे आजच्या निर्णय पद्धतीने, आजच्या चाकोरीतून आपण काम करणार असू तर आपला भारत देश सुपर पॉवर बनू शकणार नाही. भारताला सुपर पॉवर बनविण्यासाठी शासनाला १०० वर्षांचे प्लॅनिंग करण्याची भूमिका स्वीकारावी लागेल. आवश्यक इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करण्यासाठी सर्व यंत्रणांची सांगड घालण्याची भूमिका स्वीकारावी लागेल.

अध्यक्ष महोदय, मला याचीही कल्पना आहे की, हे सगळे करीत असतांना आपल्याला रिर्सोसेस कमी पडतील. अध्यक्ष महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांचे एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो. मला आठवते की, १९८५-८६ साली तत्कालीन माननीय मुख्यमंत्री जळगाव येथे आले होते. मी त्यावेळी जळगाव नगरपालिकेचा नगराध्यक्ष होतो. नगराध्यक्ष म्हणून मला असे अभिप्रेत होते की, पुढील ४५-५० वर्षात जळगाव शहराच्या विकासासाठी पैसे कमी पडतील. त्यामुळे आम्ही असा निर्णय घेतला होता की, २ हजार एकर जमीन नगरपालिका ॲथॉरिटीच्या माध्यमातून एमआयडीसीसारखी भूसंपादित करायची. ही जमीन रिसोर्सेस म्हणून पुढील पाच-पंचवीस वर्षात चांगल्या पद्धतीने डेव्हलप करून महसूल मिळवायचा आणि त्या पैशांच्या माध्यमातून जळगाव सिटी डेव्हलप करायची. हा अतिशय सुंदर विचार होता. परंतु, दुर्दैवाने कायदे आडवे आले. असा विकास करण्यास कायद्याने परवानगी नाही. मी असे नेहमी सांगत आलो आहे की, कायदा हा माणसाच्या प्रगतीसाठी बनविला असेल तर त्या त्या काळाशी सुसंगत विचार करून निर्णय घेतला पाहिजे आणि तो निर्णय समाजाच्या हिताचा कसा होईल, यासंदर्भातील विचार केला पाहिजे. कारण, सरकार म्हणून आपण किती प्रमाणात टॅक्स गोळा करू शकतो, याला काही सीमा आहे आणि टॅक्सची जर सीमा

[ श्री. सुरेशकुमार जैन ]

असेल तर विदिन रिसोर्सेस डेव्हलप करणे आवश्यक आहे. आज एमआयडीसी, सिडकोच्या माध्यमातून याच पद्धतीने काम करण्याचा प्रयत्न आपण मुंबई आणि पुण्यामध्ये केला आहे आणि त्या माध्यमातून करोडो रुपयांचा रेव्हेन्यू मोबलाईज करू शकलो आहोत. त्या काळात सबंध महाराष्ट्रातील नगरपालिकांना आपण असे अधिकार दिले असते किंवा आजही या पद्धतीने अधिकार देता आले तर नगरपालिका सक्षम होतील, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, नगरपालिकांना नियोजनाचे अधिकार देत असतांना माझ्या अनुभवानुसार मी सांगू इच्छितो की, अजून तेथील लोक त्यासाठी सक्षम झालेले नाहीत. त्यामुळे आपण ज्यावेळी जास्त पॉवर देण्याचा प्रयत्न करू, त्यावेळी त्या पॉवरचा मिसयुज होईल का ? असा प्रश्न तुमच्या, आमच्या समोर निर्माण होतो. पण शेवटी आपण हे अधिकार जर देणार नसलो तर लोकशाहीला अर्थ उरणार नाही. कारण लोकशाहीचा हा अर्थ आहे की, लोकांसाठी, लोकांना अधिकार दिले पाहिजेत. परंतु, त्यांनी त्या अधिकारांचा दुरुपयोग करू नये, त्यांनी इमानदारीने, प्रामाणिकपणे काम करावे, हे जे समाजाला अभिप्रेत आहे, तसे त्यांना वागले पाहिजे. मी तर असे म्हणेन की, ही जबाबदारी दोघांचीही आहे. तुमची, आमची लोकप्रतिनिधी म्हणून प्रामाणिकपणे काम करण्याची जबाबदारी आहे. We owe to the society. सोसायटीने आपल्यावर विश्वास ठेऊन या ठिकाणी बसविले असेल तर प्रामाणिकपणे त्या संस्थांचे काम करण्याची जबाबदारी तुमची आणि आमची, सगळ्यांचीच आहे.

अध्यक्ष महोदय, याच भूमिकेतून अर्बन डेव्हलपमेंटचा विषय असेल, एमआरटीपी ॲक्टचा विषय असेल, डेव्हलपमेंट प्लॅनसंबंधीचा विषय असेल किंवा कलम ३७ चा विषय असेल, याबाबतीत सुद्धा काही प्रश्न आहेत. गेली अनेक वर्षे या सभागृहामध्ये मी यासंदर्भातील प्रश्न मांडतो आहे. माझ्यासारखा सिनियर सदस्य २५ वर्षे या सभागृहाचा सदस्य आहे. खरे सांगावयाचे म्हणजे तुमचे बाबू लोक तुम्हाला उमजू देत नाहीत. एकदा महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव मंजूर केल्यानंतर तो शासनाकडे पाठविण्यात येतो. शासनाकडे ठराव पाठविल्यानंतर त्यावर आठ दिवसात निर्णय होण्याची आवश्यकता आहे, परंतु तुमच्या समोरच ती नस्ती लवकर येत नाही. बाबू लोक तुमच्याकडे नस्ती पाठवित नाही. आम्ही एखाद्याची आपल्याकडे तक्रार केली तर आपण त्याची बदली करता. बदली करणे ही शिक्षा नव्हे तर त्याला शिक्षा म्हणून घरी पाठविले पाहिजे, अशी माझी मागणी आहे. सर्वसामान्य जनतेच्या संदर्भात या बाबू लोकांना काहीही अकाउंटीबिलीटी उरलेले नाही.

अध्यक्ष महोदय, भ्रष्टाचाराची कारणे काय असतील तर नस्ती डिले करणे हे होय. या पद्धतीमध्ये सर्वसामान्य माणूस छळला जातो. माझ्यासारखा मोठा माणूस असेल तर तो पैसे देतो आणि स्वत:चे काम करून घेतो. परंतु जो गोरगरीब माणूस आहे, त्याचे काम अडलेले आहे तो मात्र या पद्धतीमध्ये छळला जातो. ही अशी एकूण ३७०० प्रकरणे आहेत. या निमित्ताने मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, आपण आयुक्तांना काही अधिकार देणार आहात की नाही ? जळगाव महानगरपालिकेने एकूण २०० ठराव मान्य केले होते. परंतु त्यातील १९० ठरावांची अंमलबजावणी करीत नसाल तर आम्ही त्या ठिकाणी कशासाठी जावयाचे, केवळ शोभेसाठी तेथे बसावयाचे काय ? असा प्रश्न आम्हाला

**[ श्री. सुरेशकुमार जैन ]**

पडतो. आम्ही बोलावयाला गेलो तर आमचे म्हणणे कोणीही ऐकावयास तयार नाही. आज आम्ही इकडे आहोत उद्या तुम्ही इकडे असाल आणि आम्ही तिकडे असू, परंतु आपल्याला लोकांना मात्र जाब द्यावयाचा आहे. लोकांची मते घेऊन आपण या सभागृहात येऊन बसलो आहोत. शहरांचा विकास करण्यासाठी, सुंदर शहरे बनविण्यासाठी, चांगले हाऊसिंग तयार करण्यासंदर्भातील आपली भूमिका महत्त्वाची असेल, याबद्दल वादच नाही. चांगले हॉस्पिटल देण्यासंदर्भातील आमची भूमिका असेल, अशा विविध कामांची अंमलबजावणी करण्यासाठी, त्याचा पाठपुरावा करण्यासाठी आम्ही येथे आलेलो आहोत.

अध्यक्ष महोदय, मागील महिनाभरात मी पाच पत्रे पोलीस अधीक्षक, जळगांव यांना दिलेली आहेत, ती पाचही पत्रे माझ्याकडे आहेत. परंतु आमचे म्हणणे ऐकूण घेण्यास ते अजिबात तयार नाहीत. कारण काय सांगतात तर आज गुढी पाडवा आहे. आज तर ईद आहे. अशी कारणे त्यांच्याकडून ऐकावयास मिळत असतात. मग महानगरपालिकांनी त्यांच्या हद्दीतील अतिक्रमणे हटवायची कशी ? अतिक्रमणे हटविण्यासाठी पोलीस संरक्षण न देण्याचे कारण काय तर डीएसपी कार्यालयामधील डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये २५ वर्षापासून एक रोड दाखविला होता. त्या रस्त्याची महानगरपालिकेकडून मागणी होत होती, परंतु तो रस्ता त्यावेळी मिळाला नाही. त्या रस्त्यासाठी माननीय उच्च न्यायालयात जावे लागले. माननीय उच्च न्यायालयाकडून आदेश आणले त्यानंतर सदरहू रस्त्याची मागणी पूर्ण झाली. रस्त्याची जमीन सरकारची आहे. डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये रोड दाखविलेला होता, त्यामुळे आमची रोडची मागणी होती. परंतु डीएसपी ला असे वाटत होते की, जणु काही ती जमीन त्यांची स्वत:चीच आहे. २५ वर्षापूर्वी सरकारने डेव्हलपमेंट प्लॅन पास केलेला आहे. तो २५ वर्षापूर्वीचा रस्ता मिळविला म्हणून कोठेतरी त्याला राग आला होता. जळगाव जिल्ह्यातील महापौरांनी मला सांगितले की, मागील महिनाभरात मी पाच वेळा डीएसपीला अतिक्रमण हटविण्यासंदर्भात पत्रे दिली, परंतु तरीही त्यांनी अतिक्रमण हटविण्यासाठी सहकार्य केले नाही. जे तत्त्व लोकांना मान्य नाही ते राज्यकर्त्यांनी करू नये, या मताचा मी आहे. त्यांनी कारण सांगितले की, अगोदर पैसे भरा.

अध्यक्ष महोदय, पैशांच्या संदर्भातील बाब मी आपल्या निदर्शनास आणून दिली तर कार्पोरेशनचे ९० लाख रुपये गृह विभागाकडे बाकी आहेत. यामध्ये हाऊस टॅक्स, नळाचे पाणी अशा विविध बाबींचा समावेश आहे. अशा पद्धतीने राज्याचा राज्य कारभार चालणार आहे का ? अशा पद्धतीने कार्पोरेशनचा विकास होऊ शकतो का, होऊच शकत नाही. हीच परिस्थिती मी मुंबई महानगरपालिकेसंदर्भात वर्तमानपत्रातून वाचत आहे. अतिक्रमणे हटविण्यासाठी पोलीस मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. ...(अडथळा).....हे सर्वांसाठी होऊ द्यावे आबा. जळगाव हाच विषय नाही, मी जे बघतो आहे तेच येथे विशद करतो आहे. सार्वजनिक जीवनात आपण बघतो आहोत. मुंबई, पुणे येथील डेव्हलमेंट प्लॅन असतील किंवा इतर कोणत्याही शहराचे प्लॅन असतील तर तेथील अतिक्रमणे हटविण्यासाठी अशीच परिस्थिती असेल याबाबत शंकाच नाही. आबा, आपले अधिकारी जळगाव शहरात बसून प्लॅन मंजूर करतात. डेव्हलपमेंट प्लॅन संदर्भात, जमिनीच्या संदर्भात पैशांचे व्यवहार होत असतील, हा मूळ भ्रष्टाचार

**[ श्री. सुरेशकुमार जैन ]**

कशामुळे होत असेल तर त्या प्रकरणी निर्णय घेण्यास होत असलेला विलंब. तीन महिन्यात अमूक एक निर्णय झाला पाहिजे अशा प्रकारचे बंधन अधिकाऱ्यांवर घालण्याची आवश्यकता आहे. सर्वसाधारण सभेने एकदा ठराव मान्य केला की, त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही आयुक्तांची असते. परंतु आयुक्त शासनाकडे ठराव पाठवितो आणि विखंडित करून टाकतो. तुम्ही २४ तासात, ३८ तासात किंवा सात दिवसांत तो ठराव विखंडित करा. ठरावाची अंमलबजावणी करावयाची नाही, सरकारकडे पाठवून द्यावयाचा नाही. आठ ते दहा वर्षे ठराव विखंडितही करावयाचा नाही. आणि अंमलबजावणी सुद्धा होऊ द्यावयाची नाही. त्यामुळे लोकांच्या अपेक्षा आणि आकांक्षा कशा पूर्ण होतील. या सर्व बाबी नगरविकास विभागाच्या माध्यमातून सांगाव्याशा वाटतात.

अध्यक्ष महोदय, मला मनापासून आनंद आहे की, हाऊसिंगच्या संदर्भात मुंबईत पुष्कळ कामे होण्यासारखी आहेत. येथे चांगले अधिकारी आहेत, चांगली कामे होऊ शकतात. यासाठी आपण सर्वांनी हातभार लावण्याची आवश्यकता आहे. स्कॅमच्या संदर्भात जो कोणी दोषी असेल त्यांच्याबाबत जे काही करावयाचे आहे ते जरूर करावे. परंतु विकास करताना सर्वसामान्य माणसाला समाधान देणार आहात किंवा नाही. आज साठ वर्षानंतर सामान्य माणसाला पिण्याचे पाणी देणार आहात किंवा नाही ? आज मी ग्रामीण विभागाचा विषय बोलत नाही. आज ग्रामीण विभागाच्या संदर्भात चर्चा नाही. परंतु शहरात सुद्धा अशीच अवस्था झालेली आहे. शहरे झपाट्याने वाढत असताना तेथे जर पिण्याचे पाणी, आरोग्याच्या सुविधा, शिक्षणाच्या सुविधा देणार नसाल, सुंदर गार्डन देणार नसाल तर शासन कसा काय नगराचा विकास करणार आहे. कोणाचा विकास शासन करीत आहे.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदय, व मंत्री महोदयांकडे मी मागणी करतो की, आपण सर्व मिळून शहराचे चांगले नियोजन करण्याची आवश्यकता आहे, मी कोणाचीही चूक दाखवित नाही. यामध्ये ज्या सुधारणा करण्याची आवश्यकता आहे त्या केल्या पाहिजेत. कायदे जुने झाले आहेत,. आवश्यक ते बदल कायद्यात करा, किंवा नवीन कायदे तयार करा. ज्यांची आवश्यकता नसेल ते कायदे रद्द करा. वाढत्या लोकसंख्येच्या काळात मोठे रस्ते असावयास पाहिजेत. पुढील १०० वर्षापर्यंत पिण्याच्या पाण्याचे नियोजन करावयास पाहिजे. यासाठी शहरामध्ये ड्रेनेज, मच्छर विरहित परिसर करणे, स्लमलेस सिटी तयार करणे, चांगल्या शाळा व कॉलेज निर्माण करणे, यासाठी वेगळे प्लॅनिंग नॉम्स् तयार करावे लागतील. आज विकास कामांच्या संदर्भात जे अधिकारी व कर्मचारी काम करीत आहेत, यामध्ये डायरेक्टर टाऊन प्लॅनिंगपासून सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचा माईंडसेट बदली करावा लागेल. त्यांना व्होरायझन बदलावे लागेल. आपण आता विसाव्या शतकात आहोत. पुढील प्रत्येक वर्षी एक कोटी वाहने रस्त्यांवर येणार आहेत. आपण कल्पना करा की दहा वर्षात १४ कोटी लोकसंख्या वाढली आहे. देशाची लोकसंख्या १२१ कोटी झालेली आहे. पुढील २०२१ मध्ये ही लोकसंख्या १३५ कोटी इतकी होणार आहे. कल्पना करा की प्रचंड संख्येने लोकसंख्या देशात वाढत असतांना त्यांना लागणाऱ्या सुखसोई नगरविकास विभाग व ग्रामीण विकास विभागाच्या माध्यमातून करणे अतिशय आवश्यक आहे. त्यासाठी सर्वांनी प्रामाणिक प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी जे-जे करणे आवश्यक आहे ते

**[ श्री. सुरेशकुमार जैन ]**

सरकारने जरुर करावे. सुरेशदादा तुमच्या विरोधात आहे किंवा सन्माननीय सदस्य श्री. बाळा नांदगांवर तुमच्या विरोधात आहेत म्हणून तेथील लोकांना छळू नका. मला एवढेच सांगावयाचे आहे की, आवश्यक ते कायद्यात बदल करून विकासाच्या दृष्टीने सर्व एकत्रित येऊन कार्यवाही करू या, एवढी अपेक्षा व्यक्त करतो. आपण माझे विचार ऐकले त्याबद्दल धन्यवाद देतो व माझे भाषण संपवितो.

**श्री. नवाब मलिक** (अणुशक्तीनगर) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आज सामान्य प्रशासन विभाग, नगर विकास विभाग, गृहनिर्माण विभाग व मराठी भाषा विभाग अशा चार विभागांच्या मागण्या चर्चेला आलेल्या आहेत. मी नगरविकास विभाग व गृहनिर्माण विभागाच्या या दोन मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जैन यांनी सांगितल्याप्रमाणे शहरांचे नागरिकीकरण महाराष्ट्रात जवळपास ५० टक्के इतके झालेले आहे. जनगणनेवरुन आपणा सर्वांना कल्पना आलेली असेल, महाराष्ट्राची लोकसंख्या ११ कोटी इतकी झालेली आहे. यामुळे साडेपाच कोटी लोकसंख्या ही शहरात राहत आहे. साडेपाच कोटी लोकसंख्येच्या सुविधेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. नगरविकास विभागाच्या माध्यमातून जी मागणी सभागृहात सादर करण्यात आली आहे. यामध्ये नगरपालिकांसाठी अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी असे मुद्दे उपस्थित केले आहेत की, मुंबई शहरासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. मी आपणाला सांगू इच्छितो की, गेल्या दहा वर्षात बजेटमध्ये तरतूद झाली नसली तरी मुंबईमध्ये एमयुटीपीच्या माध्यमातून ५५ हजार कोटी रुपयांची कामे झाली आहेत. एमयुआयपीची नवीन संकल्पना आली. एमयुआयपी अंतर्गत जळपास ३ हजार कोटी रुपयांची कामे मुंबई शहरामध्ये करण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जैन यांनी असा मुद्दा उपस्थिती केला की, युती शासनाच्या काळात ५० उड्डाण पूल बांधण्यात आले. मी सांगू इच्छितो की, लालबाग, माटुंगा येथील उड्डाण पुलाचे काम सुरू आहे. सायन जवळ रेल्वेची कामे सुरू आहेत. मुंबई शहरात मागील १० वर्षात ५२ पेक्षा जास्त उड्डाण पूल बांधण्यात आलेले आहेत. मुंबई शहरामध्ये विकासाची कामे सुरू आहेत. मुंबई शहरातील पायाभूत सुविधांवर जो ताण येतो तो ताण कमी करण्यासाठी राज्य शासन अर्थसंकल्पात तरतूद करीत नसेल. परंतु केंद्र शासनाकडून जेएनएनयुआरएम अंतर्गत जेवढा निधी उपलब्ध झाला तो सर्व निधी मुंबई महानगरपालिकेला देण्यात आलेला आहे. एमएमआरडीएच्या विविध योजनांसाठी बजेटमध्ये तरतूद करून मुंबई शहरात विविध विकास कामे हाती घेण्यात आलेली आहेत आणि ती कामे सुरू आहेत. परंतु ती कामे सुरू असतांना काम कोणत्या गतीने होत आहे हे देखील कोठे तरी बघण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहरात एमयुटीची कामे १० वर्षापूर्वी सुरू झाली.

अध्यक्ष महोदय, मला आठवते की, मी प्रथम आमदार म्हणून निवडून आल्यानंतर सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोडचे काम मंजूर करण्यासाठी अनेक मंत्र्यांना भेटत होतो. त्यावेळी श्री. प्रकाश महेता साहेब मुंबई शहराचे पालकमंत्री होते. हा उड्डाण पूल झाला पाहिजे यासाठी मी त्यांच्याकडे सुद्धा पाठपुरावा करीत होतो. कुर्ला शहरातील प्रश्न सुटले पाहिजेत. परंतु सन १९९९ मध्ये सत्ता परिवर्तन झाले. मी स्वत: मंत्री झाल्यानंतर हा उड्डाण पूल होण्यासाठी प्रयत्न केले. त्यावेळी श्री. सुरेश दादा सार्वजनिक

**[ श्री. नवाब मलिक ]**

बांधकाम विभागाचे मंत्री होते. सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोडचे काम आम्ही जागतिक बँकेच्या एमयुटीपी प्रकल्पामध्ये अंतर्भूत करून घेतले. आम्ही मागील ७ वर्षांपूर्वी या कामाचे माननीय केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार साहेबांच्या हस्ते भूमिपूजन केले. परंतु ते काम अजून पूर्ण झालेले नाही आणि ते काम अजून २-४ वर्षे तरी चालेल, अशी परिस्थिती आहे. सांताक्रुझ-चेंबूर लिंग रोडचे काम ७ वर्षे पूर्ण होत नाही, एमयुआपीची कामे ६-६ वर्षे पूर्ण होत नाहीत, एमयुटीपीची कामे १०-१० वर्षे पूर्ण होत नाहीत. मुंबई शहरामध्ये ज्या गतीने विकासाची कामे पूर्ण व्हावयास पाहिजेत त्या गतीने ती कामे पूर्ण होत नाहीत. मी शासनाला विनंती करतो की, आपण एमएमआरडीए असेल, एमएसआरडीसी असेल किंवा इतर ज्या यंत्रणा असतील त्यांना जाब विचारला पाहिजे. मुंबई शहरातील विकासाची जी कामे हाती घेण्यात आलेली आहेत त्या कामांसाठी कालबद्ध कार्यक्रम ठरवून ती सर्व कामे पूर्ण केली पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, मुंबई शहरासाठी राज्य शासनाने जास्त तरतूद करण्याची आवश्यकता नाही. कारण मुंबई महानगरपालिकेचे २२ हजार कोटी रुपयांचे बजेट आहे. त्यातून मुंबई शहराचा विकास होऊ शकतो. परंतु धोरण ठरविण्याची जबाबदारी शासनाची आहे. शासन धोरण ठरवित असताना त्यासंदर्भात तत्काळ निर्णय घेत नाही. निर्णय घेतल्यानंतर एखाद्या अधिकाऱ्याला अधिकार दिल्यानंतर तो अधिकारी त्याला दिलेल्या अधिकाराचा वापर करीत नाही. त्यामुळे मुंबई शहरातील विकासाची कामे थांबलेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. बाबा सिद्दिकी यांनी काही मुद्दे उपस्थित केलेले आहे. मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री. सुबोध कुमार निर्णय घेण्यास तयार नाहीत. ते सांगतात की, माझ्याकडे फाईली पाठवू नका. शासनाने एखाद्या अधिकाऱ्याला अधिकार दिल्यानंतर त्या अधिकाऱ्याने निर्णय घेतला पाहिजे. त्या अधिकाऱ्यामध्ये निर्णय घेण्याची क्षमता नसेल तर त्या अधिकाऱ्याने घरी बसेले पाहिजे. त्यांना अधिकार देऊन सुद्धा ते निर्णय घेत नसतील तर त्यांना आयुक्तपदी राहण्याचा अधिकार नाही. त्यांची स्वत: निर्णय घेण्याची क्षमता नसेल तर त्यांनी अधिकार डेलिगेट केले पाहिजेत आणि इतर अधिकाऱ्यांना जबाबदारी दिली पाहिजे. ते निर्णय घेत नाहीत त्यामुळे मुंबई शहरातील विकासाची कामे थांबलेली आहेत.

अध्यक्ष महोदय, आपण मुंबई शहराच्या विकासासाठी सन १९९२ मध्ये डीसीआर तयार केलेला आहे. डीसीआर अंतर्गत ओपन स्पेस कन्डोन करण्याचे अधिकार त्या काळामध्ये नव्हते. परंतु त्यानंतर मुंबई शहरातील झोपडपट्टीचा विकास करण्यासाठी आपण ३३ (१०) चा डीसीआर तयार केला. आपण सन १९९७ साली एसआरए योजनेला मंजुरी दिली. त्या अंतर्गत टीडीआर उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली. त्यानंतर आपण २००० मध्ये ३३ (७) मध्ये मॉडिफिकेशन केले. त्या काळामध्ये ३३ (७) आणि ३३ (१०) हे डीसीआर नव्हते. एखाद्या जुन्या इमारतीचा पुनर्विकास करीत असताना त्या इमारतीसाठी ओपन स्पेस उपलब्ध नसेल तर त्याला

**(अध्यक्षस्थानी तालिका सभाध्यक्ष ॲड. उत्तमराव ढिकले)**

कन्डोन करण्याचे सर्व अधिकार मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना देण्यात आलेले आहेत. मला अशी माहिती मिळालेली आहे की, जवळ जवळ २००० हजार फाईलींवर निर्णय व्हावयाचा आहे आणि आयुक्त सांगतात की, त्या फाईली माझ्याकडे आणूच नका. मी त्या फाईलींवर स्वाक्षरी करणार नाही. अध्यक्ष महोदय,

[ श्री. नवाब मलिक ]

शासनाने त्या अधिकाऱ्यांना सांगावे की, ज्या ठिकाणी आपल्याला सही करण्याची ड्युटी नसेल तेथे त्यांनी जावे, परंतु या जागेवर आपल्याला काम करण्याचा व बसण्याचा अधिकार नाही. जर त्या अधिकाऱ्यांमध्ये सही करण्याची हिंमत नसल्यास त्यांनी सदर अधिकार एखाद्या मुख्य अभियंत्याकडे डेलिगेट करायला पाहिजे. अन्यथा मुंबईतील विकासांची कामे होऊ शकणार नाहीत. या संदर्भात शासनाच्या विविध योजनांमध्ये भ्रष्टाचार होत असल्याची कारणे सांगितली जात आहेत. अध्यक्ष महोदय, एखाद्या ठिकाणी भ्रष्टाचार झाल्यास संबंधिताला पकडता येते, किंवा त्याला दंड सुद्धा करता येतो. परंतु एखाद्या ठिकाणी भ्रष्टाचार झाल्यामुळे प्रलंबित असलेली २००० कामे करणार नाहीत अशा प्रकारची पद्धत स्वीकारली जात आहे. ही बाब अत्यंत चुकीची आहे. ही पद्धत कोठे तरी थांबण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर झोपडपट्टींचे प्रश्न प्रलंबित आहेत. सध्या मुंबईत अनेक ठिकाणी झोपडपट्ट्यांच्या विकासाची कामे सुरू आहेत. परंतु झोपडपट्टीसाठी १९९७ साली एक खिडकी योजना सुरू करण्यात आली. सन १९९७ साली मी प्रथमच आमदार म्हणून विधानसभेवर निवडून आलो होतो. तेव्हा दादा, आपण मंत्री असताना एक खिडकी योजनेसंबंधी नागपूरच्या विधानसभेमध्ये मंजुरी घेण्यात आली. त्यावर सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांनी भाषणांद्वारे आपापले विचार व्यक्त केले. एक खिडकी योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे एखादा प्लॅन सादर झाल्यानंतर त्या प्लॅनला १५ दिवसांच्या आत मंजुरी मिळाली पाहिजे जेणेकरून १-२ वर्षांत त्या इमारती पूर्ण झाल्या पाहिजेत व झोपडपट्टी धारकांना स्वत:च्या मालकीची घरे मिळाली पाहिजेत. अध्यक्ष महोदय, आमच्या अनुभवाप्रमाणे एसआरए योजनेत एका एका मंजुरीसाठी २ ते ३ वर्षांचा कालावधी लागतो. एखादी मंजुरी मिळाल्यानंतर पुढील सीसी घेण्यासाठी ६ महिन्यांचा कालावधी लागतो. सध्या मुंबईत एसआरए योजनेसाठी एक खिडकी योजना राहिलेली नाही. या योजनेतंर्गत ५० ठिकाणी मंजुरी आणण्यासाठी जावे लागते. एका एका ठिकाणी ४ ते ६ महिने फाईल प्रलंबित राहते. शासनाने एसआरए योजनेअंतर्गत मिळणाऱ्या घरांसाठी २२५ चौरस फुटांची मर्यादा वाढवून ती २७० चौरस फुटांपर्यंत करण्यात आली. तेव्हा झोपडपट्टी धारकांनी एसआरए योजनेतंर्गत २२५ चौरस फुटांची नव्हे तर २७० चौरस फुटांची घरे दिली जावीत अशी मागणी केली. या संदर्भात आम्ही अशी मागणी केली की, सुरू असलेल्या योजनेत ज्या ठिकाणी शक्य आहे तेथे २७० चौरस फुटांच्या घरांसाठी शासनाने मान्यता द्यावी. या संबंधी शासनाने असा निर्णय घेतला की, एका वर्षाच्या कालावधीत यासंबंधी ज्यांच्याकडून मागणी केली जाईल त्यांची मागणी मान्य केली जाईल. एका वर्षाच्या कालावधीत शासनाकडे बरेच अर्ज करण्यात आले. यासंबंधी काही बिल्डरांनी नगरविकास विभाग व गृहनिर्माण विभागाकडे पाठपुरावा करून प्रलंबित असलेल्या प्रस्तावाच्या प्रलंबित फाईल्स पुढे नेण्याचा प्रयत्न केला. परंतु काही योजना गरीब लोकांच्या आहेत. अध्यक्ष महोदय, कुर्ला येथे धम्म को. ऑप हौसिंग सोसायटी आहे. ही दलित लोकांची सोसायटी आहे. त्या सोसायटीची फाईल गेल्या ३ वर्षापासून मंत्रालयात प्रलंबित आहे, ती फाईल पुढे सरकत नाही. एखाद्या वेळी मी फोन केल्यानंतर ती फाईल थोडी पुढे सरकते. अशा प्रकारे मुंबईतील एसआरए योजनेची अवस्था आहे.

**[ श्री. नवाब मलिक ]**

याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. पारदर्शक कारभार करू असे माननीय मुख्यमंत्री महोदयांकडून सांगितले जाते. अध्यक्ष महोदय, अशा प्रकारच्या प्रलंबित असलेल्या फाईल्स एका आठवड्याच्या आत क्लिअर करून पुढे पाठविणे आवश्यक आहे. जेणेकरून गेल्या ५-५ वर्षांपासून संक्रमण शिबिरात राहणाऱ्या झोपडपट्टी धारकांचे स्वप्न पूर्ण होऊन त्यांना त्यांच्या मालकीची घरे मिळू शकतील.

अध्यक्ष महोदय, भारताने वल्डकप जिंकल्यामुळे आज या विधानसभेने भारताच्या क्रिकेट टीमचे अभिनंदन केले. राज्य शासनाने श्री. सचिन तेंडुलकर साठी पारितोषिक जाहीर केले. श्री. सचिन तेंडुलकर यांना " भारतरत्न " मिळण्यासाठी या सभागृहाने ठराव संमत केला होता. अध्यक्ष महोदय, मी सभागृहाला एक धक्कादायक बाब सांगू इच्छितो की, मुंबई महानगरपालिकेतल्या मार्केट व गार्डन समितीने असा ठराव केला आहे की, कोणत्याही मैदानावर मुलांना क्रिकेट खेळता येणार नाही. यासंबंधी १९७७ साली परिपत्रक काढण्यात आले होते. अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघात क्रिकेट स्पर्धा घ्यावयाची असल्यामुळे मी वॉर्ड ऑफिसरकडे परवानगी घेण्यासाठी गेलो असता, त्यांनी मला सांगितले की, मार्केट व गार्डन समितीने सन १९७७ मध्ये ठराव केल्यामुळे आपल्याला मैदानावर क्रिकेट स्पर्धेसाठी परवानगी देता येणार नाही. याउलट आपल्याला मैदानावर कबड्डी किंवा खो-खो खेळण्याची परवानगी देता येईन. आपण बेकायदेशीरपणे मैदानावर क्रिकेट स्पर्धा घ्यावी. परंतु यासाठी आम्ही आपल्याला कायदेशीररित्या परवानगी देऊ शकत नाही. अध्यक्ष महोदय, मुंबईतल्या मैदानांवर क्रिकेट खेळून श्री. सचिन तेंडुलकर यांच्या सारखा महान खेळाडू निर्माण झाला. त्यांना " भारतरत्न " देण्यासाठी आपल्या सभागृहाने एकमताने ठराव संमत केला. अशा परिस्थितीत मुंबईतल्या मैदानांवर क्रिकेट खेळण्यास परवानगी न देणे, ही अत्यंत खेदाची बाब आहे. या संदर्भात मार्केट व गार्डन समितीने सन १९७७ मध्ये काढलेले परिपत्रक शासनाने रद्द करावे व मुंबई शहरामध्ये मुलांना क्रिकेट खेळण्यासाठी मैदाने उपलब्ध करून दिली पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, मुंबईत अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. मुंबईची लोकसंख्या जवळपास २ कोटी आहे. अशा परिस्थितीत मुंबईत मोठ्या प्रमाणावर पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत आहे. मी ज्या मतदारसंघात आमदार या नात्याने काम करीत आहे त्या ठिकाणी अनेक विभागात पाण्याची तीव्र टंचाई आहे. पाण्याच्या संदर्भात दररोज मोर्चे काढले जात आहेत. माझ्या मतदारसंघातील अनेक विभागात पाण्याची तुटपुंजी सोय केलेली आहे. मुंबईतील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन गोवंडी, वाशी नाका किंवा मानखूर्द या भागात केले जाते. एमयुटीची कामे सुरू झाली की ५० हजार प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन त्या ठिकाणी केले जाते. पुनर्वसन करीत असताना त्या ठिकाणी पाण्याची कोणतीही सुधारणा केली जात नाही. त्यामुळे महानगरपालिकेवर अनेक मोर्चे, आंदोलने काढली जात आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अबु आझमी आज सभागृहात उपस्थित नाहीत. पाणी टंचाईवर ते नेहमीच आक्रमक भूमिका धेत असतात. ज्या विभागात पाणी टंचाई असते, त्या ठिकाणी आमदार या नात्याने आम्हाला फिरता येत नाही. माझ्या मतदारसंघात श्री. जलोटा आणि पालकमंत्री यांच्यासमवेत पाणी टंचाईच्या संदर्भात एक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी २ ते ४ एमएलडी पाणी वाढवून देण्याची भूमिका घेतली होती. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार मुंबईतील प्रत्येक भागात पाण्याचे समान वाटप केले पाहिजे.

**[ श्री. नवाब मलिक ]**

अध्यक्ष महोदय, मुंबईतील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन गोवंडी, वाशी नाका किंवा मानखूर्द या भागात केले जाते. परंतु प्रकल्पग्रस्तांसाठी शिक्षणाच्या कोणत्याही सुविधा केल्या जात नाही, ही खरी वस्तुस्थिती आहे. प्रकल्पग्रस्तांसाठी मानखुर्दमध्ये कोणत्याही शाळांची व्यवस्था केलेली नाही. मानखुर्दमध्ये एसपीपीएलने ४ हजार घरे बांधलेली आहेत. त्या ठिकाणी अनेक मोकळ्या भूखंडावर घरे बांधण्याची कार्यवाही सुरू झालेली आहे. यासंदर्भात आम्ही संबंधितांकडे ३३ (१०) डीसीआर अंतर्गत बांधकामे बांधण्याबाबत सांगितले होते. महानगरपालिकेला शाळेची इमारत बांधून देण्याची गरज आहे. जोपर्यंत त्या ठिकाणी शाळा सुरू होत नाही, तोपर्यंत तेथील गोरगरिबांना शिक्षण मिळणार नाही. वाशी नाक्याला देखील जवळपास १० ते १२ हजार सदनिका बांधण्यात आलेल्या आहेत. त्या ठिकाणीसुध्दा कोणत्याही प्रकारे शिक्षणाची आणि शाळांची, हॉस्पिटलची व्यवस्था करण्यात आलेली नाही.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिका २२ हजार कोटी रुपयांचे बजेट सादर करीत असताना आरोग्यासाठी फक्त २१०० कोटी रुपये खर्च करते. अध्यक्ष महोदय, गोवंडी भागात शताब्दी रुग्णालय आहे. गोवंडी येथील शताब्दी रुग्णालच्या संदर्भात मी विधानसभेत अनेक वेळा प्रश्न उपस्थित केलेला आहे. पण आजपर्यंत शताब्दी रुग्णालयाच्या इमारतीमध्ये आज कोणत्याही प्रकारची अत्यावश्यक दुरुस्ती करण्यात आलेली नाही. मी कोणत्याही विभागावर टीका करणार नाही. कुपर हॉस्पिटलच्या परिसरात आज धनाढ्य लोक राहत आहेत. कुपर हॉस्पिटलवर हजारो कोटी रुपये खर्च करून ते रुग्णालय उभारलेले आहे. कांदिवली येथे रुग्णालयाची आवश्यक ती कामे पूर्ण केली जात आहेत. याबद्दल आमचे काहीच म्हणणे नाही. पण गोवंडीमध्ये दलित, मागासवर्गीय, अल्पसंख्याक, गोरगरीब लोक राहत आहेत. त्या ठिकाणी अत्याधुनिक रुग्णालय उभारले गेले पाहिजे. याकरिता मी वेळोवेळी संबंधित आयुक्तांशी पत्रव्यवहार करून बैठका आयोजित करण्याबाबत विनंती केली असता ते वेळ देत नाही आणि बैठका आयोजित करीत नाहीत. या बाबीकडे माननीय मंत्री महोदयांनी लक्ष देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाने जीवनदायी योजना सुरू केलेली आहे. सर्वांचा विमा ते काढणार आहेत. याचा लाभ गोरगरिबांना निश्चितपणाने होणार आहे. मुंबई महानगरपालिकेने शहरातील रुग्णालयांचा दर्जा वाढविण्यास अत्यावश्यक ती कामे केली पाहिजेत. नवीन रुग्णालये निर्माण करणे जरुरीचे आहे. ज्या ठिकाणी रुग्णालयाचे आरक्षण आहे त्या ठिकाणी रुग्णालयच उभारले गेले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, गृह निर्माण विभागातर्फे झोपडपट्टीचा विकास केला जात आहे. अनेक ठिकाणी शाळा नाहीत. शेकडो भूखंड महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत. पण त्या ठिकाणी गोरगरीब मुलांसाठी शाळा बांधल्या जात नाही, हीच खरी दुर्दैवाची गोष्ट आहे. यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी महानगरपालिकेला डायरेक्शन देण्याची गरज आहे. ज्या ठिकाणी भूखंड आहे, त्या ठिकाणी गोरगरीब मुलांसाठी शाळा बांधल्या पाहिजेत. झोपडपट्टीत एखादी शाळा सुरू असेल तर त्या ठिकाणी एसआरए अंतर्गत सांगितले जाते की, आपल्याकडे चार वर्ग खोल्या असल्यामुळे फक्त चारच खोल्या मिळतील. मला वाटते हे धोरण चुकीचे आहे. चार खोल्या किंवा पाच खोल्यांवर शाळा चालत नाही. याकरिता फ्री एफएसआय देण्याची गरज आहे. एसआरए अंतर्गत फ्री प्लेस शाळा बांधण्याची परवानगी दिली पाहिजे. अशा प्रकारची तरतूद एसआरएअंतर्गत केली पाहिजे. माझ्या मतदारसंघातील देवनार भागात स्लॉटर हाऊस आहे. १९७६ च्या काळात रस्त्यावर किंवा वांद्रे परिसरात स्लॉटर हाऊसमध्ये कामे सुरू होती.

**तालिका सभाध्यक्ष** (ॲड. उत्तमराव ढिकले) **:** सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

**श्री. ग. आ. देशमुख :** अध्यक्ष महोदय, सभागृहातील कामकाज किती वाजेपर्यंत संपवावे या बाबत काही तरी मर्यादा निश्चित केली पाहिजे. आज सकाळी ११.०० वाजता सभगृहाचे कामकाज सुरू झालेले आहे. सायंकाळ ६.००, ७.०० वाजेपर्यंत किंवा रात्री ९.००, १०.०० या प्रमाणे निश्चित वेळ ठरवावी व त्या वेळेस कामकाज संपवावे. वेळेची मर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

**श्री. नवाब मलिक :** अध्यक्ष महोदय, देवनार स्लॉटर हाऊसची परिस्थिती अतिशय वाईट झालेली आहे. तेथे भिंत नाही. जनावरांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही. तेथील परिस्थिती आता हाताबाहेर गेली आहे. महानगरपालिकेच्या सहायक आयुक्त, श्रीमती मनीषा म्हैसकर यांच्याशी मी चर्चा केली. त्यांनी मला असे सांगितले की, आमच्याकडे निधी उपलब्ध नाही. निधी प्राप्त झाल्यास यामध्ये सुधारणा केली जाईल. माननीय केंद्रीय मंत्री श्री. शरद पवार यांच्याशी मी चर्चा केली. त्यांनी श्री. सुबोधकुमार यांना फोन केला. देवनार स्लॉटर हाऊसच्या संदर्भात प्रस्ताव पाठवावा त्याकरिता केंद्र शासनाकडून ४५० कोटी रुपये देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. महानगरपालिकेने केंद्र शासनाकडे हा प्रस्ताव पाठविल्यास ४५० कोटी रुपये उपलब्ध होतील व दर्जेदार कत्तलखाना निर्माण होण्यास मदत मिळू शकेल. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश महेता माझ्याकडे बघून हसत आहेत. त्यांच्या मनात काय आहे, ते मला कळते आहे. देवनार स्लॉटर हाऊसच्या संदर्भात एका विशिष्ट समाजाचा कारभार चालला आहे, असे त्यांना वाटत असेल.

**श्री. प्रकाश महेता :** अध्यक्ष महोदय, माझे नाव काढण्यात आले म्हणून मी स्पष्टीकरण करीत आहे. मी त्यांच्याकडे बघून केवळ मिष्कीलपणे हसलो. मला काय म्हणावयाचे आहे, माझ्या मनात काय आहे, हे त्यांनी कसे काय ओळखले ? मुंबईतील कत्तलखान्याकरिता ४५० कोटी रुपये मिळवून त्याचा विकास करावयाचा. मुंबईतील रहिवाशांचे मरण होत असताना मुंबईतील जगभरात मटण पाठविण्याचा प्रस्ताव आहे.

**श्री. नवाब मलिक :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश महेता यांना आपल्या भाषणात मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. देवनार स्लॉटर हाऊस येथे डुकरे कापली जातात. तेथे हायजिनिक पद्धतीचे फूड उपलब्ध होते. ज्यांना शाकाहार करावयाचा असेल त्यांनी तो करावा. मात्र इतरांना मांसाहार करण्यासाठी त्यांना थांबवता येणार नाही.

अध्यक्ष महोदय, आज मुंबई शहरात विविध प्रश्न आहेत. एमएमआरडीए मार्फत अनेक मेट्रो रेल्वेचे प्रोजेक्ट तयार केले जात आहेत. मेट्रो रेल्वेला मंजुरी दिली आहे. मेट्रो रेल्वेचा पहिला टप्पा वर्सोवा ते घाटकोपर असून त्या कामास सुरुवात झालेली आहे. कांदिवली-बांद्रा-मानखुर्द च्या कामाची देखील सुरूवात होणार आहे. घाटकोपर व मानखुर्द जोडण्यासाठी पुढील टप्प्यात काम हाती घेण्याची आवश्यकता आहे. नवी मुंबईमध्ये विमानतळ निर्माण होणार आहे. या विमानतळाला जोडण्यासाठी मेट्रो रेल्वे तयार केली पाहिजे. ठाण्या करिता वेगळी मेट्रो रेल्वे, मुंबईकरिता वेगळी मोनो रेल्वे असे न

[ श्री. नवाब मलिक ]

करता एकत्रित प्रोजेक्ट सुरू करण्याची आवश्यकता आहे. मिरा भाईंदर येथे राहणारी व्यक्ती केवळ तेथेच फिरत नाही तर ते लोक कामानिमित्त मुंबईत देखील येतात. तसेच मुंबईतील लोक देखील मिरा भाईंदर येथे कामानिमित्त जातात. नव्या मुंबईतील लोक मुंबईत येतात व मुंबईतील लोक देखील नव्या मुंबईत जात असतात. त्यामुळे, ठाणे, मुंबई रायगड या शहरांच्या विकासाकरिता इंटीग्रेटेड प्लॅन तयार करून पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी निरनिराळे मुद्दे मांडले. सॅटेलाईट सिटी तयार केली पाहिजे, असे सांगण्यात आले. अध्यक्ष महाराज, मला आठवते की, मी एमएमआरडीएचा सदस्य असताना आमच्याकडे डोंबिवलीतील २७ गावे व भिवंडीतील ५७ गावांबाबतचे सॅटेलाईट सिटीबाबतचे दोन प्रस्ताव त्यांचा आराखडा तयार करून मान्यतेसाठी आले होते. ही हजारो एकर जमिनीची योजना आहे व त्याचा फायदा कुणाला होणार आहे तर त्या हजारो एकर जमिनीपैकी पैकी ५ हजार एकर जमीन लोढा कन्स्ट्रक्शन कंपनीची आहे, याचा फायदा त्या कंपनीला मिळणार आहे. तो लहान शेतकऱ्याला मिळणार नाही. हिरानंदानीची २ हजार एकर जमीन आहे, त्यांना फायदा मिळणार आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, याबाबतचा आराखडा पाहिल्यावर माझ्या लक्षात आले की, या बिल्डर लोकांच्या जागेवर अजिबात आरक्षण ठेवण्यात आलेले नाही. लहान शेतकऱ्यांच्या जागेवर सगळी आरक्षणे आहेत. आपल्या मार्फत मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण या राज्यामध्ये टाऊनशिपचा नवीन कायदा आपण मंजूर केलेला आहे त्या कायद्या अंतर्गत सर्व जमीन टाऊन प्लानिंगसाठी घेतली पाहिजे. त्या अंतर्गत लोढा बिल्डरची जर ५ हजार एकर जमीन असेल तर त्याच्या ३३ टक्के जमीन विकासासाठी लागत असेल तर त्यामध्ये समान कपात झाली पाहिजे. एखादा गरीब (अडथळा)

(सन्माननीय सदस्य, श्री. मंगलप्रभात लोढा उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात)

लोढा बिल्डर ही कंपनी आहे. मी कोणाचेही व्यक्तिगत नाव घेतलेले नाही. लोढा कन्स्ट्रक्शन ही कंपनी आहे जिची ५ हजार एकर जमीन आहे, सन्माननीय सदस्यांना व्यक्तिगत आक्षेप घेण्याचे अधिकार नाहीत, मी व्यक्तिगत मंगलप्रभात लोढा हे नाव घेतलेले नाही.

**श्री. मंगल प्रभात लोढा :** अध्यक्ष महोदय, लोढा कंस्ट्रक्शन की एक इंच जमीन भी सरकार से ली हुई नहीं है. यह एक बात हो गई. दूसरी बात यह कि मुंबई का कोई भी बिल्डर डोंबिवली में काम नहीं करना चाहता है.....(व्यवधान)...... वहां पर अगर लो कॉस्ट हाऊसिंग के लिए कोई काम करता है.....(व्यवधान).....आपके मन में यह गलतफहमी है कि किसी की जमीन पर रिजर्वेशन डाला है या किसी की जमीन पर रिजर्वेशन नहीं डाला है. किसी की जमीन पर रिजर्वेशन डालते समय एमएमआरडीए ने....(व्यवधान)...... अभी तो प्लान डिक्लेयर भी नहीं हुआ है. अध्यक्ष महोदय, बिना जानकारी के गलत आक्षेप लगाना ठीक नहीं है इसलिए मेरा आपसे निवेदन है कि सम्माननीय सदस्य की वह बात रिकॉर्ड पर नहीं रहनी चाहिए.

**श्री. अमिन पटेल :** अध्यक्ष महोदय, मैं यह जानना चाहता हूं कि लोढा जी ऑन बिहाफ ऑफ लोढा कन्स्ट्रक्शन बोल रहे हैं कि आमदार लोढा जी बोल रहे हैं.

**श्री. नवाब मलिक :** सन्माननीय मंगलप्रभात लोढा साहेब मी त्यांचे नाव घेत नसताना उभे राहिले. हे क्लॅरिफिकेशन ते ऑन बिहाफ ऑफ मंगलप्रभात लोढा देत आहेत की, लोढा कन्स्ट्रक्शन कंपनीतर्फे देत आहेत ते मला माहीत नाही. नवीन टाऊनशिप कायद्यामध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, शासनाने ती संपूर्ण जागा स्वत:च्या मालकीची केली पाहिजे. रस्ते, गार्डन व इतर विकासाच्या कामासाठी जर ती जागा जात असेल तर, त्याचे समान वाटप करून प्रत्येकाला ती जागा मिळू शकते असा कायदा या राज्यामध्ये झालेला आहे.

अध्यक्ष महाराज, डोंबिवलीतील २७ गावांचा तसेच, भिवंडीतील ५७ गावांचा विकास झाला पाहिजे. तेथे हजारो एकरांची दोन टाऊनशिप निर्माण झाली पाहिजे पण हे होत असताना,... अध्यक्ष महाराज, माझ्या पक्षातर्फे केवळ दोनच सदस्य बोलणार आहेत, मलाच बोलण्यासाठी सगळा वेळ देण्यात आलेला आहे कृपया मला बोलू द्यावे. हे विकास होत असताना ग्रामीण भागातील आगरी समाजाचे जे लहान लहान शेतकरी आहेत ते रोज मला येऊन भेटतात व सांगतात की, मलिकसाहेब आपण एमएमआरडीएमध्ये सदस्य आहात, आमच्या जागेवर गार्डन दाखविण्यात आले आहे, तेथे ना-विकास क्षेत्र जाहीर करण्यात आले आहे, तेथे इंडस्ट्रिअल झोन जाहीर करण्यात आले आहे. तेथे इमारती बांधण्यासाठी विकसकाने जी जमीन खरेदी केली आहे, त्याच्यामध्ये सगळे डेव्हलपमेंटचे प्लान तयार करण्यात आले आहेत. या दोन्ही शहरांमध्ये जवळ-जवळ ८०-९० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे आणि त्याचा फायदा या लोढा कन्स्ट्रक्शन कंपनीला होणार आहे. त्यांनी जवळपास १० हजार एकर जागा २० हजार रुपये एकर भावाने घेतली. हे प्लान मंजूर झाल्यानंतर तेथील एका एकर जागेची किंमत जवळपास २० हजार कोटी रुपये इतकी होणार आहे, आणि लोढा कन्स्ट्रक्शन कंपनीला १ लाख कोटी रुपये एवढा फायदा होणार आहे. मी एमएमआरडीए मध्ये सदस्य असताना याला दोनदा विरोध केलेला आहे. माननीय मंत्री महोदय, मी हे याच्यासाठी बोलत आहे की, याचा तपास केला पाहिजे. या २७ गावांची मालकी कुणाची आहे, याचा फायदा कुणाला होणार आहे पण अधिकारी कुठे तरी पळवाट काढत आहेत असे वाटते. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, यामध्ये किती पैशांची गुतवणूक केली जाणार आहे ? रस्त्यांसाठी किती पैसे लागणार आहेत ? पाणी उपलब्ध करून देण्यासाठी किती निधी लागणार आहे, पदपथ बांधण्यासाठी किती निधी लागणार आहे असे मुद्दे उपस्थित केल्यावर तो कुठेतरी थांबला. लोढा यांचा फायदा होणार म्हणून माझ्या पोटात दुखत नाही. परंतु अशाप्रकारचा फायदा होत असताना लहान शेतकरी मरणार नाहीत याची दक्षता कुठे तरी घेतली पाहिजे. विकासाचा लाभ लोढा कन्स्ट्रक्शन्सला मिळू द्या, परंतु जे लहान शेतकरी आहेत, ज्यांची एक-दोन एकराची शेती आहे, तो भाग नो-डेव्हपलमेंट झोन करून त्यांच्यावर अन्याय करू नये. तेव्हा या गोष्टींवर पुनर्विचार करून जो नवीन कायदा करण्यात आलेला आहे त्या कायद्यांतर्गत सर्वांना समान न्याय देण्यात यावा आणि जे लहान शेतकरी आहेत त्यांच्यावर होणारा अन्याय थांबवावा अशी माझी मागणी आहे.

**[ श्री. नवाब मलिक ]**

अध्यक्ष महाराज, गृह निर्माण राज्य मंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. मला गृह निर्माण खात्याशी संबंधित दोन-तीन सूचना करायच्या आहेत. आपल्याकडे स्लम डेव्हलपमेंट बोर्ड आहे. मुंबई शहरामध्ये आमदार फंडातून कामे होत आहेत. डी.पी.डी.सी.च्या फंडातून कामे होत आहेत. ही सर्व कामे करताना ३३ टक्के कामे सोसायटीला, ३३ टक्के कामे नवीन इंजिनिअर्सना आणि ३३ टक्के कामे टेंडरद्वारे करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आमचा टेंडर पध्दतीला विरोध नाही. परंतु २०१०-२०११ वर्षे संपले तरी अजून टेंडरींग झालेले नाही. एकेका कामाचे टेंडर काढण्यात येणार आहे. आपण मुंबई महानगरपालिकेमध्ये एकेका विभागासाठी रेट कॉन्ट्रक्ट देतो. एका वर्षामध्ये जेवढी कामे निघतील मग त्यामध्ये ए.पी.ब्लॉकसाठी अमुक तरतूद, लादी बसविण्यासाठी अमुक तरतूद, अमुक एका मीटरच्या गटारसाठी इतकी तरतूद अशाप्रकारे कुठेतरी रेट कॉन्ट्रॅक्ट सिस्टीम करून मतदारसंघवाईज टेंडर काढले पाहिजे. जेणेकरून आम्ही सूचना केल्यास आमची तत्काळ कामे होतील आणि आमचा निधी लॅप्स न होता त्याचा फायदा झोपडपट्टीतील लोकांना होईल आणि झोपडपट्टीमध्ये कामे होतील.

अध्यक्ष महाराज, आज मुंबईतील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या जवळपास ६० लाख आहे. जेव्हा स्लम बोर्ड निर्माण करण्यात आले त्यावेळी असे सांगण्यात आले होते की, एका झोपडीमागे एक हजार रुपये खर्च करण्यात येईल. परंतु ही तरतूद फार वर्षापूर्वी केली होती. आजचा विचार केल्यास प्रत्येक झोपडीमागे २० हजार रुपये तरतूर करण्याची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे ६० लाख झोपडपट्टीवासियांसाठी तरतूद केली पाहिजे आणि त्याप्रमाणे कामे झाली पाहिजेत. आपण झोपडपट्टी विकासासाठी बजेटमध्ये तरतूद करीत नाही. यापूर्वी झोपडपट्टीमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने बजेटमध्ये ३०-४० कोटी रुपयांची तरतूद केली जात असे. परंतु आता तशी तरतूद करण्यात येत नाही. कारण या संदर्भात केंद्र शासनाने वाल्मिकी योजना अंमलात आणल्यानंतर सरकारने बजेटमध्ये तरतूद करण्याचे सोडून दिले आहे. परंतु मागील दोन वर्षापासून केंद्र आणि राज्य सरकारकडून निधी मिळालेला नाही. त्यामुळे झोपडपट्टीत काही विकासाची कामे झाली नाहीत.

सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जैन यांनी सांगितले की, आम्ही झोपडपट्टीवासियांना एस.आर.ए. अंतर्गत फुकट जागा देत होतो. परंतु आता २५ टक्के रेडीरेकनरनुसार पैसे आकारले जातात. त्यामुळे महानगरपालिकेला, म्हाडाला आणि राज्य सरकारला पैसे उपलब्ध होत आहेत. परंतु सरकार हे पैसे पूल बांधण्यासाठी व इतर कामांसाठी वापरीत आहेत. झोपडपट्टीवासियांसाठी ते पैसे उपलब्ध करून देत नाही. ज्यावर्षी एस.आर.ए. अंतर्गत जमिनीचे पैसे मिळतील ते सर्व पैसे झोपडपट्टीवासियांच्या सोयीसुविधा पुरविण्यासाठी वापरण्यात येतील असे आपण बंधन आणले पाहिजे. आपण अशाप्रकारचा निर्णय घेतल्यास मुंबई शहरात जवळपास २०० ते ३०० कोटी रुपये उपलब्ध होतील आणि त्यातून सर्व आमदारांच्या मतदारसंघातील झोपडपट्ट्यांत सोयीसुविधा पुरविण्याची कामे होतील.

अध्यक्ष महाराज, युतीचे सरकार असताना श्री. मनोहर जोशी हे मुख्यमंत्री होते. त्यावेळी बोरिवली येथील " शिवसागर " इमारत कोसळली होती. त्यावर विधानसभेत दिवसभर चर्चा झाली. आम्ही मागणी केल्यानंतर अफझलपूरकर समिती नेमण्यात आली. मुंबई शहरामध्ये जुन्या इमारतींच्या संदर्भात एक

**[ श्री. नवाब मलिक ]**

धोरण ठरविण्यात आलेले आहे. परंतु उपनगरामध्ये अशाप्रकारच्या उपाययोजना शोधण्यासाठी अफझलपूरकर समितीची स्थापना करण्यात आली. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश महेता हे पालकमंत्री होते. मी या विभागाचा मंत्री असताना अफझलपूरकर समितीचा अहवाल सादर केला होता. मंत्रिमंडळाने अभ्यास करून त्या अहवालास मंजुरी दिली. डी.सी.आर. करण्यासंदर्भात मंत्रिमंडळाने सात वर्षापूर्वी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी आजपर्यंत झालेली नाही. मुंबईमध्ये इमारत कोसळली की, तेथील रहिवाशांना संक्रमण शिबिरामध्ये जागा मिळते, परंतु उपनगरातील इमारत कोसळल्यास त्या रहिवाशांना संक्रमण शिबिरात जागा मिळत नाही. शासनाने अफझलपूरकर समितीचा अहवाल तत्काळ मंजूर केला आहे, मंत्रिमंडळाने मंजुरी दिलेली आहे. आपण त्या अहवालाची अंमलबजावणी करण्यासाठी तत्काळ निदेश दिले पाहिजेत. महानगरपलिकेला डीसीआर तयार करण्यासासाठी कालमर्यादा ठरविली पाहिजे, जेणेकरून उपनगरामध्ये यापुढे कामे होतील. अध्यक्ष महोदय, मी १-२ मुद्दे मांडून माझे भाषण संपविणार आहे. अध्यक्ष महोदय, म्हाडाची कामे सुरू आहेत. आता २.५ एफएसआय सुरू करण्यात आला आहे. २.५ एफएसआय करण्यात आल्यानंतर विविध कॉलनींच्या विकासाची कामे विकसकाच्या मार्फत होतील. मधल्या काळात मुंबई मंडळाने निर्णय घेतला होता की, आम्ही तुमच्याकडून पैसे घेऊन रेडिरेकनरचे जे दर आहेत त्यामध्ये तुम्हाला प्रॉफिट होणार आहे, तो प्रॉफिट शेअर करून परवानगी देऊ. परंतु, काही दिवसांपूर्वी तुम्ही असा निर्णय घेतला की, आम्ही आता जागा शेअर करणार आहोत. अध्यक्ष महोदय, जागा शेअर करण्यास आमचे देखील समर्थन आहे. परंतु, जागा शेअर करत असताना एखादे धोरण तुम्ही जेव्हा स्वीकारता त्यावेळी त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. काही चाळीमध्ये राहणाऱ्या, एलआयजी, एमआयजीमध्ये राहणाऱ्या लोकांनी एरिया ठरविला आहे, त्यापेक्षा जास्त एरिया देऊ करून काही विकसकांनी संमती घेतली आहे. आता तुम्ही त्यांच्याकडून जादा मागत आहात, ते शक्य होत नाही. आपण त्यासाठी मध्यम मार्ग काढला पाहिजे. जो एरिया त्यांना देऊ केलला आहे, म्हणजे पाचशे फुटांसाठी तुम्ही परवानगी देत असाल तर त्यांनी सातशे देऊ केलेला आहे, ते गृहीत धरुन तुमची आकडेवारी तयार करा आणि जागा त्यांच्याकडून उपलब्ध करून घ्या. जेणेकरुन, मुंबईतील म्हाडाच्या प्लॉटवरील स्किम्स थांबलेल्या आहेत, त्या पुन्हा सुरू होतील.

अध्यक्ष महोदय, मी जास्त काही न बोलता फक्त १-२ सूचना करणार आहे. शासनाने त्या संदर्भात विचार करून निर्णय घेतला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. बाबा सिद्दिकी साहेबांनी प्रोटेक्टेड स्ट्रक्चरला ट्रान्सफर करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. मी मंत्री असताना ट्रान्सफर करण्याच्या बाबतीत सर्व पक्षाच्या लोकांची आम्ही बैठक बोलाविली होती. माननीय मंत्री श्री. नारायण राणे साहेब हे त्यावेळी विरोधी पक्ष नेते होते. भाजपाकडून देखील त्यांचे प्रतिनिधी आले होते. सर्वांनी संमती दिली होती. प्रोटेक्टेड स्ट्रक्चर आहे, त्या संदर्भात अगोदर ट्रान्सफरची पॉलिसी होती. या संदर्भात सर्क्युलर काढण्यात येऊन ट्रान्सफरवर बंदी आहे असे सांगितले गेले. त्यामुळे अडचण निर्माण झाली आहे. झोपडपट्टी ट्रान्सफरची परवानगी दिल्यानंतर आपल्याला पैसे सुद्धा उपलब्ध होऊ शकतात. सन्माननीय सदस्य श्री. बाबा सिध्दीकींनी सांगितले की, अमेंडमेंट मूव्ह केल्यानंतर विधानसभेची प्रोसिडिंग कशी

**[ श्री. नवाब मलिक ]**

बदलली हे आम्हाला कळत नाही. माननीय मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. ते या संदर्भात विचारपूर्वक निर्णय घेतील. आम्ही केलेल्या सूचनांचा गंभीरपूर्वक विचार करतील. डोंबिवलीची ५७ गावे आहेत, भिवंडीची ५७ गावे आहेत, लहान शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये. श्री. मनुकुमार श्रीवास्तव साहेब देखील या ठिकाणी उपस्थित आहेत. माननीय मंत्र्यांनी सदर कायदा मंत्रिमंडळासमोर आणला होता. सदर कायद्यांतर्गत डोंबिवलीतील ५७ गावे व भिवंडीतील २७ गावे विकसित करावीत, अशी विनंती करून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद !

**श्री. नितीन सरदेसाई** (माहिम) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील नगरविकास विभाग व मराठी भाषा विभाग या विभागांच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. मध्यंतरी माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे, असा एक उल्लेख केला होता. मला दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, मी पहिल्या अधिवेशनापासून सातत्याने मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी शासनाने केंद्र शासनाकडे प्रयत्न करावा, असे मांडत आहे. परंतु, तरीही त्यास इतका उशीर लागत आहे. आपण पाहिले तर आपणास असे दिसेल की, इतर राज्ये स्वत:च्या भाषेच्या बाबतीत खूप कडवट आहेत. मी तुम्हाला काही उदाहरणे देतो. तामिळनाडूकडून या संदर्भातील प्रस्ताव २००४ साली पाठविण्यात आला आणि भाषेला लगेच दर्जा मिळाला, संस्कृत भाषेला २००५ साली, कन्नड भाषेला २००८ साली, तेलगू भाषेला २००८ साली दर्जा मिळाला आहे आणि असे असताना महाराष्ट्राकडून २०११ साली असा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यास सुरूवात व्हावी, ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. आपल्या स्वत:च्या भाषेसंदर्भात आपणाला अजिबात अभिमान नाही असे मी म्हणणार नाही. परंतु, त्यासाठी आग्रही भूमिका घेणे हे देखील फार गरजेचे आहे. परंतु, तसे अजिबात दिसत नाही.

अध्यक्ष महोदय, मी यापूर्वी इतर राज्यांचा उल्लेख केला. त्या ठिकाणी सत्ताधारी पक्ष असो, विरोधी पक्ष असो, तेथील प्रेस असो, संस्था असो, सांस्कृतिक क्षेत्रातील लोक असो वा साहित्यिक असो, सर्वजण आपल्या भाषेसाठी आग्रही असतात आणि म्हणूनच या गोष्टी त्या राज्यात होऊ शकतात. भाषेच्या विकासाला सन २०११ साली आपल्या राज्यात सुरुवात झाली. पण त्याचा योग्य प्रकारे पाठपुरावा प्रशासनाकडून होईल, एवढीच अपेक्षा मी सरकारकडून बाळगतो. कारण सभागृहात बोलण्यापुरता असा उल्लेख करावयाचा की, अभिजात दर्जा मिळविण्यासाठी आम्ही प्रयत्न करू आणि पुढे काहीच होणार नाही. असे याबाबतीत तरी होऊ नये, अशी माझी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, मराठी भाषा विभाग एक वर्षापूर्वी स्थापन करण्यात आला आहे. त्याची स्थापना करण्यामध्ये एवढा वेळ का लागावा ? असा प्रश्न आमच्यासमोर उभा राहतो. त्या विभागामध्ये आता राज्य मराठी संस्था, भाषा संचालनालय, विश्वकोष निर्मिती मंडळ यांचा समावेश करण्यात आला आहे. पण हा समावेश केल्यानंतर या विभागाकडे पुरेसा निधी आहे का, त्या विभागाची रचना कशी असणार आहे, याबाबत अजून कोणताही निर्णय माझ्या मते झालेला नाही. मी अभिजात भाषेबाबत आणि नवीन विभागाबाबत येथे सांगितले आहे. पुन्हा एकदा सांगतो की, केवळ याचा उल्लेख सभागृहामध्ये केला, बजेटमध्ये आणि आपल्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये उल्लेख केला आणि पुढे काहीच केले नाही, असे होणार असेल तर ती खेदाची आणि चुकीची गोष्ट आहे.

**[ श्री. नितीन सरदेसाई ]**

अध्यक्ष महोदय, मी याबाबतीत इतर राज्यांची उदाहरणे दिली. ती राज्ये किती पुढे असतात आणि आपण किती मागे असतो, याचे थोडक्यात एक उदाहरण मी देणार आहे. इतर राज्ये किती पुढे आहेत ? तामीळनाडू आणि कर्नाटक या दोन राज्यांमध्ये 'भाषा विभाग' हा स्वतंत्र विभाग असून कॅबिनेट दर्जाचे मंत्री या विभागाची जबाबदारी सांभाळतात. या दोन्ही राज्यात सध्या या विभागाची जबाबदारी स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे. यावरुन हे लक्षात आले असेल की, किती गांभीर्याने ते हा विषय हाताळतात. आंध्र प्रदेश आणि तामीळनाडूमध्ये निव्वळ भाषा विकासासाठी वर्षाला सुमारे २५ कोटी रुपयांची तरतूद केली जाते. आपल्या राज्यात यासाठी किती तरतूद करण्यात आली आहे, याची तपासणी एकदा माननीय मंत्री महोदयांनी करावी. म्हणजे आपल्याला कळेल की, आपण या विषयाच्या बाबतीत किती गंभीर आहोत.

अध्यक्ष महोदय, कर्नाटकमध्ये आपल्या भाषेच्या विकासासाठी किती वेगवेगळया संस्था एकावेळेला काम करीत आहेत, हे कृपया आपण बघावे. या राज्यात सन १९९४ मध्ये कन्नड डेव्हलपमेंट ॲथॉरिटी ॲक्ट लागू झाला आणि कन्नड डेव्हलपमेंट ॲथॉरिटीसाठी ६ कोटी रुपयांची तरतूद त्या राज्याने केली आहे. कन्नड साहित्य परिषदेसाठी २ कोटी रुपयांची तरतूद आहे. इंटरनेटवर कन्नड कोष, ज्याला आपण एनसायक्लोपिडिया म्हणतो, त्यासाठी २ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. विकासात्मक कामे, कन्नड पाट्या, शासन व्यवहारात कानडीचा वापर याबाबत कन्नड डेव्हलपमेंट ॲथॉरिटी निरीक्षक-नियंत्रकाची भूमिका बजावते. अशी कोणती गोष्ट आपल्याकडे केली गेली आहे ? केवळ सभागृहात उल्लेख करायचा आणि पुढे काहीच करायचे नाही, असे चालले आहे. म्हणून मी वारंवार सांगतो की, बाहेर लोकांची एवढी ओरड सुरू असताना आज सुद्धा आपले शासन मराठी भाषेच्या बाबतीत किंचितही गंभीर नाही.

अध्यक्ष महोदय, तामिळनाडूमध्ये बघितले तर तामिळ भाषा विकासासाठी सन १९८१ पासून तामीळ विद्यापीठ स्वतंत्रपणे काम करीत आहे. जगभरात तामिळ लोक मोठ्या प्रमाणावर आहेत, त्यांना आपली भाषा शिकता यावी, तामिळ भाषेचा विकास व्हावा म्हणून, इंटरनेटच्या माध्यमातून तामिळ व्हर्च्युअल युनिव्हर्सिटीची स्थापना सन २००१ मध्ये करण्यात आली आहे. याउलट महाराष्ट्राची परिस्थिती आहे आणि ती अतिशय खेदजनक आहे.

अध्यक्ष महोदय, आजही महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेसाठी स्वतंत्र विद्यापीठ नाही. भाषा विकासासाठी स्वतंत्र विभाग, मंत्रालय किंवा निधी नाही. राज्य मराठी विकास संस्थेसाठी सन २००९-२०१० मध्ये फक्त ४३ लाख रुपयांची तरतूद केली होती. राज्य साहित्य सांस्कृतिक महामंडळ आणि मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ यांच्यासाठी फक्त दीड कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या सगळ्या गोष्टी आणि इतर राज्यांच्या तरतुदी बघितल्या किंवा ते त्यांच्या भाषेच्या बाबतीत किती आग्रही आहेत, हे जर आपण तपासले तर मला वाटते, आपण त्या राज्यांच्या ५ टक्के देखील प्रयत्न करीत नाही आणि हा ५ टक्के प्रयत्न खरोखरच आपले शासन करीत आहे का ? हा देखील प्रश्न माझ्यासमोर आहे.

**[ श्री. नितीन सरदेसाई ]**

अध्यक्ष महोदय, ज्यावेळी अशी परिस्थिती निर्माण होते त्यावेळी आमच्यासारखा पक्ष कुठे तरी मराठी पाट्या, एअरपोर्टवर मराठी भाषेतून उद्‌घोषणा, विमानांमध्ये मराठी वृत्तपत्र वाचण्यास मिळावे, यासाठी आंदोलन करतो. सन्माननीय सदस्य श्री. शिशिर शिंदे यांनी सांगितल्याप्रमाणे आकाशवाणीवर मराठीमध्ये समालोचन व्हावे, मराठी चित्रपटगृहांना चित्रपटगृहे मिळत नाहीत, ती मिळावीत, म्हणून आम्हाला, आमच्या राज्यामध्ये, आमच्या भाषेसाठी आंदोलने करावी लागतात, सरकारशी आणि सगळयांशी भांडावे लागते. त्यातही दुर्दैवाची गोष्टी अशी आहे की, हे सगळे कायदे आज राज्यात आहेत. कायदा अस्तित्वात असताना सुद्धा सरकार, प्रशासन कायद्याची अंमलबजावणी करीत नाही, अंमलबजावणी होत नाही, म्हणून आम्हाला भांडावे लागते आणि अनेकदा तुरुंगवासही भोगावा लागतो. राज्यकर्त्यांना वेगळे आंदोलन करायला लावण्याची आवश्यकताच नाही. सर्व कायदे अस्तित्वात आहेत, त्याची अंमलबजावणी केली तर या सर्व गोष्टी होऊ शकतात. भारतीय घटनेच्या कलम ३४८ नुसार, राज्याच्या उच्च न्यायालयात इंग्रजीचा वापर केला जातो. कलम ३४८(२) नुसार, राज्य सरकार राज्य सरकारच्या माध्यमातून प्रादेशिक भाषेचा वापर करण्याचा निर्णय घेऊ शकते, परंतु आपल्या राज्यात मात्र तो निर्णय घेतला गेलेला नाही. मुंबई उच्च न्यायालयाचा अजूनही ' बॉम्बे हाय कोर्ट ' असाच नेहमी उल्लेख केला जातो. विधान भवनातूनही जी विधेयके आमच्याकडे येतात, त्यामध्ये 'बॉम्बे' असाच वारंवार उल्लेख केलेला असतो. अनेक वर्षे लोटली तरी सुद्धा मुंबईचा उल्लेख 'बॉम्बे' का करण्यात येतो, ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. हाय कोर्टाचे निकालपत्र इंग्रजीत असावे, हे जरी बंधनकारक असले तरी सुद्धा व्यवहाराची भाषा प्रादेशिक असण्याला काहीही हरकत नसते. अशा पध्दतीने श्री. राजन कोचर यांनी मराठी निवाडा संच, खंड क्रमांक १०६, पृष्ठ क्रमांक १२५ मध्ये असा निकाल दिलेला आहे. केवळ यासंबंधी पाठपुरवा केलेला नसल्याने महाराष्ट्रात ही अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे. बिहार, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या चारही राज्यामध्ये हिंदी भाषेचा न्याय प्रक्रियेत वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे, परंतु आपल्या राज्यात मात्र या पद्धतीप्रमाणे वापर केला जात नाही, ही एक शोकांतिका आहे. तामिळनाडू, कर्नाटक, केरळ या राज्यातही प्रादेशिक भाषेचा वापर केला जातो. तामिळनाडू या राज्याने प्रादेशिक भाषेचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवून दिलेला आहे. आपले राज्य मात्र त्याबाबतीत अतिशय उदासीन आहे, असे मोठ्या खेदाने म्हणावेसे वाटते.

अध्यक्ष महोदय, स्थानिक स्वराज्य संस्था असोत, निमसरकारी संस्था असोत, महाराष्ट्रातील ३१ जिल्ह्यांच्या वेबसाईटवर ९५ टक्के माहिती इंग्रजीमध्ये आहे. यावरुन आपले राज्य प्रादेशिक भाषेचा किती प्रमाणात वापर करते आहे हे आपल्या लक्षात येईल. अहमदनगर, कोल्हापूर आणि चंद्रपूर या जिल्ह्याची संकेतस्थळावर इंग्रजीसहित मराठीमध्ये माहिती आहे. अशा रीतीने मराठी भाषेचा वापर होणार असेल तर, संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्याविरुद्ध कारवाई होण्याची आवश्यकता आहे. नगरविकास विभागाचा आराखडा असेल, जवाहरलाल राष्ट्रीय नेहरू नागरी पुनरुत्थान अभियान असेल, याबाबतच्या सर्व जाहिराती या मराठी भाषेतूनच प्रसिध्द झाल्या पाहिजेत. याबाबत फक्त घोषणा करावयाच्या, परंतु अंमलबजावणी मात्र करावयाची नाही, हे उचित नाही.

**श्री. प्रकाश महेता :** अध्यक्ष महोदय, माझा पाईंट ऑफ ऑर्डर आहे. सन्माननीय सदस्य भाषण करीत आहेत परंतु त्यांच्या भाषणातील मुद्दे लिहून घेण्यासाठी कोणतेही माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत. ........(अडथळा)...... मला असे वाटले की, आपण वाचत आहात म्हणून मी पाईंट ऑफ ऑर्डरबाबतचा मुद्दा उपस्थित केला.

**श्री. नितीन सरदेसाई :** अध्यक्ष महोदय, शासनाने मराठी भाषेच्या बाबतीत उदासीन राहणे ही बाब राज्याच्या दृष्टीने हितावह नाही. शासनाने घोषणा केल्या असतील तर त्याची अंमलबजावणी करण्याचे काम प्रशासनाचे आहे.संबंधित विभाग, संबंधित अधिकारी सदरहू घोषणेची अंमलबजावणी करणार नसतील तर, त्यांच्याविरुध्द शासन कोणती कडक कारवाई करणार आहे ? याबाबतचा उल्लेख माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या वेळी करणे आवश्यक आहे. जर घोषणेची अंमलबजावणी होणार नसेल तर, त्याला काही अर्थच उरत नाही.

अध्यक्ष महोदय, नगर विकास विभागासंबंधी मी काही बाबींचा उल्लेख करणार आहे. आज मुंबई शहरामध्ये लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे. रोज ३०० कुटुंबे आज मुंबई शहरामध्ये नव्याने येत आहेत. वर्षानुवर्षे या मुंबई शहराची लोकसंख्या वाढत असताना त्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर वाढविण्याची गरज आहे. मुंबई शहरामध्ये लोकसंख्येची वाढ होणार असेल तर त्या वाढीच्या प्रमाणात दूरदृष्टी ठेवून त्याबाबतच्या सोईसुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. परंतु असे होताना मात्र दिसत नाही. गेल्या दहा वर्षात झोपडपट्टीतील लोकसंख्या २९ टक्क्यांनी वाढलेली असून ती एक कोटीच्या आसपास गेलेली आहे. ९० लाख ते एक कोटी लोक आज मुंबई शहरामधील झोपडपट्टीमध्ये राहात आहेत. मग ही शहरे सुधारावयाची असतील तर त्यासाठी अनेक गोष्टी कराव्या लागतील. प्रचंड लोकसंख्येला सामावून घेण्याचा विचार करताना मुंबई शहरात मोठमोठे प्रकल्प केले पाहिजेत. पाण्याची गळती होत आहे. आता उन्हाळा सुरू झालेला आहे, पाण्याची कमतरता भासणार आहे, सुरुवातीपासून पाणी कमी मिळत आहे. मुंबईमध्ये पाण्याची गळती होते. पिण्याचे पाणी देण्यासाठी जी पाईपलाईन टाकण्यात आलेली आहे ती अत्यंत जीर्ण झालेली आहे. ब्रिटीशांच्या काळातील या पाईपलाईन आहेत. यासंदर्भात विचार केला गेला पाहिजे. अनेक वेळा हे पाईप फुटतात. हे पाईप छोटे आहेत, ते मोठे करून हा प्रश्न सुटणार नाही. परंतु पाणी पुरवठ्यासाठी काही तरी वेगळ्या तंत्राचा वापर करण्याची आवश्यकता आहे. जगामध्ये टनेलद्वारे पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. त्याला आपण जल बोगदे म्हणतो. आपल्याकडे तसे करण्यास सुरुवात झालेली आहे. अशा पद्धतीने दुरगामी परिणाम करणारे प्रकल्प हातात घेण्याची गरज आहे. पुढील पाच ते सात वर्षाचा विचार न करता १०० ते १५० वर्षांचा विचार करून योजना आखण्याची गरज आहे. तरच ही शहरे जगू शकतील. नाही तर त्यांची अवस्था आताच मरणासन्न झालेली आहे. त्यापेक्षा ती पुढील काळात अत्यंत बिकट होत जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेत सुजल ही योजना पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात राबविण्यात येत आहे. ही योजना खूप चांगली आहे. या योजनेमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. यामध्ये २५ टक्के सुद्धा कामे झालेली नसून मोठ मोठी बिले पास करण्यात आलेली आहेत. मी भ्रष्टाचारावर बोलणार नव्हतो. परंतु हा विषय निघाल्यामुळे मी हे बोललो आहे.

[ श्री. नितीन सरदेसाई ]

अध्यक्ष महोदय, मुंबईतील रुग्णालयाची काय परिस्थिती आहे. आता पावसाळा सुरू होईल रोग पसरण्यास सुरुवात होईल. मलेरिया, ताप हे डोके वर काढणार आहेत. शहराची लोकसंख्या वाढत असताना रुग्णालयाची संख्या किती तरी पटीने कमी आहे. अनेक रुग्णांची रुग्णालयात सोय होत नसल्यामुळे त्यांना बाहेर तंबू टाकून ठेवावे लागते. लोकसंख्या वाढत असल्यामुळे रुग्णालयांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. या शहरात आता आहे त्यापेक्षा दुप्पट रुग्णालये झाली पाहिजेत. तर मुंबईतील नागरिकांची सोय होऊ शकते. मुंबई शहरात चांगल्या सेवा मिळत असल्यामुळे भारतातून रुग्णसेवा घेण्यासाठी अनेक लोक येत असतात. या सर्वांचा ताण मुंबई शहरावर पडतो. त्यामुळे मुंबईत राहणाऱ्या लोकांना आरोग्याच्या सुविधा मिळत नाहीत. या लोकांनी मग काय करावयाचे याचे उत्तर आजही सरकारकडे नाही.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरात वाहतुकीचा प्रश्न अत्यंत कठीण झालेला आहे, मुंबई ते पुणे हे अंतर जाण्यासाठी तीन तास लागतात. आमचे सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दरेकर हे बोरिवली येथे राहतात. त्यांना कधी-कधी बोरिवली ते विधानभवन येथे येण्यासाठी तीन तास लागतात. अशा प्रकारे रस्त्यांची अवस्था झालेली आहे. ही अत्यंत वाईट परिस्थिती आहे. वाहतूक समस्येबाबत अमेरिकेचे अध्यक्ष जॉन केनेडी यांनी असे म्हटले होते की, "American roads are not good because America is rich, America is rich because American roads are good." अमेरिका श्रीमंत आहे, म्हणून तेथील रस्ते चांगले आहेत, असे नाही तर अमेरिकेतील रस्ते चांगले आहेत म्हणून अमेरिका श्रीमंत आहे. मुंबईला शांघाय करण्याचे स्वप्न पाहण्यात येत आहे मी म्हणतो मुंबई ही मुंबईच राहिली पाहिजे. मुंबईचे उदाहरण जगामध्ये दिले गेले पाहिजे, अशी माझी अपेक्षा आहे. असे रस्ते व्हावेत अशी सर्वांची इच्छा आहे. परंतु मुंबईतील रस्त्यांवर अनेक खड्डे आहेत, पावसाळा आला की, आपण रस्त्यांवरील खड्डे भरुन काढतो. दरवर्षी तेच रडगाणे करण्यात येते. तेच तेच बोलावे लागते. मुंबईतील मुंबईत जर तीन-चार तास लागत असतील तर आपण मुंबईचे काय शांघाय आणि सिंगापूर करणार आहोत ? मुंबईची अवस्था तर खेडेगावापेक्षा वाईट होणार आहे.

अध्यक्ष महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. बाबा सिद्दिकी यांनी भाषण करताना सांगितले आहे की, हा विषय मी अनेक वेळा सभागृहात उपस्थित केलेला आहे. मेट्रो रेल्वे ही शहरातून भूमिगत असावयास पाहिजे. जेव्हा ती मेट्रो उपनगरातून जाते तेव्हा ती जमिनीच्या वर येते. याचे कारण असे असते की, उपनगरात लोकवस्ती ही विरळ असते. आपल्याकडे तशी परिस्थिती नाही. शहरात दहा मतदारसंघ राहिले व उपनगरात १६ मतदारसंघ झाले आहेत. म्हणजे उपनगरात देखील तेवढीच गर्दी झालेली आहे. असे असेल तर मेट्रो रेल्वे ही भूमिगतच असावयास पाहिजे. याचे कारण असे की कालांतराने त्यात वाढ करावयाची असेल तर त्यामध्ये अधिक खाली जाता येऊ शकते.

अध्यक्ष महोदय, ब्रिटिशांनी व्ही.टी.स्टेशन १५० वर्षांपर्वी बांधले आहे, आजही ते आपणाला पुरे पडत आहे. ब्रिटिशांनी जर १५० वर्षापूर्वी इतका पुढचा विचार केला तर आपण मात्र पुढच्या पाच व दहा वर्षाचा विचार करून योजना करतो हे कोठे तरी थांबले पाहिजे अन्यथा हे शहर मी मघाशी म्हटल्याप्रमाणे मरणासन्न अवस्थेत आहे, ते मृत्यूपंथाला लागलेले आहे. त्याची अवस्था अधिकाधिक बिकट होत चालली आहे.

[ श्री. नितीन सरदेसाई ]

अध्यक्ष महोदय, अजून एक पर्यायी जलवाहतूक मुंबई शहरात होऊ शकते. मुंबई शहराला तिन्ही बाजूंनी पाणी आहे, हे आपणाला माहिती आहे. जल वाहतूक सुरू करण्यासाठी आज सन २०११ उजाडले आहे. मी परदेशात अनेक वेळा काही कामानिमित्त गेलो, तसेच अनेक सनमाननीय सदस्य परदेशात जात असतात. प्रत्येक शहरात जिकडे नदी असेल, समुद्र असेल, तेथे जल वाहतुकीची सोय उपलब्ध आहे. इकडे आपण रोज पाहतो की, रेल्वे ही खचाखच भरलेली असते. लोक लटकत असतात, त्यातून पडून मृत्यू पावतात. हे आपणाला पहावत नाही. महाराष्ट्राला एवढा मोठा समुद्रकिनारा लाभलेला असताना शासन जलवाहतुकीची सोय करू शकले नाही. ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. मी कोणत्याही एका मतदारसंघापुरते बोलत नाही. आपल्या शहरांची अवस्था ही अशी का व्हावी. केवळ एखाद्याला दृष्टी असते पण व्हीजन नसते. आपल्याकडे त्या व्हिजनचीच कमतरता आहे. कारण आपल्या सर्वांना दृष्टी आहे. परंतु ते व्हिजन नसल्यामुळे आपण या सर्व गोष्टींचा विचार करीत नाहीत. टेंडरच्या काढतांना ५-१० वर्षांच्या गोष्टी करावयाच्या आणि काही तरी काम केल्यासारखे दाखवायचे. मला असे वाटते की, हे कोठे तरी थांबले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आपण बांद्रा सी-लिंकचे कौतुक करतो. त्या ब्रिजची सुरुवातील ४०० कोटी रुपये किंमत होती. या ब्रिजचे काम २-३ वर्षांमध्ये पूर्ण होऊ शकत होते. परंतु या ब्रिजचे काम पूर्ण होण्यासाठी १४-१५ वर्षे लागली आणि या ब्रिजचा खर्च ४०० कोटी रुपयांवरून १६०० कोटी रुपयांवर पोहोचला. आपण आज कोणत्या जगामध्ये वावरत आहोत ? चीनमध्ये ३६-३६ किलोमीटरचे ब्रिज २-३ वर्षात पूर्ण होतात आणि आपल्या राज्यामध्ये ब्रिजचे काम पूर्ण होण्यासाठी १६-१६ वर्षे लागतात. बाहेरून आलेल्या व्यक्तींना आपण तो ब्रिज दाखवितो. बाहेरून आलेले लोक आज आपल्याला हसतात. अशा पद्धतीचा ब्रुक्लीन ब्रिज अमेरिकेमध्ये १८८३ मध्ये बांधण्यात आला होता. आपण आता हायराईज कमिटी वैगैरे बोलतो. अमेरिकेमध्ये एम्पायर स्टेट बिल्डींग १९४४ मध्ये महायुद्धाच्या काळात बांधण्यात आलेली आहे आणि आपण आज सन २०११ मध्ये आपल्याकडे काय तंत्रज्ञान आहे याविषयी चर्चा करतो. आपल्याकडे तंत्रज्ञान नाही काय ? आपल्याकडे सर्व गोष्टी आहेत. आपल्याकडील तंत्रज्ञ मग ते कॉम्प्युटर क्षेत्र असो किंवा इतर क्षेत्र असो. त्या क्षेत्रातील तंत्रज्ञ जगभरामध्ये जाऊन नावारुपाला आलेले आहेत. जगभरामध्ये अनेक ठिकाणी आपले कन्सल्टंट आहेत. हे लोक जगभरामध्ये जाऊन तिकडे चांगले काम करू शकतात तर मग आपल्याकडे का करू शकत नाहीत ? कारण आपल्याकडे राजकीय इच्छा शक्तीचा अभाव आहे, त्यांना कोणत्याही प्रकारचे पाठबळ मिळत नाही. म्हणून आज आपल्या राज्याची अशी अवस्था आहे. वेळेवर प्रोजेक्ट पूर्ण न झाल्यामुळे खर्चामध्ये वाढ होते. आपल्याला हे सर्व सुधारावयाचे असेल, आपल्या शहरांची अवस्था सुधारावयाची असेल तर यामध्ये बदल व्हावयास पाहिजे. असे सांगितले जाते की, मेट्रो रेल्वे जर भूमिगत करावयाची असेल तर त्याच्या खर्चामध्ये वाढ होईल. मोठे ब्रिज बांधावयाचे असतील तर आपल्याकडे त्यासाठी निधी उपलब्ध नाही. मला यासंदर्भात एक जुनी म्हण आठवते. असे म्हटले जाते की, " नाव सोनूबाई आणि हाती कथलाचा वाळा." आता मला एक नवीन म्हण सुचलेली आहे आणि ती म्हणजे " नाव पृथ्वीराज परंतु हाती सव्वा दोन लाख कोटीच्या कर्जाचा गोळा." या परिस्थितीमध्ये कोठे तरी बदल केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**श्री. प्रवीण दरेकर :** अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य मागण्यांवर चर्चा करीत आहेत आणि माननीय राज्यमंत्री महोदया सभागृहामध्ये त्यांच्या विभागाच्या फाईल क्लीअर करीत आहेत. खरे म्हणजे त्यांनी सन्माननीय सदस्यांच्या मुद्द्यांची नोंद घेतली पाहिजे. सभागृहामध्ये फाईल क्लीअर करता येत नाहीत. माननीय राज्यमंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्य बोलत असतांना फाईल क्लीअर न करता सदस्यांच्या भावना समजावून घेतल्या पाहिजेत.

**प्रा. फौजिया खान :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ज्यावेळी माझ्या विभागाच्या मागण्यांवर चर्चा करतात त्यावेळी मी मुद्द्यांची नोंद घेत असते. सन्माननीय सदस्य मी घेतलेल्या मुद्द्यांचे नोटिंग बघू शकतात.

**तालिका सभाध्यक्ष :** आता सन्माननीय सदस्या श्रीमती मिनाक्षी पाटील यांनी आपले भाषण सुरू करावे.

**श्रीमती मिनाक्षी पाटील** (अलिबाग) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील मराठी भाषा या विभागाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, कविवर्य माधवराव पटवर्धनांनी म्हटले होते की,

" मराठी असे आमुची माय बोली,
जरी ती राजभाषा नसे,
नसो ऐश्वर्य आज या माऊलीला,
यशाची पुढे दिव्य आशा असे."

अध्यक्ष महोदय, कविवर्य माधवराव पटवर्धनांचे हे भविष्य किंवा स्वप्न आज जरी साकार झालेले असले तरी देखील हे बजेट बघितल्यानंतर नाईलाजाने म्हणावेसे वाटते की, मराठी भाषा मंत्रालयाच्या दारामध्ये फाटकी वस्त्रे घालून भिकाऱ्यासारखी उभी आहे. हजारो वर्षांची समृद्ध परंपरा असलेल्या मराठी भाषेसाठी अर्थसंकल्पात फक्त ६ पाने असून त्यासाठी केवळ ९ कोटी ४० लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. जी तरतूद करण्यात आलेली आहे ती सुद्धा आस्थापनेच्या खर्चाची तरतूद आहे. म्हणून अत्यंत नाईलाजाने म्हणावेसे वाटते की, मराठी भाषा मंत्रालयाच्या दारामध्ये फाटकी वस्त्रे घालून भिकाऱ्यासारखी उभी आहे. मी त्यासंबंधी द्विरुक्ती करणार नाही. परंतु सन्माननीय सदस्य श्री. नितीन सरदेसाईसाहेबांनी मराठीचे अतिशय सुंदर विवेचन केले आहे. आमच्या राज्यात मराठी भाषेची किती शोकांतिका हे त्यांनी सांगितले आहे. याउलट अन्य राज्यांमध्ये त्यांच्या भाषांना कशा प्रकारे महत्त्व दिले जाते. त्यांनी कर्नाटक राज्याचे उदाहरण दिले आहे. मी गेल्या महिन्यात कर्नाटकला गेले होते. तेथे पानाच्या गादीला मराठीचा बोर्ड असल्यास तो पोलीस प्रोटेक्शनमध्ये काढला जातो व तेथे कानडी भाषेचा बोर्ड सक्तीने लावण्याच्या सूचना दिल्या जातात.

अध्यक्ष महोदय, ९०० वर्षांपूर्वी महाराष्ट्रात देवगिरी आणि पैठण ही विद्येची माहेरघरे होती. नेवाशां-सारख्या लहान खेड्यात देखील साक्षात ब्रम्हविद्येचा सुकाळू उदेला होता. प्रत्यक्ष सरस्वती एका लहान मुलासमवेत काव्य कल्पनांचा सारीपाट खेळत होती. त्या लहान मुलाचे नाव होते ज्ञानेश्वर.

**[ श्रीमती मिनाक्षी पाटील ]**

वीणेच्या तारा सप्तसुरात झंकारत होत्या आणि अभिनव विलासाचे फासे ज्ञानेश्वर महाराज आवेशाने फेकत होते, गर्जत होते.

" माझ्या मराठीच्या बोल कौतुके,
परी अमृताच्या पैजा जिंके,
ऐसी अक्षरे रसिके मेळवीन... "

अध्यक्ष महोदय, अमृतालाही पैजेत जिंकणारी मराठी भाषा ज्ञानेश्वर महाराजांनी लिहिली. संस्कृत भाषेमध्ये अडकलेले मराठीचे धन त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातल्या सामान्य जनतेसाठी खुले केले. पंढरीच्या राऊळावरती भागवताचा मराठीचा ध्वज अभिमानाने फडकत होता. तो ध्वज खांद्यावर घेऊन ज्ञानेश्वर, तुकाराम, मुक्ताबाई, ज्ञानदेव, जनाबाई, चोखामेळा, नरहरी सोनार अशा संताची मांदियाळी साध्या, सोप्या मराठी भाषेत जीवनाचे तत्त्वज्ञान समाजाला समजावून सांगत होती. तुकाराम महाराजांनी सांगितले की, "एकमेकांस सहाय्य करू, अवघेची धरू सुपंथ." हा सहकाराचा मूलमंत्र तुकाराम महाराजांच्या अभंगाने आपल्याला दिला.

" कांदा, मुळा भाजी अवघी विठाई माझी
रखमा माझी पेरणी करी,
माझा पांडुरंग नांगर धरी."
हा कृषिमंत्र सावतामाळींनी दिला.
" माझी शेती ही पंढरी "

त्याचप्रमाणे जातीवादाला मूठमाती देण्याचे काम जातीवाद व वर्णभेद किती वाईट आहेत ही बाब समाजाला पटवून देण्याचे काम करताना चोखामेळ्याने म्हटले,

" ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा
काय भुललासी वरलीय रंगा,"

अध्यक्ष महोदय, मी या निमित्ताने एवढेच सांगू इच्छिते की, अशा प्रकारचे सर्व संत साहित्य पुनर्मुद्रित होणे अत्यावश्यक आहे. ही काळाची गरज आहे. आज अनेक संत वाङ्मय नामशेष झालेले आहेत. काही प्रमाणात एशियाटिक लायब्ररीत संत वाङ्मय असू शकेल. परंतु आज आम्हाला प्रकर्षाने वाटते की, ज्या संतानी आमची मराठी जागवली, ज्या संतांनी आमच्या मराठीचा उद्‌घोष आमच्यामध्ये स्फुरवला. त्या संत वाङ्मयासाठी शासनाने तरतूद करावी व त्यात वाढ करावी अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करते.

अध्यक्ष महोदय, असे म्हटले जाते की, मराठीतील इतिहासाला ज्ञात असलेले पहिले मराठी वाक्य " श्री चामुंडेराय करविले, गंगाराजे सुतीने करीले." हे वाक्य इ. स. ९८३ मध्ये म्हैसूर जवळच्या श्रावण-बिरबोळ येथे लिहिलेले आहे. त्याही पूर्वी आपल्याला अभिमान वाटायला पाहिजे की, इ. स. ९३४ मध्ये मराठीतले पहिले वाक्य ज्ञानेश्वरांच्या महाराष्ट्रात लिहिले गेले. मला अभिमान वाटतो की, त्या वाक्याचा शीलालेख आमच्या अलिबाग जवळील श्रीकृष्णाचे माहेरघर असलेल्या चौक चंपावतीमध्ये आक्षी येथे आहे. त्याचे संवर्धन नव्हे तर, त्या बाबत इतिहासामध्ये नोंद करण्याचे काम शासनाने करणे अत्यावश्यक आहे. म्हणून माझी आग्रहाची भूमिका आहे की, इ. स. ९३४ मध्ये महाराष्ट्रात मराठी भाषेत जो शीलालेख लिहिला गेला, मला वाटते की, १९९५ साली कोकणात अलिबागमध्ये मराठी साहित्य

**[ श्रीमती मिनाक्षी पाटील ]**

संमलेन झाले होते त्यावेळी त्याचे फार मोठ्या प्रमाणात पुनरुज्जीवन करण्यात आले होते. परंतु यासंबंधी शासनाने कोणतीही दखल घेतली नाही. हे वाक्य प्रथम महाराष्ट्रात असताना, त्याची महाराष्ट्र शासनाने नोंद घेतली नाही. आपण मराठी भाषेचा जागर करतो, मराठी भाषेच्या संवर्धनासाठी शासनाने विशेष कार्यक्रम हाती घ्यावा, अशी माझी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, मुकुंद राय यांनी " विवेक सिंधू " नावाचे संपूर्ण मराठी भाषेत असलेले पहिले समग्र साहित्य लिहिले. त्यापूर्वी संस्कृत भाषेत साहित्य लिहिले जात असे. त्यानंतर नाथ संप्रदायातील मंडळी आली. गोरखनाथ, मच्छिंद्रनाथ या मंडळींनी मराठी भाषा वाढवली. परंतु त्यांचे साहित्य आज महाराष्ट्रात कोठेही उपलब्ध नाही. ते साहित्य जवळजवळ नष्टच झाले आहे.

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. नवाब मलिक)**

ते शोधून काढले पाहिजे. " मराठी भाषा विश्वविद्यापीठाची आज गरज आहे." असे मघाशी सन्माननीय सदस्य श्री. नितीन देसाई यांनी म्हटले होते. मराठी भाषा आज नामशेष होत चालली आहे. आज आम्ही इंग्रजी भाषेकडे वळू लागलेलो आहोत. हे आमचे दुर्दैव आहे. नाथानंतर महानुभव पंथ आला. त्यांनी मराठी भाषेला वैचारिक, कलात्मक दर्जा दिलेला आहे. आज मराठी भाषेच्या संदर्भातील चर्चा या सार्वभौम सभागृहात होत आहे. महाराष्ट्रात अतिशय दुर्मिळ आणि उत्कृष्ट अशी साहित्य निर्मिती झालेली आहे. रामदास स्वामींचे महाराष्ट्र धर्म साहित्य आहे. त्यांनी सांगितले की,

मराठा तितुका मेळावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा....

(माननीय तालिका सभाध्यक्ष भाषण संपल्याची बेल वाजविता.)

अध्यक्ष महोदय, मराठी साहित्यावर आपण मला बोलण्यासाठी आणखी वेळ दिली पाहिजे. मराठीसाठी बजेटमध्ये कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. तुकाराम महाराजाने सांगितले आहे की,

" सोने आणि मोती आम्हा मृत्तिके समान,
शब्द हेचि आद्य रत्न भांडार "

ते शब्द तरी आम्हाला बोलू द्यावे. शब्दाचा दुष्काळ कशासाठी ? महाराष्ट्र कर्जबाजारी झालेला असल्यामुळे आम्ही पैशाचा दुष्काळ समजू शकतो. अध्यक्ष महोदय, बखरीचा अभ्यास आम्ही केलेला आहे. लोकहितवाद्यांची शतपत्रे होती. विष्णू शास्त्री चिपळूणकरांची निबंध माला, बाळ शास्त्री जांभेकरांची मराठीतील वृत्तपत्रे, लक्ष्मीबाईंची स्मृतिचित्रे, वामन पंडितांच्या कविता, ग. दि. माडगूळकर, केशवसुत अशा साहित्तिकांनी अनेक कविता लिहिलेल्या आहेत. जे जुने मराठीतील लिखाण आहे, मराठी वाङ्.मयातील लिखाण आहे, तो ठेवा आम्ही आज हरवून बसलेलो आहोत. या ठेव्याचे जतन करण्याची आज खरी गरज आहे. ग. दि. माडगूळकर हे अतिशय उत्कृष्ट कविताकार आहेत. चेत्रबन कविता संग्रह मला मुंबईत मिळाला नाही. मी सदर 'चैत्रबन' कविता संग्रह घेण्यासाठी पुण्यातील अप्पा बळवंत चौकामध्ये काल परवा गेले होते, तेथे देखील तो मला मिळालेला नाही. ग. दि. माडगूळकरांच्या कवितेतील प्रत्येक शब्द हा दुर्मिळ दागिन्यासारखा आहे.

**[ श्रीमती मिनाक्षी पाटील ]**

" कुणा मुखी पडते लोणी,
कुणा मुखी अंगार,
विठ्ठला तू वेडा कुंभार "
किंवा
" एक धागा सुखाचा,
शंभर धागे दु:खाचे,
जरतारी वस्त्र माणसा,
तुझ्या आयुष्याचे "

यासारख्या सुंदर कवितांनी साहित्य समृध्द केले आहे. आज आपण वसंत ऋतुमध्ये मराठी भाषेवर चर्चा करीत आहोत. त्या वसंत ऋतुचे वर्णन त्यांनी असे केले आहे की,

" आल्या वसंत गौरी सांगे फुलास वारा,
वाऱ्याचा गंध येतो म्हणती ढगास तारा,
जाई-जुईत झुलतो गुलमोहर तांबडा,
डोळ्यात सुंदरीच्या रसराज घेई निवारा "

याची पुन्हा पुनरावृत्ती व्हायला पाहिजे. महाराष्ट्राला लावणी, शाहिरी आणि साहित्याची परंपरा आहे. शाहीर परशुराम, शाहीर पठ्ठेबापू यांची परंपरा होती. सकाळी माझा ३ वर्षांचा नातू उठून " शीला की जवानी " हे गाणे गात असतो. अध्यक्ष महोदय, शाहीर होनाजी बाळा यांची अमर भूपाळी

" घन:शाम सुंदरा श्रीधरा,
अरुणोदय झाला "

पण आज तो अरुणोदय मुले ऐकत नाहीत, तर आजकालची मुले " शीला की जवानी " सारखी गाणी गात असतात. ही प्रवृत्ती कुठे तरी थांबिवली गेली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, होनाजी बाळांची ती लोकप्रिय लावणी,

" लटपट लटपट तुझं चालण गं मोठ्या नखऱ्याचं,
बोलण ग मंजुळ मैनेच "

या संपूर्ण कविता जतन करण्याची गरज आहे. मी मराठी साहित्याची चाहती आहे. हे सर्व साहित्य पुढच्या पिढीला प्रेरणादायी आहे असे मला मनापासून वाटत आहे. १९व्या शतकाच्या अखेरीस अनेक लोकहितवाद्यांच्या पत्रामधून महात्मा फुलेंनी आवाज उठविला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजात माणूस घडविण्याचे मोठे काम केलेले आहे. ती माणुसकी मराठी साहित्यातून मिळाली पाहिजे. ती माणुसकी ते साहित्य आज कुठे तरी हरवत आहे असे आम्हाला वाटत आहे. श्री. नरेंद्र जाधव मंत्रालयात सचिव पदावर कार्यरत होते. त्यांचे "मी आणि माझा बाप" नावाचे एक पुस्तक आहे. सदर पुस्तकाचे ८ देशांमध्ये भाषांतर करण्यात आले आहे. आठ देशांनी आपल्या मराठी भाषेचे कौतुक केले. मात्र आपण आपल्या भाषेचे कौतुक करीत नाही. या पुस्तकाची आवृत्ती मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना, महाविद्यालयातील

**[ श्रीमती मिनाक्षी पाटील ]**

विद्यापीठामधील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करावी, असे आपल्याला वाटले नाही. आपण जर मराठी शाळांना बंदी केली तर उद्याची पिढी बरबाद होणार आहे. मी मराठी शाळेत शिकले. आमच्या प्राथमिक शिक्षकांनी आम्हाला अत्यंत चांगल्या पद्धतीने शिकविले होते. श्री. वामन पंडित यांच्या कवितेचा उल्लेख करून मी माझे भाषण संपवणार आहे. मी चौथीमध्ये असताना आम्हाला श्री. पाटील हे शिक्षक होते. त्यांनी पाण्याच्या ३ अवस्था आम्हाला शिकवल्या होत्या. या विषयावर त्यांनी आम्हाला एक कविता शिकवली होती. ती कविता अशी होती की,

" तोयाचे ते नावही न उरले, संतप्त लोहावरी
ते भासे पाहा नलीनीदलावर सन्मौतिकाचे परी
ते स्वातीस्तव अब्धीशुकपुटके
मोती घेडे नेटके "

या कवितेचा अर्थ असा आहे की, पाणी तापल्या तव्यावर पडले तर ते क्षणात नाहीसे होते. पण तेच पाणी कमळाच्या पानावर पडले तर फक्त मोत्याचा भास होतो. तेच पाणी जर स्वाती नक्षत्रामध्ये शिंपल्यात पडले तर त्याचे मोती तयार होतात. अशा प्रकारचे मोती तयार करण्याचे काम राज्य शासनाने करावे, अशी मी अपेक्षा करते.

अध्यक्ष महोदय, कुसुमाग्रजांचा विशाखा काव्यसंग्रह किंवा चैत्रबन हा कविता संग्रह व इतर साहित्य हे पुनर्मुद्रित करावे, अशी मी या निमित्ताने मागणी करते. कुसुमाग्रजांची " स्वातंत्र्याची विनवणी " व " गर्जा जयजयकार " या कविता आपणा सर्वांना माहित आहे. परंतु मला भावलेली कविता संपूर्ण महाराष्ट्राला भावावी. सध्याच्या युगात आपण मराठीपण व महाराष्ट्रीयपण विसरत चाललो आहोत.

" नवलाख तळपती दीप विजेचे येथ,
उतरली जणू तारकादळे नगरात.
परि स्मरते आणि करते मजला व्याकुळ
त्या माजघरातील मंद दिव्याची वात "

ही माजघरातील मंद दिव्याची वात तुमच्या प्रत्येकाच्या ह्रदयात तेवत राहिली पाहिजे तरच खरी मराठी व ज्ञानेश्वराची मराठी सर्वांना कळू शकेल. मात्र महाराष्ट्र शासनाला ही गोष्ट कधी कळणार आहे, ते मला समजत नाही.

" गीत मराठ्यांचे हे श्रवणी, मुखी असो
स्फूर्ति रीति धृतिही देत अंतरी ठसो,
वचनी, लेखनी ही मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्र धर्म मर्म मनी वसो,
देह पडो सत्कारणी ही असे स्पृहा ।।३।।
प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा !

एवढे बोलून मी माझे भाषण संपवते. धन्यवाद.

**श्री. शिरीष कोतवाल** (चांदवड) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी प्रामुख्याने मराठी भाषा विभागाच्या संदर्भात बोलणार आहे. मराठीची राजधानी असलेल्या शहरात मराठीचे पानिपत झाले आहे. ही वस्तुस्थिती आहे. ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरी या ग्रंथात मराठीचा गौरव करताना " माझ्या मराठीचे बोल बोलु कौतुके, परि अमृताते पैजा जिंके, ऐसी अक्षरे रसिके मेळवीन ". असे म्हटले आहे. कुसुमाग्रज यांच्या जन्मशताब्दी वर्षामध्ये जागतिक मराठी साहित्य संमेलन होत असताना. असे म्हटले आहे की, मराठी भाषा मंत्रालयाच्या दारात भिकाऱ्यासारखी उभी आहे. त्यांची एक कविता आहे " लावला कपाळी टिळा, तिच्या संगे जागल्या दऱ्याखोऱ्यांच्या शिळा " कुसुमाग्रजांनी केलेले विधान चिंतनीय आहे. " मराठी भाषेच्या मस्तकावर राजमुकुट आहे, मात्र तिच्या अंगावरील वस्त्रे फाटलेली आहेत." या विधानातील सत्य अतिशय विदारक आहे. मराठी भाषा अजून देखील मुंबईत व राज्यात अंग चोरून उभी आहे. कुसुमाग्रजांची जयंती ही मराठी भाषा राज्य दिन म्हणून साजरा केला जातो. तरी देखील राज्यात मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. मातृभाषेची अशी उपेक्षा करणे, ही सांस्कृतिक दारिद्र्याची लक्षणे आहेत असे मला येथे खेदाने सांगितले पाहिजे. उत्तरोत्तर आमची ही मराठी भाषा आम्हीच केविलवाणी करीत आहोत हे लक्षात घेतले पाहिजे. दक्षिणेतील राज्यांमध्ये लोकांचे त्यांच्या मातृभाषेविषयीचे प्रेम, जागृतता, आस्था पाहून कौतुक वाटते व मनाला त्रास होतो की, आपल्या मातृभाषेविषयी आपल्याला किती अनास्था आहे. मला हे देखील सांगितले पाहिजे की, सर्वसामान्य मराठी माणसाच्या लक्षात एक गोष्ट आली पाहिजे, की मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून मराठीचा अट्टाहास व उदोउदो केला जातो. परंतु, हे उदोउदो करणारे साहित्यिक, कवी त्यांची मुले त्यांची भावी पिढी चोरी-चोरी, चुपके-चुपके, इंग्लंड व अमेरिकेमध्ये शिकायला पाठवतात. स्वत:ला मराठी समजणारे व मराठी माणसाचे नेतृत्त्व करणाऱ्या, सर्वांची मुलेही मुंबईमध्ये इंग्रजी माध्यमामध्ये शिकत आहेत.

(सभागृहात अनेक सन्माननीय सदस्य शेम असे एकाच वेळी बोलतात )

ही वस्तुस्थिती आहे पण तुम्ही का अंगावर घेता.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. नवाब मलिक) :** सन्माननीय सदस्य, श्री. शिरीष कोतवाल आपण माझ्याकडे पाहून बोला.

**श्री. शिरीष कोतवाल :** अध्यक्ष महाराज, तसेच काही जेष्ठ मराठी सरस्वती पूजक जे व्यासपीठावर मराठ्यांमध्ये किंवा मराठी भाषिकांमध्ये गेले तर ते मराठीला नमस्कार करतात व खाजगीमध्ये मात्र याच मराठी भाषेचा तिरस्कार करतात व इंग्रजी भाषेचे लांगुलचालन करतात. असे त्यांचे दुटप्पी वर्तन दिसते. भाषेचा ऱ्हास म्हणजे खऱ्या अर्थाने संस्कृतीचा ऱ्हास आणि भाषा जर टिकली नाही, वाढली नाही तर, या राज्यामध्ये मराठी संस्कृतीही टिकणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. आज महाराष्ट्रामध्ये ६७ टक्के लोक मराठी भाषा बोलणारे आहेत. आम्ही घरामध्ये मराठी भाषा बोलतो, आमची मुले मराठी भाषेत शिकतात, ती देखील जिल्हापरिषदेच्या शाळेत शिकतात. आम्ही ग्रामीण भागातील माणसे आहोत.

(सन्माननीय सदस्य, श्री. नितीन भोसले हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्याबाबत बोलतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य, श्री. नितीन भोसले यांना हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे.

**श्री. नितीन भोसले :** अध्यक्ष महाराज, मुलांचे शिक्षण हा मूलभूत हक्क आहे. आमची मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जरी शिकत असली तरी, अस्खलिखित मराठी भाषेमध्ये बोलतात, शुद्ध मराठी भाषेमध्ये लिहितात आणि आमच्याकडून मराठीला कधीही दुय्यम स्थान दिले जात नाही. सन्माननीय सदस्यांचे बोलणे कामकाजातून काढून टाकले पाहिजे.

**श्री. जयकुमार गोरे :** सन्माननीय सदस्य, श्री. शिरीष कोतवाल आपले म्हणणे मांडत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन भोसले ते आपल्या अंगावर का ओढवून घेत आहेत ? त्यांनी अशाप्रकारे ते बोलणे आपल्या अंगावर ओढवून घेता कामा नये.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य, श्री. शिरीष कोतवाल आपण आपले म्हणणे सुरू करा.

**श्री. शिरीष कोतवाल :** महाराष्ट्रामध्ये जवळजवळ ६७ टक्के लोक मराठी बोलतात. ग्रामीण भागांतून मराठी शाळांची मागणी होत असतानाही शासन तेथे मराठी शाळा ऐवजी इंग्रजी शाळा देत आहे. याचे माझ्या सारख्या सर्वसामान्य ग्रामीण भागामध्ये काम करणाऱ्या माणसाला दु:ख होत आहे. मराठी शाळांना परवानगी दिली पाहिजे अशी विनंती मी या निमित्ताने राज्य शासनाला करतो. शेजारील राज्यांमध्ये दुसऱ्या भाषेतील नवे नवे संशोधन, ज्ञान, विज्ञान स्वत:च्या भाषेत लिहिले जाते व स्वत:च्या भाषेत शिकविले जाते जे नवनवीन तत्त्वज्ञान असेल, विज्ञान असेल, इतर भाषांतील चांगली पुस्तके असतील तर त्या पुस्तकांचे मराठी भाषेत रुपांतर करून ते ज्ञान महाराष्ट्रामध्ये प्रत्येक मराठी माणसाला देण्याचा प्रयत्न केला पाहिजे अशी मी विनंती करतो. महाराष्ट्रात सर्वत्र मराठी भाषेचा वापर केला पाहिजे, मराठी भाषेला प्रोत्साहन दिले पाहिजे. मग शाळा कॉलेजेस असो, निरनिराळी कार्यालये असो की न्यायदान करणारे न्यायालय असो त्याठिकाणी इंग्रजी भाषेऐवजी मराठी भाषेतून कामकाज चालविले पाहिजे. मराठी भाषेचे संवर्धन व जपणूक झाली नाही तर या राज्यातीज मराठी संस्कृतीचा ऱ्हास झाल्याशिवाय राहणार नाही. आपणास मराठी संस्कृती टिकवावयाची असेल तर सर्वत्र मराठी भाषेचा वापर केला पाहिजे. मी याठिकाणी ज्या भावना व्यक्त केल्या त्यामुळे काही जणांच्या भावना दुखावल्या असतील, परंतु मी माझ्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**श्री. प्रकाश महेता** (घाटकोपर-पूर्व) **:** अध्यक्ष महाराज, मी सन २०११-२०१२ च्या अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. मी नगरविकास आणि गृह निर्माण विभागावर प्रामुख्याने बोलणार आहे.

याठिकाणी नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग, सामान्य प्रशासन विभाग, मराठी भाषा विभाग या विभागांवर चर्चा आहे. याठिकाणी नगरविकास राज्यमंत्री उपस्थित आहेत. परंतु गृह निर्माण विभागाचे मंत्री वा राज्यमंत्री उपस्थित नाहीत. तसेच माननीय मुख्यमंत्र्यांकडे या चारही विभागाचा कार्यभार आहे ते देखील याठिकाणी उपस्थित नाहीत.

**[ श्री. प्रकाश महेता ]**

अध्यक्ष महाराज, मी परमेश्वराकडे प्रार्थना करतो की, माझ्या शब्दाला त्यांनी इतकी ताकद द्यावी की, माझे विचार ऐकल्यानंतर ते समोरच्या बाकावरील मंत्री महोदयांच्या मनात उतरतील. कारण गेली १२-१५ वर्षे आम्ही जे प्रश्न येथे मांडत आहोत. त्या प्रश्नांचे निराकरण सरकारच्या माध्यमातून होत नाही. याचा अर्थ एक तर आमच्या शब्दात ताकद नाही किंवा या सरकारमध्ये काम करण्याची इच्छा शक्ती नाही असा होतो.

अध्यक्ष महाराज, सरकारने दोन-तीन वेळा गृहनिर्माण धोरण जाहीर केले. त्याशिवाय शासन अधूनमधून महानगरपालिकेच्या नियमामध्ये सुधारणा करून प्रशासन सेवा सुधारण्याचा प्रयत्न करीत असते. माझे अनेक प्रश्न आहेत, धारावी झोपडपट्टी पुनर्विकासाचे काय झाले, बी.डी.डी. चाळीच्या पुनर्विकासाच्या प्रश्नाचे काय झाले, महात्मा गांधी पदपद क्रांती योजनेचे काय झाले, म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास करण्यासंदर्भात पुढे कोणता निर्णय घेण्यात आला, जेएनएनयुआरएम अंतर्गत ॲफोर्डेबल घरांच्या संदर्भात पुढे काय झाले ? मागील अधिवेशनात तत्कालीन वित्त मंत्री श्री. जयंत पाटील यांनी सांगितले होते की, येणाऱ्या वर्षात आम्ही पोलिसांना मोफत घरे देऊ, त्या घोषणेचे पुढे काय झाले ? माननीय उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी देखील अर्थसंकल्प मांडताना सांगितले की, आम्ही पोलिसांना मोफत घरे देण्याची योजना आखली आहे. सन २००० पर्यंतच्या झोपडपट्टयांना मान्यता देण्याच्या निर्णयाचे पुढे काय झाले ? भाडे तत्त्वावर घरे बांधण्याची घोषणा झाली होती, त्याचे पुढे काय झाले ? संक्रमण शिबिराच्या पुनर्वसनाचा निर्णय अनेकवेळा येथे केला त्याबाबत पुढे कोणता निर्णय घेण्यात आला ? एमएमआरडीए मार्फत सुरू असलेल्या मेट्रो आणि मोनो रेलच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे, या कामामुळे नागरिकांना किती त्रास सहन करावा लागत आहे याची दखल सरकार घेत आहे काय ? केंद्र सरकारच्या जमिनीवर असलेल्या झोपडपट्टीवासियांचे स्थलांतर करून त्यांचे पुनर्वसन करण्याची घोषणा सन २००१ मध्ये करण्यात आली. त्याप्रमाणे गेली १२ वर्षे रेल्वे लाईन्स नजीक असलेल्या झोपडपट्ट्या, एअरपोर्ट ऑथॉरिटीच्या बाजूच्या असलेल्या झोपडपट्ट्या, डोंगरभागात असलेल्या झोपडपट्ट्यांतील रहिवाशांचे पुनर्वसन करण्यासंदर्भात आपण येथे चर्चा करीत आहोत.

अफझलपूरकर समितीच्या अहवालाचा २००० साली आपण स्वीकार केला आहे. आतापर्यंत ४ वेळा शासन निर्णय काढले आहेत. आपण त्याच्यासंबंधी काय केले या संदर्भातील ठळक मुद्दे सांगून मी नंतर डिटेलमध्ये जाणार आहे. एसआरए योजना आणि त्याचे अनेक्श्चर, सहायक निबंधक अशाप्रकारच्या एजन्सीकडे असताना एसआरए योजनांचे काम इतका विलंबाने होते. मी योजनेसंदर्भातील प्रगती कार्यक्रम अंदाजपत्रक वाचत होतो. अध्यक्ष महोदय, आतपर्यंत एकूण किती प्रस्ताव आले ? किती दफ्तरी दाखल केले ? किती प्रस्ताव कार्यान्वित आहेत ? 'कार्यान्वित' या शब्दाचे इंटरप्रिटेशन काय होते, हे तपासण्याची गरज आहे. आपण धारावीसंदर्भात एक घोषणा केली. धारावीनंतर रमाबाई आंबेडकरनगर, कामराजनगर, नेताजीनगर, नित्यानंदनगर ही झोपडपट्टी येते. आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी धारावी असून महाराष्ट्रातील सर्वात मोठी झोपडपट्टी रमाबाई आंबेडकरनगर आणि कामराजनगर असल्याचे सांगितले. धारावीच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक बोलाविली आणि निर्णय घेतला.

**[ श्री. प्रकाश महेता ]**

माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक बोलाविल्यानंतर दुसऱ्या दिवशी माननीय मुख्यमंत्री कार्यालयातून धोरणात्मक निर्णय जाहीर केला गेला, प्रेस नोट काढली गेली. विभागाला त्याची सूचना केली आणि अचानक तूर्त स्थगिती दिली.

अध्यक्ष महोदय, योजना तूर्त स्थगितीमध्ये असल्याचे सांगितले. परंतु, योजना गेली ३ वर्षे स्थगित आहे. सदर स्थगिती का दिली, हे पाहण्याचा मी प्रयत्न केला, पाठपुरावा केला, तेव्हा असे लक्षात आले की, माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते आणि त्या आश्वासनाच्या पूर्ततेचे काम प्रारंभ केल्यानंतर, एका लोकप्रतिनिधीने तक्रार केली, त्या लोकप्रतिनिधीकडे चुकीची माहिती होती.

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात विभागीय सचिवांना विचारले. विभागीय सचिवांनी विभागातील कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. आश्वासन समितीसमोर विभागीय सचिवांनी सांगितले की, तेथे अनेक इमारती उभ्या राहिलेल्या आहेत, अनेक इमारतींना एलओआय दिलेला आहे, काम सुरू झालेले आहे. आश्वासन समितीसमोर गृहनिर्माण सचिवांनी असा आश्वासनाचा विषय मांडला. मी त्याच दिवशी ते उत्तर ऐकून एसआरए योजनेच्या कार्यालयात गेलो आणि सांगितले की, आपण आजच्या तारखेला त्या वसाहतीमध्ये किती एलओआय दिले, किती इमारती उभ्या राहिल्या, याची माहिती मला द्यावी. मला त्यांनी त्या संदर्भातील सर्व माहिती लेखी स्वरूपात दिली. लेखी स्वरूपात दिलेल्या माहितीमध्ये असे सांगितले की, आजपर्यंत एकही इमारत तेथे उभी राहिलेली नाही, एकाही एसआरए योजनेला एलओआय दिलेला नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहात त्या संबंधातील माहिती ३ वेळा देऊन सुद्धा त्यासबंधी कोणतीच कार्यवाही झाली नाही. टाऊनशिप प्रोजेक्टच्या अंतर्गत रमाबाई आंबेडकर, कामराजनगर, नित्यानंदनगर, नेताजीनगर यांचा विकास व्हावा असे लोकांचे एकमत झाले आहे. निविदा मागवून विकसकाला बोलावू नका, जे विकसक असतील, त्यांना टाऊनशिपचे प्लॅनिंग करून द्यावे. गोवंडीतील शिवाजीनगर आणि अनुशक्तीनगरमध्ये पाण्याचा प्रश्न आहे, तसाच प्रश्न रमाबाईनगरमध्ये सुद्धा आहे. रमाबाईनगरमध्ये मध्यंतरी कॉंग्रेसचे राष्ट्रीय नेते आदरणीय श्री. राहुल गांधीसाहेब येऊन गेले. ते त्या ठिकाणी ५ मिनिटे होते. अध्यक्ष महोदय, माननीय तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी ११ कोटी ६८ लाख रुपयांच्या नागरी सुविधा देण्यासंबंधी जाहीर केले. माननीय पालकमंत्र्यांनी ७ महिन्यांपूर्वी भूमिपूजन केले. आजच्या तारखेला ते पैसे विभागाकडे येऊन सव्वा वर्षे झाले आहेत. विभागात ११ कोटी ६८ लाख रुपये देऊनसुध्दा आजच्या तारखेपर्यंत एक रुपयाचे सुद्धा काम झालेले नाही. साडे सतरा कोटी रुपये पिण्याच्या पाण्यासंबंधी घोषित केले गेले. परंतु, आजपर्यंत एकाही रुपयाचा खर्च पाण्यासाठी झालेला नाही.

अध्यक्ष महोदय, आपण उपनगरातील आहात. रुग्णालयाची चर्चा आपण या सभागृहात केली आहे. अणुशक्तीनगर, शिवाजीनगर, रमाबाईनगर, कामराजनगर या परिसरात शासकीय रुग्णालय असावे, यासाठी सर्व्हे क्रमांक २३० हा भूखंड रुग्णालयासाठी आरक्षित करण्यात आला आहे. डीपीडीसीने ५ कोटी रुपये देखील यासाठी मंजूर केले होते. आता मंत्रालयीन विभागाकडून असे उत्तर येते की, रुग्णालयाचे महापालिका बघून घेईल. प्रत्येक जिल्ह्याला एक शासकीय रुग्णालय असणे आवश्यक आहे, असा नियम असताना सुद्धा शासन ही जबाबदारी टाळत आहे आणि लाखो गरीब रुग्णांना वंचित ठेवण्यात येत आहे.

[ श्री. प्रकाश महेता ]

अध्यक्ष महोदय, एखाद्या विषयाच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर करून सुद्धा रमाबाईनगर, आंबेडकरनगर येथील निवासींच्या घरांचा प्रश्न सुटत नसेल तर ते बरोबर नाही. शासनाकडून बीडीडी चाळीला एक नियम लागू करण्यात येत आहे आणि रमाबाईनगरला वेगळा नियम लागू करण्यात येत आहे. रमाबाईनगरात असलेल्या चाळी महानगरपालिकेने सन १९६५ मध्ये बांधल्या आहेत. एका डेव्हलपरच्या सांगण्यावरुन या ठिकाणी स्लम डिक्लेअर केले गेले. त्यानंतर चाळीची जी व्याख्या होती, ती रद्द करण्यात आली. झोपडपट्टीमध्ये आपण २६९ चौ. फुटाचे घर देतो आणि बीडीडी चाळीमध्ये ४००-४५० चौ. फुटाचे घर देण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे. म्हणजे मुंबईतील एका भागाला एक न्याय आणि दुसऱ्या भागाला दुसरा न्याय, असा हा निर्णय आहे.

अध्यक्ष महोदय, एसआरए योजनेबद्दलचा विषय आहे. एका झोपडपट्टीबाबतचा हा प्रश्न आहे सन १९९९ मध्ये शासनाने एक शासन निर्णय निर्गमित केला. या शासन निर्णयाची प्रत माझ्याकडे आहे. सन १९९९ पासून सन २०११ पर्यन्त आम्ही केलेला पाठपुरावा आणि प्रशासनातील विविध विभागांच्या सचिवांची, माननीय मुख्यमंत्री महोदयाची घेतलेली भेट, यामुळे तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी एक बैठक आयोजित केली होती. त्यावेळी श्री. टी. चंद्रशेखर हे म्हाडाचे उपाध्यक्ष होते, श्री. स्वाधीन क्षेत्रीय हे गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव होते. त्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी सर्व फाईल बघून असा निर्णय दिला की, सन १९९९ मध्ये शासनाने निर्गमित केलेला शासन निर्णय आणि सध्याचा शासन निर्णय यांचा समन्वय साधून या योजनेला मंजुरी देण्यात यावी. या बैठकीचे इतिवृत्त देखील माझ्याकडे आहे. मागील वेळी मी जेव्हा सभागृहामध्ये प्रश्न मांडला होता, त्यावेळी त्या प्रश्नाला उत्तर देताना माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री श्री. सचिन अहिर यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे बैठक बोलाविली होती. त्यानंतर अधिवेशन आले. अधिवेशनात दिलेल्या कपात सूचनेला शासनाकडून मला कशा पध्दतीचे उत्तर आले आहे, हे मी त्या पत्रातील दोन-तीन ओळी वाचून आपल्या निदर्शनास आणतो. शासनामध्ये किती समन्वय आहे, हे आपल्याला यामधून दिसून येईल. एका बाजूला शासन सन २००१ पासून सन २०१० पर्यन्त १०० बैठका घेते, त्याचे इतिवृत्त लिहिले जाते, ही योजना आजही कागदावर आहे आणि दुसऱ्या बाजूला माननीय राज्यमंत्री बैठक घेतात आणि १० दिवसांनंतर अधिवेशनात कपात सूचनेला असे उत्तर दिले जाते की, " झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने, सन १९९७ मध्ये हा प्रस्ताव स्वीकारला होता. सन १९९७ मध्ये असे पत्र जारी केले आहे की, त्यांना ट्रान्झीट कॅम्प बांधण्यास परवानगी देण्यात आली. परंतु, नंतर पाठपुरावा झाला नाही म्हणून सन २००१ मध्ये ही योजना दप्तरी दाखल करण्यात आली आहे." माननीय राज्यमंत्र्यांनी बैठक घेतल्यानंतर सन २००३ मध्ये म्हाडाने अशा पद्धतीने पत्र पाठविले आहे.

अध्यक्ष महोदय, माझी भाषणाची वेळ संपल्याचे आपण घंटी वाजवून दर्शवित आहात.

**तालिका सभाध्यक्ष :** आपल्या पक्षाकडून अनेक सन्माननीय सदस्यांची नावे आली आहेत. या चर्चेसाठी ६ तासांचा वेळ देण्यात आला आहे. अद्याप ४२ वक्त्यांना बोलावयाचे आहे. त्यामुळे शेवटचा मुद्दा मांडून सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण आटोपते घ्यावे, अशी माझी विनंती आहे.

**श्री. प्रकाश महेता :** अध्यक्ष महोदय, मुंबईच्या भावना आपण जाणता. त्यामुळे अधिक वेळ लागला तरी आपण बसावे, आम्हीही बसू. आम्हाला एवढेच समाधान मिळेल की, यापूर्वी बारा वेळा हे मुद्दे मी मांडले आहेत, परत तेराव्यांदा हे मुद्दे या प्रस्तावाच्या निमित्ताने पुन्हा मांडता आले. अध्यक्ष महोदय, यापूर्वी हेच मुद्दे आम्ही बारा वेळा सभागृहात मांडले आहेत. या सरकारमध्ये संवेदना असेल तर सरकार यावेळी या प्रश्नांकडे लक्ष देईल आणि लोकांचे प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करेल. अध्यक्ष महोदय, सन २००३ ची, सन २००५ ची म्हाडाची पत्रे माझ्याकडे आहेत. दिनांक ६ जून २००८ रोजी सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, यांच्या दालनात बैठक झाली होती. त्या बैठकीचे इतिवृत्त माझ्याकडे आहे. मंत्रालयाच्या दालनात बैठक झाली आहे. तेरा वर्षे झालेले आहेत आता चौदाव्या वर्षात तरी शासन वनवास संपविणार आहे की नाही ? रमाबाई आंबेडकर आणि झोपडपट्टीवासियांसंदर्भात मी बोलत आहे. रमाबाई आंबेडकर नगरात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नगरसेविका आहेत. त्यांनी सदरहू विषय हातात घेऊन तो तातडीने निकाली काढावा, अशी माझी मागणी आहे. आपण आता घरकुलावर जास्त बोलू देत नाहीत, ठीक आहे. परंतु हा बारा, तेरा, चौदा वर्षाचा वनवास संपला तरी आमची काहीही हरकत नाही.

अध्यक्ष महोदय, पूर्वी एक काळ असा होता की, विधानसभेच्या सभागृहामध्ये बोलले तर त्यावेळी सरकार संवेदनशील व्हावयाचे, परंतु आता मात्र सरकारला संवेदनाच राहिलेल्या नाहीत. आता एखाद्या प्रकरणासंबंधी लक्षवेधी सूचना लावा, प्रश्न विचारा, परंतु त्याबाबत कसलीही कार्यवाही पुढे होत नाही. या सरकारने चार-चार शासन निर्णय काढले आहेत. गृहनिर्माण विभाग सांगतो की, सदरची फाईल ही नगरविकास विभागाकडे प्रलंबित आहे आणि नगरविकास विभाग सांगतो की, गृहनिर्माण विभागाकडे प्रलंबित आहे. दिनांक २७ जुलै, २०१० रोजी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या सभागृहात भाषण केले त्यावेळी अफझलपूरकर समितीच्या शिफारसी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. अनेक सन्माननीय सदस्यांनी अफझलपूरकर समितीच्या शिफारसी मुंबई प्रमाणेच उपनगरातही लागू करण्यात याव्यात अशाप्रकारची मागणी केली. अशाप्रकारचा निर्णय माननीय मुख्यमंत्री महोदयांनी घेतला. आज दुसरा जुलै महिना आलेला आहे, परंतु माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या सभागृहात घेतलेल्या निर्णयाची मात्र अंमलबजावणी अजून झालेली नाही. चार-चार शासन निर्णय काढले, परंतु तरीसुध्दा काम करायला कोणीही अधिकारी तयार होत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे......(अडथळा) ....अध्यक्ष महोदय, आपणही आपल्या भाषणात घरकुल, रमाबाई आंबेडकरनगरचा उल्लेख केला. चार-चार शासन निर्णय काढूनही यासबंधी पुढे कार्यवाही होत नाही, ही अतिशय खेदाची बाब आहे. हे सरकार एवढे संवेदनशीलशून्य झाले असेल तर आमचा बोलून काहीच उपयोग नाही. आम्हाला बोलू देऊ नका. जर बोलण्यास संधी दिली तर त्यासंबंधी पुढील कार्यवाही होणार आहे की नाही, याची शाश्वती महाराष्ट्रातील जनतेला राहिलेली नाही. म्हाडाने २.५ एफएसआय देण्याचे धोरण स्वीकारले आहे. म्हाडाकडून ले-आऊट तयार झाला आहे, परंतु मुंबई महानगरपालिकेकडे ले-आऊट गेला का ? त्यांच्याकडे गेल्यानंतर सदरहू एफएसआय ३.५ होणार आहे. एवढा एफएसआय मिळाल्यानंतर सरकारने मागे येण्याची गरजच काय ?

**[ श्री. प्रकाश महेता ]**

अध्यक्ष महोदय, या जागांसंदर्भात एकेक विकसक येतो आणि तेथील झोपडपट्टीमधील सदस्यांना प्रत्येकी पंधरा लाख रुपये देण्याचे आमिष दाखवितो. दुसरा विकसक येतो तो बारा लाख रुपये आणि एक फ्रीज. तिसरा विकसक येतो तो काही रक्कम आणि ए.सी. गाडी देण्याचे आमिष दाखवितो. परंतु शासन मात्र या गोरगरिबांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यास तयार नाही. गेल्या ५६ वर्षापासून म्हाडाला यामध्ये इंटरेस्ट दिसत नाही.

भाषणाच्या अगोदर मी राज्यमंत्री महोदयांकडे पाहत होतो. त्यावेळी राज्यमंत्री हात हलवून सांगत होते की, माझ्या हातात काही नाही. हे सर्व नगर विकास विभागाकडे आहे. आता नगर विकास विभागाकडे काय आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण आटोपते घ्यावे. आपण गेली वीस मिनिटे भाषण करीत आहात, आता आपण दोन मिनिटांत आपले भाषण संपवावे.

**श्री. प्रकाश महेता :** अध्यक्ष महोदय, आपण सांगत असाल तर मी खाली बसतो. अजून मला तीन मुद्दे मांडावयाचे आहेत. तुम्हाला आम्ही एक तास बोलू दिले आहे. मंत्री महोदयांना आमचे बोलणे झोंबले की, ट्रॅकवर येण्यास सांगण्यात येते. नगर विकास राज्यमंत्री महोदय सभागृहात आहेत. या चर्चेतून सरकारची बाजू मांडली जाते. शासन निर्णय काढूनही त्याची अंमलबजावणी होत नाही. मंत्री महोदय, तुम्हाला व आम्हाला लोकांना उत्तरे द्यावयाची आहेत. यासाठी खंबीरपणे निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सभागृहात आपण सांगा की, आम्ही निर्णय करतो. लोकप्रतिनिधी सरकार चालवितात की, अधिकारी चालवितात हे मंत्री महोदयांच्या भाषणातून त्यांनी सांगितले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, एकही घरकुल योजना मंजूर केली नाही. संक्रमण शिबिरे व झोपड्या एकत्र आहेत, शांती सागर को.-ऑप. हौसिंग सोसायटीमध्ये १०० टक्के लोक घुसखोर आहेत. त्या योजनेला एसआरए मध्ये एलओआय दिला आयओडी दिली. हा विषय मी अधिकाऱ्यांसमोर मांडला तेव्हा त्यांनी मला सांगितले की, यातून काही तरी मार्ग काढावा लागेल. यातून खरोखर मार्ग काढण्याची गरज आहे. सन १९९५ पासून पडीत भागात जे संक्रमण शिबीर होते. तेथे लोक राहत आहेत, त्यांना एसआरए योजनेमध्ये एलओआय दिला. ती योजना पूर्ण करण्यास सांगण्यात आले. त्या योजनेला शांतीसागर पासून दूर करून पोलीस वसाहतीची इमारत, झोपडपट्टी आणि संक्रमण शिबीर, असे तीन एकत्र करून कसे काय एलओआय दिले. मग घरकुल योजनेला एलओआय देण्यास काय अडचण आहे. त्यासंदर्भात शासन निर्णय असून सुद्धा का निर्णय घेण्यात येत नाही. शासन निर्णय होता म्हणून तुम्ही त्यांना परवानगी दिली. यामध्ये पाईपलाईन वरील झोपड्या असतील, रस्ता रुंदीकरणातील झोपड्या असतील. पोलीस, रेल्वे वसाहतीतील झोपड्या असतील. यामध्ये आमची अपेक्षा एवढीच आहे की, आपण या सार्वभौम सभागृहात बसलो आहोत. याची गरिमा आहे, येथे बोललेल्या प्रत्येक शब्दाला किंमत आहे. महाराष्ट्राची जनता या सभागृहाला सार्वभौम सभागृह म्हणते आहे. असे असताना सत्ताधारी व विरोधी असे भांडत राहिलो. लोक कल्याणाच्या कार्यक्रमासाठी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी जर १३-१३ वर्षे होत

**[ श्री. प्रकाश महेता ]**

नसेल तर खरोखर लोकांचा लोकशाहीवरील, सभागृहावरील व प्रशासनावरील विश्वास उठला तर लोक रस्त्यावर आल्याशिवाय राहणार नाही. म्हणून या विषयाचा तत्काळ निर्णय लागावा अशा प्रकारची विनंती करून माझे दोन शब्द पूर्ण करतो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

**श्री. अबु आझमी** (मानखुर्द-शिवाजीनगर) **:** अध्यक्ष महोदय, मी सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे. सामान्य प्रशासन विभाग, गृह निर्माण विभाग, मराठी भाषा विभाग पर मैं अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, हाऊसिंग विभाग की समरी में २०१०-११ में, रिवाईज बजट में १६८३ करोड़ ८९ लाख ९६ हजार रुपये था, वह बजट २०११-१२ में १८९४ करोड़ ६६ लाख ५ हजार रुपये रखा गया है. मेरा विधानसभा क्षेत्र पूरा का पूरा स्लम एरिया है. उस बस्ती में एससी, एसटी और मॉयनॉरिटी के लोग ज्यादा रहते है. सब से पहले मैं सरकार से निवेदन करुंगा कि जो बजट है, उस बजट का ज्यादा से ज्यादा हिस्सा उस स्लम एरिया में खर्च होना चाहिए, जहां समाज के दबे-कुचले लोग रहते है.

अध्यक्ष महोदय, सरकार ने सन २००० तक के झोपड़ों को रेग्युलराईज करने का वादा किया था. मैं बजट पढ़ रहा था. डिमांड नंबर क्यू-३२२१६, हाऊसिंग के तहत बजट में ॲडिशनल कलेक्टर, एन्क्रोचमेंट डिमोलेशन, वेस्टर्न सबर्ब और इस्टर्न सबर्ब को १५ करोड़ रुपये की रकम डिमॉलेशन के लिए रखी गई है. दोनो पार्टियां जो सत्ता में है. बार-बार घोषणा की गई कि २००० तक के झोपड़ों को रेग्युलराईज किया जाएगा. १९९५ तक के झोपड़ों को रेग्युलराईज किया गया. उसके बाद सन २००० का सवाल कहां से आया ? इन लोगों ने बार-बार वादा किया. अब १५ करोड़ रुपये इसलिए रखे गए है कि इसको डिमॉलिश किया जाएगा. १९९५ के बाद झोपड़े बने कैसे ? यदि ९५ के बाद झोपड़े बने है, तो जिन लोगों ने बनवाया, जो लोग उसके जिम्मेदार है, उनके ऊपर बुलडोजर चलना चाहिए. १९९५ के झोपड़ों पर बुलडोजर चल रहे है, इसके ऊपर नजर रखनी चाहिए. १५ करोड़ रुपये विकास के लिए खर्च होने चाहिए.

अध्यक्ष महोदय, मानखुर्द-शिवाजी नगर में अनुसूचित जाती के लोग बड़ी संख्या में रहते है. गरीब लोग झोपड़े में रहते है. मुंबई की सब से बड़ी झोपड़पट्टी है. सिव्हिक ॲमिनिटीज, डिमांड नंबर ए-१६, क्यू-३२२१६, एससी की गरीब बस्तियों के लिए बुनियादी सुविधाएं प्रदान करने के लिए ५७ करोड़ रुपये इसमें दिए गए है. इसी तरह बीडी कामगारों के हाऊसिंग के लिए पांच करोड़ रुपये सब्सिडी के लिए दिया जाएगा. शिवाजीनगर इलाके में एससी, एसटी के लिए पानी, शौचालय, गटर इन चीजों के लिए भी फंड देने की जरुरत है. मेरी दो डिमांड है. मालेगांव और भिवंडी में पावरलूम चलानेवाले लोग झोपड़पट्टी में रहते है और सब से बड़े रोजगार के अवसर खेती के बाद, पावरलूम में है. उस पावरलूम को भी बीडी कामगारों की तरफ से हाऊसिंग के लिए फंड देने की जरुरत है. जिस तरह एससी,एसटी, गरीब लोगों की बुनियादी सुविधाओं के लिए खास रकम रखी गई है, मेरा यह कहना है कि सच्चर कमिटी की रिपोर्ट बार-बार यह कह रही है कि मॉयनॉरिटी,

**[ श्री. अबु आझमी ]**

मुसलमानों की हालत इस देश में बहुत खराब है. दिल्ली की सरकार से लेकर यहां की सरकार बार-बार यह कमिटमेंट कर रही है कि उस रिपोर्ट को लागू करने के लिए हम बाध्य है. लेकिन मैं देख रहा हूं कि मॉयनॉरिटी के लिए फंड में कोई गुंजाईश नहीं हो रही है. हाऊसिंग विभाग में, जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्यूअल मिशन के तहत १५०० करोड़ रुपये की तरतूद की गई है. सच्चर कमिटी की रिपोर्ट को सामने रखते हुए मेरी यह मांग है कि उसमें से १५० करोड़ रुपये मॉयनॉरिटी इलाके में खर्च किए जाने चाहिए.

अध्यक्ष महोदय, स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना है. यह योजना अर्बन डेवलपमेंट डिपार्टमेंट के अंतर्गत आती है. गरीबी की रेखा से नीचे रहने वाले नौजवान मर्द और औरतों की ट्रेनिंग की जिम्मेदारी एनजीओ की दी गई थी. लेकिन एनजीओ से यह काम लिया गया. डायरेक्टर ऑफ व्होकेशनल एज्युकेशन को इसकी जिम्मेदारी दी गई और इसमें जिम्मेदारी बांट दी गई. डायरेक्टर ऑफ व्होकेशनल एज्युकेशन की जिम्मेदारी नौजवानों को ट्रेनिंग देना और एक कलकत्ता की प्राईव्हेट कंपनी नियुक्त की गई जो कि सर्वे करेगी और सर्वे कर के प्लेसमेंट दिलवाएगी. इसके अंतर्गत गवर्नमेंट एजन्सी को २८०० रुपया ट्रेनिंग के लिए दिया जाएगा और प्राईव्हेट एजन्सी को ३००० रुपया सर्वे करने का और ३००० रुपया प्लेसमेंन्ट दिलवाने का दिया जाएगा. मुझे अफसोस है कि सन २०१०-११ में एक भी नौजवान को ट्रेनिंग नहीं दी गई और इसकी वजह यह है कि सरकार ने फंड साल के आखिर में, मार्च महीने में फंड दिया. इसमें ७५ प्रतिशत फंडींग केंद्र सरकार की और २५ प्रतिशत फंडींग राज्य सरकार की है. सन २००९-१० में सिर्फ २० से २५ प्रतिशत हम लोगों ने अपना गोल अचिव्ह किया है. अध्यक्ष महोदय जो सर्व्हे हुआ है, अफसोस के साथ ये कहना पड रहा है की, उसमें पुरे मुंबई शहर में सिर्फ २३९ लोगों के नाम आये है. इन २३९ लोगों के ॲड्रेस भी सही नही है. उसमें ५०-६० साल के लोगों के भी नाम है. जो सर्वे हुआ है, यह सर्वे गलत है. पिछड़े हुए लोगों में मॉयनॉरिटी के लिए भी कोटा है. मानखुर्द है, शिवाजीनगर है, भिंडी बाजार है. मदनपूरा है, इन इलाकों के किसी भी आदमी का नाम इसमें नहीं आया. जब यह रोजगार योजना इस तरह से फेल हो रही है, तो इस पर तुरंत कार्रवाई होनी चाहिए. सर्वे सही तरीके से किया जाना चाहिए. जिनको नौकरी नहीं है, उनको नौकरी मिलनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, मेरा दूसरा मुद्दा यह है कि, महाराष्ट्र में बहुत बड़ा एक ऐसा हिस्सा है, चाहे वह मुस्लिम हो, दलित हो, बहुत सारे ऐसे लोग है जो मटन और बीफ खाते है. उसके लिए स्लॉटर हाऊस अच्छी तरह से बनाए जाने चाहिए. लेकिन कामठी के अंदर स्लॉटर हाऊस के लिए जगह रिजर्व है. किसके दबाव में है, यह पता नहीं. स्लॉटर हाऊस तो बन नहीं रहा है. कामठी के लोगों को अपने जानवरों लेकर नागपुर जाना पड़ता है. उनके साथ नाइन्साफी हो रही है. मैं गुजारीश करुंगा कि कामठी के स्लॉटर हाऊस का जो काम रुका हुआ है, वह काम जल्द से जल्द पूरा होना चाहिए.

[ श्री. अबु आझमी ]

यहां पर बार-बार चिल्लाया जाता है कि बाहर से लोग आते है. यहां पर लोगों को कोई सुविधाएं नहीं मिल रही है, पानी नहीं है, सड़क नहीं है, रहने की जगह नहीं है, लेकिन आजकल किसी व्यापारी, इंडस्ट्रीज से बात करेंगे तो पता चलेगा कि आजकल लेबर की बहुत कमी हो गई है.

पावरलूम में कोई लूम चलानेवाला आदमी नहीं है. बेकरी में जाओ तो वे बेकरी में बैठे हुए है. वहां मजदूर नहीं मिल रहे है. लोगों के पास काम करने के लिए आदमी नहीं है. काम के लिए कोई गुजरात जा रहा है तो कोई कर्नाटक जा रहा है. आज मुंबई में कारोबार खराब हो रहा है. मेरा निवेदन है कि, जिस तरह से बीडी कामगारों के लिए....जिस तरह से लोग दूसरे राज्यों से यहां आते है, युपी से आते है, बिहार से आते है, उनके लिए हाऊसिंग की सुविधा मुहैय्या की जानी चाहिए. वे गरीब लोग होते है, उनको कम पगार मिलता है. उनको किराए पर सस्ते मकान दिए जाए. इस तरह का काम यह सरकार करेगी तो यहां पर बहुत सारे लोग नौकरी के लिए आएंगे ओर यहां का कारोबार बढ़ेगा. महाराष्ट्र देश की आर्थिक राजधानी है. वह बरकरार रहेगी.

अध्यक्ष महोदय, मैं सामान्य प्रशासन विभाग के बारे में कहना चाहता हूं. २००९-१० में माननीय मंत्रियों के टूर पर २ करोड़ १७ लाख ३० हजार रुपये खर्च हो रहे थे. परंतु इस बजट में, २०११-१२ में ६ करोड़ २ लाख ४१ हजार रुपया हो गया. इसका मतलब तीन गुना खर्च बढ़ गया. इसी तरह सॅलरी के ऊपर १ करोड़ ५३ लाख ९० रुपये खर्च था, वह भी बढ़ गया. लेकिन मैं देख रहा हूं कि मायनॉरिटी के लिए जो बजट दिया गया है, पिछले बजट में पूरे मॉयनॉरिटी के लिए २२० करोड़ रुपये दिए गए थे और अब के बजट में बढ़ा दिए गए. २७५ करोड़ रुपये कर दिए गए है. माननीय मंत्रियों के पगार और दौरे पर तीन गुना खर्च हो रहा है, महंगाई बढ़ने से खर्च हो रहा है, तो यह भी सोचना चाहिए कि सिर्फ ५० करोड़ रुपये मॉयनॉरिटी के बढ़ाना, यह मॉयनॉरिटी के साथ नाइन्साफी है. इस बारे में सरकार ने ध्यान देना चाहिए और समाज के दबे-कुचले मॉयनॉरिटी के लोगों की तरफ ध्यान देना चाहिए.

अध्यक्ष महोदय, जीएडी के बारे में कहना चाहूंगा कि, उर्दू की जुबां के लिए जो ॲडव्हरटाईजमेंट हो रही है, उर्दू अखबारों में ॲडव्हरटाईजमेंट के लिए ४८ करोड़ ९ लाख ३५ हजार रुपये २०११-१२ में रखे गए है. उर्दू जुबान किसी एक मजहब की नहीं है. मराठी की हम जयजयकार कर रहे है. लेकिन मैं यहां पर बैठे हुए सम्माननीय सदस्यों से पूछना चाहता हूं कि, सरकार मराठी के नाम से वोट तो ले रही है. लेकिन तीन साल से कह रहे है कि, मराठी स्कूलों में टीचर की नियुक्ति की जाएगी. लेकिन अभी तक एक भी टीचर की नियुक्ति नहीं हुई है. उसी तरह उर्दू के साथ हो रहा है. उर्दू को ऐसा ट्रीट कर रहा है मानो उर्दू यहां की जुबान ही नहीं, कहीं और की जुबान है. मैं जानना चाहता हूं कि, ४८ करोड़ ९ लाख ३५ हजार रुपये पब्लिसिटी के लिए रखे गए है. उसमें उर्दू के लिए कितना रखा गया है? उर्दू और हिंदी के लिए भी इसमें रकम मिलनी चाहिए.

**[ श्री. अबु आझमी ]**

अध्यक्ष महोदय, मुंबई में घरों की बहुत समस्या है इसलिए हाऊसिंग डिपार्टमेंट की तरफ से अधिक से अधिक घर बनाये जाए. साऊथ मुंबई में जो १९ हजार पुरानी इमारतें हैं, वे बहुत खराब हालत में हैं. दो-तीन महीने के बाद बरसात शुरु हो जायेगी और फिर बरसात में कोई न कोई इमारत गिरेगी और कई लोगों की जानें जायेंगी. हम लोग वहां पर जायेंगे और अपने आंसू बहाकर आ जायेंगे. हर साल ऐसा होता है और कई लोगों की जान चली जाती है. हमारा मुख्यमंत्री महोदय से निवेदन है कि पुरानी इमारतों के रिडेवलपमेंट के संबंध में तुरन्त कोई न कोई निर्णय लिया जाए. मुंबई में घरों की बहुत दिक्कत है. अध्यक्ष महोदय, गृह निर्माण राज्य मंत्री जी यहां पर बैठे हुए हैं. मुझे उम्मीद है कि वह इस बारे में कुछ न कुछ करेंगे. मैं एक शेर सुनाना चाहूंगा-

" पहले रहते थे मकानों में, बड़े चैन से लोग,
अब जहन में लोगों के मकान रहते हैं."

अध्यक्ष महोदय, यहां पर पानी की बात हो रही थी. मैं देखता हूं कि मुंबई शहर में स्काईवॉक बन रहे हैं और उन पर करोड़ों रुपये खर्च हो रहे हैं. मैं देखता हूं कि स्काईवॉक पर कहीं दो आदमी जा रहे हैं और कहीं पर तीन आदमी जा रहे हैं. सरकार स्काईवॉक बना रही है, वह ठीक है लेकिन सरकार लोगों को पानी देने के ऊपर क्यों नहीं ध्यान दे रही है ? अध्यक्ष महोदय, मेरे निर्वाचन क्षेत्र मानखुर्द-शिवाजीनगर में पानी की बहुत दिक्कत है. मैं आपको बताना चाहूंगा कि जहां पर पानी की पाईप लाईन ही नहीं है, तो वहां पर पानी पहुंचेगा कैसे ? वहां पर पहले टेंकर से पानी दिया जा रहा था, वह भी बंद कर दिया गया. लोग पानी के लिए चिल्ला-चिल्ला कर थक गये परन्तु कोई सुनने को तैयार नहीं है. इंसान की बुनियादी चीज पानी है तो क्या इसके लिए बजट में अधिक प्रोवीजन नहीं किया जा सकता है ? स्काईवॉक बन सकते हैं, लेकिन लोगों को पीने का पानी नहीं मिल सकता है. करोड़ों रुपयों का भ्रष्टाचार हो रहा है. मानखुर्द-शिवाजीनगर, चीता कैम्प और बहुत सारे ऐसे इलाके हैं जहां पर पीने के पानी की समस्या है. मेरा मुख्यमंत्री जी से निवेदन है कि, बजट में पानी के लिए अधिक से अधिक प्रोवीजन किया जाय. एक आदमी को एक दिन में ९० लीटर पानी मिलने का जो हक है, वह उसको मिलना चाहिए. इतना कहते हुए मैं अपनी बात यहीं समाप्त करता हूं. धन्यवाद.

**श्री. मधू चव्हाण** (भायखळा) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०११-२०१२ च्या गृहनिर्माण, नगरविकास विभागाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसांच्या मूलभूत गरज आहेत. यापासून शासनाने कोणालाही वंचित ठेवलेले नाही. शासनाने दलित, पीडित, आदिवासी, भटक्या विमुक्त जाती, एलआजी, एचआयजी, एमआयजीमधील गरिबांपासून श्रीमंतांना घरे देण्याचे काम केलेले आहे. शासनामध्ये काम करीत असताना नेहमी शासनाची स्तुती करणे हे काही बरोबर नाही. प्रश्न अनेक आहेत, उत्तर मात्र एकच आहे. सरकार धोरण ठरवित आहे. धारावीचा पुनर्विकास, सरकार धोरण ठरवित आहे. सात-आठ वर्षे उलटूनसुद्धा विकास काही होत नाही, ही खरी परिस्थिती आहे. बीडीडी, बीआयटी चाळीचा

[ श्री. मधू चव्हाण ]

पुनर्विकास, सरकार धोरण ठरवित आहे. गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत, सरकार धोरण ठरवित आहे. सगळ्याच ठिकाणी सरकार धोरण ठरवित आहे. मराठी शाळा काढण्याबाबत, सरकार धोरण ठरवित आहे. शासन जर प्रत्येक वेळेस धोरण ठरवित आहे असे उत्तर देत असेल तर हे सरकार धोरण ठरविणारे सरकार आहे का ? आज बीडीडी चाळीमध्ये सोळा ते सतरा हजार भाडेकरू राहत आहे. बीडीडी चाळीचा पुनर्विकास करताना त्यांच्या मागण्या मान्य केल्या तरी सरकार फायद्यामध्ये येऊ शकेल असे मला वाटते. मुंबईतील बीडीडी चाळींचा विकास केला तर त्यामध्ये शासनाला खूप मोठ्या प्रमाणात फायदा होण्याची शक्यता आहे. चाळीमधील लोकांना मोफत घरे दिली तर, शासनाला फायदा होऊ शकतो. बीडीडी चाळीतील राहणाऱ्या पोलिसांना कायमस्वरूपी घरे दिली पाहिजेत. आज बाआयटी आणि बीडीडी चाळीला जवळ जवळ १०० वर्षे झालेली आहेत. पोलिसांच्या तीन पिढ्यांनी त्या ठिकाणी वास्तव्य केलेले आहे. जर त्या ठिकाणच्या पोलिसांना मालकी हक्काने घरे दिली तर तेथील पोलिसांचे आशीर्वाद शासनाला मिळतील.

अध्यक्ष महोदय, गिरणी कामगार आज देशोधडीला लागलेला आहे. त्या माध्यमातून शासनाला ७५० एकर जमीन मिळणार होती. ही जमीन गिरण्यांची आहे. यामध्ये म्हाडाला आणि महानगरपालिकेला २५० एकर जमीन मिळणार होती आणि गिरणी मालकांना २५० एकर जमीन मिळणार होती. यासंदर्भात शासनाने एक कायदा केला. त्या कायद्यान्वये म्हाडा आणि महानगरपालिकेकडे २५ एकर जमीन आली आणि उर्वरित ७०० एकर जमीन गिरणी मालकांकडे गेली. आज गिरणी कामगार घरे मागत आहेत. त्यासंदर्भातील वाजवी किंमत शासन ठरवित नाही. फक्त धोरण ठरविण्याचे काम करीत आहे. मी म्हाडाचा अध्यक्ष असताना मालवणी येथील एका स्कीमच्या संदर्भात एक उदाहरण देणार आहे. त्यावेळी गिरणी कामगारांसाठी ३ लाखांची घरे बांधली होती. ती घरे ७ वर्षापूर्वी लोकांना विकली. जे गिरणी कामगार आज ५ लाख रुपयांमध्ये घर घ्यायला तयार आहे, अशा लोकांना शासनाने ५ लाखात घरे दिली तर कोणताही तोटा होणार नाही. गिरणी कामगारांची मागणी शासनाने मान्य केली तर त्यामध्ये कोणतेही दु:ख करण्याचे कारण नाही. कारण शेवटी सरकारलाच फायदा होणार आहे. ज्या लोकांनी विकास घडविला, स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये भाग घेतला अशा गिरणी कामगारांची मागणी शासनाने मान्य करावी.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरात कॉंग्रेसची शताब्दी साजरी झाली होती. त्यावेळी राजीव गांधीजींनी मुंबई शहरासाठी १०० कोटी रुपयांची मदत दिली होती. त्या माध्यमातून मुंबई शहरात ६६ नव्या इमारती निर्माण करण्यात आल्या होत्या. आज राजीव गांधी निवाऱ्यात जवळ-जवळ साडे सहा ते सात लाख गोरगरीब नागरिक राहत आहेत. त्या इमारती आता जीर्ण अवस्थेत आलेल्या असून त्याची दुरुस्ती करण्याची गरज आहे. राजीव गांधी निवारा प्रकल्पातील ६६ इमारती या मुंबई बेटावर आहेत. याकडे गृहनिर्माण खात्याने त्वरित लक्ष दिले पाहिजे. गृह निर्माण विभागाने इमारतींच्या दुरुस्तीकरिता २० ते २५ कोटी रुपये तरतूद करण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहरामध्ये ज्याप्रमाणे उपकर प्राप्त इमारती आहेत त्याचप्रमाणे उपकर नसलेल्या देखील काही इमारती आहेत. उपकर नसलेल्या साधारणपणे २०० ते २५० इमारती शहरात आहेत. पूर्वी इमारतींना कर लागू होता. १०० रुपये महिन्याचे भाडे दिल्यानंतर

**[ श्री. मधू चव्हाण ]**

ती जागा मालकीची होते, सोसायटीची होते म्हणून अनेकांनी ती जागा आपल्या मालकीची करून घेतली. त्यामुळे सदर इमारतींचे सेस रद्द झाले. आता या इमारती खूप जुन्या झालेल्या आहेत. मात्र सेस रद्द झाल्यामुळे त्या इमारतींची दुरुस्ती होऊ शकत नाही. पूर्वी उपकर असलेल्या मात्र आता उपकर नसलेल्या इमारतींमधील भाडेकरूंना गृह निर्माण विभागाने २० ते २५ कोटी रुपये खर्च करून वाचविले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मी मुंबई शहरातील आमदार असून गेली अनेक वर्षे सातत्याने हा प्रश्न सदनासमोर उपस्थित करीत आहे. आमचे शासन इतर सर्व बाबींकडे लक्ष देते. मात्र मुंबई शहरामधील आज १६ हजार इमारतींमध्ये जे भाडेकरू राहात आहेत, त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. सन १९६९ साली मुंबई दुरुस्ती मंडळाच्यावतीने योजना सुरू झाली. ४० कोटी रुपये सेसचे, ४० कोटी रुपये शासनाचे, म्हाडाचे १० कोटी, महानगरपालिकेचे १० कोटी या प्रमाणे पुनर्रचना मंडळाची निर्मिती करण्यात आली. त्या मंडळामध्ये इमारतींचे पुनर्रचना व दुरुस्ती करण्यास सुरूवात झाली. मात्र यामध्ये अनेक वर्षांपासून कोणतीही वाढ करण्यात आली नाही. राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मुंबई शहरातील १६ हजार इमारतीतील भाडेकरूंना खऱ्या अर्थाने न्याय मिळवून द्यावयाचा असेल तर शासनाने त्याकरिता १०० कोटी रुपयांचे अतिरिक्त अनुदान देऊन २०० कोटी रुपयांची योजना राबवावी.

अध्यक्ष महोदय, मुंबई इमारत दुरुस्ती मंडळामार्फत ज्या इमारतींची पुनर्रचना झाली त्यांच्या संदर्भात मागील वेळी आम्ही सातत्याने हा प्रश्न उपस्थित करीत आहोत. या इमारतीतील भाडेकरूंना घुसखोर ठरवून त्यांना म्हाडाच्या अधिकाऱ्यांकडून फसविण्यात आले होते. ३०० ते ३५० भाडेकरू तेथे राहत होते. त्यांच्याकडून म्हाडाने ठराव क्रमांक ५९६२ करून घेतला व त्यांना म्हाडाने अधिकृत करून घेतले. मात्र काही अधिकाऱ्यांनी संगनमत करून ठराव रद्द करून त्यांना अनधिकृत ठरवले. तत्कालीन मुख्यमंत्री यांच्याकडे या संदर्भात मागणी केली. त्यांनी सभागृहात आश्वासन दिले. मात्र त्या आश्वासनाची अजून पूर्तता झालेली नाही. आश्वासन दिल्याप्रमाणे भाडेकरूंना न्याय द्यावा, अशी मी या ठिकाणी मागणी करू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरात मुंबई इमारत दुरुस्ती मंडळाच्यावतीने कलम ३३ (७) व कलम ३३ (९) अंतर्गत इमारतींचा विकास केला जातो. कलम ३३ (७) नुसार इमारतीची पुनर्रचना केल्यास महानगरपालिकेच्या करात सवलत मिळते. मात्र कलम ३३ (९) नुसार पुनर्रचना केल्यास महानगरपालिकेच्या करातून सवलत मिळत नाही. जुन्या इमारतींमध्ये अनेक वर्षांपासून भाडेकरू राहत आहेत. एका इमातीला एक न्याय व दुसऱ्या इमारतीला दुसरा न्याय लावला जात आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरात अनेक ठिकाणी झोपुचे काम मोठ्या प्रमाणात हाती घेतले जात आहे. झोपुचे काही मुख्य अधिकारी योजना जाहीर करण्याचे काम करीत असतात. एखाद्या ठिकाणी २ हजार ते ३ हजार स्क्वे मी. जागा असून झोपडपट्टी असेल व तेथेचे कारखाने, बेकरी व इतर लहान मोठे उद्योगधंदे असतील तर त्या ठिकाणी झोपु जाहीर करताना विकसकांबरोबर अधिकारी संगनमत करतात व संपूर्ण प्लॉटवर गलिच्छवस्ती सुधार योजना जाहीर केली जाते. त्यामुळे तेथील कारखान्यांमध्ये,

[ श्री. मधू चव्हाण ]

बेकरीमध्ये काम करणारे कामगार बेकार होतात. हे लोक बेकार होऊन रस्त्यावर येतात. झोपडपट्टी धारकांना घरे मिळतात. विकसकांची चांदी होते मात्र तेथील गरिबांना काहीही मदत मिळत नाही. विकसकाला मदत करण्यासाठी शासनाने कायदे केलेले आहेत. या कायद्यांमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. ज्या ठिकाणी झोपडपट्टी असेल तेवढ्याच भागावर झोपडपट्टी योजना जाहीर केली पाहिजे. इतर भागात कारखाने, लहान मोठे उद्योगधंदे असतील तर तो भाग तसाच ठेवला पाहिजे. तर या मुंबई शहरातील कामगार वाचेल. अध्यक्ष महाराज, मला आपल्याला सांगावयाचे आहे की, मुंबई शहरामध्ये बीपीटीची फार मोठी जागा आहे व त्या जागेवर अनेक जुन्या इमारती आहेत. त्यांची दुरुस्ती इमारत दुरुस्ती मंडळातर्फे केली जाते. परंतु, या इमारती पडल्यानंतर त्या इमारती पुन्हा पुनर्रचित होऊ शकत नाहीत. मुंबई शहरातील इतर इमारती पडल्यानंतर त्या पुनर्रचित करता येतात. मुंबईतील बीपीटीच्या जागेवर असलेल्या इमारतींची पुनर्रचना करण्यासाठी शासनाने एक ठोस कायदा केला पाहिजे. त्याचप्रमाणे बीपीटीच्या जागेवर असलेल्या झोपडयांबाबत एसआरएची योजना राबविली पाहिजे. तेथे असलेले कारखाने, गोदामे यांच्या दुरुस्तीबाबत मुंबई महानगरपालिकेने बीपीटीस परवानगी दिली पाहिजे.

अध्यक्ष महाराज, आपल्या सभागृहामध्ये आपण नेहमीच झोपडपट्ट्यांबाबतचा विषय मांडत असतो की, मुंबईच्या फुटपाथवर असलेल्या झोपडपट्ट्यांना आपण महात्मा गांधी पथ क्रांती योजनेतून घरे देतो. एखादी झोपडपट्टीवर वसलेली असेल किंवा एखादी झोपडपट्टी फुटपाथवर असेल तर तसेच, दिनांक १ जानेवारी १९९५ च्या आधीच्या ज्या झोपड्या असतील त्या अधिकृत करून, त्याचे स्ट्रक्चर अधिकृत केले पाहिजे. त्यामध्ये राहणारा माणूस कोणी असेल, एखाद्याने ती झोपडी विकत घेतली असेल तर, त्या झोपडीधारका ऐवजी झोपडीला प्रमाणित मानून त्याला त्या योजनेचा लाभ मिळाला पाहिजे. त्या माणसाला त्याचे घर मिळाले पाहिजे.

माझ्या भागामध्ये मोटावाला चाळ, प्रभुदास चाळ अशा अनेक चाळींची जागेचे म्हाडाने ॲक्वीझिशन केलेले आहे. तेथे म्हाडा की प्रायव्हेट डेव्हलपर योजना राबवणार असा वाद निर्माण झालेला आहे. ७-७, ८-८ वर्षे तेथील लोक प्रतिक्षा नगरातील संक्रमण शिबिरात राहत आहेत. परंतु, आजपर्यंत त्यांचा निर्णय होत नाही. मी गृहनिर्माण खात्याला विनंती करेन की, या चाळींचा लवकरात लवकर निर्णय झाला पाहिजे. श्रीनिवास बिल्डिंग पडून ८ वर्षे झाली, तेथील लोक संक्रमण शिबिरात राहत आहेत. ती उपकर प्राप्त नसलेली इमारत आहे, त्याला एफएसआय मिळू शकत नाही. अध्यक्ष महाराज, शासनाकडे माझी मागणी आहे की, ज्या उपकर प्राप्त इमारती नसतील त्या सगळ्या इमारतींना उपकर प्राप्त इमारतीप्रमाणे नियम लावून त्यांची डेव्हलपमेंट केली पाहिजे. माझ्या भागामध्ये जिजामाता उद्यान आहे. त्या उद्यानामध्ये अण्णा भाऊ साठे नाट्यगृह आहे. ते बंदिस्त करून लोकांना त्याचा उपयोग झाला पाहिजे.

माझ्या भागामध्ये सर्वात मोठे जे. जे रुग्णालय आहे. त्याच्या आवारात अनेक झोपड्या आहेत. या झोपड्यांनाही पर्यायी जागा दिली पाहिजे. यासाठी मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करेन की, आपण मागण्या सादर करताना, त्यांना पाठिंबा देताना आम्ही ज्या मागण्या केलेल्या आहेत त्या मान्य कराव्यात. आपण मला बोलण्याची संधी दिली याबद्दल धन्यवाद !

**श्री. सुभाष देसाई** (गोरेगाव) : अध्यक्ष महाराज, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील सामान्य प्रशासन विभाग, नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग, मराठी भाषा विभाग या विभागांच्या मागण्यांवर चर्चेसाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, आज चर्चेसाठी हे चारही महत्त्वाचे मंत्रालयीन विषय ठेवलेले आहेत. एरवी मी गृहनिर्माण व नगरविकास या विभागांवर बोलण्यास प्राधान्य देत असतो. परंतु, आज मराठी भाषेचा क्रमांक बऱ्याच काळानंतर लागलेला असल्याने, मी आज पहिले महत्त्व मराठी भाषा विभाग या विषयाला देणार आहे.

बरीच वर्षे पाठपुरावा केल्यानंतर मंत्रालयामध्ये याबाबत एक नवीन विभाग सुरू करण्याचा एक चांगला निर्णय झाला. त्यानंतर असे वाटले होते की, मराठीची जी काही आजची अवस्था आहे ती सुधारण्यास भराभर सुरुवात होईल. परंतु, शेवटी शासकीय चक्रे एकदा सुरू झाली की, त्यांच्या पद्धतीनेच चालतात आणि त्यामध्ये इतर विषयांचा जसा विचका होतो, तसेच मराठी भाषेच्या विकासाबाबतही विशेष काही घडलेले दिसत नाही.

वास्तविक सरकारने याबाबत काही निर्णय घेतले. त्यामध्ये मोठमोठ्या मंडळींना सल्लागार नेमून वेगवेगळे विषय त्यांच्याकडे दिले. त्याच्यामध्ये थोर साहित्यिक श्री. मधु मंगेश कर्णिक आहेत. महासंगणक ज्यांनी आपल्या देशाला दिला, त्या श्री. विजय भटकर यांच्याकडे एका विषयाची जबाबदारी देण्यात आलेली आहे. न्यायमूर्ती श्री. चपळगावकर यांना भाषाविषयक सल्लागार म्हणून नेमले आहे, तर श्री. आनंद कुलकर्णी या आयएएस अधिकाऱ्यांस याचे सचिव नेमले आहे. एवढी मोठी नावे असताना सुद्धा मराठी भाषेची गती काही पकडता आलेली नाही, याचे कारण म्हणजे सरकारची तेवढी तीव्र इच्छा नाही. इच्छा शक्ती नसेल तर काम कसे होणार ? तेव्हा हा विभाग फक्त नावापुरता राहिलेला आहे. मंत्रालयामध्ये या विषयाच्या बाबतीत काही घडत नाही. या संदर्भात सरकारने काही यंत्रणा तयार केली नाही. स्वतंत्र कर्मचारीवर्ग दिलेला नाही. ज्या सचिवांकडे या विभागाचा कार्यभार दिलेला आहे त्यांच्याकडे आणखी सहा विभागांचा कार्यभार आहे. तेव्हा आमची मागणी आहे की, मराठी भाषा विभागाला न्याय द्यायचा असेल तर त्यासाठी एक स्वतंत्र सचिव नेमला पाहिजे, त्याशिवाय एक स्वतंत्र राज्यमंत्री नेमला पाहिजे, जो या मराठी भाषा विभागाला वेळ आणि न्याय देईल. आपण अशा प्रकारचा निर्णय घेतला तर यातून काही चांगले घडणार आहे.

अध्यक्ष महाराज, यापूर्वी देखील मराठी भाषेसंबंधीचे विषय होते. परंतु त्यांची वेगवेगळ्या विभागांमध्ये विभागणी केलेली होती. भाषा संचालनालय विभाग सामान्य प्रशासन विभागाकडे होता. राज्य मराठी विकास संस्था देखील सामान्य प्रशासन विभागाकडे होती. साहित्य संस्कृती मंडळ हे सांस्कृतिक कार्य विभागाकडे होते. विश्वकोष निर्मिती मंडळ हे सांस्कृतिक कार्य विभागाकडे होते. ग्रंथालय आणि संचालनालय हे उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे होते. विद्यापीठ ग्रंथ निर्मिती हा विभाग बंद पडला, पण हा विभाग सुद्धा उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे होता. असे सहा विभाग पूर्वीच अस्तित्वात असताना ते तीन वेगवेगळ्या खात्यांमध्ये विभागले असल्यामुळे त्यांच्यामध्ये समन्वय राहिलेला नाही. त्यामध्ये हे आघाडीचे सरकार. त्यांच्यामध्ये सत्तेचा समतोल सांभाळता सांभाळता नाकीनऊ येतात, ओढाताण होते,

**[ श्री. सुभाष देसाई ]**

खेचाखेची होते. माझ्या विभागाला इतकी तरतूद, आपल्या विभागाला इतकी तरतूद यावरून त्यांच्यात भांडणे होतात आणि मग निर्णय होत नाहीत. सामान्य प्रशासन विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग आणि शालेय शिक्षण विभाग हे मराठीशी संबंधित विभाग काँग्रेस पक्षाकडे आहेत. तर उच्च व तंत्रशिक्षण विभाग राष्ट्रवादी पक्षाकडे आहे. त्यामुळे साहजिकच या ओढाताणीमध्ये राजकारण होते, त्यामुळे आपला हेतू साध्य होत नाही किंवा पुढे सरकत नाही. म्हणून मराठी भाषेची ही दुरवस्था झालेली आहे.

अध्यक्ष महाराज, आपण मंत्रालयात गेल्यावर मुख्य प्रवेशद्वारापाशी जी दोन उद्‌वाहने आहेत, त्यांच्या-बरोबर मध्ये कुसुमाग्रजांची एक कविता लावलेली आहे. उद्‌वाहनाची काही वेळ वाट पाहत असताना मधल्या काळात कोणाही मंत्री महोदयांना त्यातील ओळी वाचाव्यात आणि त्यातून काही अर्थबोध घ्यावा असे वाटत नाही. त्या कवितेतील दोन ओळी फार महत्त्वाच्या आहेत.

" परभाषेतही व्हा पारंगत,ज्ञान साधना करा जरी
माय मराठी इकडे मरते, परकीचे पद चेपू नका."

कुसुमाग्रजांनी परभाषेचा द्वेष केलेला नाही, परंतु हा इशारा त्यांनी दिलेला आहे. आपण इंग्रजी शिकायला काही हरकत नाही. परंतु मराठी भाषा इकडे मरते आहे, त्याकडे लक्ष द्या. त्या परकीचे पद चेपू नका असे कुसुमाग्रजांनी सांगितलेले आहे.

अध्यक्ष महाराज, आपल्या शालेय शिक्षण विभागाला मराठीचा पूर्णपणे विसर पडल्यामुळे त्यांनी काही दुष्ट निर्णय घेतलेले आहेत. दिनांक १९ जून २०१० रोजी जो जी. आर. काढलेला आहे, तो काळा जी. आर. आहे. शिक्षणहक्क कायदा होऊनही अनेक मराठी शाळांना या जी. आर. ने अनधिकृत ठरविलेले आहे. फक्त अनधिकृत ठरविलेले नाही तर त्या मराठी शाळेला परवानगी नाही म्हणून सुरुवातीला एक रुपयांपर्यंत दंड, त्यानंतर दररोज दहा हजार रुपये दंड ठोठाविला आहे. संबंधितांनी इंग्रजी शाळा काढली नाही हा त्यांचा दोष झाला. मराठी शाळा काढली हा त्यांचा गुन्हा झाला. असे असेल तर कोणते कार्यकर्ते मराठी भाषेची सेवा करायला पुढे येतील ? तेव्हा सर्व मराठी संस्थांवर अन्याय झालेला आहे. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर त्यांनी आझाद मैदानावर उपोषण सुरू केले आहे. त्यामध्ये मराठी भाषा समन्वय समिती आहे आणि मराठी अभ्यास केंद्र या संस्था उपोषण करण्यासाठी बसल्या आहेत. आपण इंग्रजीचे एवढे स्तोम माजविले आहे की त्यांना कोणत्याही प्रकारचे दंड होत नाहीत. त्यांनी इंग्रजी शाळा काढल्याबद्दल त्यांच्यावर कारवाई नाही. मराठी शाळा काढली तर याद राखा, आम्ही आपणास गोळ्या मारत नाहीत फक्त दंडच करीत आहोत हे आपले नशीब समजा. अशा प्रकारच्या निर्णयामुळे आपल्या मराठी भाषेची अशी अवस्था झालेली आहे. राज्यकर्त्यांना मराठी भाषेची किंमत वाटत नाही, तर मराठी भाषेचे आणखी काय होणार ?

अध्यक्ष महाराज, आजही मुंबई उच्च न्यायालयामध्ये " बॉम्बे हायकोर्ट " असा शब्द वापरला जातो. याचे कारण म्हणजे आपले सरकार कणखरपणे पाठपुरावा करीत नाही हे आहे. अनेक राज्यांच्या हायकोर्टामध्ये तेथील स्थानिक नाव समाविष्ट झाले आहे. मुंबई हायकोर्टाला मुंबई उच्च न्यायालय असे का म्हटले जात नाही ? ते बॉम्बेचा हट्ट का धरतात ? राज्य शासन या संदर्भात उदासीन आहे.

**[ श्री. सुभाष देसाई ]**

आपणाकडे त्रिभाषा सूत्र केंद्र शासनानेच मान्य केले आहे, घटनेनेच त्याला स्थान दिले आहे. पण तरी सुद्धा आपल्याकडे मुंबई विमानतळावर अजूनही मराठी भाषेला प्राधान्य दिले जात नाही. ३ भाषेतील १ भाषा म्हणून तरी माना. परंतु, तेवढेही होत नाही. पूर्वी विमान मुंबईत आल्यावर एक घोषणा होत असे की, "आम्ही छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरत आहोत." हे ऐकल्यावर जरा बरे वाटायचे. आपण आपल्या राज्यात, शहरात, राजधानीत आलो आहोत, असे कुठेतरी वाटायचे. परंतु, ही घोषणा आता सगळ्या एअरलाईन्सने बंद केली आहे. आता ती घोषणा ऐकायला मिळत नाही.

अध्यक्ष महोदय, विमानतळावरील सगळ्या किंवा जास्तीतजास्त सूचना इंग्रजीतच होतात, थोड्याशा हिंदीत असतील, पण मराठीचा मागमूस सुद्धा नसतो. आपण यासाठी फक्त चळवळी केल्या पाहिजेत का ? आंदोलने केली पाहिजे का ? राज्य सरकारचे काही कर्तव्य नाही का ? फक्त मराठी विभाग उघडला, स्थापन केला अशी घोषणा केली की, त्यांचे कर्तव्य संपले, असे जर त्यांना वाटत असेल तर ते मराठीचे दुर्दैव आहे. थोरा-मोठ्यांनी संगितले आहे की, भाषा ही प्रयोगशाळेत जन्माला येत नाही. भाषा वापरात ठेवली तर ती जीवंत राहू शकते, टिकू शकते, तिचा विकास होऊ शकतो. मराठी भाषेचा वापर करण्याबाबतीत राज्य शासन शंभर टक्के उदासीन आहे आणि त्यामुळेच ही वाईट परिस्थिती आपल्यावर ओढवलेली आहे. निव्वळ भाषा विभाग स्थापन करून उपयोग होणार नाही. मराठी भाषेच्या चळवळतील कार्यकर्ते, विचारवंत आहेत, जे अभ्यास करतात, त्यांना निमंत्रित करा, त्यांची मदत घ्या. अध्यक्ष महोदय, ठाण्याचे ज्येष्ठ वकील ॲड. शांताराम दातार आहेत, ते न्यायालयामध्ये मराठीचा वापर व्हावा, यासाठी बरीच वर्षे प्रयत्न करीत आहेत. मराठी भाषा ही फक्त कनिष्ठ कोर्टात मान्य झाली आहे, वरिष्ठ कोर्टात मान्य होत नाही. आपण ॲड. शांताराम दातार यांची मदत घ्या, प्रा. रमेश पानसे यांची मदत घ्या, ॲड. संतोष आगरे यांना बोलवा. मराठी अभ्यास केंद्राचे श्री. दीपक पवार यांची मदत घ्या. या मंडळींनी मराठीबाबतीत कार्य केले आहे, काही विचार व्यक्त केले आहेत, त्यांच्याकडे काही योजना आहेत. परंतु, अशा मंडळींना दूर ठेवायचे, हे योग्य नाही. मराठी भाषेसंदर्भात समिती तयार केलेली आहे, त्यामध्ये बहुतांश यादी राजकीय आहे, असे तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी कबूल केले होते. एका बैठकीत त्यांनी संगितले होते की, भाषा सल्लागार मंडळातील बऱ्याच मंडळींचा संबंध या कार्याशी नाही, त्यांची राजकीय सोय म्हणून नेमणूक झाली आहे. अध्यक्ष महोदय, तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी जाहीर केले आहे. त्यांना हे सांगायला देखील काही वाटत नाही. सत्य म्हणून प्रांजळपणे सांगितले असले तरी सुधारणा करणे गरजेचे आहे. चुकीचे असेल तरी तसेच चालू ठेवायचे हे बरोबर नाही. मराठी भाषेसंदर्भात काम करणारी अनेक मंडळी आहेत, त्यांची मदत घेतली तर मराठी भाषेचा उद्धार करण्याची आपली भावना प्रामाणिक आहे, असे आम्हाला मानायला हरकत नाही. मराठी भाषा विभाग स्थापनेचा हेतू असा आहे की, राज्यभाषा मराठीच्या विकासासाठी वीज, पाणी, रस्ते आदी संसाधनांप्रमाणे हे एक सामाजिक संसाधन म्हणून सोशल इन्फ्रास्ट्रक्चर म्हणून मराठी भाषेचे नियोजन, नियंत्रण, नियमन, व्यवस्थापन करणारी, राज्यातील जनतेला उत्तरदायी अशी

**[ श्री. सुभाष देसाई ]**

कायमस्वरूपी जबाबदारी यंत्रणा प्रस्तावित करणे. परंतु, तो हेतू दूर राहिला आहे. केवळ आपल्या ४ चमच्यांची सोय लावायची, या हेतूने हे अंमलात आणले जात असेल तर ते मराठी भाषेचे दुर्दैव आहे. आज इतरही ३ विषय आहेत, त्यातील २ विषयांचा मी येथे उल्लेख करणार आहे. आपणाला फक्त मुद्दे सांगणार आहे.

अध्यक्ष महोदय, अफझलपूरकर समितीबद्दल माझे सहकारी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश महेता बोलले. २००६ साली शासनाने जीआर काढला आणि शहराप्रमाणे उपनगरातील जुन्या इमारतींतील भाडेकरूंना न्याय देण्याचे धोरण स्वीकारले. परंतु, ते धोरण फक्त कागदावर राहिले. आजतागायत त्या संदर्भातील नियम बनविलेले नाहीत, अधिकारांचा वापर केलेला नाही, काहीही केलेले नाही. त्यामुळे उपनगरात इमारती कोसळत आहेत, माणसे मरत आहेत. परंतु, त्या इमारतींचा पुनर्विकास व्हावा म्हणून शासनाने कोणतीही योजना अंमलात आणलेली नाही.

**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

अध्यक्ष महोदय, एक शासन निर्णय निर्गमित केला की, मोकळे झालो, असा सरकारचा समज आहे. याच सभागृहात डिमड् कन्व्हेन्सचे विधेयक मंजूर झाले आणि त्यानुसार कन्व्हेन्सची नोंदणी व्हावयास लागली आहे. परंतु, भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याच्या बाबतीत काही इमारतीतील लोक कमनशिबी आहेत. मुंबईमध्ये ५० हजारांहून अधिक अशा इमारती आहेत की, ज्यांना अद्याप भोगवटा प्रमाणपत्र, ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळालेले नाही. त्यामुळे त्यांना दुप्पट दराने पाणी विकत घ्यावे लागते, अडीचपट मालमत्ता कर भरावा लागतो. लोकांची होणारी ही पिळवणूक थांबविण्यासाठी शासनाने भोगवटा प्रमाणपत्राबाबतचे विधेयक या सभागृहात आणावे आणि लाखो लोकांना न्याय द्यावा, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, झोपडपट्टी योजनेमध्ये सन १९९५ च्या पूर्वीचा रहिवास पाहिजे, झोपडी जुनी पाहिजे, असा नियम आहे. आता अनेक लोकांचा आग्रह असा आहे की, बरीच वर्षे झाली आहेत, अशा ज्या लोकांनी झोपड्या विकत घेतल्या आहेत, जी खरीखुरी प्रकरणे आहेत त्यांना पात्र ठरवावे. विकसकांना फायदा करून देण्याची पळवाट न ठेवता, सन १९९५ नंतर आलेल्या लोकांनासुद्धा त्यामध्ये स्थान असावे, झोपडे १९९५ पूर्वीचे असेल, तर त्यांना सुद्धा पात्र ठरवावे, असा बदल नियमात करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, यापूर्वी मेट्रो रेल्वेबाबत बरीच चर्चा झालेली आहे. खऱ्या अर्थाने मुंबईमध्ये गरज असेल तर ती भुयारी मेट्रो रेल्वेची आहे. जमिनींवरील किंवा इलेव्हेटेड मेट्रो रेल्वे प्रकल्प सध्या मुंबईत सुरू आहेत. मुंबईमध्ये अगोदरच रस्ते अरुंद आहेत आणि त्यामध्ये मेट्रो रेल्वेचे खांब रस्ते व्यापून टाकतात. त्यामुळे या प्रकल्पाचे नियोजन चुकीचे आहे. शहरात असलेल्या रस्त्यांवर आणखी किती सुविधा निर्माण करण्याचे शासनाचे धोरण आहे, हे एकदा समजले पाहिजे. हे धोरण पूर्णपणे चुकीचे आहे. सध्या घाटकोपर-वर्सोवा मार्गाचे काम प्रगतिपथावर आहे. परंतु, येथून पुढचे सगळे मेट्रो रेल्वेचे मार्ग भुयारी असावेत, अशी आग्रहाची मागणी मी या निमित्ताने करतो.

**[ श्री. सुभाष देसाई ]**

अध्यक्ष महोदय, म्हाडा प्राधिकरणाकडे पाहिले, तर त्या कार्यालयात अनेक प्रस्ताव व अर्जांची नुसती गर्दी झालेली आहे. शेकडो फाईल्स तुंबलेल्या आहेत. म्हाडा प्राधिकरणाच्या मुंबई मंडळाकडे खूप मोठ्या प्रमाणावर काम आहे. परंतु, या मंडळातील 'मुख्याधिकारी' हे पद गेल्या अनेक दिवसांपासून रिक्त आहे. यापूर्वीचे मुख्याधिकारी गेल्यानंतर नवीन मुख्याधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आलेली नाही. त्यामुळे त्या मंडळात कोणतेही निर्णय होत नाहीत.

अध्यक्ष महोदय, म्हाडा किंवा इतर वसाहतींना सरकार जे चटईक्षेत्र मंजूर करते त्याबाबत भेदभावाची भावना आहे, असे लक्षात येते. डी. सी. रुल्सच्या कलम ३१ (५), ३१ (६), ३१ (७), ३१ (९) अन्वये वेगवेगळ्या प्रवर्गामध्ये, वेगवेगळे चटईक्षेत्र मंजूर करण्यात येत असल्यामुळे भेदभाव निर्माण होत आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था उभारणीसाठी ज्या संस्थांना सरकारी जमीन देण्यात आली आहे, त्यांना मात्र अडीच चटईक्षेत्राचा लाभ मिळू शकत नाही. याबाबत माननीय गृहनिर्माण मंत्र्यांनी विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न फार चर्चिला गेला आहे. या सरकारने त्यांना मोफत घर देण्याचे वचन दिले होते. त्याप्रमाणे गिरणी कामगारांना मोफत शक्य नसेल तर नाममात्र दराने घरे उपलब्ध करून द्यावीत, अशी माझी विनंती आहे. आतापर्यंत ७,००० घरे तयार झाली आहेत, त्याचे वाटपही होणार आहे. परंतु, त्यांना याबाबत दिलासा मिळाला नाही तर ही घरे दुसऱ्या कोणाच्या तरी घशात जातील, याचाही विचार शासनाने करावा.

अध्यक्ष महोदय, गोरेगाव या माझ्या मतदारसंघामध्ये पत्राचाळ नावाची सगळ्यात जुनी किंवा सगळ्यात जास्त जुनी चाळ आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. या चाळीच्या विकासाचे काम सुरू आहे. या चाळीचा विकास १० एकर क्षेत्रामध्ये होत असताना ४० एकर जमीन म्हाडाने विकसकाला का दिली ? या प्रश्नाचे काहीही उत्तर मिळू शकत नाही. ही अतिरिक्त जमीन करारान्वये ज्यांना मिळाली आहे, त्यांनी ती इतर विकसकांना तुकडे करून वाटून टाकली आहे आणि प्रत्येक विकसक आता वसुलीच्या मागे लागलेला आहे. जे गुंतवणूक करतात, ते वसूल करणार, हे बरोबर आहे. हे जरी खरे असले तरी मुळ पत्राचाळीतील ६७२ रहिवाश्यांसाठी बांधावयाच्या घरांचे काम अगदी कासवाच्या गतीने सुरू आहे. त्यामध्ये फारशी प्रगती नाही. परंतु, विक्रीयोग्य टॉवर्सचे काम मात्र जोरात सुरू आहे. त्या ठिकाणी स्थानिक रहिवासी गेल्या ६० वर्षांपासून राहात आहेत. ते लोक तेथून घरे सोडून गेलेले आहेत, त्यामुळे आमची घरे आम्हाला परत मिळतील की नाही, अशा प्रकारची भीती त्यांच्या मनामध्ये उभी राहिलेली आहे. याबद्दल म्हाडातर्फे स्पष्टीकरण होण्याची गरज आहे. म्हाडातर्फे अभिन्यास मंजूर झालेले नाहीत. एकीकडे शासन सवलती जाहीर करते, परंतु कृती मात्र करायला वेळ नाही. ज्या गोष्टींची अंमलबजावणी करणे आवश्यक होते, ती केली गेलेली नाही. त्यामुळे शासनाने दिलेली आश्वासने ही कागदोपत्री न राहता ती प्रत्यक्षात उतरावीत, अशा प्रकारचे धडक पाऊल हे शासन उचलेल, अशी किमान एवढी अपेक्षा करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

**श्री. संजय सावकारे** (भुसावळ) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील सामान्य प्रशासन विभाग, नगर विकास विभाग, गृहनिर्माण विभाग आणि मराठी भाषा विभागाच्या अनुदानाच्या मागण्यावर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात आम्ही या विषयावर चर्चा केली होती. 'अ' वर्ग नगरपालिकेचे बजेट अतिशय कमी असते. तेथील लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्र यांचा विचार केला तर जवळपास 'ड' वर्ग महानगरपालिकेच्या आसपास 'अ' वर्ग महागनरपालिकेचे कामकाज असते. 'ड' वर्ग महानगरपालिका आणि 'अ' वर्ग महानगरपालिका यांच्या बजेटमध्ये खूप मोठा फरक असतो. 'अ' वर्ग नगरपालिकेचे बजेटमध्ये वाढ करण्यात यावी, अशा प्रकारची मागणी करण्यात आली होती परंतु ती वाढ अद्याप करण्यात आलेली नाही. 'अ' वर्ग नगरपालिकेचे कामकाज वाढत आहे. तेथील क्षेत्रफळ वाढत आहे, त्यामुळे त्या क्षेत्रातील लोकांना इन्फ्रास्ट्रक्चरच्या सुविधा कमी पडत आहेत, ही वस्तुस्थिती कोणीही नाकारून चालणार नाही.

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य अतिशय महत्त्वाच्या विभागाच्या मागण्यांवर चर्चा करीत आहेत, परंतु सभागृहात नगर विकास खात्याचे मंत्री उपस्थित दिसत नाहीत. ही बाब शासनाने अतिशय गंभीरतेने घेतली पाहिजे. आठवड्यातून एक दिवस तारांकित प्रश्न असतात, अर्थसंकल्पीय अधिवेशनात आठवडयातून एक दिवस नगर विकास विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा असते, त्यामुळे संबंधित खात्याच्या माननीय मंत्री महोदयांनी उपस्थित राहण्याची आवश्यकता आहे. 'अ' वर्ग  महानगरपालिकांमध्ये ५० टक्के ऑर्गनायझेशन झाले आहे. संबंधित खात्याचे मंत्री सभागृहात उपस्थित नसतील तर त्यांना आपण काहीतरी शिक्षा केली पाहिजे.

**उपाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, वरिष्ठ माननीय मंत्री महोदय सन्माननीय सदस्य उपस्थित करीत असलेल्या मुद्द्यांची नोंद घेत आहेत.

**श्री. संजय सावकारे :** अध्यक्ष महोदय, नगरपालिकेला २१ मीटरपर्यंत बांधकाम करण्याची परवानगी देण्याबाबत अधिकार आहेत...(अडथळा).... अध्यक्ष महोदय, नोंदी कोण घेत आहेत, तेवढाच आपण कृपया खुलासा करावा.

**श्री. जयदत्त क्षीरसागर :** अध्यक्ष महोदय, नगरविकास खात्याच्या मागण्यांसंबंधीच्या चर्चेसंबंधी सर्वांच्या मुद्द्यांची नोंद घेण्यात येत आहे. .....(अडथळा) ...... आम्ही काय नोंदी घेतल्या. त्या आपणांस सांगण्याची आवश्यकता नाही. सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत, त्याची समर्पक उत्तरे निश्चितपणे मिळतील. सन्माननीय सदस्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न निश्चितपणे करण्यात येईल.

**उपाध्यक्ष :** माननीय मंत्री महोदयांना बोलावून घेण्यात यावे.

**श्री. रवींद्र वायकर :** अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय येतील तोपर्यंत सभागृहाची बैठक दहा मिनिटांसाठी स्थगित करण्यात यावी.

**श्री. गिरीश बापट :** अध्यक्ष महोदय,तीन लाख लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी सभागृहात आपले विचार मांडत आहेत. विषयाची नोंद घेण्यास नगर विकास खात्याचे मंत्री महोदय किंवा राज्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत. शासन गंभीर नाही. अध्यक्ष महोदयांनी याबाबत मंत्री महोदयांना निर्देश दिले पाहिजेत. मंत्री महोदय येतील तोपर्यंत सभागृहाची बैठक अर्ध्या तासासाठी स्थगित करण्यात यावी.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात)

**उपाध्यक्ष :** सभागृहाची बैठक मी दहा मिनिटांसाठी स्थगित करतो.

**(सभागृहाची बैठक ७.११ वाजता दहा मिनिटांसाठी स्थगित झाली)**

**(स्थगितीनंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

**श्री. संजय सावकारे :** अध्यक्ष महोदय, इमारतीच्या २१ मजल्यापर्यंतची परवानगी असिस्टंट डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग देत असतात आणि २१ मजल्यांपेक्षा जास्त मजल्यांची परवानगी डिव्हीजनल डायरेक्टर देत असतात. वास्तविक पाहता संपूर्ण प्रकरणाची छाननी करणे, त्याचे असेसमेंट करणे, कॅल्क्युलेशन करणे ही सर्व कामे अॅडिशनल डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग करीत असतात. केवळ शिक्के मारण्यासाठी डिव्हीजनल डायरेक्टरकडे फाईल पाठविण्यात येते. माझी अशी विनंती आहे की, असिस्टंड डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग यांना २१ मजल्यांपेक्षा जास्त बांधकामास परवानगी देण्याचे अधिकार देण्यात यावेत. माझ्या माहिती प्रमाणे शासनाने असे परिपत्रक काढले होते. परंतु त्याची अंमलबजावणी अजून होत नाही. शासनाने त्या परिपत्रकाची अंमलबजावणी करण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, "अ" वर्ग नगरपालिकांमध्ये स्टाफ कमी आहे. "अ" वर्ग नगरपालिकेतील स्टाफ वाढविण्याची आवश्यकता आहे. तसेच, नगरपालिकेतील अभियंत्यांना तांत्रिक अधिकार प्रदान केले पाहिजेत. टाऊन प्लॅनिंगच्या नकाशांची मंजुरी असेल, डेव्हलपमेंट प्लॅन असतील यासाठी नगरपालिकेचे जे टाऊन प्लॅनर आहेत त्यांना अधिकार दिले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, मध्यंतरी नगरपालिकांना २० टक्के सांडपाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक करण्यात आले होते आणि शासनाने तसा आदेश काढला होता. " ड " वर्ग नगरपालिकेचा त्यामध्ये समावेश करण्यात आला होता. परंतु अजून ही योजना प्रत्यक्षात आलेली नाही. शासनाने पुढाकार घेऊन २० टक्के सांडपाण्याचा पुनर्वापर कसा करता येईल यासंदर्भात धोरण ठरविले पाहिजे आणि महानगरपालिका, नगरपालिकांना २० टक्के सांडपाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक केले पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, भुसावळ नगरपालिकेची इमारत १५० वर्षापुर्वीची आहे. मी पुर्वीसुद्धा भुसावळ नगरपालिकेच्या इमारतीच्या बांधकामासाठी निधीची मागणी केली होती. ती मागणी शासनाने मान्य करावी, अशी माझी विनंती आहे.

**[ श्री. संजय सावकारे ]**

अध्यक्ष महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो की, भुसावळमध्ये नुकतेच पोलिसांच्या संरक्षणामध्ये एक अतिक्रमण पाडण्यात आलेले आहे. हे अतिक्रमण पाडत असताना जे पोलीस तेथे हजर होते त्यांनी शासकीय अधिकाऱ्यांवर दरोड्याचे गुन्ह दाखल केलेले आहेत. शासनाने या प्रकरणाची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**उपाध्यक्ष :** आता सन्माननीय सदस्य श्री. धैर्यशील पाटील यांनी आपले भाषण सुरू करावे.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे** (पाटील) **:** अध्यक्ष महोदय, माझी अशी विनंती आहे की, आपण रोटेशनकडे लक्ष दिले पाहिजे. सन्माननीय सदस्यांच्या संख्येनुसार रोटेशन आले पाहिजे. भारतीय जनता पक्षाचे ४६ सन्माननीय सदस्य आहेत. आमच्या पक्षाचे फक्त दोनच सन्मानीय सदस्य मागण्यांवर बोललेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.धैर्यशील पाटील यांना आपण बोलू द्यावे. ज्या पक्षाचे ७ सन्माननीय सदस्य आहेत त्या पक्षाचे सुद्धा दोन सन्माननीय सदस्य बोललेले आहेत.

**उपाध्यक्ष :** माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) साहेब मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण अपक्षांसह सर्व पक्षाला वेळ ठरवून दिलेला आहे.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे** (पाटील) : अध्यक्ष महोदय, आपण अपक्षांसह वेळ ठरवून दिलेला असेल तर सत्ताधारी पक्षाला अर्धा वेळ आणि विरोधी पक्षाला अर्धा वेळ असे करू नका.

**उपाध्यक्ष :** आपण जरी वेळ ठरवून दिलेला असला तरी मी प्रत्येक सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी वेळ वाढवून देत आहे.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे** (पाटील) **:** अध्यक्ष महोदय, भारतीय जनता पक्षाचे ४६ सदस्य असतांना आमच्या पक्षाचे फक्त दोन सन्माननीय सदस्य मागण्यांवर बोललेले आहेत. परंतु काही पक्षाचे ७ सदस्य असताना त्यांच्या २ सदस्यांनी भाषणे केली. याबाबत कोठे तरी विचार होणे आवश्यक आहे. पूर्वी पक्षाच्या संख्येनुसार रोटेशन केले जात होते. परंतु आता आपण पक्षनिहाय रोटेशन केल्यास अपक्ष पक्षाच्या सदस्यांनी भाषण केल्यानंतर आमच्या पक्षाच्या सदस्यांना दहाव्या क्रमांकावर बोलण्यासाठी संधी मिळेन. याबाबत आपल्या दालनात चर्चा करून यासंबंधी व्यवस्थितपणे रचना करणे गरजेचे आहे.

**उपाध्यक्ष :** ही बाब पुन्हा तपासून घेऊ व त्यानुसार कामकाज करू.

**श्री. रवींद्र वायकर :** अध्यक्ष महोदय, आमच्या पक्षाचे फक्त एक सन्माननीय सदस्य बोलले आहेत.

**श्री. बाळा नांदगावकर :** अध्यक्ष महोदय, आमच्या पक्षाचे आतापर्यंत फक्त एक सन्माननीय सदस्य बोलले आहेत.

(अडथळा)

**उपाध्यक्ष :** प्रत्येक पक्षाचे २-२ सन्माननीय सदस्य बोलले आहेत. मी सर्वांना योग्य वेळी बोलण्याची संधी देत आहे.

(अडथळा)

**श्री. धैर्यशील पाटील :** अध्यक्ष महोदय, या चर्चेसाठी ६ तासांचा वेळ ठरवून दिला होता. यासंबंधी प्रथम माननीय अध्यक्षांनी या चर्चेसाठी तीन तासांचा वेळ असल्याचे सांगितले होते. त्यावर माननीय विरोधी पक्षनेते श्री.एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) यांनी तीन तासांमध्ये चर्चा होणे शक्य नसल्यामुळे चर्चेची वेळ वाढवून देण्यासंबंधी माननीय अध्यक्षांकडे विनंती केली होती. चर्चेसाठी वेळ ठरवून दिल्यानंतर, त्यानुसार वेळेत चर्चा होणे गरजेचे आहे. अध्यक्ष महोदय, मी सुरूवातीला सांगितले की, सर्वप्रथम चर्चेसाठी वेळ ठरवून घ्यावा. त्यावर आपण सांगितले होते की, रात्री सव्वाआठ वाजेपर्यंत यासंबंधी चर्चा होईल व त्यानंतर माननीय मंत्री महोदयांचा रिप्लाय होईन.

**श्री. बाळा नांदगावकर :** अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्हाला जनतेने येथे निवडून पाठविले आहे. अध्यक्ष महोदय, शासनाने अर्थसंकल्पाच्या अनुदानाच्या मागण्यांवर महत्त्वाच्या ४-४ विभागांवरील चर्चा एकाच दिवशी ठेवल्यास आम्ही त्यावर चर्चा कशी करायची ? आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविलेले चारही विभाग आमच्यासाठी अतिशय जिव्हाळ्याचे आहेत, महत्त्वाचे आहेत. परंतु या ठिकाणी आम्हाला असे सांगितले जात आहे की, आपले म्हणणे थोडक्यात मांडावे. ही बाब कशी शक्य आहे ? अध्यक्ष महोदय, आपण आमच्या भावनांशी खेळत आहात. माझी आपल्याला विनंती आहे की, यासंबंधी आमच्यावर वेळेचे बंधन घालू नये. या संदर्भात प्रत्येक सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. आम्ही सभागृहात सकाळपासून बसलेलो आहोत. अध्यक्ष महोदय, आपण सकाळी जेव्हा सभागृहाचे कामकाज सुरू करता, तेव्हा सकाळी ९.३० किंवा १०.०० वाजलेले असोत, तेव्हा पासून आम्ही सभागृहात उपस्थित असतो.

(अडथळा)

**उपाध्यक्ष :** यासंबंधी आपणच नियम ठरवलेले आहेत....

**श्री. हर्षवर्धन पाटील :** अध्यक्ष महोदय, यात सभागृहाचा वेळ वाया जाता कामा नये. अध्यक्ष महोदय, दुपारी पावणेतीन वाजता अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेला सुरूवात केली. माननीय अध्यक्षांनी या चर्चेसाठी ६ तासांची वेळ ठरवून दिली होती. त्या अनुषंगाने आपल्या माध्यमातून नियोजन होणे गरजेचे आहे. तसेच ज्या सन्माननीय सदस्यांना मुद्दे मांडायचे आहेत ते त्यांनी अतिशय थोडक्यात मांडले पाहिजेत. चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला पाहिजे, त्यावर त्यांनी बोलले पाहिजे, याबाबत आमचा विरोध नाही. अध्यक्ष महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, या चर्चेत जे सन्माननीय सदस्य भाग घेणार आहेत, त्यांना आपण मुद्देसूद बोलण्यासंबंधी सूचना कराव्यात. ही चर्चा वेळेमध्ये पूर्ण करावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**श्री. विजयराज शिंदे :** अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण चर्चेचे दिवस वाढवून द्यावेत.

**उपाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांच्या एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपले शासन सत्तेवर असताना देखील एकाच दिवशी अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर ४-५ विषय येत असत. सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्याला न्याय देण्याची शासनाची भूमिका आहे. परंतु एकही सदस्य ठरवून दिलेल्या वेळेत बोलत नाही, सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा दुप्पट वेळ घेतात. तरी सुद्धा मी सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी वेळ देण्याचा प्रयत्न करीत आहे. सभागृहात ज्यावेळी सदस्याचे नाव पुकारले जाते त्यावेळी संबंधित सदस्य सभागृहात अनुपस्थित असतात. नंतर ते सदस्य सभागृहात आल्यानंतर त्यांचे नाव पुकारण्यासंबंधी पीठासीन अधिकाऱ्यांकडे विनंती करतात. नियमानुसार चर्चेसाठी सहा तासांची वेळ आहे. सदर वेळेत आपण चर्चा संपवू या. आता सन्माननीय सदस्य श्री. धैर्यशील पाटील यांनी त्यांच्या भाषणाला सुरूवात करावी.

**श्री. धैर्यशील पाटील** (पेण) : अध्यक्ष महोदय, मी सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी नगरविकास विभागासंबंधी सांगू इच्छितो की, केंद्र शासन पुरस्कृत असलेल्या युआयडीएसएसएमटी योजनेतंर्गत लहान व मोठ्या शहरांना पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनेक योजना घेतल्या जातात. पेण नगरपालिकेसाठी अशाच प्रकारची १२ कोटी रुपयांची योजना घेण्यात आली. या योजनेचा मोठ्या प्रमाणात शुभांरभ करण्यात आला. त्यावेळी माननीय मंत्री महोदय व मान्यवर आले होते. अशा प्रकारे मोठ्या जल्लोषात ही योजना सुरू करण्यात आली. त्या योजनेतंर्गत पेण नगरपालिकेच्या नावे ५.१८ कोटी रुपयांचा पहिला हफ्ता ॲक्सिस बँकेत जमा करण्यात आला होता. परंतु नगरसेवकांनी असे ठरविले की, सदर रक्कम ॲक्सिस बँकेत जमा करण्याऐवजी अर्बन को.ऑप.बँकेत जमा करू. त्यांच्या कृतीला पेण नगरपालिकेच्या सीओ यांनी लेखी विरोध केला होता. परंतु त्या विरोधाला न जुमानता बहुमताच्या जोरावर ५.१८ कोटी रुपयांची रक्कम ॲक्सिस बँकेतून काढून अर्बन को.ऑप.बँकेत जमा करण्यात आला. अर्बन बँकेत ५ कोटी टाकल्यानंतर आरबीआयने बँकिग करू नका अशा प्रकारचे निर्बंध घातले. त्या बँकेचे सर्वेसर्वा श्री. धारकर यांना केंद्र शासनाच्या महामंडळात ८०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याबद्दल पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यानंतर ज्या बँकेचे ६०० कोटी रुपयांचे डिपॉझिट आहे, त्या ठिकाणी ऑडिट करण्याचे राज्य शासनाने ठरविल्यानंतर ५९३ कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीस आला होता. बँकेतील झालेल्या घोटाळ्यामुळे सर्वसामान्य आणि संस्थांचे पैसे बुडाले होते.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने काही कोटी रुपयांचे अनुदान नगरपालिकेच्या ताब्यात दिले होते. त्यांनी ते अनुदान राष्ट्रीयकृत बँकेत किंवा एक्सेस बॅकेतच ठेवायला पाहिजे होते. परंतु नगरसेवक आणि संचालकांच्या संगनमतामुळे ते अनुदान दुसऱ्या बँकेत जमा केल्यामुळे ती बँक आता डबघाईला आलेली आहे. त्या बँकेतील सर्व संचालक आणि नगरपालिकेतील सर्व नगरसेवक हे विशिष्ट पक्षाचे होते. कल्याणकारी राज्यात जे दोन पक्ष आहेत त्यापैकी एक पक्षात ही सर्व मंडळी होती. घोटाळा झाल्यानंतर त्या लोकांना वाटले की, ती मंडळी आपल्याला संरक्षण देऊ शकणार नाही. म्हणून अर्धी मंडळी तिकडे आणि अर्धी मंडळी इकडे गेली होती. कोण कुठे गेले याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. कराच्या रुपाने गोरगरिबांकडून पैसे गोळा केले जातात. त्या माध्यमातून सुखसुविधा भारतातील जनतेला मिळत

**[ श्री. धैर्यशील पाटील ]**

असतात. कराच्या रुपाने गोळा होणारे पैसे चुकीच्या कार्यप्रणालीमुळे धोक्यात आलेले आहेत. संबंधित नगरसेवकांवर काय करायचे हा प्रश्न मी मंत्री महोदयांना विचारणार नाही. त्या प्रश्नाशी मला काही देणे-घेणे नाही. परंतु आज पेणमधील पिण्याच्या पाण्याची योजना धोक्यात आलेली आहे. त्याचे काय करणार याचे मला शासनाने उत्तर दिले पाहिजे. त्या ठिकाणी फक्त २० टक्केच काम झालेले आहे. पेणमधील जनतेला पाणी मिळणार आहे की नाही ? पाणी मिळणार नसेल तर त्याची जबाबदारी शासन घेणार आहे काय, किंवा ती जबाबदारी दुसऱ्या कोणावर फिक्स केली जाणार ? या सर्व प्रश्नांची उत्तरे मला मिळाली पाहिजेत अशी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे. मतदारसंघातील लोक सांगतात की, विधान सभेत गेल्यानंतर तुम्ही या प्रश्नाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. चुकीच्या पध्दतीने ठेवी ठेवल्यामुळे त्या आज मिळतील की नाही याची मला माहिती नाही. परंतु आमच्या हक्काचे पाणी आम्हाला मिळालेच पाहिजे. हे पाणी मिळण्याकरिता शासन कोणती कार्यवाही करणार, याचे उत्तर मला मिळाले पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण या ठिकाणी थांबवितो.

**श्री. जयकुमार गोरे :** अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. सार्वभौम सभागृहामध्ये एकूण २८ अपक्ष सन्माननीय सदस्य आहेत. संसदीय कार्य मंत्र्यांनी बोलाविलेल्या बैठकीला सर्व गटनेते हजर असतात. सदर बैठकीत झालेल्या निर्णयाची माहिती अपक्ष सन्माननीय सदस्यांना दिली जात नाही, ही खरी वस्तुस्थिती आहे. सभागृहात पुरवणी मागण्यांवर भाषण करण्यासाठी आम्हाला किती वेळ दिलेला आहे, त्याची माहिती आम्हाला दिलेली नाही.

**उपाध्यक्ष :** पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी अपक्ष सन्माननीय सदस्यांना जास्त वेळ दिलेला आहे. एकूण चार अपक्ष सन्माननीय सदस्यांची भाषणे झालेली आहेत, याची त्यांनी नोंद घ्यावी.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**श्री. जयकुमार गोरे :** अध्यक्ष महोदय, ज्यावेळी गट नेत्यांची बैठक माननीय अध्यक्षांच्या दालनात आयोजित केली जाते, त्यावेळी अपक्षांच्या एका प्रतिनिधीला बोलाविले पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

**उपाध्यक्ष :** हा विषय मी माननीय अध्यक्षांना अवगत करतो. कृपया सन्माननीय सदस्यांनी याची नोंद घ्यावी.

**श्री. बाळा नांदगावकर** (शिवडी) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. आज चार महत्त्वाच्या विभागांवर चर्चा होणार आहे. हे सर्वच विभाग महत्वाचे असल्यामुळे सर्वच सन्माननीय सदस्यांना त्यावर बोलावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय,मी या ठिकाणी प्रामुख्याने मराठी भाषा विभागाच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. मराठी भाषा विभाग हा अत्यंत महत्वाचा विभाग आहे. या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांची बाहेर बैठक सुरू आहे. एकूणच शासनाला जनतेचे प्रश्न सोडविण्याची किती इच्छा शक्ती आहे, हे यातून दिसून येत आहे. आता मुख्यमंत्री महोदय सभागृहात आले आहेत. मुख्यमंत्री महोदय आम्हाला थोडेसे प्रामाणिक वाटतात. ते काही तरी करतील, अशी आमची भावना आहे. इतरांबद्दल मी काहीच

**[ श्री. बाळा नांदगावकर ]**

बोलत नाही. त्यामुळे मराठी भाषेला चांगले दिवस येतील, अशी आम्हाला अपेक्षा आहे. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी १० मे रोजी मराठी भाषा विभागाची स्थापना केली व त्या करिता १० कोटी रुपयांची तरतूद करण्याचा विभागाने निर्णय घेतला होता. आता माननीय श्री. अशोक चव्हाण गेले व माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण आले. त्यांनी आपल्या पहिल्याच पत्रकार परिषदेमध्ये शासन मराठी भाषेला किती प्राधान्य देणार आहे, हे दाखवून दिले. मला वाटले की, अता खरोखरच मराठी भाषेला चांगले दिवस येणार. मात्र दुर्दैवाने मला सांगावे लागत आहे की, मराठी भाषा विभाग स्थापन झाला. मात्र त्याकरिता शासनाकडून बजेटरी प्रोव्हीजन करण्यात आली नाही. शासनाने जाहीर केल्याप्रमाणे १० कोटी रुपये तरी दिले आहेत की नाही, हे मला माहीत नाही.

अध्यक्ष महोदय, तामिळनाडू सरकाने त्यांच्या भाषेतील संमेलनासाठी ३१५ कोटी रुपयांची तरतूद केली. आम्ही आमच्या भाषेकरिता वेगळा विभाग तयार केला आहे. मात्र त्याकरिता निधी दिलेला नाही. आता कुठे त्याकरिता स्टाफ दिला आहे. शासनाने विश्वकोष निर्मिती मंडळ निर्माण केले. मात्र त्या विभागाला पूर्ण वेळ सचिव उपलब्ध नाही. पु.ल.देशपांडे यांच्या नावाने अकादमी सुरू केली. मात्र त्याकरिता पूर्णवेळ संचालक नाहीत. ही काय परिस्थिती आहे ? राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राजन वेळुकर हे मराठी भाषिक आहेत. तरी देखील तेथील कामकाज मराठीत होत नाही. तसेच न्यायालयांमध्ये देखील मराठी भाषेत कामकाज होत नाही. आमच्या वाहनांवरील क्रमांक मराठीत लिहिले तर आम्हाला दंड लावला जातो. मात्र इतर राज्यांमध्ये वाहनांवरील नंबर प्लेट मातृभाषेत असतात. या संदर्भात शासनाने केंद्र शासनाकडे सन २००७ मध्ये प्रस्ताव पाठविला आहे. मात्र त्या प्रस्तावाच्या बाबत कोणीही पाठपुरावा करीत नाही.

अध्यक्ष महोदय, दिल्लीमध्ये महाराष्ट्र सदन आहे. मात्र तेथे मराठी भाषिक कर्मचारी फार कमी आहेत. तेथे केवळ २६ टक्के कर्मचारी मराठी आहेत. मात्र परिस्थिती अशी आहे की, ते कर्मचारीदेखील मराठी भाषा बोलत नाही. ते हिंदी भाषा बोलतात. सन्माननीय सदस्या श्रीमती मिनाक्षी पाटील यांचे भाषण त्यांनी ऐकले तर ते लोक मराठी भाषा चांगल्या प्रकारे बोलतील, अशी माझी अपेक्षा आहे. मराठी भाषेच्या संदर्भात सर्वांच्या भावना तीव्र आहेत. राज्यात मराठी भाषा अभ्यास केंद्र आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांना भेटून काही अभ्यास केंद्रांनी सूचना केल्या होत्या. बजेटमध्ये काही प्रोव्हिज करा म्हणून सांगितले होते. त्यांनी केलेल्या सूचनांमध्ये यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये मराठी भाषा विभागासाठी ३०० कोटी रुपयांची तरतूद करावी, असे म्हटले होते. परंतु, ३० कोटी रुपयांची तरी त्यासाठी तरतूद केली गेली का ? मराठी भाषा विभागासाठी एक राज्यमंत्री व पूर्ण वेळ सचिवांची नियुक्ती करावी असे बोलले गेले. परंतु, काही केलेले दिसत नाही. याबाबत सरकारला खरच काही तरी करण्याची इच्छाशक्ती आहे का ? सरकारला या भाषेविषयी संवेदनशीलता आहे का ? ज्या मराठी राज्यामध्ये आपण राज्यकर्ते म्हणून काम करतो, तेथील मराठी भाषिकांना खऱ्या अर्थाने सन्मान दिला पाहिजे या विषयावर बरेच सन्माननीय सदस्य बोलले आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयावर अत्यंत गांभीर्यपूर्वक लक्ष घालण्याची आवश्यकता आहे.

**[ श्री. बाळा नांदगावकर ]**

आम्ही गिरणगावातील आमदार आहोत. मी सातत्याने या सदनामध्ये गिरणगाव व गिरणी कामगारांच्या प्रश्नांविषयी बोलत असतो. माननीय गृहनिर्माण मंत्री येथे आहेत. ६८ हजार गिरणी कामगारांना आम्ही घरे देऊ, पहिल्या टप्प्यातील ६ हजार घरे तयार आहेत असे बोलले गेले. भाऊ तुम्ही तुमच्या सदसद्विवेकबुद्धीला स्मरून, छातीवर हात ठेऊन सांगा की, हा गिरणी कामगार साडेआठ लाख रुपये घराची किंमत देऊ शकतो का ? आपण जर म्हणालात, की तो देऊ शकतो तर मी त्यावर एकही शब्द बोलणार नाही. या गिरणी कामगारांना तुम्ही काय पैसे मिळवून दिले. गिरणी कामगारांनी याबाबत मोर्चे काढले, माननीय मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यावर ते घुसले, ते काही त्यांना आंदोलने करण्याची हौस होती म्हणून नाही. ते जेलमध्येही गेले. ते म्हणतात हे घर आम्हाला फुकट नको. किती रुपयांत ते हे घर घेऊ शकतात, याची त्यांनी एक आकडेवारी दिलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांकडे मी ती मुद्दाम पाठविणार आहे. जर तुम्ही जे मागासभागामध्ये जाणारे उद्योगपती आहेत, त्यांना विविध करसवलती देता तर हे घर घेण्यासाठी जे विविध कर लावले आहेत, त्या करांमध्ये सवलत दिली पाहिजे व त्यांच्या ताकदीप्रमाणे त्यांना दीड-दोन लाखांपर्यंत घर दिले तर मला पूर्ण खात्री आहे की, हे गिरणी कामगार तुम्हाला निश्चितपणे दुवा देतील.

अध्यक्ष महाराज, या सभागृहात सातत्याने बोलले गेले की, पोलीस कर्मचारी व शासकीय कर्मचारी मग ते बीडीडी, बीआयटी चाळीत राहणारे असोत, ते रात्रीचा दिवस करून सरकारची सेवा करीत असतात. आमची विनंती एवढीच आहे की, सरकारने सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना घर देण्याची भूमिका घेतली पाहिजे. ते घरे मालकीहक्काने मागत आहेत. आपण जर मालकीहक्काने ही घरे देऊ शकत नसाल, तर त्यांना भूखंड द्या त्या भूखंडावर ते घरे बांधतील, त्याचे आपल्याला काही नॉमिनल पैसे घ्यायचे असतील, ते घ्या. पण त्या बाबतीतही सरकार कुठलेही धोरण ठरवित नाही किंवा कुठेतरी शासकीय कर्मचाऱ्यांना, पोलीस कर्मचाऱ्यांना मालकीहक्काने घरे देण्याबाबत काहीतरी निर्णय घ्यावा, याबाबतीत शासनाची काही भूमिका दिसत नाही.

अध्यक्ष महाराज, चारकोप येथे जवळजवळ ४०-४० वर्षांपासून राहणारी १०० टक्के मराठी असणारी जवळपास ५० हजार कुटुंबे आहेत. त्यांनी ४०-५० वर्षांपूर्वी जे काही वाढीव बांधकाम केलेले आहे, त्याला तुमच्या म्हाडाने नोटिसा पाठविल्या आहेत. आपल्याला मी याबाबतची माहिती देतो. इतक्या वर्षांपासून राहणाऱ्या लोकांना अशाप्रकारे नोटिसा पाठवून उद्ध्वस्त केले जाणार आहे काय ? कोणाचे कोण येथे येऊन इलिगली घरे बांधतात आणि ज्यांचे पूर्ण आयुष्य येथे गेले, त्यांच्या बाबतीत शासन विचार करणार आहे की नाही ? या सदनामध्ये मागच्या वेळी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी भ्रष्टाचाराची ३३ प्रकरणे दिली.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जैन यांनी अत्यंत स्पष्ट शब्दात या विषयावर आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. तशाच प्रकारच्या आमच्या देखील भावना आहेत. कोणतीही डेव्हलपमेंट ही पुढील ५०-१०० वर्षे डोळ्यासमोर ठेवून करण्यात आली पाहिजे. मला असे वाटते की, माननीय मुख्यमंत्री या संदर्भात लॉग टर्म प्लॅनिंग धोरण आखतील. कारण आज मोठ्या प्रमाणावर खेड्यातून लोक शहराकडे धाव घेत आहेत. तेव्हा पुढील ५०-१०० वर्षांचे प्लॅनिंग डोळ्यासमोर ठेवून डेव्हलपमेंट केली पाहिजे.

**[ श्री. बाळा नांदगावकर ]**

अध्यक्ष महाराज, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी नागपूरच्या अधिवेशनात मुंबई महानगरपालिकेने तीन वर्षांचा आर्थिक ताळेबंद दिला नव्हता म्हणून चौकशी लावली होती. त्यासाठी आयुक्तांची बदली करण्यात आली. नवीन आयुक्तांनी सांगितले की, आता जो ताळेबंद करण्यात आलेला तो मागील तरतुदींप्रमाणे केलेला आहे. या संदर्भात नक्की चौकशी झाली किंवा कसे याचे उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, मुंबई शहरावर दिवसेंदिवस परराज्यातील लोंढ्याचा ताण वाढत आहे. या लोढ्यांना कधीतरी आवर घालणार आहात की नाही ? जे मूळ मुंबईकर आहेत त्यांना सुविधा पुरविता येत नाहीत. या संदर्भात सरकार निर्णय घेणार नाहीच काय ?

अध्यक्ष महाराज, या सभागृहात " ओन्ली विमल " संदर्भात चर्चा झाली. या " ओन्ली विमलची " चौकशी झाली की नाही ? त्यांना जो भूखंड दिला होता, त्याचे पुढे काय झाले ? या संदर्भात माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत की नाही ?

अध्यक्ष महाराज, आपण ५०० एकर जमीन हिरानंदानीला दिली. या संदर्भात मी एक रुपयाची कपात सूचना दिली होती. त्यांनी बोगस दस्ताऐवज दाखवून आदिवासींची जमीन हडप केली. ज्या दुर्बल आणि मध्यम घटकांसाठी घरे बांधावयाची होती, ती घरे त्यांनी बांधलीच नाही. त्याचे पुढे काय झाले ? त्या संदर्भात सदनामध्ये चर्चा होतच नाही. आपण या सदनामध्ये नेमके काय करतो, याची माहिती जनतेला देणार आहात की नाही ?

अध्यक्ष महाराज, ज्येष्ठ नागरिकांच्या अनेक समस्या आहेत. त्यांच्या काही मागण्या आहेत, ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेली वयोमर्यादा ६५ ऐवजी ६० वर्षांची करावी अशी त्यांची मागणी आहे. बेस्टमध्ये त्यांना हाफ तिकीट ठेवण्याची मागणी केलेली आहे. ज्येष्ठ नागरिकांना पेन्शन योजना सुरू करावी. हृदय शस्त्रक्रिया, किडनी रोपण शस्त्रक्रियेसाठी सवलत देण्यासाठी मागणी केलेली आहे. तेव्हा आपण त्यांच्या मागण्यांचा विचार करावा अशी विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, केंद्र शासनातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरून ६० वर्षे करण्याचा निर्णय झाला. १७ राज्यांमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्यात आलेले आहे. तेव्हा आपल्या राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरून ६० वर्षे करावे अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महाराज, ज्या गिरणीच्या जागेवर डेव्हलपमेंट होते, त्या ठिकाणी गिरणी कामगारांच्या मुलांना नोकरीत सामावून घेऊ अशा प्रकारचा निर्णय झाला, जो शासन निर्णय काढण्यात आला, त्यामध्ये ही बाब बंधनकारक करायला पाहिजे. परंतु, शासन निर्णयामध्ये तसे काहीही नाही. माननीय मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, संबंधिताला नोकरी देण्याबाबत बंधनकारक करणे अत्यंत गरजेचे आहे. माननीय मुख्यमंत्री या संदर्भात योग्य निर्णय घेऊन गिरणी कामगारांना न्याय देतील, अशी मी अपेक्षा बाळगतो.

**[ श्री. बाळा नांदगावकर ]**

शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सहानुभूतिपूर्वक भूमिका घ्यावी. पोलीस कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सुद्धा सहानुभूतिची भूमिका ठेवावी, एवढीच माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो. माननीय मुख्यमंत्री उत्तराच्या भाषणात आमच्या कर्मचाऱ्यांच्या पदरात निश्चितपणे काही तरी टाकतील, अशी भावना व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद !

---

**महाराष्ट्र विधासभा नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावाबाबत**

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** अध्यक्ष महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेवर, राज्यातील पर्यावरणाचा प्रदुषणामुळे ऱ्हास होत असल्याबाबतच्या अतिशय महत्त्वाच्या विषयावर म. वि. स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव आहे. कृपया सदर प्रस्ताव आपण उद्या घ्यावा.

**डॉ. पतंगराव कदम :** अध्यक्ष महोदय, माझी काहीही हरकत नाही. आपण सदर प्रस्ताव उद्या सकाळी १०.०० वाजता घ्यावा. विरोधी पक्षाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य व भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या विनंतीस माझी संमती आहे.

**श्री. सुनील केदार :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी म. वि. स. नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावाबाबत जे म्हणणे मांडले आहे, त्या संदर्भात आपले रूलिंग काय आहे ? सदर प्रस्तावात माझे देखील नाव आहे.

**श्री. बाळासाहेब थोरात :** अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी या संदर्भात सांगितले आहे.

**उपाध्यक्ष :** ठीक आहे.

**श्री. गिरीश बापट :** अध्यक्ष महोदय, सभागृह सकाळी ११.०० च्या अगोदर सुरू करायचे नाही, असे कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरले आहे. आपण आता सांगितल्याप्रमाणे सभागृह सकाळी १०.०० वाजता ठेवले आहे. अधिवेशन काळात शेकडो कर्मचारी काम करत असतात, सभागृह रात्री दहा वाजेपर्यंत चालत असते. सभागृह सकाळी १०.०० वाजता घ्यायचे नाही असा आपण मागे निर्णय घेतलेला आहे. उद्या सकाळी ११.०० वाजता प्रश्नोत्तरांचा तास आहे. आपण काही तरी क्लिअॅरिटी ठेवावी.

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. गिरीश बापट, आपणच या संदर्भात क्लिअर करावे.

**श्री. गिरीश बापट :** अध्यक्ष महोदय, सकाळी ११.०० वाजता सभागृह घ्यायचे असे ठरले आहे.

**उपाध्यक्ष :** मी सांगू इच्छितो की, सभागृहात नियमानुसार चर्चा होत नाही. आपण प्रत्येक चर्चेला ३-४ तास वाढवून देतो, तरीदेखील सन्माननीय सदस्यांचे समाधान होत नाही.

**श्री. गिरीश बापट :** अध्यक्ष महोदय, असे असेल तर आपण अधिवेशनाचे दिवस वाढवा. आपण अधिवेशनाचे दिवस कमी करायला लागला आहात. आमच्या अधिकारावर गदा आणायला लागला आहात.

**उपाध्यक्ष :** म. वि. स. नियम २९३ अन्वयेचा प्रस्ताव उद्या सकाळी १०.०० वाजता चर्चेला घेण्यात येईल.

**श्री. शिशिर शिंदे :** अध्यक्ष महोदय, संपूर्ण वर्षात फक्त ५० दिवस अधिवेशन होत आहे. अधिवेशनाचा कालावधी वाढत नाही.

**उपाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्या पक्षाचे गटनेते कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला उपस्थित असतात.

---

**सन २०११-२०१२ च्या अनुदानाकरिता मागण्या**

**(१) सामान्य प्रशासन विभाग (२) नगरविकास विभाग**

**(३) गृहनिर्माण विभाग (४) मराठी भाषा विभाग**

(चर्चा पुढे सुरू...

**श्री. मंगल प्रभात लोढा** (मलबार हिल) : अध्यक्ष महोदय, मैं सन २०११-२०१२ के बजट पर बोलते हुए नगर विकास विभाग एवं गृह निर्माण विभाग की अनुदान मांगों पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हुआ हूं. अध्यक्ष महोदय, मैं समय की मर्यादा को ध्यान में रखते हुए अपनी बात कहना चाहूंगा. मेरा मुख्यमंत्री महोदय से निवेदन है कि पूरे महाराष्ट्र के लिए अर्बन डेवलपमेंट और हाऊसिंग के लिए एक यूनिफॉर्म रुल बनायें. मुंबई में जो सुविधायें दी जाती हैं, वही सुविधायें संभाजीनगर में भी मिलनी चाहिए, पुणे में भी मिलनी चाहिए और बारामती में भी मिलनी चाहिए. आज मुंबई और मुंबई उपनगर की सुविधाओं में फर्क है. ठाणे और मुंबई की सुविधाओं में भी फर्क है. यदि सरकार महाराष्ट्र और मुंबई का डेवलपमेंट चाहती है और मुंबई की डिकंजेशन की समस्या से मुक्ति पाना चाहती है तो, जो सुविधायें सरकार केवल मुंबई को देती है और मुंबई महानगरपालिका के लिए कानून बनाती है वही सुविधायें और वही कानून महाराष्ट्र के सभी जिलों पर लागू करे.

अध्यक्ष महोदय, मैं मुख्यमंत्री जी के ध्यान में यह बात लाना चाहता हूं कि मुंबई में मल्टीपल ऑथोरिटी है. यहां पर सिडको है, महानगरपालिका है, म्हाडा है, एसआरए है और एमएमआरडीए है. ये ऑथोरिटी अलग-अलग हैं यह बात तो समझ में आती है परन्तु सब के रुल्स भी अलग-अलग हैं. मैं मुख्यमंत्री महोदय से निवेदन करना चाहता हूं कि मुंबई और ठाणे में भले ही अलग-अलग ऑथोरिटी रखें परन्तु इन सब ऑथारिटी के रुल्स एक ही होने चाहिए.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र के अंदर नई शुरुआत हुई है कि हर नये सिस्टम के साथ में कोई न कोई नई चीज जोड़ते जाते हैं. प्रि एनओसी चाहिए, हाई राईज की एनओसी चाहिए, सिविल एवियेशन की एनओसी चाहिए और एन्वायर्नमेंट की एनओसी चाहिए. इस तरह की एनओसी लेने में ३ से ६ महीने तक का समय लग जाता है और डेवलपमेंट का सारा काम रुक जाता है. मेरा मुख्यमंत्री जी से निवेदन है कि जिन ऑथोरिटीज को जो कागजात चाहिए उसके संबंध में डीसी रुल में नियम बना देना चाहिए और ऑटोमेटिक यह सब काम होना चाहिए.

[ श्री. मंगल प्रभात लोढा ]

अध्यक्ष महोदय, मैंने पहले भी बजट पर बोलते हुए निवेदन किया था और मंत्री महोदय ने उस बात को माना भी था. मैं मुख्यमंत्री जी के ध्यान में वह बात लाना चाहता हूं कि अगर आप मुंबई, ठाणे एवं सभी जगहों पर एसआरए के प्लॉट्स को ऑक्शन करेंगे, जो सरकारी जमीन है, जो महानगरपालिका की जमीन है, उसको ऑक्शन करने से पहले ही साल में १००० से १५०० करोड़ रुपये सरकार को मिल जायेंगे.

अध्यक्ष महोदय, मेरे मलबार हिल निर्वाचन क्षेत्र में गिरगांव का एरिया आता है. पूरा मुंबई का क्षेत्र तटीय किनारे पर है. सीआरजेड कानून बीच में आता है, इसके बारे में अभी तक कोई खुलासा नहीं हुआ है. मेरा मुख्यमंत्री जी से निवेदन है कि सीआरजेड के कानून के बदले में कब नया कानून लागू होगा ? मुंबई में जो पुरानी इमारतें हैं और जो तटीय क्षेत्र में आती हैं, उनका काम सीआरजेड के कानून की वजह से रुका हुआ है. मेरा मुख्यमंत्री जी से निवेदन है कि इस बारे में कोई नया कानून जल्दी से जल्दी बनाया जाय जिससे इन पुरानी इमारतों के पुनर्निर्माण का काम हो सके.

अध्यक्ष महोदय, एमएमआर रीजन और पुणे रीजन के बारे में बात की जाती है कि सेटेलाईट सिटी बनने चाहिए और मुंबई एवं पुणे का डिकंजेशन होना चाहिए परन्तु इसके साथ में इन्फ्रास्ट्रक्चर के बारे में नहीं सोचा जाता है. मुंबई में हालत यह है कि मेट्रो रेल को सड़क के ऊपर से नहीं ले जा सकते हैं. मेट्रो रेल को सड़क के नीचे से ले जाना पड़ेगा. कुछ दिनों के बाद में मुंबई के बाहर के क्षेत्र में भी इसी तरह की परिस्थिति पैदा होगी तो अभी से वहां का इन्फ्रास्ट्रक्चर डेवलप किया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, अर्बन डेवलपमेंट और हाऊसिंग के संबंध में सरकारी कानून का मिसयूज होता है. मैं मुख्यमंत्री जी से कहना चाहता हूं कि महाराष्ट्र में राईट टू इन्फोर्मेशन एक्ट भले ही कांग्रेस सरकार ने पास किया हो लेकिन सन् १९९६ में युती की जब सरकार थी उस समय मैंने राईट टू इन्फोर्मेशन एक्ट का प्रायवेट बिल इस सदन में रखा था. मैंने जो बिल इस सदन में रखा था उसी के ९५ प्रतिशत नियम इस राईट टू इन्फोर्मेशन एक्ट में हैं. मैं आज इस एक्ट के बारे में इसलिए बोल रहा हूं क्योंकि इस राईट टू इन्फोर्मेशन एक्ट का भयानक मिसयूज हो रहा है. अर्बन डेवलपमेंट और हाऊसिंग के क्षेत्र में इस एक्ट के माध्यम से लोगों को ब्लैकमेल किया जा रहा है. राईट टू इन्फोर्मेशन एक्ट साधारण आदमी को जानकारी देने के लिए बनाया गया था, लोगों को ब्लैकमेल करने के लिए नहीं बनाया गया था. मेरा मुख्यमंत्री जी से निवेदन है कि राईट टू इन्फोर्मेशन एक्ट में योग्य अमेंडमेंट करने की जरुरत है.

अध्यक्ष महोदय, अभी यहां पर सम्माननीय सदस्य श्री. बाला नांदगावकर जी ने जो कहा है, उसके बारे में मैं यहां कहना चाहूंगा कि सरकार की शॉर्ट टर्म प्लानिंग नहीं होनी चाहिए. मुख्यमंत्रीजी बहुत पढ़े लिखे हैं, एनालिटिकल माईन्ड के हैं. २०५० में महाराष्ट्र की क्या परिस्थिति होगी, एमएमआर

रीजन की क्या परिस्थित होगी, पुणे रीजन की क्या परिस्थिति होगी ? इस बारे में मुख्यमंत्रीजी के पास सोचने की शक्ति है. २०५० में महाराष्ट्र का अर्बनाईजेशन कैसा रहेगा, महाराष्ट्र का कितना विकास होगा ? महाराष्ट्र का अभी करीब ५० प्रतिशत अर्बनाईजेशन हो चुका है और उस समय तक ७०-८० प्रतिशत अर्बनाईजेशन हो जायेगा. मेरा कहना है कि आग लगने के बाद कुआं खोदने के बजाय पहले से ही इसकी प्लानिंग की जाय.

अध्यक्ष महोदय, मैं अंत में एक बात कहना चाहता हूं कि यह जो वरली-नरीमन पोईन्ट सी लिंक का काम है या वरली-नरीमन पोइन्ट समुद्री रास्ते का काम है, इसके बारे में सरकार कब जानकारी उपलब्ध करायेगी ? मुंबई के लोगों से करोड़ों रुपये टैक्स के रुप में लिये जाते हैं. मैं मुख्यमंत्री जी से कहना चाहता हूं कि आप मुंबई के समुद्री रास्तों से यातायात शुरु करेंगे नहीं, सी लिंक बनायेंगे नहीं और सड़क चौड़ी करने के लिए जगह नहीं है तो मुंबई को आप धीरे-धीरे एक गैस चेंबर बनाते जा रहे हैं. मुंबई के लोगों के साथ न्याय होना चाहिए. मुंबई में इन्फ्रास्ट्रक्चर की जो मिनिमम रिक्वायरमेंट है, सरकार ने भी इस बात को माना है तो उसके ऊपर ध्यान दिया जाय. इतना कहते हुए मैं अपनी बात यहीं समाप्त करता हूं. धन्यवाद.

**श्री. कृष्णा हेगडे** (विले-पार्ले) **:** अध्यक्ष महोदय, मैं नगर विकास विभाग और गृह निर्माण विभाग की अनुदान मांगों पर पर अपने विचार व्यक्त करना चाहता हूं. अध्यक्ष महोदय, आपने मुझे बोलने का जो अवसर दिया है उसके लिए मैं आपको धन्यवाद देना चाहता हूं. अध्यक्ष महोदय, मेरे निर्वाचन क्षेत्र में डोमेस्टिक और इंटरनेशनल ऐसे दोनों एयरपोर्ट हैं. वहां पर करीब ४५ हजार घर हैं और वहां पर करीब २.५ लाख लोग रहते हैं. पिछले ५ अधिवेशनों में मैंने एयरपोर्ट के संदर्भ में अपनी बात रखी है. मैं मुख्यमंत्री जी को धन्यवाद देना चाहता हूं कि सहार गांव का जो एरिया है जिसमें चर्च पकाडी, सुतार पकाडी और तलाब पकाडी हैं, वह एयरपोर्ट मोर्डनाईजेशन प्लान से अलग किये गये हैं. एयरपोर्ट मोर्डनाईजेशन प्लान में पुरावे की जो मांग है उसके बारे में मैं मुख्यमंत्रीजी से निवेदन करना चाहता हूं कि जो फोटो आई.डी. है उसको कम्पलसरी न किया जाय.

अध्यक्ष महोदय, दूसरी बात यह है कि वोटर लिस्ट में नाम होना चाहिए, इसको कम्पलसरी नहीं किया जाना चाहिए. इसके अलावा जो दूसरे पूरावे मांगे जाते है, जैसे कि ड्रायविंग का लाइसेंस वगैरह मांगे जाते है, ऐसे पूरावे नहीं मांगे जाए. इससे लोगों के लिए सहुलियत हो सकती है. इससे ५० प्रतिशत समस्या हल हो सकती है.

अध्यक्ष महोदय, इसी तरह सन २००० के बाद के स्ट्रक्चर्स है, जिसको लोगों ने लिया, बायर और सेलर, दोनों के पेपर्स सन २००० के पहले के हों तो उसे भी ट्रान्सफर केस मानकर इसे भी पात्रता देनी चाहिए.

एअरपोर्ट का जो परिसर है... मैंने कलेक्टर साहब से भी बात की है. उन्होंने मुझसे कहा कि जीवीके का यह प्रायोरिटी है कि यह जमीन चाहिए. मुझे यह पूछना है कि क्या सभी अधिकारी जीवीके के लिए और एचडीआई के लिए काम कर रहे है ? मुझे माननीय मुख्यमंत्री जी से विनती

[ श्री. मंगल प्रभात लोढा ]

करनी है कि एअरपोर्ट के संबंध में आप एक मिटींग बुलाइए. एअरपोर्ट के मामले में पारदर्शकता लाना बहुत ही जरुरी है. ऐसा नहीं किया जाएगा तो आम आदमी के बीच में हमारा विश्वास खो जाएगा. इसी तरह मैं लगातार अनुरोध कर रहा हूं कि एअरपोर्ट का जो एरिया है, १३२ एकर नई जमीन हम हासिल करने जा रहे है. यहां पर लोग पिछले ४० सालों से रह रहे है. यही पर उनके बच्चे स्कूल में जाते है. लोग यहीं पर आसपास में काम करते है. मेरा कहना है कि उनका आसपास ही पुनर्वसन किया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, दूसरी जो कलेक्टर लॅण्ड है. महात्मा कबीरनगर पर, पोस्ट अॅण्ड टेलीग्राम कॉलोनी जो अंधेरी ईस्ट में है, यहां पर लोगों का पुनर्वसन किया जाए. इसी तरह जो ड्राफ्ट प्लॅन एमएमआरडीए ने रिलिज किया है, इस बारे में किसी भी जन प्रतिनिधि को नहीं बताया गया है. ड्राफ्ट के समय यह बताया गया है कि यह जो एअरपोर्ट का नॉन एरॉनॉटीकल झोन है, वहां पर होटल, रेसिडेन्शियल अपार्टमेंट, गल्फ कोर्स, शापिंग कॉम्पलेक्स, रिटेल शॉप्स, बिझनेस पार्क आदि सुविधाएं दी जाने वाली है. यदि हम ४०-४० साल से जो लोग यहां रहते है, उनको यहां से हटाएंगे, तो लोगों का हमारे ऊपर से विश्वास उठ जाएगा. मेरी माननीय मुख्यमंत्री जी से विनती है कि आप इस मामले में जल्द से जल्द मिटींग बुलाइए. लोगों को जो चार एफएसआई देना है....हम एसआरए में २६९ स्क्वेअर फीट देते है, म्हाडा में २.५ एफएसआई देते है, तो यह जो डेवलपर है, उसको एअरपोर्ट के संबंध में....उनका वहां पर पुनर्वसन भी नहीं हो रहा है तो फिर चार एफएसआई देने की क्या जरुरत है.

अध्यक्ष महोदय, मिलन सब वे के बारे में मैं यह कहूंगा कि एमएमआरडीए ने हमको अंधेरे में रखा. यहां पर १६२ लोगों का हमने पुनर्वसन किया. सौ लोगों का उसी जगह पर पुनर्वसन किया. ६२ लोगों का ओशिवरा में पुनर्वसन किया. मंदिर और मस्जिद का भी मसला है. इसके बावजूद हम इतना सब प्रयास करे,....लोगों को निकालकर ढ़ाई महीने हो गए. लेकिन यहां पर मिलन सब वे का काम अब तक शुरु नहीं हुआ है. इस कारण से हम लोगों के बीच जाकर उनको मुंह नहीं दिखा सकते. लोग हमसे पूछ रहे है कि ढ़ाई महीने से आपने हमको यहां से निकाल दिया है और आपने यहां पर अभी तक काम शुरु नहीं किया है.

अध्यक्ष महोदय, इसी तरह गावठाण का जो मसला है, इस बारे में मुझे सरकार से निवेदन करना है कि गावठाण को २.५ का एफएसआई दिया जाना चाहिए. गावठाण में रहने वालों को अच्छे घर दिए जाने चाहिए. इसी तरह मुंबई के लिए वॉटर ट्रान्सपोर्ट बहुत आवश्यक है....अडथळा......इसी तरह हम १४०० कॉलोनिज को शिफ्ट करने जा रहे है. जहां पर सर्वे करने की जरुरत नहीं है वहां पर सर्वे करने के बारे में नोटीस देकर एक भय का वातावरण निर्माण किया जा रहा है. टेंशन का वातावरण, नंदीग्राम जैसा वातावरण निर्माण किया जा रहा है. मैं माननीय मुख्यमंत्री जी से निवेदन करना चाहता हूं कि जब तक एअरपोर्ट के मसले पर हम मिटींग यहां पर नहीं बुलाएंगे, तब तक जो नोटीस दी जा रही है, उस पर माननीय मुख्यमंत्री स्टे लेकर आए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं. धन्यवाद.

**श्री. एकनाथ शिंदे** (कोपरी-पाचपाखाडी) **:** अध्यक्ष महोदय, मी सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी नगरविकास विभाग व गृह निर्माण विभागावर माझे विचार मांडणार आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. ठाणे जिल्ह्यातील अतिशय गंभीर प्रश्न मी मांडणार आहे. ठाणे जिल्ह्यातील पाच लाख घर मालकांना नोटिसा दिल्या आहेत. त्याचप्रमाणे ठाणे शहरात ८११ धोकादायक इमारती आहेत. या ८११ धोकादायक इमारतीमध्ये ५६ हजारापेक्षा जास्त लोक राहत आहेत. गेल्या अनेक वर्षापासून धोकादायक इमारतीमध्ये लोक राहत आहेत. सन १९९८ मध्ये साईराज ही इमारत पडली होती, त्यावेळी १८ लोक मृत्युमुखी पडली आहेत. त्यानंतर दरवर्षी इमारती पडत आहेत, त्यामध्ये चार, आठ, बारा अशा संख्येने लोक मृत्युमुखी पडत आहेत. ही आकडेवारी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. हा विषय मी सभागृहात सातत्याने मांडत आहेत. हा विषय सोडण्याचा प्रयत्न शासनाने आजपर्यंत केलेला नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांना मी धन्यवाद देईन की, नागपूर अधिवेशनामध्ये या विषयाच्या संदर्भात लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती त्यावर सभागृहाचे कामकाज दोन वेळा बंद पडले होते. या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी बैठक आयोजित केली होती. त्यासाठी दोन समित्या गठित करण्यात आल्या होत्या. माननीय मुख्यमंत्री महोदयांना मी विनंती करीन की सदर प्रकरण अत्यंत गंभीर आहे. या प्रश्नाकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहण्याची आवश्यकता आहे. गेल्या अनेक वर्षापासून हे दोन प्रश्न प्रलंबित आहेत. यामध्ये धोकादायक इमारती आहेत. त्यातील रहिवाशांची संख्या ५६ हजारापर्यंत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासंदर्भातील मी सर्व आकडेवारी देऊ शकतो. यासाठी जे चटई क्षेत्र देण्यात आले, जो एफएसआय देण्यात येतो तो वाढवून दिला पाहिजे. तरच हा प्रश्न मार्गी लागू शकतो. यासंदर्भातील दखल माननीय मुख्यमंत्री महोदयांनी घेतली आहे.

अध्यक्ष महोदय, ठाणे जिल्ह्यात ज्या नोटिसा देण्यात आल्या आहेत त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष पसरला आहे. लोक घाबरू लागले आहेत, त्यांना कायद्याचे संरक्षण देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी कायद्यात दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. त्या ठिकाणच्या लोकांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता आहे. ठाणे जिल्ह्यात एसआरए व बीएसयुपी योजनेची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मुंबईप्रमाणे ठाणे शहरासाठी भूमिका घेण्याची आवश्यकता आहे. मुंबईसाठी ज्याप्रमाणे एमएमआरडीए आहे त्याप्रमाणे ठाणे जिल्ह्यासाठी एमएमआर व एसआरए योजना लागू केली आहे. ठाणे जिल्ह्यातील प्रश्न अतिशय गंभीर आहे.

अध्यक्ष महोदय, एक लाख घरांना नोटीसा दिल्या आहेत, या घरांमध्ये जवळपास २५ लाख लोक राहत आहेत. हे लोक अत्यंत भयभीत झाले आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदय आहेत, ठाणे जिल्ह्यात एसआरए व बीएसयुपी योजना मोठ्या प्रमाणात राबवावी अशी माझी मागणी आहे. त्याचप्रमाणे एमआयडीसीच्या जमिनीवर काही बांधकामे झाली आहेत. त्यांना संरक्षण देण्याची आवश्यकता आहे. एसआरए योजनेत स्ट्रक्चरला मान्यता देणे आवश्यक आहे. एखाद्या माणसाने ती जागा विकली तर त्यांना संरक्षण देण्यात येत नाही. यासठी स्ट्रक्चरला जर परवानगी दिली तर निश्चितपणे त्याचा फायदा होऊ शकेल असे मला वाटते. स्ट्रक्चरला संरक्षण दिले तर एफएसआय वाढवून मिळेल व या योजना

पूर्ण करता येतील. ठाणे जिल्ह्यासाठी एमएमआरडीएने २१७ कोटी रुपये मंजूर केले आहेत. निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे, परंतु मंजूर कामे नामंजूर करण्यात आली आहेत. ती कामे करण्यात येऊ नयेत असे एमएमआरडीएकडून पत्र देण्यात आले आहे. याकडे माननीय मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे, अशी विनंती करतो वेळ कमी असल्यामुळे मी एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

**उपाध्यक्ष :** आता सन्माननीय सदस्य कृषिभूषण साहेबराव पाटील यांनी आपले भाषण सुरू करावे.

(शिवसेना पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**कृषिभूषण साहेबराव पाटील** (अमळनेर) : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील सामान्य प्रशासन विभाग, नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग आणि मराठी भाषा विभागाच्या मागण्यांवर बोलण्याठी मी उभा आहे.

(शिवसेना पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**श्री. रवींद्र वायकर :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी थोडा वेळ वाढवून द्यावा, अशी माझी विनंती आहे.

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना जो वेळ ठरवून देण्यात येतो त्या वेळेमध्ये सन्माननीय सदस्य आपले भाषण पूर्ण करीत नाहीत. तुमच्या पक्षाचे गट नेते १५-२० मिनिटे भाषण करतात.

**श्री. रवींद्र वायकर :** अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये ज्याप्रमाणे वेळेचे वाटप करून देण्यात आलेले आहे त्याप्रमाणे सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी वेळ देण्यात यावा. काही सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी फक्त २-४ मिनिटांचा वेळ दिला जातो. सर्व सन्माननीय सदस्यांना समान न्याय द्यावा, अशी माझी विनंती आहे. काही सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी अर्धा तास, एक तास दिला जातो आणि इतर सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी फक्त २-४ मिनिटांचा वेळ दिला जातो असे होऊ नये, अशी माझी विनंती आहे.

**उपाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, तुमच्या पक्षाचे गट नेते अर्धा तास, एक तास बोलतात. गट नेते संपूर्ण राज्यातील महत्त्वाचे मुद्दे मांडत असतात. त्यामुळे आपण गट नेत्यांना बोलण्यासाठी जास्त वेळ देतो. मी प्रत्येक सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी ७-८ मिनिटांचा वेळ देत आहे.

**कृषिभूषण साहेबराव पाटील :** अध्यक्ष महोदय, मुंबई शहराच्या धर्तीवर अतिक्रमणे व निष्कासने या संदर्भात प्रत्येक नागरी स्वराज्य संस्थेत स्वतंत्र यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे. शासनाने याकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे.

(शिवसेना पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उपाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्य श्री.एकनाथ शिंदे यांना बोलण्यासाठी ५ मिनिटांचा वेळ दिलेला आहे. शिवसेना पक्षाचे अजून १० सन्माननीय सदस्य बोलणार आहेत.

**श्री. रवींद्र वायकर :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद घोसाळकर बोलणार नसल्यामुळे त्यांचा वेळ इतर सन्माननीय सदस्यांना देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

**उपाध्यक्ष :** ठीक आहे.

**कृषिभूषण साहेबराव पाटील :** अध्यक्ष महोदय, झोपडीधारकांसाठी मोफत पुनर्वसन योजना राबविण्यात येत असल्यामुळे अलीकडच्या काळात बाहेरच्या राज्यातून येणाऱ्या लोंढ्यांमध्ये वाढ झाल्याचे आपल्याला दिसून येते. राज्यातील लोकसंख्येची वाढ नैसर्गिक प्रजननामुळे न वाढता नागरिकांच्या स्थलांतराने वाढत असल्याची बाब लक्षात घेता फक्त मतांसाठी झोपडीधारकांचे फाजील लाड थांबविण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, शासन सामान्य कर भरणाऱ्या नागरिकांना कोणतीही मोफत सुविधा देत नाही. परंतु अतिक्रमण करणाऱ्या झोपडीधारकांना मात्र मोफत घरे दिली जातात. केंद्र व राज्य शासन सर्व ग्रामीण विकास योजनांसाठी लोक सहभागाच्या तत्त्वावर नागरिकांकडून किमान १०-२० टक्के अंशदान घेते. त्याच धर्तीवर झोपडीधारकांकडून १०-२० टक्के सहभाग घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र शासनाचे विविध शासन निर्णय आणि परिपत्रक निघत असतात. मी सभागृहामध्ये हा मुद्दा उपस्थित केला होता त्यावेळी माननीय राज्यमंत्री महोदयांनी कबूल केले होते की, राज्य शासनाचे जे परिपत्रक निघतील ते विधानसभा आणि विधानपरिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांना देण्यात येतील. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, अजूनही आम्हाला शासनाचे परिपत्रक मिळत नाहीत. उदाहरणार्थ आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्व, दिनांक १८ मार्च, २०११ रोजीचा शासन निर्णय आहे. आमदारांनी आमदार निधी कसा वापरावा यासंदर्भात शासनाने परिपत्रक काढलेले आहे. परंतु त्यामध्ये आमदारांचा उल्लेख करण्यात आलेला नाही.

अध्यक्ष महोदय, शासनाने दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी २५१५ योजनेसंदर्भात परिपत्रक काढलेले आहे. त्या परिपत्रकाच्या प्रती सुद्धा सन्माननीय सदस्यांना देण्यात आलेल्या नाहीत. परंतु त्यासंबंधीच्या प्रती विधानसभा व विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांना दिल्या जात नाही. त्यासंबंधी आपण शासनाला सूचना करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, नगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर, पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी ३५ ते ३६ दिवसांचा कालावधी दिला जातो. हा कालावधी कमी करण्याची आवश्यकता आहे. त्यासंबंधी आपण शासनाला निदेश द्यावेत अशी माझी आपल्याला विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो. यापुढे आपण आम्हाला बोलण्यासाठी जास्त वेळ द्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो व वेळेअभावी माझे भाषण संपवतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र ! जय गजानन महाराज.

**डॉ. अनिल बोंडे** (मोर्शी) **:** अध्यक्ष महोदय, मी सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मराठी भाषा विभागासंबंधी अनेक वक्त्यांनी आपापले विचार व्यक्त केले आहेत. परंतु सर्वात महत्त्वाची गोष्ट अनेकांच्या विस्मरणातून गेली असावी की, मराठी भाषेचे जन्मस्थान रिद्धपूर आहे. आपण स्वत: अभ्यासक आहात, यासंबंधीची आपल्याला माहिती असावी. श्री. चक्रधर स्वामी यांनी महानुभाव पंथाची स्थापना केली होती. त्यांनी तेथे निरनिराळे चरित्र ग्रंथ लिहिले. गोविंद प्रभू व म्हाळसाईने तेथे साहित्य लिहिले. रिद्धपूर " महानुभावची काशी " या नावाने ओळखले जाते. तेथे संपूर्ण देशातून लोक येत असतात. तेथे मराठी ग्रंथसंपदा अतिशय मोठ्या प्रमाणात विपुल आहे. त्यामुळे तेथे अनेक लहानलहान ग्रंथाना उधळी लागलेली आहे. म्हणून मराठी भाषेचे खरोखरीच सांस्कृतिक जतन करायचे असल्यास रिद्धपूरला ऊर्जितावस्थेत आणणे गरजेचे आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने रिद्धपूर येथे मराठी भाषेचे विद्यापीठ सुरू करावे अशी माझी शासनाला विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, दुसरी महत्त्वाची बाब अशी आहे की, विदर्भाच्या जवळ असलेल्या मध्य प्रदेशात असलेल्या पांढूर्णाच्या बैतूल येथे सर्व मराठी भाषिक आहेत. परंतु तेथील सर्व मराठी शाळा बंद केलेल्या आहेत. परिणामी तेथील विद्यार्थ्यांना सक्तीने हिंदी शाळेत जावे लागते. अध्यक्ष महोदय, मराठी भाषेच्या अनुषंगाने बेळगावसंबंधी या सभागृहात अनेकदा चर्चा केली जाते. परंतु विदर्भाला लागून असलेल्या मध्य प्रदेशात असलेल्या मराठी बांधवांची मोठ्या प्रमाणावर गळचेपी होत आहे. त्याकडे कोणाचेही लक्ष नाही. ही बाब अतिशय महत्त्वाची आहे. या संदर्भात मध्य प्रदेश शासनाला विनंती करून सुद्धा काहीही उपयोग झाला नाही. तेथे मराठी शाळा असल्या पाहिजेत. त्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मराठी विषय शिकवला गेला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मी नगरविकास विभागाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, तेराव्या वित्त आयोगानुसार अनेक नगरपालिकांचे डीपी प्लॅन प्रलंबित आहेत. त्यात शेंदूर्णाघाट नगरपालिकेचा डीपी प्लॅन प्रलंबित आहे. सदर नगरपालिकेच्या इमारतीची अतिशय दुरवस्था झाली आहे. ती इमारत कधीही पडू शकते. परंतु नगरपालिकेचा डीपी प्लॅन मंजूर नसल्यामुळे, तेराव्या वित्त आयोगामध्ये सदर नगरपालिकांच्या इमारतीच्या बांधकामासाठी निधी व प्रस्ताव मंजुरी होत नाही. मी उक्त नगरपालिकेचा डीपी प्लॅन मंजूर होण्यासाठी गेल्या वर्षापासून शासनाकडे पाठपुरावा करीत आहे, परंतु मला त्यात यश मिळाले नाही. नगरपालिकांचे डीपी प्लॅन प्रलंबित राहू नयेत अशी माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझा मतदार संघ असलेल्या मोर्शी तसेच शेंदूर्णाघाट व वरुड येथे यावर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे पूर आला. या शहरातून विविध नद्या जातात. शेंदूर्णाघाट येथे जिवना व देवना नावाच्या नद्या आहेत. वरुड येथे सोकी नावाची नदी आहे. मोर्शी येथे नल-दमयंती नावाची नदी आहे. परंतु अप्परवर्धा धरण झाल्यामुळे, उक्त सर्व नद्यांचे पाणी त्या घरणामध्ये जाते. परिणामी या धरणामध्ये पूर्णपणे गाळ भरलेला आहे. अध्यक्ष महोदय, वरील नद्यांचे व गावांचे संरक्षण होणे अत्यावश्यक आहे. यासाठी पूर संरक्षक भिंती तयार करणे, धरणातील गाळ काढणे व तेथे हरितपट्टा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. सदर कामे करण्यासाठी शासनाने या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. जेणेकरून सदर गावे वाचविता येऊ शकतील. तसेच प्रदूषित झालेल्या नद्या स्वच्छ करता येऊ शकतील.

[ डॉ. अनिल बोंडे ]

अध्यक्ष महोदय, गृह निर्माण विभागासंबंधी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, नगरपालिका क्षेत्रात एकात्मिक नागरी गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम राबविला जातो. परंतु शेंदूर्णाघाट नगरपालिका क्षेत्रात अनेक लोकांची पूर्वीपासून घरे आहेत, ती घरे निझूलच्या जागेवर आहेत.

त्यांच्या नावाने भूखंड नाही. लाभार्थ्याच्या नावाने भूखंड असला पाहिजे, अशा प्रकारची अट आहे. अशा प्रकारची अट असल्यामुळे मंजूर झालेली घरकुले सुद्धा पूर्णत्वास येत नाही. त्यामुळे ती अट काढून टाकली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, नगरपालिकेतर्फे हगणदारी मुक्त योजना राबविली पाहिजे असे प्रस्तावित केलेले आहे. अशा प्रकारे शासनाचे निर्देश आहेत. यासंदर्भातील " क " वर्ग नगरपालिका अशा प्रकारचे प्रस्ताव शासनाकडे पाठवित असतात. परंतु शासनाकडे ते प्रलंबित राहतात, ही खरी वस्तुस्थिती आहे. त्यामुळे तेथील नगरपालिका बकाल अवस्थेत आलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहराच्या विविध समस्येच्या संदर्भात सार्वभौम सभागृहात चर्चा केली जाते, त्याबद्दल आम्हाला काहीच म्हणावयाचे नाही. कारण मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबई नवरीसारखी सजली पाहिजे, मुंबईचे शांघाय झाले पाहिजे आणि ते गरजेचे आहे. त्याचबरोबर बाकीच्या शहरांचा देखील विकास झाला पाहिजे अशा तऱ्हेची मागणी करतो आणि माझ्या शब्दांना विराम देतो.

**श्री. अमिन पटेल** (मुंबादेवी) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई में १६ हजार सेस इमारतें है. पांच हजार नॉन सेस इमारतें है. इन इमारतों में करीबन २५ लाख लोग रहते है. म्हाडा के द्वारा इन इमारतों के रिपेअर का काम किया जाता है. रिपेअर के लिए म्हाडा ने १०० करोड़ रुपये रखे है. सम्माननीय सदस्य श्री. मधू चव्हाणजी ने बताया कि १०० करोड़ रुपये से बढ़ाकर २०० करोड़ रुपये किए जाने चाहिए. मैं मुख्यमंत्री जी से जानना चाहता हूं कि इन इमारतों का क्या होगा ? २५ लाख लोगों को हम कब तक मौत के साये में जिंदा रखेंगे ? लोग ट्रान्जिट कॅम्प में इसलिए नहीं जाते है क्योंकि वे ४०-४० साल से ही ट्रान्जिट कॅम्प में रह रहे है. २५ स्क्वेअर मीटर से लेकर ४० स्क्वेअर मीटर का प्लॉट है. मैं जानता हूं कि २५ और ४० स्क्वेअर मीटर का प्लॉट डेवलप नहीं हो सकता है. एक बाप के दो बेटे एकसाथ नहीं आ सकते है तो १० लॅण्डलॉर्ड को एकसाथ् लाना नामुमकिन बात है. सरकार इस बारे में कोई धोरण बनाएगी या नहीं ? इसके बारे में कोई विकल्प निकलेगा या नहीं ?

अध्यक्ष महोदय, आज मुंबई महानगर पालिका ने सभी योजनाओं को रोक कर रखा है. हमने सेक्शन ३३ (७) और ३३ (९) बनाया. लेकिन सेक्शन ३३ (९) के अंदर आज तक दो ही स्कीम को एलओआई मिला है, उसके बाद एक भी सेस की इमारतों को एलओआई नहीं मिला है. आज मुंबई महानगर पालिका के आयुक्त ने सभी इमारतों को ओपन स्पेस नहीं मिल रहा है, ऐसा कह कर रोक के रखा है. यदि हम २५ और ४० स्क्वेअर मीटर की दस इमारतों को एक साथ में क्लब करते है तो भी ४०० मीटर का एक प्लॉट होता है. यह मॅटर सुप्रीम कोर्ट तक जाकर आया हुआ

[ श्री. अमिन पटेल ]

है. हाईकोर्ट ने इस पर स्टे दिया था. सुप्रीम कोर्ट ने १.५ स्क्वेअर मीटर पर, ओपन स्पेस में बिल्डिंग बनाने की अनुमति दी है. उसके बाद में मुंबई महानगर पालिका ने उन इमारतों के प्लान को क्यों रोक कर रखा है ?

अध्यक्ष महोदय, आज यहां पर गृह निर्माण विभाग के सचिव यहां पर बैठे हुए है. पीएमजीपी के बारे में कहना चाहूंगा कि २००८ को रिडेवलपमेंट का प्रपोजल सरकार को भेजा है. उस रिडेवलपमेंट के बारे में कोई चर्चा नहीं होती. इस बारे में निर्णय लिया जाना चाहिए.....अडथळा.... हर महीने में एक बिल्डिंग गिरती है. मेरे इलाके में एक बिल्डिंग गिरनेसे १२ लोग मर गए है. जिसके घर का बच्चा मर जाता है, जिसका पति मर जाता है, उसस पर क्या बीतती है ? १६ हजार इमारतों के बारे में कोई फैसला नहीं हो पा रहा है. आज बिल्डिंग का रिडेवलपमेंट नहीं हो रहा है. १०० करोड़ रुपये का जो रिकंस्ट्रक्शन हो रहा है, उसके बारे में बार बार चिल्लाने के बाद, म्हाडा जो काम कर रही है, कॉन्ट्रक्टर जो काम कर रहे है, सारा पैसा गटर में जा रहा है. उसके ऊपर कोई चर्चा नहीं हो पा रही है.

अध्यक्ष महोदय, ६६ बिल्डिंगों में से २२ बिल्डिंग मेरे मुंबादेवी क्षेत्र में है. ९ बिल्डिंग उमरखाड़ी के अंदर है. आर्किटेक्ट ने लिखकर दिया है कि इन बिल्डिंगों की मुदत खत्म हो चुकी है. एक हजार फॅमिली, पांच हजार लोग वहां पर रहते है. २००८ में एक बिल्डिंग का स्लॅब गिर गया था तो उसमें एक औरत मर गई. हर दो-चार दिन के बाद बिल्डिंग का स्लॅब गिर जाता है और लोग जख्मी हो जाते है. आज उसके लिए हमारे पास कोई विकल्प या प्रावधान है या नहीं ? आज हम लोग उस बिल्डिंग को किस तरह से रिडेवलपमेंट करें ? इसी तरह यदि हम हाथ पर हाथ रख कर बैठे रहे तो ऐसा कोई अनर्थ न हो कि लाखो लोग इन बिल्डिंगों को नीचे दबकर मर जाएंगे. इसका जिम्मेदार कौन होगा ? यह बहुत सीरियस इश्यू है. आज हमारी लोकशाही आघाडी की सरकार ने बड़े अच्छे फैसले किए है. २२५ स्क्वेअर फूट के लोगों को हम ३०० स्क्वेअर फूट के घर देने वाले है. लेकिन २.५ की जगह ३.५ की बात हुई थी, उस पर अब तक निर्णय नहीं हुआ है. बिल्डिंग बन नहीं रही है, क्योंकि उनको ३ एफएसआई नहीं मिल रहा है. लोगों को भाड़ा देना बंद कर दिया गया है. यह बहुत बड़ा इश्यू है. हमने बहुत अच्छे निर्णय लिए, लेकिन उस निर्णय को लागू करने के लिए उसको जो बॅकअप होना चाहिए, वह बॅकअप नहीं हो रहा है.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री जी ने बड़े अच्छे निर्णय लिए. मैं सीआरझेड के बारे में कहना चाहूंगा. श्री. जयराम रमेश जी को और माननीय मुख्यमंत्री जी को मुबारक बाद पेश करता हूं. एक अच्छा निर्णय हुआ है. लेकिन वहां पर भी बिल्डिंग नहीं बनेगी. वहां पर भी यही मसला आ जाएगा. हमने १९४० से लेकर १९६९ पर लेकर आए. एबीसी बिल्डिंग को क्लब कर दिया. हमारी सरकार का बड़ा अच्छा फैसला हुआ है. जब तक हम २.५ को ३.५ एफएसआई नहीं देंगे, ओपन स्पेस में कन्सेशन नहीं देंगे, तब तक कोई बिल्डिंग नहीं बनेगी. इतना सब कुछ करने के बाद भी कुछ नहीं होगा.

[ श्री. अमिन पटेल ]

अध्यक्ष महोदय, हमारा सौभाग्य यह है कि हमारे स्टेट हाऊसिंग मिनिस्टर हमारे इलाके के है. लेकिन दुर्भाग्य की बात यह है कि उनके रहते हुए भी कोई फैसला नहीं हो पा रहा है. श्री. विलासराव देशमुख जी यहां पर मुख्यमंत्री थे, तब उन्होंने एक फैसला किया था कि म्हाडा के अंदर पांच प्रतिशत रिजर्वेशन मॉयनॉरिटी को मिलेगा. वह फाईल भी मूव हुई. उसका भी कोई फैसला नहीं हुआ. मैं मुख्यमंत्री जी से निवेदन करना चाहूंगा कि १६ हजार सेस बिल्डिंग और ५ हजार नॉन सेस बिल्डिंग के बारे में, आज अपने भाषण में इस बारे में कुछ न कुछ बताइए. ताकि हम लोगों को जाकर बता सके. पीएमजीपी के बारे में भी कुछ फैसला किया जाना चाहिए. आपने मुझे बोलने के लिए मौका दिया उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं और अपना भाषण पूरा करता हूं.

**श्री. रमेश वांजळे** (खडकवासला) : अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्याकरिता मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, पुणे शहरामध्ये अनेक नवीन गावांचा समावेश केलेला आहे. मात्र तेथील विकास आराखडा १४ वर्षापासून मंजूर न झाल्यामुळे नागरिकांना अनेक सोयीसुविधा उपलब्ध होत नाहीत. क्रीडांगण, बागबगीचा, शौचालये, रुग्णालये, भाजी मंडई, नाट्यगृहे इत्यादी सोयीसुविधांपासून तेथील नागरिकांना वंचित राहावे लागत आहे.

अध्यक्ष महोदय, सिंहगड रोड ते वारजे रोड या ठिकाणी बीआरटी प्रकल्प राबविण्याचे काम महानगरपालिकेतर्फे सुरू आहे. मात्र तेथे हा प्रकल्प राबविला जाऊ नये, अशी माझी विनंती आहे. सातारा रोड व हडपसर रोड या ठिकाणी हा प्रकल्प राबविण्यात आला होता. मात्र तेथील रस्ता अरुंद असल्यामुळे तेथे अपघात होऊन अनेक जण अपंग झाले व अनेक जण मृत्युमुखी पडले होते. पुण्यात सिंहगड इन्स्टिटयूट ही एक शैक्षणिक संस्था आहे. स्प्रिंक्टल स्कूल व वेणुताई चव्हाण या संस्था वडगाव बुद्रुक येथील सिंहगड रोड येथे आहेत. हवेली तालुक्यात या संस्था असून या संस्था मनमानी पद्धतीने आपला कारभार चालवित आहेत. बीडीपी झोनमध्ये लाखो स्क्वे. फूट अनधिकृत बांधकाम सुरू आहे. त्या बांधकामाच्या संदर्भात महापालिकेने नोटीस देऊन देखील तेथील शिक्षण सम्राट त्यास जुमानत नाही. त्यांचे काम आजही धडाक्यात सुरू आहे. या संदर्भात एमआरटीपी ॲक्ट मधील सेक्शन ५२ ते ५७ नुसार, गुन्हे दाखल केले पाहिजेत व तेथे सुरू असणारे अनधिकृत बांधकाम थांबविले पाहिजे. बीडीपी झोनमध्ये लाखो स्क्वे.फूट अनधिकृत बांधकाम सुरू आहे. ते देखील शासनाने त्वरित थांबविले पाहिजे.

अध्यक्ष महोदय,चांदनी चौकातून कर्वे रोडला मिळणारा रस्ता अतिशय अरुंद असून तेथे मोठी दरी आहे. तेथे एखादा मोठा अपघात झाला तर कोणीही वाचू शकणार नाही. बंजारा हिल पासून जाणारा रस्ता अरुंद आहे. तो रस्ता लवकरात लवकर रुंद केला पाहिजे. वडगाव बुद्रुक येथे पुनर्वसनात मिळालेल्या जमिनींचे गट क्रमांक वगळले गेले पाहिजेत. तसेच झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबांची नावे एसआरए योजनेंतर्गत वगळली गेली असून तेथे राहणाऱ्या लोकांना या योजनेंतर्गत घरे मिळालेली नाहीत. त्यांच्यावर अन्याय झालेला आहे आणि जे प्रकल्पग्रस्त आहेत त्यांना एसआरएमध्ये घरे मिळत नाहीत दुसऱ्यांनाच मिळतात, महापालिकेच्या हद्दीमध्ये ५ कि.मी. पर्यंत रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत महापालिकेने जबाबदारी घेतली पाहिजे याकरिता मी आपल्या माध्यमातून विनंती करतो. नवीन समाविष्ट झालेल्या

**[ श्री. रमेश वांजळे ]**

२३ गावांना कमी दाबाने पाणी पुरवठा होतो, महापालिका त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. त्याकडेही मी लक्ष वेधू इच्छितो. पुणे महापालिकेच्या अंतर्गत सीएमजे रोड आणि वारजे रोड यावर भरपूर ताण येत असल्याने शिवणे ते खराडे हा रस्ता लवकर झाला पाहिजे. जेणेकरून या रस्त्यावर येणारा ताण कमी होईल ही देखील मी आपल्या माध्यमातून विनंती करीत आहे. आपण मला या विधानसभेत पहिल्यांदा बोलण्याची संधी दिलेली आहे याबद्दल मी आपले आभार मानतो. असे आहे की, सासुसासऱ्यांचा कंटाळा आल्यानंतर सुनेने ताट वाजवावे तसे होऊ नये यासाठी मी माझे बोलणे आटोपते घेतो. मागच्या वेळेस यावर बोलूनही काही फायदा झालेला नाही म्हणून आपले लक्ष घालून ही सिंहगड इन्स्टिटयुट सुरू करण्याबाबत आपण त्वरित इन्स्ट्रक्शन देणे गरजेचे आहे. कारण तेथे महापालिकेने याबाबत नोटीस देऊनही अतिशय वेगाने बीडीपी झोनमध्ये काम सुरू आहे.

**उपाध्यक्ष :** मराठी भाषा जोपासली गेली पाहिजे.

**श्री. रमेश वांजळे :** अध्यक्ष महाराज, आम्ही मराठी भाषेचा आग्रह धरत असतो. आमचे बाकीचे सहकारीही बोलणार आहेत त्यामुळे मी बाकीच्या विषयांवर बोलत नाही. आपण सगळ्यांबरोबर मलाही बोलण्यास वेळ दिला, याबद्दल आपले आभार मानतो व या सगळ्या गोष्टींबाबत शासनाला गांभीर्याने पहायला सांगावे. या गोष्टी आपल्या माध्यमातून सांगितल्या तर त्या मार्गी लागतील असे मला वाटते, म्हणून मी आपल्याला तशी विनंती करतो व माझे दोन शब्द संपवतो.

(काही सन्माननीय सदस्य, श्री. रमेश वांजळे यांना अभंग म्हणण्याची विनंती करतात.)

आता अध्यक्ष स्थानी असलेले माननीय उपाध्यक्ष हे माझ्या आवडीचे आहेत कारण त्यांनी शिक्षण विभागाचे मंत्री पद अतिशय चांगल्या पद्धतीने सांभाळलेले आहे. माझे राजकीय गुरु स्वर्गीय रामकृष्ण मोरे यांनी पहिलीपासून इंग्रजीतून शिक्षण देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. मी तीन तास प्रवचनही करू शकतो.

**श्री. कैलाश गोरंट्यांल :** अध्यक्ष महाराज, आपण त्यांना अभंग बोलण्याची संधी दिलेली आहे. त्यांनी अभंग सादर करावा.

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य, मराठीवर खरे प्रेम केले पाहिजे असा एक अभंग आपण सादर केला होता.

श्री. रमेश वांजळे :　आलिया भोगासी असावे सादर,
देवावरी भार घालुनिया,
मग तो कृपासिंधु निवारी साकडे
येणे ते बापुडे काय रोडके,
भयाचिया पोटी दु:खाचिया राशी,
शरण देवाशी जाता भले,
तुका म्हणे नव्हे काय त्या करिता
चिंता वाहतो आता विश्वंभर !

एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवतो. धन्यवाद !

**श्री. गोपाळ शेट्टी** (बोरिवली) : अध्यक्ष महाराज, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील सामान्य प्रशासन विभाग, नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग, मराठी भाषा विभाग या विभागांच्या मागण्यांवर चर्चेसाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, या मागण्यांवर बोलत असताना ज्या मुंबई शहरातील ६० टक्के लोक ज्या झोपडपट्टयांमध्ये राहतात, तेथील लोकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी शासनाला एक रुपयाचा खर्च करावा लागत नाही. परंतु, याबाबतीत फक्त निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. या सभागृहात गेली अनेक वर्षे अनेक सन्माननीय सदस्यांनी ज्या काही रास्त मागण्या केलेल्या आहेत. त्यातील एक मागणी अशी आहे की, सन २००० पर्यंतच्या झोपड्यांना मान्यता द्यावयाची. तसेच, दिनांक १ जानेवारी १९९५ नंतर ज्यांनी झोपड्यांची खरेदी-विक्री केली त्यांना मान्यता देणे, अशा छोट्या छोट्या गोष्टींमध्ये सरकार निर्णय घेत नाही म्हणून अनेक स्कीम बंद पडलेल्या आहेत. सन २०११ मध्ये महानगरपालिकेच्या क्षेत्रात तसेच शासनाच्या जमिनीवर अनधिकृतपणे बांधलेली झोपडीसुद्धा अधिकारी तोडत नाहीत अशी स्थिती आहे. तेव्हा आपण मुंबई शहराचा चेहरा-मोहरा बदलण्याचा विचार करता, पण अशाप्रकारच्या गोष्टी होत राहिल्या तर ते शक्य होणार नाही. आज मुंबई शहराचा चेहरा बकाल होत चालला आहे. तेव्हा शासनाने या बाबतीत निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महाराज, माजी विधानसभा सदस्य श्री. दगळू सकपाळ यांनी एक अतिशय चांगला मुद्दा मांडला होता. खाजगी जागेवरील झोपडपट्टीमध्ये राहणारे जे रहिवाशी ॲसेसमेंट टॅक्स भरतात आणि सिटी सर्व्हे रेकॉर्डमध्ये त्यांच्या नावावर १५० स्वे. फूटापेक्षा जास्त किंवा ३००-४०० स्वे. फूट जागा असेल तर त्यांना एसआरए स्कीममध्ये २२५ चौ.फूट जागा देण्यात येते हे बरोबर नाही. तेव्हा या संदर्भात सर्व आमदारांसमवेत चर्चा करून निर्णय घ्यावा अशी माझी मागणी आहे. ज्यांनी जागा बळकावली असेल त्यांना घरे देऊ नका. परंतु ज्यांनी जमीन मालकाकडून जागा विकत घेतली आहे, सिटी सर्व्हे रेकॉर्डवर त्यांची नोंद आहे, जे ॲसेसमेंट टॅक्स भरत आहेत असे रहिवाशी जितकी जागा वापरतात तेवढी जागा त्यांना द्यायला पाहिजे. तेव्हा एसआरएमध्ये अशाप्रकारचा निर्णय घेणे अत्यंत गरजेचे आहे असे मला वाटते.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश महेता हे मुंबई आणि नागपूर अधिवेशनात अफझलपूरकर समिती संदर्भात गेली सात वर्षे मुद्दा उपस्थित करीत आहेत. त्या संदर्भात शासनाकडून सांगण्यात येते की, आम्ही अफझलपूरकर समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करणार आहोत. परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी झालेली नाही. चार चार जी.आर.काढल्यानंतर देखील सरकार त्याकडे लक्ष देत नाही. सरकारने निर्णय केल्यानुसार उपनगरातील इमारतींमध्ये राहणारे रहिवाशी स्वत: पैसे खर्च करून इमारतींची दुरुस्ती करू शकत नाही अशी स्थिती आहे. मुंबईत इमारत कोसळून त्यामध्ये काही जणांचा मृत्यू झाल्यानंतर सरकार निर्णय घेणार आहे काय असा माझा प्रश्न आहे. तेव्हा सरकारने अफझलपूरकर समितीच्या शिफारशींची आजच घोषणा करावी अशी मी विनंती करतो.

[ श्री. गोपाळ शेट्टी ]

अध्यक्ष महाराज, मी मंत्रालयातील आय.ए.एस.अधिकाऱ्यांना आव्हान देऊ इच्छितो. मंत्रालयात कार्यरत असलेले श्री. बेंजामीन हे चांगले अधिकारी आहेत याबद्दल कोणाचे दुमत नाही. परंतु त्यांचे असे म्हणणे आहे की, उपनगरामध्ये ०.३३ एफएसआय दिल्यामुळे इन्फ्रास्ट्रक्चरवर भार पडणार आहे. माझे त्यांना आव्हान आहे की, ०.३३ एफएसआय दिल्यामुळे इन्फ्रास्ट्रक्चरवर भार येतो असे कोणी सिद्ध करून दाखविले तर मी राजकारण सोडून देईन. ओव्हर ऑल २ एफएसआय वाढत नाही. हे शासन बिल्डरला मदत करीत आहे की, गोरगरीब जनतेला मदत करीत आहे याचा कुठेतरी खुलासा झाला पाहिजे. ज्या माध्यमातून महानगरपालिका आणि राज्य शासनाला कोट्यवधी रुपये मिळतात ती योजना गेल्या दोन-तीन वर्षापासून बंद केलेली आहे. टी.डी.आर. रॅकेटवाल्यांना मोकाट सोडलेले आहे, यावर शासनाने स्पष्टता देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महाराज, याठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित नाहीत. परंतु त्यांना माहिती असेल शाळेच्या इमारतीचा प्लान मंजूर होतो त्यावेळी चार एफएसआय असेल तर प्लीन्थपासून, लेव्हलपासून कामास सुरुवात होते, त्यामध्ये १ एफएसआय वापरतात, त्यानंतर दुसरा आणि तिसरा एफएसआयचा पैसा शासनाकडे आणि महानगरपालिकेकडे भरण्यात येतो. परंतु पुढील परवानगी नाही म्हणून त्यांचे काम बंद केले जाते. आताचे माननीय मुख्यमंत्री प्रामाणिक आहेत. मी त्यांना आपल्यामार्फत सांगू इच्छितो की, १०० रुपये पर स्वे.फूट भरल्याशिवाय तिसरा व चौथा एफएसआय मंजूर केला जात नाही हा इतिहास आहे. या संदर्भात अधिकाऱ्यांची नार्को टेस्ट केली पाहिजे. चार एफएसआय असल्यामुळे किमान शाळेला तरी यातून वगळले पाहिजे. आपणाला बिल्डरांच्या बाबतीत जो काही निर्णय घ्यावयाचा असेल तो घ्यावा. परंतु जे शाळा चालविणारे आहेत, ज्यांना चार एफएसआय परमिसीबल आहे त्यांना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही याबाबत शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महाराज, भारताने वर्ल्ड कप जिंकला म्हणून भारतीय संघावर अनेक पारितोषिकांचा वर्षाव झाला. अनेक राज्यांनी स्वत:च्या विभागातील प्रत्येक खेळाडूला एक कोटी रुपये देण्याची घोषणा केली. महाराष्ट्र राज्याने देखील आपल्या विभागातील खेळाडूंना एक कोटी रुपये देण्याची घोषणा केली त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. जर अन्य राज्यांनी दीड किंवा दोन कोटी रुपयांची घोषणा केल्यास आपल्या राज्याने सुद्धा त्याप्रमाणे घोषणा करावी त्याला कोणीही विरोध करणार नाही. अध्यक्ष महाराज, या महाराष्ट्राच्या मातीमध्ये कबड्डी खेळणाऱ्या खेळाडूंना छत्रपती शिवाजी पुरस्कार मिळालेला आहे, अशी अनेक कबड्डी खेळाडूंची नावे आहेत. ज्या खेळाडूंना छत्रपती शिवाजी पुरस्कार मिळालेला आहे ते खेळाडू पैसे भरुन मुख्यमंत्री कोट्यातून सदनिका मागत आहेत परंतु त्यांना मुख्यमंत्री कोट्यातून सदनिका मिळत नाही. माझ्या परिचयाचे श्री. जया शेट्टी यांना छत्रपती शिवाजी पुरस्कार मिळालेला आहे. त्याने महाराष्ट्रीयन मुलीशी लग्न केले आहे. त्यांची पत्नी छायाला छत्रपती शिवाजी पुरस्कार मिळाला. जया शेट्टी आणि छाया शेट्टी यांचा जो गौरव नावाचा मुलगा आहे, त्याला छत्रपती शिवाजी पुरस्कार मिळाला. या तिघांनी मिळून फक्त एक फ्लॅट मागितला आहे. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण साहेबांनी सही देखील केली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण यांचे मुख्यमंत्री पद गेले. शेट्टी परिवारालाही अजून घर मिळत नाही. आपण क्रिकेट खेळाडूंना इतक्या मोठ्या प्रमाणात देणगी देत आहात त्याचे स्वागत आहे. पण महाराष्ट्रातील मातीत जे लोक लोळले आहेत, त्यांचाही विचार झाला पाहिजे, अशी मी विनंती करतो.

[ श्री. गोपाळ शेट्टी ]

अध्यक्ष महोदय, सर्वच सन्माननीय सदस्य मराठी भाषेबद्दल बोलले, मी त्यांचे अभिनंदन करतो. मराठी भाषा, मराठी भाषिक यांचे माझ्यावर खूप उपकार आहेत. मी आपणास सांगू इच्छितो की, महाराष्ट्र राज्यात मराठी शाळांना परवानगी देत नाही, असा फतवा काढणे बंद करा. मी तर म्हणेन की, कॉन्व्हेंट शाळेमध्ये मराठी विषय कम्पलसरी करा, ज्या कॉन्व्हेंट शाळेमध्ये मराठी भाषा शिकविली जाणार नाही, त्या कॉन्व्हेंट शाळांची मान्यता रद्द करा, अनुदान बंद करा. परंतु, मराठी पहिल्यांदा कम्पलसरी करा, बाकी सर्व गोष्टी आपोआप सुटत जातील, अशी भावना व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद !

**श्री. रूपेश म्हात्रे** (भिवंडी-पूर्व) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील नगरविकास विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. देशामध्ये जनगणनेनुसार ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या सर्वात जास्त आहे. सर्वच क्षेत्रात ठाणे जिल्ह्याचा उल्लेख केला जात आहे. परंतु, ठाणे जिल्ह्यात शहरी भाग जास्त प्रमाणात असताना देखील शहरी भागासाठी कोणत्याही प्रकारचा जादा निधी मंजूर केलेला नाही. मी माननीय मुख्यमंत्र्यांना याद्वारे विनंती करतो की, आपण ठाणे जिल्ह्यासाठी जादा निधी उपलब्ध करून द्यावा. भिवंडीमध्ये पीपीपी योजनेंतर्गत ५७१ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेला शासनाची मंजुरी मिळाली, असे सन २०११-१२ च्या भिवंडी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये सांगण्यात आले आहे. ही योजना प्रत्यक्षता कार्यरत नाही. या योजनेला मंजुरी मिळाली की नाही याबद्दल मला शंका आहे. या गोष्टीचा निश्चितपणे उलगडा व्हावा.

अध्यक्ष महोदय, एमएमआरडीए मार्फत कर्ज प्राप्त करून, भिवंडी शहरात साईबाबा मंदिर ते अशोक हॉटेल असा उड्डाणपुलाचा प्रस्ताव मंजूर केला आहे. त्याचप्रमाणे, नदीनाका ते वंजारपाटीनाका असा देखील उड्डाणपुलाचा प्रस्ताव मंजूर केलेला आहे. हे कर्ज निश्चितपणे निघाले आहे की नाही, याबाबतीत देखील शासनाने उलगडा करावा.

अध्यक्ष महोदय, शिक्षण हा सर्व मुलांचा मूलभूत अधिकार आहे विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांचा शारीरिक, मानसिक व बौध्दिक विकास व्हावा, यादृष्टीने भिवंडी महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाने अर्थसंकल्प सादर केला आहे, यामध्ये असे सांगितले आहे की, शालेय इमारतींच्या आजुबाजूचा परिसर अतिशय घाण असून आरोग्यदायी वातावरण राखण्यास यंत्रणा कमी पडली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विषयक विकास खुंटला जात आहे, विद्यार्थी शाळेत गैरहजर राहत आहेत. शासनाने या गोष्टीकडे देखील लक्ष द्यावे.

अध्यक्ष महोदय, भिवंडी महानगरपालिकेमध्ये कचरा उचलण्याचा ठेका ॲन्थोनी वेस्ट हॅन्डलिंग या कंपनीला दिलेला आहे. परंतु, या कंपनीकडून कचरा उचलण्याचे काम पूर्णपणे होत नाही. कंपनीने डम्पिंग ग्राऊंड महानगरपालिकेच्या स्वत:च्या मालकीचे असताना देखील, तेथे न करता, मानसरोवर जे अतिशय दाट लोकसंख्या असलेली वस्ती आहे, त्या वस्तीमध्ये डम्पिंग ग्राऊंड केले आहे. सदर गोष्टीला वारंवार विरोध झाला, स्थानिकांनी विरोध करून अक्षरश: तोडफोड देखील केली. परंतु, शासनाने याबाबत कोणतीही दखल घेतलेली नाही. मी माननीय मंत्र्यांना प्रत्यक्षातील सर्व घटनाक्रमाची माहिती दिलेली आहे. माननीय मंत्र्यांनी देखील माझ्या समोरच आयुक्तांना या संदर्भात विचारणा केली.

[ श्री. रूपेश म्हात्रे ]

परंतु, आयुक्तांनी त्याची गोलमाल उत्तरे दिली. मला या संदर्भात एवढेच सांगायचे आहे की, आयुक्त माननीय मंत्र्यांचा आदेश देखील मानत नसतील तर अशा मुजोर अधिकाऱ्यांना त्या ठिकाणाहून बदलून सक्षम निर्णय घेऊ शकणाऱ्या अधिकाऱ्यांची तेथे नियुक्ती करावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, भिवंडीतील कल्याणनगर ते रांजणोली या रस्त्याच्या मजबुतीकरणाचे काम महानगरपलिकेतर्फे करण्यात आले आहे. तब्बल ९ वर्षे हे काम झालेले नव्हते परंतु, त्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे. याबाबत मी पत्राव्दारे आणि अनेकदा आयुक्तांशी व्यक्तिश: चर्चा करून तक्रार केली आहे. परंतु, आयुक्तांनी चुकीची उत्तरे दिलेली आहेत. ३ कोटी रुपये खर्चाची तरतूद करून हा रस्ता करण्यात आला आहे. परंतु, याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे. माननीय नगर विकास राज्यमंत्री, श्री. भास्कर जाधव यांना मी प्रत्यक्ष भेटून सर्व माहिती दिलेली असताना अद्याप यासंदर्भात कोणतीही कारवाई झालेली नाही.

अध्यक्ष महोदय, दिनांक २५ मार्च २०११ रोजी घडलेली एक घटना मी येथे सांगणार आहे. भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वॉर्ड क्रमांक ५२ मध्ये साईप्रिया हॉटेल-आशापुरा क्लिनिक पर्यंतचा २९० मीटरच्या सी. सी. नाल्याचे बांधकाम सुरू असताना किशोर नावाचा ३२ वर्षाचा मुलगा खोल खड्ड्यात पडून त्याचा मृत्यू झाला आहे. हा मृत्यू बांधकामामुळे झालेला आहे. संबंधित कंत्राटदाराविरुध्द गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी मी या निमित्ताने करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

**श्री. रशिद ताहीर मोमिन** (भिवंडी-पश्चिम) **:** अध्यक्ष महोदय, मैं सन २०११-१२ के बजट के डिमांड पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हुआ हूं.

सब से पहले मैं महाराष्ट्र सरकार का अभिनंदन करना चाहूंगा, आभार व्यक्त करना चाहूंगा. नगरोत्थान महाअभियान के तहत भिवंडी महानगरपालिका के लिए २६० करोड़ रुपये टेलरींग स्कीम के लिए उन्होंने मंजूरी दी है. ऑक्ट्राय के बारे में पिछले दो साल से चर्चा चल रही है कि, "डी" वर्ग की महानगरपालिका में ऑक्ट्राय खत्म कर दी जाएगी. लेकिन आजतक "डी" वर्ग की १५ महानगरपालिकाओं में से केवल ४ महानगरपालिका में, लोकल बॉडी टॅक्स लगाकर ऑक्ट्राय खत्म कर दिया गया है. आज के जो सम्माननीय मुख्यमंत्री है, उन्होंने माननीय प्रधानमंत्रीजी के साथ काम किया है. आज से चार महीने पहले सम्माननीय प्रधानमंत्रीजी ने दिल्ली में सभी राज्यों के चीफ सेक्रेटरी की मिटींग लेकर, उनको निर्देश दिया था कि, ऑक्ट्राय और लोकल बॉडी टॅक्स, सब खत्म हो जाना चाहिए. लेकिन आजतक ऑक्ट्राय खत्म नहीं हुआ. यहां पर भी कॉंग्रेस की सरकार है और दिल्ली में भी कॉंग्रेस की सरकार है. माननीय प्रधानमंत्रीजी भी कॉंग्रेस के ही है. पूरे भारत में ऑक्ट्राय खत्म हो गया है. पूरी दुनिया में कही भी ऑक्ट्राय नहीं है. केवल महाराष्ट्र में ऑक्ट्राय है.

[ श्री. रशिद ताहीर मोमिन ]

अध्यक्ष महोदय, यहां के इंडस्ट्रीज को बचाना है तो ऑक्ट्राय खत्म होना चाहिए. एमएमआरडीए के ताल्लूक से मैं कहना चाहूंगा कि, पिछले पांच घंटे से, इसी सदन में बहस चल रही है कि, मुंबई में ट्राफिक की समस्या बढ़ रही है. मुंबई के सराऊंडींग में भिवंडी है, थाना है, उल्हासनगर है, मिरा-भाईंदर और वसई-विरार है. इन सभी शहरों में ट्रान्सपोर्ट इन्फ्रास्ट्रक्चर नहीं दिया जाता है और बेसिक सुविधाए नहीं दी जाती है और मुंबई में सैंकड़ों वाहन पूल बना दिए जाए....पिछले १५ सालों में हम देख रहे है कि, मुंबई में सैंकड़ों उड्डान पूल बनते जा रहे है. लेकिन उससे यहां की ट्राफिक की समस्या हल नहीं हो रही है. सराऊंडींग मुंबई में, जितनी महानगरपालिकाओं के मैंने नाम लिए है, यह एमएमआर झोन है. वहां यदि बेसिक सर्विसेस नहीं दी जाएगी तो मुंबई की समस्या हल नहीं होगी. मेरा निवेदन है कि सराऊंडींग मुंबई में ट्रान्सपोर्ट इन्फ्रास्ट्रक्चर की सुविधा मुहैय्या करायी जानी चाहिए. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाणजी को मैं धन्यवाद देना चाहूंगा कि उन्होंने भिवंडी महानगरपालिका के लिए एमएमआरडीए से ९५ करोड़ रुपये का एक पॅकेज की घोषणा की थी. वहां पर चार वाहन पूल बनाने का निर्देश एमएमआरडीए को दिया था. लेकिन आज तक वह काम शुरु नहीं हो रहा है. मेरा निवेदन है कि वह उड्डान पूल बनाने का काम जल्द से जल्द पूरा करना चाहिए और जितनी बेसिक सर्विसेस एमएमआरडीए की ओर से दी जानी चाहिए थी, वह सुविधाएं जल्द से जल्द दी जानी चाहिए. एमएमआर झोन में, सराऊंडींग मुंबई में ५७ गांवों को लिया गया है. ५७ गांवों का डेवलपमेंट प्लान पिछले एक साल से बन कर पड़ा हुआ है. लेकिन आज भी वह प्लान मंजूर नहीं हो रहा है. इस कारण से भिवंडी कारपोरेशन का जो एरिया है, वहां पर नियोजित विकास नहीं हो रहा है. प्लान के हिसाब से विकास नहीं हो रहा है. इससे ट्राफिक की समस्या आगे और भी बढ़ेगी.

अध्यक्ष महोदय, पानी के ताल्लूक से कहना चाहूंगा कि, जो भिवंडी को जो पानी सप्लाय अथॉरिटी देती है. उस अथॉरिटी नें २००० से ४५०० रुपया प्रति एमएलडी का रेट लगाना शुरु कर दिया था. बाद में प्रिन्सिपल सेक्रेटरी, अर्बन डेवलपमेंट, उनका लवाद नियुक्त किया गया. उन्होने ३५०० रुपये का रेट तय किया. लेकिन जो ज्यादा पैसा भिवंडी महानगरपालिका ने भरा था, वह पूरा पैसा भिवंडी महानगरपालिका को वापस किया जाए.

खाजगीकरण के ताल्लूक से कहना चाहूंगा कि, ऐसा महसूस होता है कि, देश में ब्रिटीश राज्य दोबारा वापस आ रहा है. महानगरपालिका का यह हाल है. ऑक्ट्राय का काम प्राईव्हेट को दे दिया गया है......

**श्री. नवाब मलिक :** अध्यक्ष महोदय, या पुरवणी मागण्यांवरील ही सहा तासाची चर्चा उत्तरासहित होणार आहे. आता सहा तास पूर्ण झालेले आहेत. आपण ही चर्चा केव्हा संपविणार आहात ?

**उपाध्यक्ष :** कामकाज संपेपर्यंत आपण ही चर्चा घेणार आहोत. ठराविक वेळेत सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडण्याची आवश्यकता आहे.

**श्री. नवाब मलिक :** अध्यक्ष महोदय, कामकाज केव्हा संपणार आहे ?

**श्री. रशिद ताहीर मोमिन :** अध्यक्ष महोदय, ऑक्ट्राय का काम प्राईव्हेट को दे दिया गया है. सेनिटेशन का काम प्राईव्हेट को दे दिया गया है. वॉटर की स्कीम ५७१ करोड़ रुपये की है, वह भिवंडी कारपोरेशन के लिए फिजिबल नहीं है. इसको भी प्राईव्हाडायजेशन को दे दिया गया है. टॅक्स कलेक्शन का काम भी प्राईव्हेट को देने की तैयारी चल रही है. एक दिन हमको इसी सदन में यह न्यूज मिलेगी कि, पूरी महानगरपालिका किसी प्राईव्हेट कंपनी को दे दी जाएगी और सरकार वहां पर कोई इलेक्शन नहीं करेगी. वहां कोई लोकल बॉडी नहीं रहेगी. इस पर रोक लगनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, करप्शन के ताल्लूक से कहना चाहूंगा. वराडा देवी लेक संवर्धन प्रोजेक्ट जो है, जो कंजर्वेशन प्रोजेक्ट है, उसके लिए ७० और ३० की स्कीम थी.....अडथळा........ ५ करोड़ की स्कीम को १६ करोड़ की स्कीम की गई है. इसकी इन्क्वायरी के लिए मैंने प्रधान सचिव को एक पत्र लिखा. आजतक इसकी इन्क्वायरी नहीं हुई. यह इन्क्वायरी पूरी करनी चाहिए. लोगों को न्याय दिया जाना चाहिए.

फायर ब्रिगेड के ताल्लूक से कहना चाहूंगा कि, भिवंडी में आज बड़ी बड़ी इमारते बन रही है. पहले तीन मंजिल की इमारत हुआ करती थी. अब १२ फ्लोर तक की परमिशन दी जा रही है. वहां पर फायर ब्रिगेड का कोई प्रावधान नहीं है. आज मुंबई से फायर ब्रिगेड को मंगाना पड़ता है. भिवंडी की सारी समस्याओं की ओर सरकार ने उचित ध्यान देना चाहिए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं.

**श्री. ओमप्रकाश पोकर्णा** (नांदेड दक्षिण) **:** अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील नगर विकास विभाग, विभागाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. गेल्या एक वर्षापूर्वी नांदेड महानगरपालिकेवर शासनाने एलबटी लावला.

**उपाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, आपण केवळ एका महानगरपालिकेपुरतेच बोलून चालणार नाही तर, संपूर्ण राज्याला दिशा देणारे विचार आपण आपल्या भाषणाच्या माध्यमातून व्यक्त केले पाहिजे. केवळ एका नगरपालिकेचा उल्लेख करून चालणार नाही.

**श्री. ओमप्रकाश पोकर्णा :** अध्यक्ष महोदय, १९ नगरपालिकांसदंर्भात शासनाने एक वर्षापूर्वी एलबीडीचा निर्णय घेतला. ज्याप्रमाणे मेडिकल कॉलेजमध्ये एखाद्या बेडकावर, एखाद्या उंदरावर प्रयोग करतात तशा प्रकारचा प्रयोग महानगरपालिकांवर करण्यात आला आहे. तो प्रयोग करीत असताना गेल्या एक वर्षामध्ये नांदेड महानगरपालिकेचे १५ कोटी रुपयांचे नुकसान जकात काढून एलबीटी लावल्यामुळे झाले आहे. जकात काढण्याची मागणी आम्ही केली होती. परंतु एलबीटी लावल्यामुळे महानगरपालिकेला १५ कोटी रुपयांची तूट आली आहे. गेल्या अधिवेशनात मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, महानगरपालिकेला जेवढी तूट होईल तेवढी तूट शासनाकडून भरून दिली जाईल. परंतु चालू वर्षाच्या बजेटमध्ये त्यासंदर्भात कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, या तुटीसाठी सभागृहात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे तरतूद करण्यात यावी.

[ श्री. ओमप्रकाश पोकर्णा ]

अध्यक्ष महोदय, नांदेड जिल्हाधिकाऱ्यांनी एक परिपत्रक काढले आहे, त्यामध्ये असे नमूद केले आहे की, महानगरपालिकेच्या हद्दीत विमानतळाच्या २० किलोमीटरच्या परिसरात कोणतेही बांधकाम करावयाचे असेल तर विमान प्राधिकरणाची एनओसी घेतली पाहिजे. जर २० किलोमीटरच्या परिसरात बांधकाम करण्यासाठी विमान प्राधिकरणाची एनओसी घ्यावी लागत असेल तर हे विमानतळ चालू करताना महानगरपालिकेची एनओसी का घेण्यात आलेली नाही. अशा प्रकारचा माझा प्रश्न आहे. मुख्यमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, अशा प्रकारे कायद्याचा गैरवापर करण्यात येत आहे. त्यामुळे नांदेड शहरात लोकांमध्ये घबराट पसरली आहे. त्यामुळे २० किलोमीटर परिसरात कोणतीही परवानगी मिळणार नाही, असा संभ्रम निर्माण झालेला आहे. या कायद्याचा मोठ्या प्रमाणात प्रचार केला गेला. डी. सी. रुलच्या संदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी बैठक घेतली होती. आठ महिन्यांपूर्वी यासंदर्भात निर्णय झाला. यासंदर्भातील कोणतीही अंमलबजावणी झालेली नाही.

अध्यक्ष महोदय, आमच्या परिसरात एक रुग्णालय आहे तेथे ५० हजार रुपयात शस्त्रक्रिया करून दिली जाते. तेथे एका माणसाने अर्ज दिल्याबरोबर ते रुग्णालय पाडून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशा प्रकारचे आदेश ताबडतोब निघतात, त्यांची अंमलबजावणी पण होते. अशा प्रकारे अधिकारी निर्णय घेत आहेत. राज्यकर्त्यांनी घेतलेले निर्णय राबविण्यासाठी अधिकारी सहकार्य करीत नाहीत. उलट सुलट चर्चा करून चांगले निर्णय राबविण्यात येत नाहीत. राज्यकर्त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न अधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, महानगरपालिकेला अधिकारी द्या अशी मागणी करतो. आतापर्यंत प्रतिनियुक्तीवर जे अधिकारी आले आहेत. ते अधिकारी असे आहेत की, जे अधिकारी कोठे चालत नाहीत असे अधिकारी नांदेड येथे पाठविण्यात आले आहेत. नांदेड महानगरपालिकेमध्ये आयुक्त चांगले आहेत. परंतु त्याच्या अखत्यारित जे अधिकारी आहेत ती कामे करीत नाहीत. गेल्या दीड वर्षापासून आम्ही चांगले अधिकारी मिळावे म्हणून प्रयत्न करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात एक कत्तलखाना आहे, तेथील असलेल्या नाल्यामधून रक्त वाहत जाते. हा कत्तलखाना शहरातून बाहेर काढावा यासाठी गेल्या एक वर्षापासून विनंती करण्यात आलेली आहे. परंतु कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही. याबाबत मंत्री महोदयांनी लक्ष घालावे, अशी मी विनंती करतो. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी आपण आयुक्त म्हणून नियुक्त करतो. हे चांगले अधिकारी असतात त्यांच्या माध्यमातून महानगरपालिकेची कामे दृतगतीने झाली पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, मी नगरपालिकेचा अध्यक्ष होतो, महानगरपालिकेचा महापौर होतो. परंतु, आमदार झाल्यावर मी पाहिले आहे की, नगरपालिकेच्या अध्यक्षांना जेवढे अधिकार आहेत, तेवढे अधिकार महापौर यांना नाहीत. महापौर शोभेची वस्तू झालेली आहे. त्याच्या डोक्यावर लाल दिवा आहे. परंतु त्याचा कारभारी हा आयुक्त असतो. नगरपालिकेत नगराध्यक्षांना जेवढे अधिकारी आहेत त्यापेक्षा जास्त अधिकार महापौर यांना दिले पाहिजेत. गेल्या दहा वर्षापासून महापौर परिषदेच्या माध्यमातून प्रश्न मांडले

आहेत. महापौर यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार नसल्यामुळे महापौर यांना काहीही किंमत नाही. महापौरांना जास्त अधिकार दिले पाहिजेत. इतर राज्यात आमदारांना महानगरपालिकेत पदाधिकारी होता येते. परंतु आपल्या राज्यात आमदारांना नगरपालिकेत प्रवेश नाकारला आहे. माझी विनंती आहे की, नगरपालिकेत आमदारांना पदाधिकारी राहण्याचा अधिकार दिला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, नांदेड महानगरपालिका कर्जबाजारी आहे, महानगरपालिकेवर १५० कोटी रुपयांचे कर्ज आहे. परंतु डी. सी. रुल मंजूर न झाल्यामुळे आठ महिन्या अगोदर घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही. १०० कोटी रुपयांचे उत्पन्न गुंठेवारीच्या व डी. सी. रुल मंजूरीच्या माध्यमातून होणार आहे त्याला प्राधान्य द्यावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. आमची कॉर्पोरेशन छोटी कॉर्पोरेशन आहे. छोट्या कॉर्पोरेशनमध्ये ऑक्ट्रॉय घेत असताना, एलबीटी लावत असताना या कॉर्पोरेशनचे कंबरडे मोडणार नाही, या स्वायत्त संस्था बुडणार नाहीत याची शासनाने काळजी घ्यावी, अशी विनंती करून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**श्री. प्रकाश भोईर** (कल्याण पश्चिम) : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी प्रथम आपले आभार मानतो. ठाणे जिल्ह्यातील काही प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. एकनाथ शिंदे यांनी मांडलेले आहेत. मी सांगू इच्छितो की, संपूर्ण ठाणे जिल्ह्यामध्ये २.५ एफएसआय आणि एसआरए योजना राबविणे अपरिहार्य आहे. ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामांची परिस्थिती आपल्याला माहिती आहे. ती योजना फक्त ठाणे आणि नवी मुंबई येथे प्रायोगिक तत्त्वावर न राबविता त्या योजनेमध्ये कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूर या भागाचा समावेश करावा, अशी माझी मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, कल्याण शहरामध्ये डम्पिंग ग्राऊंडचा फार मोठा प्रश्न आहे. यासंदर्भात मागील कित्येक वर्षांपासून आंदोलने होत आहेत. कल्याण शहरातील नागरिक विविध आजारांमुळे त्रस्त झालेले आहेत. परंतु डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न सोडविण्यासाठी कोणताही प्रोजेक्ट राबविण्यात आलेला नाही. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, कल्याण शहरातील डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न सोडविण्यासाठी तेथे लवकरात लवकर प्रोजेक्ट राबविण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, कल्याण शहर ऐतिहासिक शहर म्हणून ओळखले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांनी कल्याण शहरामध्ये प्रथम आरमार स्थापन केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली होती. कल्याण खाडीच्या शेजारी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक व्हावे, अशी कल्याणमधील जनतेची इच्छा आहे. यासंदर्भात दोन-दोन उद्‌घाटने झाली. परंतु अद्याप स्मारकाचा पाया सुद्धा रचण्यात आलेला नाही. ही अतिशय गंभीर बाब असून शासनाने यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घ्यावा.

[ श्री. प्रकाश भोईर ]

अध्यक्ष महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या रुक्मिणी रुग्णालयामध्ये आरोग्य सुविधांची वानवा आहे. तेथे कोणत्याही प्रकारच्या आरोग्य सुविधा पुरविल्या जात नाहीत. तेथील एक्स-रे मशीन बंद आहे. तेथे डॉक्टरांची सुद्धा वानवा आहे. अशा परिस्थितीत माझी मागणी आहे की, शासनाने हे रुग्णालय शासनाच्या ताब्यात घेऊन या रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देऊन तेथे आरोग्य सुविधा पुरवाव्यात, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, खेळांची मैदाने, तरंग तलाव या सर्व सुविधांसाठी शासनाने भरीव निधी उपलब्ध करून द्यावा. कल्याण महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीची शासनाला जाणीव आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे. शासनाने कल्याण-डोंबिवली महानरगपालिका क्षेत्रातील रस्त्यांसाठी भरीव निधीची तरतूद करावी, अशी विनंती करून मी माझे दोन शब्द संपवितो.

**श्री. सुरेश हाळवणकर** (इचलकरंजी) : अध्यक्ष महोदय, सन २०११-१२ च्या नगर विकास आणि गृहनिर्माण विभागाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, नगर विकास विभागाच्या चर्चेच्या निमित्ताने राज्याचे प्रमूख, माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. मी सभागृहाचा अधिक वेळ न घेता नगर विकास विभागाच्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्र्यांचे राज्यातील दोन प्रश्नांकडे लक्ष वेधू इच्छितो. सन २००१ साली राज्यामध्ये जकात रद्द करून शासनाच्या वतीने नगरपालिकांना जकात अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला. सन २०११ मध्ये राज्यातील वाहनांची संख्या ६६,०७,०५४ इतकी होती. त्या वाहनांवर इंधन अधिभार लावण्यात आला. पेट्रोलवर ६६ पैसे आणि डिझेलवर ३४ पैसे इंधन अधिभार लावण्यात आला आणि २००१ साली त्यातून राज्याच्या तिजोरीमध्ये ५०० कोटी रुपयांचा महसूल जमा झालेला आहे व जकात अनुदानापोटी ४२० कोटी रुपये देण्यात आले. अशा प्रकारे राज्यातील सर्व नगरपालिकांना जकात अनुदान दिल्यानंतर राज्याच्या तिजोरीत ८० कोटी रुपये शिल्लक राहिले. सन २०११-२०१२ मध्ये वाहनांची संख्या १,७०,२९,१०९ इतकी झाली. त्याद्वारे राज्याच्या तिजोरीत १,५०० कोटी रुपयांचा महसूल जमा झाला. यावर्षीचे बजेट काढल्यानंतर सहाय्यक अनुदानाच्या माध्यमातून नगरपालिकांसाठी शासनाकडून एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. माझे असे म्हणणे आहे की, राज्याचे नागरिकरण सातत्याने वाढत आहे. राज्यातील नगरपालिकांसह त्यांच्या कर्मचारी वृंदासाठी सहाव्या वेतन आयोग लागू केल्यामुळे, त्यांच्याकडे विकास कामांच्या खर्चासाठी निधी शिल्लक राहिलेला नाही. माझी शासनाला विनंती आहे की, शासनाकडे नगरपालिकांकडून इंधन अधिभाराच्या माध्यमातून जमा झालेली १,५०० कोटी रुपयांची जमा झालेली रक्कम झाली आहे. ही रक्कम नगरपालिकांच्या हक्काची आहे. शासनाने सदरहू रक्कम सहाय्यक अनुदानाच्या माध्यमातून राज्यातल्या नगरपालिकांना वाढवून दिल्यास तेथे नागरिकरणाच्या सुखसोयी देण्यासंबंधी मोठ्या प्रमाणावर मदत होईल. यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी माझी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझी दुसरी प्रमुख मागणी आहे की, राज्याचे नागरिकरण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. राज्यातील नगरपालिकांची शासनाकडून फार मोठी अपेक्षा नाही. शासनाने २-३ निर्णय घेतल्यास, ते राज्यातील नागरिकांच्या हिताचे होऊ शकतील. १९६६ साली म्हणजेच गेल्या ५० वर्षांपूर्वी एमआरटीपी

ॲक्ट मंजूर झाला. परंतु आजपर्यंत या कायद्यातील नियमावलीमध्ये कोणताही बदल झाला नाही. मी सातत्याने यासंबंधीची शासनाकडे मागणी करीत आहे. या संदर्भात आज प्रश्नोत्तराच्या वेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी एका तारांकित प्रश्नाला उत्तर देताना असे सांगितले की, विकास नियमावलीच्या दुरुस्तीसाठी शासनाने एक समिती नेमली आहे व त्या समितीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला आहे. या संदर्भात नागरिकांची अशी मागणी आहे की, गावठाणाची हद्द वाढवावी. ही बाब शक्य नसल्यास गावठाणाच्या हद्दीनुसार सरसकट २ टक्के एफएसआय करावा. राज्यात ९० टक्के अवैध बांधकामे झाली आहेत. या सदनात माननीय मंत्री श्री. राजेश टोपे साहेब उपस्थित आहेत. शासनाने काकोडकर समितीच्या शिफारशी लागू करण्याचा

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. नवाब मलिक)**

निर्णय घेतल्यामुळे राज्यातील अनधिकृत बांधकामासाठी तीन पट शास्ती लागू झाली. अध्यक्ष महोदय, मी राज्यातील नगरपालिकांचे विषय येथे मांडत आहे. काकोडकर समितीच्या शिफारशी लागू केल्यानंतर, एमआरटीपी कायद्यानुसार एकाही नागरिकाला घरासाठी नगरपालिकेकडून परवाना घेता येत नाही. म्हणून एमआरटीपी कायद्यामध्ये दुरुस्ती करणे अत्यावश्यक आहे......

(अडथळा)

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. नवाब मलिक) :** प्रत्येक पक्षातील सदस्याने या ठिकाणी बोलणे बंधनकारक नाही. ही चर्चा ठरवून दिलेल्या वेळेत संपली पाहिजे....

**श्री. सुरेश हाळवणकर :** अध्यक्ष महोदय, मी राज्यातील नगरपालिकांच्या संदर्भातील विषय या ठिकाणी उपस्थित केले आहेत. मी अजून माझ्या मतदार संघातील अनेक महत्त्वाच्या बाबींचा येथे कोणत्याही स्वरूपाचा उल्लेख केलेला नाही...

(अडथळा)

**तालिका सभाध्यक्ष :** सर्वात जास्त वेळ भारतीय जनता पक्षासाठी दिलेला आहे....

(अडथळा)

**श्री. सुरेश हाळवणकर :** अध्यक्ष महोदय, आपण मला भाषणाचा समारोप करण्याची अनुमती द्यावी.

**तालिका सभाध्यक्ष :** ठीक आहे.

**श्री. सुरेश हाळवणकर :** अध्यक्ष महोदय, या निमित्ताने माझी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, नागरीकरणासाठी राज्यातील नगरपालिकांच्या हद्दीत असलेल्या गावठाणाची तातडीने हद्द वाढवावी. ही बाब शक्य नसल्यास शहरांमध्ये गावठाणाच्या हद्दीनुसार सरसकट २ टक्के एफएसआय करावा. जेणेकरून नागरिकांना बांधकामाचे परवाने मिळू शकतील व गृह कर्ज मिळण्यास मदत होऊ शकेल. तीन पट शास्तीच्या कायद्यातून राज्यातील नागरिकांची मुक्तता व्हावी यासाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात उल्लेख करावा. त्यामुळे राज्यातील जनतेवर अनंत उपकार केल्यासारखे होईल. एवढीच विनंती करतो व माझे दोन शब्द संपवितो.

**तालिका सभाध्यक्ष :** आता शेवटचे वक्ते श्री. हरिदास भदे यांनी भाषण सुरू करावे. त्यानंतर माननीय मुख्यमंत्री महोदयांना रिप्लाय सुरू होईल. या चर्चेसाठी सहा तासांची वेळ ठरवून दिली होती. त्यानुसार या ठिकाणी चर्चा झाली आहे. या चर्चेसाठी पक्षनिहाय जास्तीत जास्त वेळ दिलेला आहे. आज आपल्याला सदर चर्चा पूर्ण करायची आहे.

(अडथळा)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** यासंबंधी सन्माननीय सदस्यांनी आपल्या पक्षप्रतोदांसमवेत चर्चा करावी.

**श्री. हरिदास भदे** (अकोला-पूर्व) **:** अध्यक्ष महोदय, मी सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, नगर विकास विभागाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, राज्यात अनेक मोठमोठी शहरे आहेत. त्या शहरामंध्ये रेल्वे क्रॉसिंगसाठी रेल्वे गेट तयार आहेत.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

या गेटमुळे वाहतुकीला मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण झालेली आहे. महाराष्ट्रात मुंबई-पुणे, मुंबई-नांदेड, मुंबई-नागपूर, मुंबई-कोकण रेल्वे, मुंबई-अहमदाबाद वगैरे रेल्वे ट्रॅक आहेत. मोठ्या शहरात रेल्वे गेट असल्यामुळे वाहतुकीला मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण होत आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. गिरीश बापट यांना सांगू इच्छितो की, आपल्याला वेळेत ही चर्चा संपवावयाची आहे. सदर चर्चेसाठी ६ तासांची वेळ निश्चित करण्यात आली होती. ६ तासांपेक्षा जास्त चर्चा झालेली आहे. अजून माननीय मंत्री महोदयांचे रिप्लाय होण्याचे बाकी आहे. पक्षनिहाय वेळ कोणा-कोणाला किती दिलेला आहे, याची तपासणी केली असता, भारतीय जनता पार्टीतील सन्माननीय सदस्यांना जास्तीचा वेळ दिलेला आहे. कामकाज संपेपर्यंत सभागृह चालणार आहे, याची सर्व सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी. आता सन्माननीय सदस्य श्री. हरिदास भदे यांचे भाषण होणार असून, त्यानंतर माननीय मंत्री महोदयांचा रिप्लाय होणार आहेत.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**श्री. हरिदास भदे :** अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात खरपन्या तापडियानगर न्यूतापले रेल्वे गेट आहे. परिणामी शाळेतील विद्यार्थी आणि नोकरदार वर्गांना १५ ते २० मिनिटे क्रॉसिंग करते वेळी थांबावे लागते. रेल्वे पास झाल्यानंतर त्यांना पलिकडे जायला मिळते.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** मनसेकडून एकूण ५ सन्माननीय सदस्यांनी भाषणे केलेली आहेत. त्यांना खूप जास्त वेळ देण्यात आलेला आहे.

**श्री. हरिदास भदे :** अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रातील जेवढी रेल्वे गेट्स शहरात असतील, त्या सर्व रेल्वे गेट्सवर उड्डाण पूल होणे गरजेचे आहे. अशा प्रकारची मागणी मी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे करीत आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

अध्यक्ष महोदय, महानगरपालिकेकडे निधी नसताना देखील मोठ्या प्रमाणात विकास कामे केली जातात. टेंडर काढली जाते, वर्कऑर्डर दिली जाते. कामे पूर्ण होतात. पण निधी नसल्यामुळे कंत्राटदारांना पैसे वेळेवर मिळत नाही. परिणामी कंत्राटदार उपोषणास बसतात. आंदोलने करतात तरी देखील त्यांना पैसे मिळत नाही. जोपर्यंत महानगरपालिकेकडे पैसा नाही, तोपर्यंत कोणत्याही कामाच्या संदर्भातील वर्कऑर्डर देण्यात येऊ नये, असे आदेश शासनाने काढावेत, अशा प्रकारची मागणी मी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे करीत आहे. जर कामाची वर्कऑर्डर दिलेली असेल तर संबंधित कंत्राटदारांना ताबडतोब पैसे देण्याची कार्यवाही केली पाहिजे, अशी प्रकारची विनंती मी माननीय अध्यक्षांच्या वतीने माननीय मुख्यमंत्री महोदयांना करीत आहे. त्याचप्रमाणे ७००० लोकसंख्येपेक्षा अनेक मोठ्या ग्रामपंचायती आहेत. तसेच महानगरपालिकेला लागून असलेल्या या ग्रामपंचायती आहेत. त्यांचा विकास होत नाही, ही खरी वस्तुस्थिती आहे. त्यांचे उत्पन्न अतिशय कमी असते. म्हणून या मोठ्या ग्रामपंचायतींना नगर ग्रामपंचायतीचा दर्जा दिला पाहिजे. त्यांना नगर विकास खात्याकडून जास्तीचा निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. अशा प्रकारची विनंती मी माननीय मंत्री महोदयांकडे करीत आहे.

अध्यक्ष महोदय, अकोला मनपामध्ये २२ ग्रामपंचायतींचा समावेश करण्याचा प्रयत्न सुरू आहे. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचे अद्याप ७ ते ८ महिन्यांपासून पगार झालेले नाहीत. अशा परिस्थितीत नवीन २२ ग्रामपंचायतींचा समावेश केला गेला तर तेथील व्यवस्था आणखी बिघडून जाईल. आज या मनपाची अतिशय दयनीय अशी परिस्थिती आहे. त्यामुळे या २२ ग्रामपंचायतींचा समावेश केला तर त्यांचा देखील विकास होणार नाही. त्यामुळे त्यांचा समावेश मनपामध्ये करू नये, अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, मार्च, २००९ मध्ये १३२ कोटी रुपयांची भूमिगत गटार योजना मंजूर झाली होती. मात्र मार्च, २०१० मध्ये हीच योजना ३२० कोटी रुपयांची झाली. त्याप्रमाणे कामाचे आदेश देण्यात आले. एका वर्षात १३२ कोटी रुपयांपासून ३२० कोटी रुपयांपर्यंत अंदाजपत्रकामध्ये वाढ कशी काय करण्यात आली, हे मी या निमित्ताने मंत्री महोदयांना विचारू इच्छितो.

**श्री. सचिन अहिर :** अध्यक्ष महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांची बोलण्याची इच्छा आहे. मात्र या मागण्यांवरील चर्चेस माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत. उत्तराला देखील न्याय मिळाला पाहिजे. काही सन्माननीय सदस्यांची नावे पुकारली त्यावेळी ते सभागृहात हजर नव्हते तर काही सन्माननीय सदस्यांची नावे पुकारली गेली नाहीत, मात्र ते आता हजर आहेत. सदस्यांची भाषणे लवकरात लवकर संपली तर मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तराला योग्य प्रकारे न्याय मिळू शकेल.

**श्री. हरिदास भदे :** अध्यक्ष महोदय, निविदा दिल्यानंतर रामकी कंपनीला कामाचे आदेश देण्यात आले. ह्या रामकी कंपनीच्या निविदेत सुद्धा खोडतोड आहे. निविदेमध्ये खोडतोड करून त्यामध्ये बदल करण्यात आलेत, फार मोठी अनियमितता ह्या योजनेत झाली आहे. सिव्हरेज ट्रिटमेंट प्लानकरिता अद्याप जागा निश्चित झालेली नाही. त्याकरिता महानगरपालिकेकडे जागा नाही. असे असताना देखील ही योजना कशी काय मंजूर झालेली आहे, हे सांगता येत नाही. ही योजना शासनाने रद्द करावी. नव्याने टेंडर काढून काम सुरू करावे, अशी मागणी करून माझे भाषण संपवतो. मला या ठिकाणी बोलण्याकरिता संधी दिल्याबद्दल, मी आपले आभार मानतो. धन्यवाद.

**श्री. कैलास गोरंट्याल** (जालना) **:** अध्यक्ष महोदय, जिस शहर से मैं प्रतिनिधित्व करता हूं वहां पर ५०-५० दिनों से पानी नहीं है. अध्यक्ष महोदय, जालना शहर के लिए केन्द्र सरकार की यूआईडीएसएसएमटी योजना के अंतर्गत १३६ करोड़ मंजूर हुए थे लेकिन नये डीएसआर के कारण और १०० करोड़ रुपये की जरुरत है. बजट के अंदर १०० करोड़ रुपये का प्रोवीजन किया गया है लेकिन इसको तीन जिलों में बांट दिया गया है. मेरी मुख्यमंत्रीजी से विनती है कि, जालना शहर के पानी के लिए १०० करोड़ रुपये की अतिरिक्त निधि उपलब्ध कराई जाय और वह पूरी की पूरी जालना शहर के लिए उपलब्ध कराई जाय. जालना शहर की पानी की समस्या के बारे में मैं केवल इतना ही कहूंगा कि-

" मैंने माना मेरी आवाज नहीं पहुंचेगी,
दर और दीवार से टकराकर लौट आयेगी,
अब भी वक्त है कुछ करो चव्हाण साहब,
वरना हमारी नस्लें पानी को तरस जायेंगी."

अध्यक्ष महोदय, जालना नगर पालिका जिनके हाथ में है उन्होंने अंधा कारोबार चला रखा है. नगर पालिका का बजट मंजूर न होने के बाद भी करोड़ों रुपये के बिल चुकाये गये हैं. इसके साथ ही १८ करोड़ रुपये के बिल दूसरी योजना के नाम से चुकाये गये हैं. कलक्टर ने इस नगर पालिका को बर्खास्त करने की रिपोर्ट भेजी है. मेरी मुख्यमंत्री महोदय से मांग है कि, वह इस नगर परिषद को तुरन्त बर्खास्त करने की घोषणा करें. इतना कहते हुए मैं अपनी बात यहीं समाप्त करता हूं. धन्यवाद.

**श्री. विजय शिवतारे** (पुरंदर) : अध्यक्ष महोदय, सन २०११ -२०१२ च्या अर्थसंकल्पातील मागण्यांवर बोलण्याकरिता मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी प्राधान्याने नगर विकास विभागाच्या संदर्भात बोलणार आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला ५० वर्षे पूर्ण झाली असून यंदाचे वर्ष हे राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या वर्षात राज्यात अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. रिजनल प्लान्समध्ये प्लानिंग ऑथॉरिटी जिल्हाधिकारी असतात व जिल्हाधिकाऱ्यांनी नगररचनाकारांच्या माध्यमातून प्लान पास करावयाचे असतात. परंतु, प्लान पास केल्यानंतर त्याच्यामध्ये जर व्हायोलेशन होत असेल, तर त्या व्हायोलेशनवर ॲक्शन घेण्यासाठी जशी कार्पोरेशनमध्ये डिमॉलिशनसाठी वेगवेगळी स्क्वॉड्स आणि डिपार्टमेंटस आहेत. अशा प्रकारची कोणतीही व्यवस्था तेथे नाही. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मोठ्या शहरांच्या आजूबाजूला असलेला ग्रामीण भाग हा अनधिकृत बांधकामामुळे अतिशय वाईट अवस्थेमध्ये

आहे. मला या माध्यमातून माननीय मुख्यमंत्र्यांना मुद्दामहून विचारावयाचे आहे की, रिजनल प्लानमध्ये प्लानिंग ऑथॉरिटी असताना जर डिमॉलिशन किंवा अनधिकृत काम होत असेल व त्यावर ॲक्शन घेण्यासाठी जर काही व्यवस्था राज्य स्थापनेस ५० वर्षे झाल्यानंतरही नसेल तर, त्याच्या इतके दुर्दैव नाही. पुणे जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र शासनाला प्रस्ताव दिलेला आहे की, यासाठी डेप्युटी कलेक्टर लेव्हलचा एक माणूस आणि स्टाफ दिला जावा. ताबडतोब यावर कार्यवाही केली जावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, फक्त एकच मिनिट मला बोलू द्या. सासवड नगरपालिकेमध्ये सर्व्हे नं. ६१७ मध्ये सुवर्णनगरी या ठिकाणी संबंधित चिफ ऑफिसरने रहिवासी असल्याचा बोगस दाखला देऊन त्याच्यावर एनए परमिशन मिळाली आणि बिल्डिंग परमिशन मिळाली आणि २ लाख ७४ हजार स्के. फुटांचे मोठे बांधकाम झाले आहे. कारवाई करतानाही शासन गंभीर नाही. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी अवर सचिव, श्री. सुनिल नरळे या अधिकाऱ्याने काढलेली जी ऑर्डर आहे ती पाहिली तर, जो संबंधित अधिकारी दोषी आहे, त्याला तुम्ही ऑर्डर काढून पुन्हा सांगत आहात की, तुम्ही संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करा. अशा प्रकारचे जर मूर्खपणाचे निर्णय होत असतील तर निश्चितपणे याच्यावर कुठेतरी बंधन आले पाहिजे. एमआयटीपी ॲक्टमध्ये जर चुकीच्या कायद्यांच्या आधाराने प्लान पास होऊन बिल्डिंगी झाल्या असतील तर, त्याच्यावर कारवाई करण्यासाठी कोणतेही कायदे नाहीत. ते करणे गरजेचे आहे. सासवड नगरपालिकेमध्ये झालेल्या सुवर्णनगरी येथील अवैध बांधकामावर ताबडतोब कारवाई व्हावी व अशा प्रकारची कामे पुन्हा होऊ नयेत याबाबत काळजी घ्यावी, एवढे बोलून मी इथेच थांबतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

**श्री. प्रकाश शेंडगे** (जत) : अध्यक्ष महाराज, सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील सामान्य प्रशासन विभाग, नगर विकास विभाग, गृहनिर्माण विभाग, मराठी भाषा विभाग या विभागांच्या मागण्यांवर चर्चेसाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सामान्य प्रशासन विभागामध्ये भटक्या विमुक्तांचा जो सन २००४ साली अनुशेष होता, सरकारी नोकरीतील जी पदोन्नतीची पदे होती, त्याबाबत हायकोर्टातून स्थगिती आली. सन २००४ ते सन २००८ ही स्थगिती कायम होती. आम्ही त्याबाबत सुप्रीम कोर्टामध्ये जाऊन ही बंदी सन २००८ साली उठवली आणि आम्ही सरकारला सांगितले की, आता ही स्थगिती उठलेली असल्याने २५ हजार नोकऱ्यांचा अनुशेष ताबडतोब दूर केला पाहिजे. पदोन्नती दिली पाहिजे, पदोन्नतीच्या जागा ताबडतोब भरल्या पाहिजेत, असे सांगितले. त्यावेळी माननीय श्री. राजेश टोपे हे सामान्य प्रशासन राज्यमंत्री होते, त्यांनी जी. आर. काढला की, येत्या ६ महिन्यांमध्ये हा भटक्या विमुक्तांचा संपूर्ण अनुशेष त्वरित भरून काढला जाईल. दोन वर्षे झाली त्याला आजतागायत हा पदोन्नतीचा आणि नवीन नोकऱ्यांचा अनुशेष भरला गेलेला नाही. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, हा अनुशेष ताबडतोब किती दिवसांत दूर करणार याबाबतचे आदेश ताबडतोब द्यावेत.

[ श्री. प्रकाश शेंडगे ]

मी सीमा भागातील आमदार आहे. आपल्याला कल्पना आहे की, तेथे मराठी भाषेची गळचेपी होत आहे. येथे काही सन्माननीय सदस्यांनी मराठी शाळांचा मुद्दा उपस्थित केला. मला स्वत:ला कानडी शिकावे लागत आहे. माझ्या भागामध्ये तेथील लोकांना मराठी शिकवण्यासाठी मराठीचा विभागच नाही. मराठीसाठी काही सुद्धा या सरकारने केलेले नाही. माझ्यावर तेथे सक्तीने कानडी शिकण्याची वेळ आलेली आहे. माझी विनंती आहे की, सरकारने या सीमा भागातील मराठी भाषिकांसाठी एखादा विभाग सुरू केला पाहिजे.

अध्यक्ष महाराज, या मुंबई शहरामध्ये मुंबई बंदर आहे. आपण माथाडी कामगारांना, गिरणी कामगारांना घरे दिली. पण या मुंबई शहरातील जे ऐतिहासिक मुंबई बंदर आहे तेथे जवळपास ५० हजार मराठी कामगार काम करतात. ते झोपडपट्ट्यांमध्ये किडामुंग्यासारखे राहत आहेत. या कामगारांनाही मोफत घरे द्यावीत, अशी मी मागणी करतो व माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

**श्री. शिशिर शिंदे** (भांडूप-पश्चिम) **:** अध्यक्ष महाराज, मी सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, मी एका संवेदनशील विषयाला हात घालत आहे. या सभागृहातील सन्माननीय सदस्यांचा जो आमदार निधी आहे त्याबाबत आमदारांचे विशेषत: मुंबईतील आमदारांचे नियंत्रण सुटत चालले आहे. आमदार निधीतून जी कामे केली जातात त्यामध्ये प्रामुख्याने झोपडपट्टीत शौचालये बांधणे, गटारे बांधणे, समाज केंद्र उभारणे, पायवाटा बांधणे अशा प्रकारची कामे केली जातात. या कामासांठी फार मोठी कुशलता लागत नाही. एखाद्या झोपडपट्टीमध्ये तातडीने शौचालय बांधण्याची आवश्यकता असेल आणि त्याठिकाणी निविदा प्रक्रिया राबविली तर त्यामध्ये दोन-तीन महिन्यांचा कालावधी निघून जातो. अशावेळी झोपडपट्टीतील रहिवाशांनी काय करायचे ? मग ही मंडळी आमदारांकडे येतात. मुंबईमध्ये म्हाडामंडळ आहे त्यातील इमारती दुरुस्ती मंडळ आणि सुधार मंडळ आणि मुंबई गृहनिर्माण मंडळामार्फत तांत्रिक कामे केली जातात. त्याठिकाणी तांत्रिक कुशलता गरजेची असते. अशी कामे आपण टेंडरद्वारे करावीत. परंतु आमदार फंडातील कामांसाठी टेंडर पद्धत बंद करावी. हे कोणा अधिकाऱ्याच्या डोक्यात आलेले खूळ आहे त्यामुळे आमदारांच्या हक्कांवर गदा आलेली आहे.

अध्यक्ष महाराज, माझी आपणास नम्रपणे विनंती आहे की, पूर्वी प्रमाणे मजूर सोसायटी आणि सुशिक्षित बेरोजगारांना ५०-५० टक्के कामे वाटून द्यावीत. त्यावर आमदारांचे नियंत्रण राहते. आमदार हा लोकशाहीचा एक भाग आहे.

अध्यक्ष महाराज, मी शेवटचा एक मुद्दा मांडतो. मी याठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. कारण मी याठिकाणी मुद्दा उपस्थित केला होता की, मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर भारत-श्रीलंका यांच्यातील अंतिम सामना होत आहे आणि ही मॅच मुंबईत होत असल्यामुळे या मॅचचे समालोचन आकाशवाणीवर मराठी भाषेतून करण्यात यावे. त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी पाठपुरावा केला त्यामुळे आकाशवाणीवर मराठी भाषेत समालोचन झाले.

[ श्री. शिशिर शिंदे ]

अध्यक्ष महाराज, माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. या राज्याची भाषा मराठी आहे. परंतु जे कोणी मराठीचे डोईजड व्यावसायिक आहेत ते कोर्टात गेले आहेत. मराठी भाषेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, अशी माझी मागणी आहे. कोणीतरी उठून कोर्टात गेला आणि त्याने स्टे आणला. परंतु हा स्टे तहहयात नाही. तेव्हा आपण मराठी भाषेचा मान राखावा, अशी विनंती करून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**श्री. प्रशांत ठाकूर** (पनवेल ) **:** अध्यक्ष महाराज, मी सन २०११-२०१२ च्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, नव्या मुंबईच्या निर्मितीसाठी सिडकोने ९५ गावांची जमीन संपादित केली. १९७० पासून ज्या गावांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या त्याठिकाणी सिडकोने नव्या नव्या शहरांची निर्मिती केली. परंतु असे करीत असताना ज्या गावठाण्यांच्या जमिनी घेतल्या त्यांना नागरी सुविधा दिलेल्या नाहीत. आजही ती गावठाणे नागरी सुविधांपासून वंचित राहिलेली आहेत. या मोठ्या शहरांमध्ये ही गावठाणे छोटीशी झोपडपट्टी बनून राहिलेली आहेत. ज्या ज्या सामाजिक सोयी-सुविधा देण्याची आवश्यकता होती त्यामध्ये शाळा, मैदाने, सामाजिक सभागृहे असतील या सर्वांची कमतरता तेथे जाणवत आहे.

अध्यक्ष महाराज, माझ्या पनवेल तालुक्याचा विचार केला तर आज त्याठिकाणी साडेसात लाख लोकसंख्या आहे. त्याठिकाणी वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी सिडकोने हॉस्पिटल उभारण्याची गरज आहे. पण सिडकोने तसा साधा विचार देखील केलेला नाही. खारघर, कामोठा, कळंबोली, नवीन पनवेल अशी मोठमोठी टोलेजंग शहरे उभी राहिली आहेत. पण त्याठिकाणी सोयी-सुविधा नाहीत. या परिसरातील जी गावे आहेत त्या गावांच्या जमिनी सिडकोच्या नावावर नाहीत. त्या गावातील लोकांना उद्योगधंदे नाहीत, नोकऱ्या नाहीत असे असताना त्यांना स्वत:च्या जमिनीवर उद्योगधंदे उभारण्यासाठी सिडको ना-हरकत प्रमाणपत्र देत नाही, तेव्हा या बाबींचा विचार व्हावा, अशी विनंती करून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**श्री. विजयराज शिंदे** (बुलढाणा) **:** अध्यक्ष महाराज, मी सन २०११-२०१२ या वर्षाच्या अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महाराज, वेळ कमी असल्यामुळे मी फक्त एक-दोन सूचना करणार आहे. महाराष्ट्रातील अनेक नगरपालिकांमध्ये अंदाधुंद आणि गैरकारभार सुरू आहे. त्यावर कोणाचेही नियंत्रण नाही. तेव्हा नगरपालिकेच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी विधिमंडळामध्ये ज्या इतर समित्या आहेत त्याप्रमाणे एक समिती नेमण्यात यावी. या सभागृहात सन्माननीय सदस्य अनेक वर्षांपासून मागणी करीत आहेत की, नगरपालिकांसंदर्भात देखील विधानमंडळाची एक समिती नियुक्ती करावी. मी पुन्हा आपणास अशा प्रकारची मागणी करीत आहे.

[ श्री. विजयराज शिंदे ]

अध्यक्ष महोदय, माझ्या बुलढाणा शहरातील खडकपूर्णा पाणीपुरवठा योजना आपल्याकडे पडून आहे. आपण त्या पाणीपुरवठा योजनेला मंजुरी द्यावी. बुलढाणा सागवण सुंदरखेड हे विकास प्राधिकरण आपण नियुक्त करावे, ही मागणी देखील आपल्याकडे प्रलंबित आहे. आमदार निधीच्या कामासाठी नगरपालिका राजकारण करून एनओसी देत नाही. लोकांची विकास कामे स्वत: करीत नाही आणि आमदारांनाही करू देत नाही. त्यामुळे नगरपालिकेने १५ दिवसांत यासंदर्भातील एनओसी दिली नाही तर ती परवानगी समजण्यात यावी, असे आपण करावे.

अध्यक्ष महोदय, ४४(ई) ची अपात्र प्रकरणे केवळ सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक आहेत म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी अपात्र केल्यानंतर सुद्धा त्यास गेल्या ३-४ वर्षांपासून तात्पुरती स्थगिती देऊन आपल्याकडे अपात्र लोकांना पात्र करण्याचे आणि सत्ता भोगण्याचे काम या ठिकाणाहून सुरू आहे. माझी विनंती आहे की, गेल्या ३ वर्षांपासून आपण जेवढ्या अपात्र प्रकरणांना स्टे दिला आहे, तो स्टे तातडीने उठविला पाहिजे व अपात्र लोकांना घरी पाठविले पाहिजे. अध्यक्ष महोदय, आपण मला बोलाण्यास सांधी दिली, त्याबद्दल आपले आभार मानतो. जय महाराष्ट्र !

**श्री. रवींद्र वायकर** (जोगेश्वरी पूर्व) **:** अध्यक्ष महोदय, या ठिकाणी नगरविकास विभागाचे आणि म्हाडाचे सचिव उपस्थित आहेत. खरे म्हणजे माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे अतिशय गरजेचे आहे. मुंबई शहरात मुंबई महानगरपालिकेची आरजीपीजीची पॉलिसी आहे. सन २००० पासून आतापर्यंत आरजीपीजीची पॉलिसी झालेली नाही. सदर बाबतीत निर्णय घेणे अत्यंत गरजेचे आहे. शासन मुंबई महानगरपालिकेला डिमॉलिशनसाठी ४०० पोलीस देणार होते. तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात होकारार्थी उत्तर दिले होते. परंतु, त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. मुंबई महानगरपालिकेला डिमॉलिशनसाठी ४०० पोलिसांचा स्टाफ देणे अत्यंत गरजेचे आहे. सन १९९५ चा नियम मुंबई महानगरपलिकेमध्ये लावल्यानंतर सन १९९५ ची झोपडी प्रोटेक्टेड होऊ शकते तर आरे वसाहतीमध्ये सन १९९५ चा नियम का लावला जात नाही ? अध्यक्ष महोदय, हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. मुंबई महानगरपालिकेच्या अनुदानाची रक्कम १ हजार ६७ कोटी रुपये आहे, ते तत्काळ देण्यात यावे.

अध्यक्ष महोदय, मराठी भाषा विभागाला एक वर्ष होऊन गेले आहे. ना घर का, ना घाट का, अशी स्थिती त्या विभागाची झाली आहे. मराठी भाषेच्या विकासासाठी एक राज्यमंत्री आणि पूर्णवेळ सचिव यांची नियुक्ती करण्यात यावी. अर्थसंकल्पामध्ये त्यासाठी ९ कोटी ५२ लाख रुपयांचा निधी आहे आणि त्याची मागणी जवळजवळ तीनशे कोटी रुपयांची आहे, त्याला तेवढ्याच पध्दतीने निधी देण्यात यावा, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाने एसआरए योजनेच्या बाबतीत निर्णय घेतला आहे. शासनाने २२५ चौ. फू. ऐवजी आता २६९ चौ. फू.चा निर्णय घेतला आहे. परंतु, अनेक सोसायट्या तशाच पध्दतीने राहून गेलेल्या आहेत. आपण एक वर्षाचा कालखंड दिला होता. दिनांक १६ एप्रिल, २००८ रोजी या संदर्भातील पहिला शासन निर्णय काढण्यात आला, दुसरा शासन निर्णय दिनांक ११ जून, २००८ रोजी काढण्यात आला.

[ श्री. रवींद्र वायकर ]

सुरू असलेल्या सोसायट्यांनी एक वर्षाच्या कालखंडात आपला प्रस्ताव दिला नाही तर पुढच्या २६९ चौ. फू.चे बांधकामाचे क्षेत्रफळ मिळणार नाही तर ते चुकीचे होत आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या परिसरामधील जेवढ्या झोपड्या आहेत, त्या तशाच राहून त्यामध्ये डिस्प्युट निर्माण झाले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, आपण २६९ चौ. फू. चा जो निर्णय घेतला आहे, तो सर्वांना कंटिन्यू लागू करावा. आपण तशाप्रकारे निर्णय द्यावा, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

**प्रा. फौजिया खान** (सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) **:** अध्यक्ष महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या चर्चेला उत्तर देण्यासाठी मी उभी आहे. समान्य प्रशासन विभागाच्या चर्चेमध्ये आदरणीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) व अन्य सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आहे. मी त्यांच्या सूचनांचे स्वागत करते. सामान्य प्रशासन विभागाच्या चर्चेसंदर्भात मला काही गोष्टी सांगावयाच्या आहेत. गतीमान, पारदर्शक आणि चांगले प्रशासन व्हावे, यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून वेगवेगळ्या प्रकारचे प्रयत्न आपण करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, आदरणीय विरोधी पक्षनेत्यांनी या ठिकाणी पेपरलेस मंत्रालयाबाबतचा उल्लेख केलेला आहे. मला येथे सांगावयास आनंद होतो की, ई-गव्हर्नन्समध्ये महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेतलेला आहे. ई-गव्हर्नन्सची पॉलिसी राज्य शासनाने तयार केली असून ड्राफ्ट पॉलिसी शासनाने वेबसाईटवर टाकलेली आहे. प्रत्येक विभागामध्ये ई-गव्हर्नन्सचे व्हिजन तयार व्हावे, ॲक्शन प्लॅन तयार व्हावा, प्रत्येक विभागाने त्याची अंमलबजावणी करावी आणि जास्तीत जास्त गतीमान आणि पारदर्शक पध्दतीने आपल्या विभागाचा कारभार करण्याचा प्रयत्न करावा, अशा पध्दतीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या पॉलिसीच्या अनुषंगाने प्रत्येक विभागासाठी ०.५ टक्के अर्थसंकल्पीय तरतूद करण्याचेही शासनाने ठरविले आहे. मला हे सांगण्यास आनंद होतो की, अशा प्रकारची पॉलिसी तयार करणारे आपले राज्य हे भारतात पहिले राज्य ठरले आहे. त्याचप्रमाणे मॅंडेटरी डिलिव्हरी ऑफ सर्व्हिसेस ॲक्ट प्रस्तावित करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरलेले आहे.

अध्यक्ष महोदय, सिटिझन्सना चांगल्या प्रकारची, इफेक्टिव्ह सर्व्हिस मिळावी, ही शासनाची भूमिका आहे. याचा एक भाग म्हणून कॉमन सर्व्हिस सेंटर स्थापन करण्याची पॉलिसी आपल्या राज्याने रोलआऊट केली आहे. ही सेंटर्स गाव पातळीवर सुरू करण्यात आली आहेत. गावामध्ये लोकांना डोअरस्टेप सुविधा मिळावी, त्यांना ७/१२ उतारा, बर्थ सर्टिफिकेट, इतर डॉक्युमेंटस् डोअरस्टेप उपलब्ध व्हावीत, त्यांना शहरात असलेल्या तहसीलदारांकडे किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे चकरा माराव्या लागू नयेत, यासाठी कॉमन सर्व्हिस सेंटर स्थापन करण्याचे काम सामान्य प्रशासन विभागाच्या आयटी विभागाच्या माध्यमातून होत आहे.

अध्यक्ष महोदय, प्रशासकीय कामकाजात एम.एस.वॅनच्या माध्यमातून कनेक्टिव्हिटी तयार करण्यात आली आहे. मंत्रालय आणि सर्व रिजनल, डिस्ट्रिक्ट ऑफिसेस यांना या माध्यमातून कनेक्ट केले आहे.

[ प्रा. फौजिया खान ]

अध्यक्ष महोदय, मंत्रालयामध्ये फाईल ट्रॅकिंग सिस्टिम देखील सुरू केली आहे. ई-गव्हर्नन्सचा विचार करतांना ई-टेंडरिंग बाबत माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. प्रत्येक विभागामध्ये ही पध्दती सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली होती. मला येथे सांगावयाचे आहे की, माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दिनांक ६ ऑगस्ट, २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक १ डिसेंबर, २०१० पासून शासनाची खरेदी-विक्री निविदा ई-टेंडरिंग पध्दतीनुसार करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार दिनांक ३१ मार्च, २०११ पर्यंत एकूण १५० निविदा ई-टेंडरिंग पध्दतीने खुल्या करण्यात आल्या आहेत. तसेच, ५६ निविदा विविध टप्प्यांवर आहेत. हळूहळू प्रत्येक विभागामध्ये ई-टेंडरिंग पद्धतीने निविदा प्रक्रिया व्हावी, यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

अध्यक्ष महोदय, आदरणीय विरोधी पक्षनेत्यांनी असा उल्लेख केला होता की, शासनाची वेबसाईट अद्ययावत नाही. मला येथे सांगावयाचे आहे की, शासनाची वेबसाईट वेळोवेळी अद्ययावत केली जाते. माननीय मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातील इतर सर्व मंत्री महोदयांची नांवे आणि त्यांचा पोर्टफोलिओ या वेबसाईटवर आहे. याशिवाय वेबसाईट हॅक होऊ नये, याबाबतची सुरक्षितता बाळगण्यात आली आहे. इंटरनेटच्या माध्यमातून येणाऱ्या माहितीची चाळणी करण्यासाठी आयडीपी २५० फोर्टिजेट फायरवॉल आणि इनबिल्ट आयपीएस इंजिनची व्यवस्था करण्यात आली आहे.

**श्री. प्रकाश शेंडगे :** अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी शपथविधी कधी घेतला आणि त्यांचे नाव वेबसाईटवर कधी अपडेट करण्यात आले, याची माहिती माझ्याकडे आहे.

**तालिका सभाध्यक्ष** (श्री. नवाब मलिक) **:** माननीय मंत्र्यांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. त्यांच्या उत्तराच्या भाषणा दरम्यान सन्माननीय सदस्यांनी कोणतेही मुद्दे उपस्थित करू नयेत.

**प्रा. फौजिया खान :** अध्यक्ष महोदय, शासनाच्या दस्तऐवजांचे डिजिटलायझेशन करण्यात येत आहे. दिनांक ३१ मार्च २०११ पर्यंत विविध मंत्रालय विभागांचे १ कोटी, २० लाख, ७३ हजार, २४५ पानांचे डिजिटलायझेशन पूर्ण झाले आहे.

अध्यक्ष महोदय, संगणकीकरणाच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने प्रकरण सादरीकरण करण्याकरिता माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून पथदर्शी तत्त्वावर डी.जी.गव्हर्नमेंट प्रणाली राबविण्यासाठी येत आहे. त्यामधील त्रुटी व उणिवा तपासून आणि आवश्यक त्या सुधारणा करून यापुढे ही प्रणाली मंत्रालयात राबविण्याचे प्रस्तावित आहे. महाराष्ट्र शासन आणि टीसीएस यांच्या जॉईंट व्हेंचरने हे काम आपण करणार आहोत.

अध्यक्ष महोदय, प्रत्येक विभागामध्ये इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट सिस्टिम राबविण्याबाबत सर्व विभागांना आदेशित केले आहे. प्रत्येक विभागामध्ये या पद्धतीचे काम सुरू झालेले आहे. वेगवेगळे इनोव्हेटिव्ह प्रोग्रॅम्स घेण्याची प्रक्रियाही सुरू झाली आहे. उदाहरण म्हणून सांगते की, एमपीएससीमध्ये ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याचे काम सुरू झालेले आहे.

**[ प्रा. फौजिया खान ]**

अध्यक्ष महोदय, युनिकोडचा वापर करण्याबाबत प्रत्येक विभागाला आदेश दिलेले आहेत. युनिकोडचा वापर प्रभावीपणे होण्यासाठी संबंधितांना आवश्यक प्रशिक्षणही देण्यात येत आहे. याशिवाय इफेक्टिव्ह गव्हर्नन्स व्हावे, यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून राजीव गांधी गतीमान पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्काराची रक्कम यापूर्वी ५ लाख रुपये होती, ती आता १० लाख रुपये करण्यात आली आहे. नवीन प्रकारचे बदल होत असताना प्रत्येक जिल्ह्यामध्ये ज्या नवीन इनोव्हेटिव्ह गोष्टी आहेत, त्यांचे आदानप्रदान, शेअरिंग ऑफ बेस्ट प्रॅक्टिसेस या तत्त्वावर करण्याचे ठरविले आहे. ही बाब सर्व विभागांना मॅडेटरी करून प्रत्येक जिल्ह्यामध्ये त्याचा अवलंब व्हावा, असा प्रयत्न शासनाकडून करण्यात येत आहे. शासन सेवेमध्ये सी. आर. लिहिण्याची जी पद्धत आहे त्यामध्ये बदल करून तो सी. आर. ऑब्जेक्टिव्ह आणि चांगल्या पद्धतीने लिहिण्याचा निर्णय घेण्याबाबत पुढाकार घेण्यात आलेला आहे. लोक आयुक्त कार्यालय अधिक सक्षम करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. शासनाने 'ई'गव्हर्नन्स सेवा सुरू करण्याचा अतिशय स्तुत्य असा निर्णय घेतला आहे. शासन प्रशासनामध्ये पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न करीत आहे.

**(अध्यक्षस्थानी-माननीय अध्यक्ष)**

अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी रिक्त पदांच्या बाबतीत एका मुद्द्यांचा उल्लेख केला आहे. त्याबाबत प्रशासकीय विभागाची एकत्रित माहिती मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छिते. दिनांक ३१ डिसेंबर २०१० रोजी गट-अ ची ३१ टक्के, गट-ब ची २३ टक्के, गट-क ची १२ टक्के आणि गट-ड ची १२ टक्के पदे रिक्त आहेत. प्रशासकीय विभागाकडून गट-अ ची राजपत्रित पदे भरण्यात येतील. गट- ब ची अराजपत्रित आणि गट-क ची पदे विभाग प्रमुखांच्या माध्यमातून भरण्यात येतात. गट-ड ची पदे कार्यालय प्रमुखांच्या माध्यमातून भरण्यात येतात. सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून पदे भरण्याबाबत वेळवेळी सूचना देण्यात येतात. जे विभाग प्रमुख आहेत त्यांना पदे भरण्याच्या बाबतीत सूचना देण्यात आलेल्या आहेत. विहित पध्दतीने ही पदे लवकरात लवकर भरली जावी, यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडून आढावा घेण्यात येत आहे. रिक्त पदांचा अनुशेष मोठा आहे किंवा जेथे पदे भरण्याची तातडी आहे, असे प्रस्ताव तपासण्यासाठी प्रधान सचिव (सेवा), यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली असून या समितीकडे पदे भरण्याबाबतचे प्रस्ताव पूर्ण समर्थनासह सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. चार प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखाली गट- क मधील पदे भरण्यास विधी विभागाने मान्यता दिलेली आहे. गट-क आणि गट-ड ची पदे भरण्यावर काही कालावधीसाठी शासनाने बॅन आणलेला होता, तो दिनांक २९ ऑक्टोबर २०१० रोजी उठविण्यात आलेला आहे. काही विभागांना पदे भरण्याबाबत परवानगी देण्यात आलेली आहे.

**श्री. गिरीश बापट :** अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांच्या भाषणात मी अडथळा आणू इच्छित नाही. परंतु मंत्री महोदया जे सांगत आहेत, त्यामध्ये त्यांनी अ,ब,क व ड वर्ग यांची साडेबारा टक्के पदे रिक्त आहेत असे सांगितले आहे. गेल्या पाच ते सहा वर्षापासून भरती झालेली नाही. आता अनेक लोक सेवानिवृत्त होत आहेत. आमच्या माहितीनुसार साडेबारा टक्के पेक्षा जास्त पदे रिक्त आहेत. त्यांच्याकडे आता माहिती नसेल तर त्यांनी ती माहिती नंतर द्यावी. आम्ही जी माहिती गोळा केली व आपण जी सांगितली त्यामध्ये तफावत आहे. वर्ग तीन व वर्ग चार ची साडेबारा टक्के पदे रिक्त असल्याची माहिती दिली आहे. ती शंकास्पद वाटते. करेक्ट माहिती मिळावी अशी आमची इच्छा आहे. आपण माहिती नंतर दिली तरी चालेल.

**प्रा. फौजिया खान :** अध्यक्ष महोदय, माझ्याकडे जी माहिती आहे, ती मी आता सांगितली आहे. सन्माननीय सदस्यांनी जी माहिती सांगितली ती तपासून पुन्हा सभागृहाला सादर करण्यात येईल. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या मानधनाबाबत मुद्दा उपस्थित केला होता मला सांगण्यात आनंद होतो की, त्यांचे मानधान आठ हजार रुपयांवरून दहा हजार रुपये करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे हुतात्मांच्या संदर्भातील मानधन आठ हजार रुपयांवरून दहा हजार रुपये करण्यात आले आहे.

अध्यक्ष महोदय, एअरपोर्ट डेव्हलपमेंटसाठी एक पॉलिसी शासन तयार करीत आहे. प्रत्येक जिल्ह्यात एअरपोर्ट असावे अशी मागणी आहे. त्यासंदर्भात एक प्लॅन तयार करण्यात येत आहे. एअरपोर्ट डेव्हलपमेंट पॉलिसी करण्याचे काम शासन स्तरावर चालू आहे. माहिती आणि जनसंपर्क विभागात एक सर्वकष पॉलिसी करण्याचे काम शासन करीत आहे. ॲडव्हर्टाईजमेंट असो, अधिस्वीकृती असो. या सर्वांचा समावेश असणारी एक प्रपोज पॉलिसी तयार करण्यात येत आहे. माहिती व जनसंपर्क कार्यालयांचे आधुनिकीकरण प्रत्येक जिल्ह्यात करण्यात आले आहे. मागील दुर्मिळ अभिलेख्यांचे डिजिटीलाईझेशन केले आहे. यामध्ये लोकराज्य, जय महाराष्ट्र या मासिकांच्या माध्यमातून शासनाने घेतलेले निर्णय लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम करण्यात येते. या शिवाय दोन मागण्यांचा मी येथे उल्लेख करणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य कृषिभूषण साहेबराव पाटील यांनी असा मुद्दा मांडला होता की, शासनाच्या जी.आर.ची प्रत सर्व आमदारांना पाठविण्यात आली पाहिजे. आतापर्यंत जी.आर. ची प्रत पाठविण्यात येत नाही. मी आश्वासन देऊ इच्छिते की, यानंतर प्रत्येक आमदारांना जी.आर. ची प्रत पाठविण्यात येईल.

**अध्यक्ष :** वेबसाईटवर जी.आर. ची प्रत असते. आमदारांकडे इतके पेपर येतात ते आपण वाचता काय ?

**प्रा. फौजिया खान :** अध्यक्ष महोदय, वेबसाईटवर जी.आर.ची प्रत असते. हे खरे आहे. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी भटक्या विमुक्त जातीच्या अनुशेषांबाबत उल्लेख केला आहे. यासंदर्भातील आढावा घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्याचे काम करण्यात येईल. सामान्य प्रशासन विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करते व माझे भाषण संपविते.

**अध्यक्ष :** मंत्री महोदयांच्या उत्तराने समाधान झाले तर समाधान झाले, असे सांगावयास पाहिजे. यावर प्रश्नोत्तरे होणार नाहीत.

**श्री. पृथ्वीराज चव्हाण** (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, दुपारी अडीच वाजल्यापासून जवळजवळ सात ते साडेसात तास अतिशय महत्त्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा झालेली आहे. सभागृहामध्ये चर्चेला सुरुवात करताना माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) साहेबांनी आपल्या नेहमीच्या पद्धतीने अनेक विषयांना स्पर्श करून अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. जवळजवळ ३५ सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतलेला आहे. मी या चर्चेमध्ये भाग घेणाऱ्या सन्माननीय सदस्यांची नावे सांगून सभागृहाचा वेळ घेणार नाही. मी सांगू इच्छितो की, मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने सभागृहात अत्यंत उपयुक्त अशी चर्चा झालेली आहे. खूप महत्त्वाच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत आणि सन्माननीय सदस्यांनी शासनाकडून काही माहितिची अपेक्षा केलेली आहे, काही निर्णयांची अपेक्षा केलेली आहे. मला असे वाटते की, महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने वाढत्या नागरिकरणाच्या समस्यांच्या संदर्भात या मागण्या अतिशय महत्त्वाच्या आहेत आणि त्यावरील चर्चाही तितकीच महत्त्वाची आहे. सन्माननीय सदस्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, नागरी प्रशासन हा एक अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार जवळजवळ ५० टक्के लोकसंख्या आज नागरी लोकसंख्या झालेली आहे आणि ही लोकसंख्या वाढतच जाणार आहे. त्यामुळे नागरिकरणाच्या समस्या, परवडणाऱ्या घरांच्या समस्या, नागरी भागामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, लोकसंख्येची घनता मग त्यामध्ये वाहतुकीचे विषय असतील, पाण्याचे विषय असतील, घन कचऱ्याचे विषय असतील हे शासना समोर सर्वात मोठे आवाहन आहे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, माझ्या सहकारी राज्यमंत्री प्रा. फौजिया खान यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या काही मुद्द्यांची उत्तरे दिलेली आहेत. सामान्य प्रशानाबद्दल शासनाची काय भूमिका आहे, शासन कशा प्रकारे काम करीत आहे हे त्यांनी सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. कदाचित माननीय राज्यमंत्री महोदयांनी सामान्य प्रशासन विभागाच्या एका मुद्याला स्पर्श केलेला नाही. मी माझ्या विषयाकडे वळण्यापूर्वी सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित असलेल्या मुद्यासंदर्भात सभागृहाला माहिती देऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) साहेबांनी माहितीच्या अधिकाराबद्दल काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यांनी सांगितले की, माहितीच्या अधिकारात मागविलेली माहिती देताना पुणे जिल्ह्यामध्ये "फक्त माहितीकरिता, परंतु कायदेशीर बाबीकरिता नाही" अशा प्रकारचा शिक्का मारला जातो. मी सांगू इच्छितो की, अशा प्रकारच्या कोणत्याही सूचना देण्यात आलेल्या नाहीत. किंबहुना माहितीच्या कायद्यानुसार अशा गोष्टीला समर्थन देता येणार नाही. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी यासंदर्भात माहिती दिलेली आहे. मी निश्चितपणे पुणे जिल्ह्यातील माहिती घेऊन अशा प्रकारचा शिक्का मारला जातो काय, याबाबतची माहिती घेईन.

[ श्री. पृथ्वीराज चव्हाण ]

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मंगल प्रभात लोढा यांनी ब्लॅकमेल करण्यासाठी माहितीच्या अधिकाराचा उपयोग होतो असा मुद्दा उपस्थित केला होता. आपल्याला माहिती आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा केंद्र शासनाचा अधिनियम आहे. त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार केंद्र शासनाला आहे आणि सद्य:स्थितीमध्ये अधिनियमाच्या तरतुदीनुसार कायद्याप्रमाणे माहिती देणे क्रमप्राप्त आहे. मी सांगू इच्छितो की, मी केंद्र शासनामध्ये मंत्री असताना २-३ वर्षे या कायद्याचे संचलन केले होते. ५ वर्षांचा अनुभव घेऊन या कायद्यामध्ये बदल करावा अशी त्यावेळी तयारी झाली होती. मला खात्री आहे की, भविष्यात हा कायदा अधिक बळकट करण्याकरिता, या कायद्यातील पळवाटा बंद करण्याकरिता आणि दुरुपयोग होत असेल तर तो बंद करण्याकरिता केंद्र शासन निश्चितपणे काही प्रयत्न करील.

अध्यक्ष महोदय, मी मराठी भाषा विभागासंबंधी सभागृहाला सांगू इच्छितो की, शासनाने भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था, मराठी विश्वकोश मंडळ किंवा राज्याचे साहित्य व सांस्कृतिक मंडळ इत्यादी विभागांना एकत्रित करून एका छत्राखाली आणले. मराठी भाषा विभाग स्वतंत्रपणे सुरू झाल्याची बाब आपणा सर्वांना माहिती आहे. या विभागाला बळकटी देण्यासाठी शासनाने नुकतीच मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीने मराठी भाषा विभागाच्या कामासाठी नव्याने ३५ पदे मंजूर केली आहेत. ही पदे लवकरात लवकर भरण्या संबंधीची प्रक्रिया सुरू आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याचे राजभाषा धोरण ठरविण्याकरिता एक उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे. त्यात राज्याचे राजभाषा धोरण ठरविणे, विविध कोश अद्ययावत करणे तसेच परिभाषा कोशांची निर्मिती वगैरे कामे त्या समितीकडे सोपविण्यात आली आहेत. अध्यक्ष महोदय, सन २०११-२०१२ मध्ये मराठी भाषा विभागातर्फे पुढील योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. मुंबईत भाषा धोरण स्थापन करणे, बोली भाषा अॅकॅडमी करणे, विविध क्षेत्रांमध्ये मराठी भाषेचा वापर व्हावा यासाठी स्पर्धा व बक्षीस योजना तयार करणे, प्रसिध्द पुस्तकांच्या श्राव्यांचा संगणकासाठी वापर करता यावा यासाठी आवृत्तीनिहाय श्राव्य तयार करणे, अमराठी लोकांना मराठी भाषेचे प्रोत्साहन देण्यासाठी संस्थात्मक उपक्रम तयार करणे इत्यादी.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी मराठी भाषेच्या वेबसाईट संबंधीचा मुद्दा उपस्थित करून सदर वेबसाईट अद्ययावत नसल्यासंबंधी अनेक तक्रारी केल्या आहेत. वेबसाईटची माहिती अद्ययावत ठेवण्यासंबंधी शासनातल्या सर्व विभागांची जबाबदारी आहे. त्या अनुषंगाने मी सर्व विभागांना सूचना दिलेल्या आहेत की, सर्व विभागांनी आपापल्या विभागातील माहिती अद्ययावत ठेवली पाहिजे. अध्यक्ष महोदय, सदर वेबसाईट हॅक होण्याचे पूर्वी काही प्रकार घडले होते. परंतु आता युनिकोडवर आधारित नवीन वेबसाईट तयार करण्याचे काम सुरू आहे. जुनी वेबसाईट सुरू आहे. त्यासाठी सर्व सुरक्षित बाबी तपासून, युनिकोडवर मराठी भाषेचा सहजपणे वापर करता येतो. इतकेच नव्हे तर मराठी भाषेच्या विविध संकेत स्थळांच्या नावांसाठी मराठी भाषेचा वापर करता येईल. अशा प्रकारची योजना लवकरच अंमलात येत आहे.

**[ श्री. पृथ्वीराज चव्हाण ]**

अध्यक्ष महोदय, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देणे, हे आपल्या सर्वांसमोरील एक महत्त्वाचे आव्हान आहे. यासाठी वर्गीकरण करण्याकरिता केंद्र शासनाच्या सांस्कृतिक विभाग मंत्रालयाने काही निकष निर्धारित केलेले आहेत. त्या निकषानुसार मराठी भाषेतील तज्ज्ञ, इतिहास तज्ज्ञ, किंवा प्रसिध्द साहित्यिक असतील या सर्वांमार्फत अभ्यास करून एक अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. केंद्र शासनाच्या निकषानुसार मराठी अभिजात भाषेच्या दर्जाच्या निकषात कशी बसू शकेन यासाठी सदर अहवाल केंद्र शासनाकडे सादर केला जाईल.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) आणि श्री. शिरीष कोतवाल यांनी न्यायालयामध्ये मराठी भाषेचा वापर करण्यासंबंधी मुद्दा उपस्थित केला होता. राज्यातील जिल्हा स्तरावरील सर्व फौजदारी व दिवाणी न्यायालयांची काही वर्जित प्रयोजने वगळून तेथे मराठी असावी असे शासनाने घोषित केले होते. त्यानुसार उच्च न्यायालयाने दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना मराठीतून कामकाज करण्याचे निदेश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील इतर दुय्यम न्यायालयांमध्ये दाखल करण्यात येणारे सर्व दावे मराठीतूनच दाखल करण्याच्या सूचना संबंधित विभाग व कार्यालय प्रमुखांना दिल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, उच्च न्यायालयात मराठीचा वापर करण्यासंबंधी विधी व न्याय विभागाकडून तपासनी केली जात आहे. संगणकाचा वापर करून, न्यायालयांमध्ये मराठी भाषेचा वापर कशा प्रकारे करता येईल यासंबंधी उच्च न्यायालयाच्या सर न्यायाधीशांनी नुकतीच शासनाकडे विचारणा केली होती. तसेच शासनाच्या स्वान नावाच्या योजनेअंतर्गत प्रत्येक न्यायालयाला जोडून, त्या स्तरावरून मराठी भाषेत कामे करता यावीत यासाठी कशी सोय होऊ शकेल यासंबंधी त्यांनी विचारणा केली आहे. त्या अनुषंगाने शासनाकडून पूर्ण तयारी करून त्यानुसार पुढील पावले टाकली जात आहेत.

अध्यक्ष महोदय, श्रीमती मीनाक्षी पाटील यांनी संत व साहित्य वाङ्.मय पुनर्मुद्रित करण्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला होता. मराठीतील प्रसिध्द ग्रंथाचे पुनर्मुद्रण करणे हे शासनाचे प्रमुख धोरण आहे. अशा अनेक संत साहित्यिकांच्या वाङ्.मयाचे पुनर्मुद्रण करून त्याचे जतन केले जाणार आहे. ते सीडीवर घेतल्या जाणार आहेत. इलेक्ट्रॉनिक माध्यमांना त्याचा उपयोग होणार आहे. श्वाव्य ग्रंथ आपल्याला भविष्यात संगणकावर सुद्धा ऐकण्यास मदत होणार आहे. अशा प्रकारे शासनाचे प्रयत्न असणार आहे.

अध्यक्ष महोदय, दिनांक १ मे, २०१० पासून राज्यभर सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले होते. त्यामध्ये मराठी साहित्यांवर चर्चासत्र आणि कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या. तसेच अनेक जिल्ह्यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी ग्रंथांची प्रदर्शने भरविली गेली होती. उदा. दिनांक २७ जानेवारीला नागपूर येथे मराठी भाषा दिवसानिमित्त एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मराठी ग्रंथांच्या संवर्धनासाठी निधी कमी पडणार नाही, याची मी सर्वांना ग्वाही देतो. उत्तम पुस्तकांचे भाषांतर आणि सांस्कृतीक ठेव्यांचे जतन करण्यासाठी शासनाने नेहमीच प्रोत्साहनाची भूमिका घेतलेली आहे. यासंदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी उपयुक्त अशा सूचना केलेल्या आहेत. त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. मराठी भाषा विभाग नवा असल्यामुळे आपल्याला अनेक उपक्रम राबविता येणार आहेत. मराठी भाषेला समृध्द करण्याबद्दल, मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याबद्दल योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

त्याचबरोबर न्यायालये किंवा ज्या ठिकाणी वैद्यकीय शिक्षण असेल अशा ठिकाणी जास्तीत जास्त मराठीचा वापर कसा करता येईल याकडे देखील प्राधान्याने लक्ष देणार आहोत. यासाठी निधी कमी पडू दिली जाणार नाही. अशा प्रकारचे मी आश्वासन सर्व सन्माननीय सदस्यांना देत आहे.

अध्यक्ष महोदय, मी आता नगरविकास खात्याच्या संदर्भात बोलणार आहे. नागरी प्रशासन, नागरी पायाभूत सुविधा किंवा नागरी नियोजन या तीन महत्त्वाच्या गोष्टी आहेत. यामधील काही कायदे कालबाह्य झालेले आहेत ही बाब देखील मला मान्य आहे. शहरीकरणाच्या संदर्भात मोठमोठे प्रोजेक्ट असतील, वाहतुकीचे प्रोजेक्ट असतील किंवा घरांचे मुद्दे असतील या मुद्यांच्या संदर्भात सर्वंकष विचार करण्याची गरज आहे, असे मला वाटते. यासंदर्भातील घेण्यात आलेले निर्णय योग्य नव्हते असे आपल्या सर्वांना वाटत आहे, यामध्ये बदल करणे हे गरजेचे आहे. तसेच यामध्ये मोठे घोटाळे झालेले आहेत, त्याची सुद्धा विस्तृत चर्चा माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केलेली आहे. त्यांनी अनेक गैरव्यवहाराच्या प्रकरणांचा उलगडा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या गैरव्यवहाराच्या प्रकरणांची तपासणी करून पुढील उचित कार्यवाही केली जाणार आहे. यामध्ये आपल्या धोरणात काही तरी चूक झालेली आहे, ही बाब आपल्या सर्वांनाच दिसून येत आहे. यामध्ये बदल करणे गरजेचे आहे. यामध्ये मार्केट डिटर्मिनंट प्राईसेस म्हणजे स्पर्धेतून खरी किंमत किती आहे हे प्रथम शोधले पाहिजे. यामध्ये एकच निविदा असेल आणि ती एकाच निविदेकाराला दिली तर ते योग्य असणार नाही. त्यामुळे आपल्याला योग्य ती किंमत कळून येत नाही. यामध्ये मार्केट डिस्कवर्ट प्राईसेस त्यामध्ये नसतात. यामध्ये निश्चित बदल करण्याची गरज आहे. या विषयाच्या संदर्भात योग्य ती चर्चा सुरू अूसन लवकरच निर्णयाप्रती येणार आहोत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नवाब मलिक यांनी मुंबई महानगरपालिकेतील प्रकल्पाची अंमलबजावणी अतिशय संथ गतीने होत असल्याबद्दल टीका केली होती. मुंबईतील एमयुटीपीचा ३७०० कोटी रुपयांचा प्रकल्प पूर्ण झालेला आहे. यामध्ये जोगेश्वरी-विक्रोळी जोड रस्ता किंवा सांताक्रुज-चेंबुर जोड रस्त्याचे काम ८०० कोटी रुपये खर्च करून या वर्षाच्या अखेरीपर्यंत पूर्ण केला जाणार आहे. यामधील संबंधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे, ही महत्त्वाची गोष्ट आहे. एमयुटीपीच्या दुसऱ्या टप्यातील ५३ कोटी रुपयांची कार्यवाही सुरू आहे. याकरिता जागतिक बँकेकडून १९०० कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध झालेले आहे. रेल्वेचा टप्पा पूर्ण झाल्यानंतर प्रवासी गाड्यांची संख्या वाढण्यास मदत होणार आहे. प्रवासी गाड्यांमधील प्रवासी संख्या ५ हजारांवरून ३ हजारापर्यंत कमी होणार आहे. हे मला या ठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटत आहे. मुंबईतील वर्सोवा-घाटकोपर-अंधेरी प्रकल्पावर २४०० कोटी रुपये खर्च करण्यात येत आहे. या वर्षअखेर त्याच्या चाचण्या सुरू होणार आहेत आणि मला वाटते की, पूर्ण वाहतूक एक ते दोन महिन्यात सुरू होणार आहे. चारकोप-बांद्रा-मानखुर्द या मेट्रो रेल्वे मार्गाची तयारी पूर्ण झालेली आहे. सन २०१४ पर्यंत हा प्रकल्प पूर्णत्वास येईल, असे नियोजन आहे. उर्वरित मेट्रो रेल्वे मार्ग टप्प्या टप्प्याने पूर्ण करण्यात येतील. नवी मुंबईतील बेलापूर-तळोजा-नवी मुंबई विमानतळ हा प्रकल्प टप्प्या टप्प्याने पूर्ण केला जाणार आहे. त्यापैकी बेलापूर ते पेंढार या प्रकल्पाचे भूमीपूजन पुढील महिन्यात केले जाणार आहे. जेकब सर्कल ते वडाळा, चेंबूर हा मोनो रेल्वेचा

[ श्री. पृथ्वीराज चव्हाण ]

२० किमी लांबीचा प्रकल्प या वर्षी पूर्ण होणार आहे. पूर्व मुक्त मार्ग (ईस्टर्न फ्री वे) हा मार्ग बीपीटी मधून जातो. मुंबई शहर व उपनगर येथील वाहतूक अधिक गतीमान होण्याकरिता कुलाबा म्युझियम ते आणिक पांजरपोळ हा मार्ग हाती घेण्यात आलेला आहे. मी राज्याचा मुख्यमंत्री या पदावर आल्यानंतर केंद्रीय उद्योग विभागाला एक पत्र लिहिले होते. या मार्गामध्ये सॉल्टेड लँडचा ८०० किमीचा पट्टा आहे. मंत्री गटाचे सदस्य माननीय श्री. चिदंबरम आहेत. त्यांना मी या मार्गाच्या संदर्भात पत्र लिहिले होते. त्यांनी ८०० कि.मी.च्या सॉल्टेड लँडमधून रस्ता जाण्यास परवानगी दिलेली आहे. आता हा प्रकल्प करण्यास कोणतीही अडचण येणार नाही. पुढील वर्षाच्या मार्च महिन्यात हा मार्ग पूर्ण होणार आहे. सहार उन्नत मार्ग (सहार एलेव्हेटेड रोड) पश्चिम द्रुतगती महामार्ग ते आंतरराष्ट्रीय विमानतळ हा मार्ग बांधण्याचे काम सुरू आहे. हा मार्ग मे २०११ पर्यंत वाहतुकीसाठी खुला होणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बाबा सिद्दिकी यांनी भाडे तत्त्वावरील घरांच्या संदर्भात काही मुद्दे उपस्थित केले आहेत. महानगरपालिका परिसरात येत्या २ वर्षात २ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट होते. घराच्या बांधकामासाठी ४८ प्रस्ताव तत्वत: मान्य झालेले आहेत. त्यापैकी १४ प्रकल्प सुरू झाले असून त्यामधून प्राधिकरणाला १५ हजार घरे प्राप्त होतील, अशी अपेक्षा आहे. ही घरे कोणी बांधायची, कोठे बांधायची, जागा कोणी निवडायची, कशी निवडायची, तसेच तेथे पायाभूत सुविधा नसतील तर तेथे घरे बांधल्यानंतर कोण राहायला येणार व ते लोक काम करण्यासाठी कोठे जाणार अशा प्रकारचे अनेक प्रश्न निर्माण झाले होते. तसेच या घरांचे रिपेअर व मेंटेनन्स कोण करणार या बाबत देखील प्रश्न उपस्थित झाले होते. या पुढे भाडे तत्वावरील घरे कोठे बांधावी, या बाबत शासन नियोजन करणार आहे. पूर्वी एखादा विकासक जमीन जेथे उपलब्ध असेल तेथे प्रोजेक्ट सुरू करीत होता. त्या ठिकाणी रेंटल हाऊसिंग बांधल्यामुळे घरांचा प्रश्न सुटतो की नाही, या बाबीचा काहीही विचार न करता भाडे तत्त्वावरील घरांचे बांधकाम सुरू केले जात होते. मात्र हे योग्य नाही. त्यामुळे भाडे तत्त्वावरील घरे कोठे बांधावीत, यासंदर्भात आता शासन निर्णय घेणार असून त्या नंतर तेथे निविदा काढून बहुमजली इमारती बांधल्या जाणार आहेत.

अध्यक्ष महोदय, मेट्रो रेल्वे भूमिगत असावी, अशी सूचना सन्माननीय सदस्य श्री. नितीन सरदेसाई व श्री. बाबा सिद्दीकी यांनी केली. दिल्ली येथील मेट्रो रेल्वे मार्गाच्या आराखडयानुसार, ९ मार्गांचा आराखडा तयार केला होता. भुयारी मार्ग करू नये, अशा प्रकारची सूचना पुढे आली आहे. किंमतीच्या बाबतीत जी माहिती मिळाली आहे, त्यामध्ये एलिव्हेटेड रेल्वे करिता २५० कोटी रुपये प्रति किमी इतका खर्च येतो. तसेच भुयारी रेल्वे करिता ६०० कोटी रुपये प्रती किमी खर्च येतो, अशा प्रकारचा सकृतदर्शनी अहवाल प्राप्त झालेला आहे. तसेच या रेल्वेवरून खाली जाताना किंवा खालून वर जाताना रॅम्प वापरले जातात. त्याकरिता जमीन लागते, जागा लागते. ती जागा मुंबई शहरात वापरणे व्यावहारिक ठरणार नाही, असे या अहवालात नमूद केले आहे. मेट्रो रेल्वेचा तिसरा टप्पा कुलाबा ते बांद्रा हा भुयारी मार्ग केला जाणार आहे. त्यामुळे भुयारी व एलिव्हेटेड मार्ग अशा दोन्ही पद्धतीने मेट्रो रेल्वे जाणार आहे.

[ श्री. पृथ्वीराज चव्हाण ]

अध्यक्ष महोदय, देवनार पशुवध गृहाच्या आधुनिकीकरणाबाबत सन्माननीय सदस्य श्री. अबू आझमी व सन्माननीय सदस्य श्री. नवाब मलिक यांनी प्रश्न उपस्थित केला होता. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून देवनार पशुवध गृहाच्या आधुनिकीकरणाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. हा प्रकल्प अहवाल प्राप्त झाल्यानंतर केंद्रीय अर्थसहाय्य मिळवून लवकरात लवकर प्रकल्प हाती घेण्यात येईल. त्याच बरोबर घन कचऱ्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. बाबा सिद्दिकी यांनी महानगरपालिकेने पीपीपी तत्त्वानुसार देवनार, मुलुंड, कांजुरमार्ग येथे प्रक्रिया करण्याबाबत मुद्दा उपस्थित केला होता. त्यामध्ये आर्थिक गैरव्यवहार झालेले आहेत, त्यामध्ये एसआयटी स्थापन करावी अशी मागणी केली होती. हे जे पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप कॉंट्रॅक्ट आहे, याबाबत शासनाकडे निश्चित तक्रारी आलेल्या आहेत. याबाबत एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या मार्फत शासनाकडे जो नियुक्त केलेला एक्सपर्ट आहे, त्याच्या माध्यमातून चौकशी करण्यात येत आहे आणि महिन्याभरात त्याचा अहवाल येईल. यामध्ये जर काही गंभीर गैरप्रकार आढळले तर मग त्यामध्ये किती गैरव्यवहार आहेत याबाबत पुढची चौकशीची प्रक्रिया एसआयटीच्या माध्यमातून किंवा ज्या माध्यमातून करायची ती निश्चितपणे करता येईल.

त्याचबरोबर सेस इमारतींना अडीच ऐवजी ३ एफएसआय करण्याचा मुद्दा, मुंबई जिल्ह्यासाठी ०.३३ अतिरिक्त एफएसआय देण्याबाबतचा मुद्दा मुंबईचे सन्माननीय आमदार सर्वश्री अमीन पटेल व बाबा सिद्दिकी यांनी उपस्थित केला होता. जुन्या भाडेकरूंना २५० ऐवजी ३०० चौ.फू.च्या सदनिका देण्याचा इरादा शासनाने जाहीर केला होता. तो केल्यामुळे एफएसआय अडीच ऐवजी तीन द्यावा का याबाबत शासनाचा विचार चालू आहे. परंतु, त्यामुळे पेन्सिल स्वरूपाच्या इमारती होऊ नयेत आणि नागरिकांना किमान सोयींपासून वंचित राहता लागू नये म्हणून ही योजना राबविताना भूखंडाचे किमान क्षेत्रफळ किती असावे याबाबत विचार होत आहे. अगदी कमी क्षेत्रफळावर पेन्सिल इमारती उभ्या कराव्यात की, क्षेत्रफळाची किमान मर्यादा ठेवावी व त्यामुळे काही सुविधा निर्माण होऊ शकतील का याबद्दल सर्वंकष विचारविनिमय करून लवकरच अंतिम निर्णय घोषित करण्यात येईल.

त्याच बरोबर ०.३३ एफएसआय अतिरिक्त दिल्यामुळे एका बाजूला टीडीआरचे दर कमी होतील व सदनिकांचे दर कमी होतील असा एक तर्क केला जात होता. परंतु, दुसऱ्या बाजूला सरसकट ०.३३ एफएसआय दिल्यामुळे पायाभूत सुविधांवर अतिरिक्त ताण पडेल आणि सोयी सुविधा अपुऱ्या पडतील असाही तर्क केला जातो. त्यामुळे यावरही सर्वंकष विचार करून आम्ही निर्णयाप्रत आलेलो आहोत लवकरच याबाबतीतील निर्णयही जाहीर करण्यात येईल.

सार्वजनिक वाहनतळा बाबतचाही एक मुद्दा मांडण्यात आला. ३३/२४ च्या योजनेंतर्गत सध्याच्या धोरणामध्ये जे काही प्रकल्प आलेले आहेत, त्यामध्ये निश्चितपणे बदल करणे गरजेचे आहे. अर्थात हे धोरण रद्द करण्यात येणार नाही. परंतु, त्यामध्ये जो धोरणाचा मूळ गाभा आहे की, अधिकाधिक सार्वजनिक वाहनतळ व्हावेत. पण हे करत असताना मूळ संकल्पना जी आहे ती फक्त एफएसआय

मिळण्याकरिता वाहनतळ बांधावेत की, वाहनतळाची गरज आहे म्हणून ते बांधावयाचे याबद्दल मूलभूत विचार केला जात आहे व लवकरच याबद्दलही निर्णय घेतला जाईल. सार्वजनिक वाहनतळाची उंची मर्यादित ठेवणे, निवड समितीकडून सुयोग्य ठिकाणाची निवड करणे आणि अनर्जित उत्पन्नाचा वाटा महापालिकांना मिळणे इतक्या मूलभूत कल्पनांचा त्यामध्ये समावेश केलेला आहे.

सिडकोने बांधलेली घरे मोडकळीस आलेली आहेत. त्यांच्या पुर्नबांधणीच्या उपाययोजनांबाबत प्रश्न उपस्थित केला गेला. सिडको मार्फत १५-२० वर्षांपूर्वी बांधलेली जी घरे आहेत ती, कदाचित निकृष्ट दर्जाची होती व त्याची वेळेवर दुरुस्ती न झाल्याने त्यापैकी बऱ्याचशा इमारती नादुरुस्त झालेल्या आहेत, कोसळलेल्या आहेत, तेथे अपघात होण्याची भिती आहे. या इमारतीपैकी २५ इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यासाठी एका संस्थेची नेमणूक करण्यात आलेली आहे. एका महिन्याभरात या संस्थेचा अहवाल सादर होईल. त्या अहवालातील शिफारसीनुसार दुरुस्तीबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबतचा निर्णय महिन्याभरात घेण्यात येईल.

सन्माननीय सदस्य, श्री. एकनाथ शिंदे यांनी ठाणे शहरातील धोकादायक इमारतींबाबतचा प्रश्न उपस्थित केला. गेल्या आठवड्यात मी ठाणे शहरातील लोकप्रतिनिधीं समवेत एक बैठक घेतली होती व त्यामध्ये काही सूचना करण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. त्यामध्ये दोन पर्याय असतील. त्यातील पहिला पर्याय म्हणजे, खाजगी सहभागाने आहे त्या ठिकाणी पुनर्वसन करणे, आणि त्यामध्ये देय चटईक्षेत्र निर्देशांक अधिक ५० टक्के प्रोत्साहनात्मक एफएसआय व कमाल मर्यादा ठरवून देणे हा आहे. तर दुसरा पर्याय क्लस्टर डेव्हलपमेंटचा आहे. या दोन्ही पर्यायांच्या बाबतीत मला १५ दिवसांच्या आत प्रस्ताव मिळतील व त्याबाबतीत निर्णय घेता येईल.

सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जैन यांनी शहराचा विकास आराखडा दोन ते तीन महिन्यांत मंजूर करावा अशी संकल्पना मांडली. विकास आराखडा तयार करणे व त्यास मंजुरी करण्यास लागणारा कालावधी कमी व्हावा यासाठी चालू अधिवेशनामध्ये एक विधेयक मंजूर करण्यात आलेले आहे. त्यानुसार संबंधित महापालिका, महानगरपालिका आणि नगरपालिका यांनी तीन वर्षे सहा महिने म्हणजे साडेतीन वर्षांमध्ये विकास आराखडा तयार केल्यानंतर साधारणत: सहा महिने ते एक वर्षाच्या आत शासनाने त्यास मंजुरी द्यावी अशी तरतूद केलेली आहे. त्यामुळे चार ते साडेचार वर्षांमध्ये हा विकास आराखडा तयार होईल.

अध्यक्ष महाराज, एमआरटीपी ॲक्ट १९६६ मध्ये आमूलाग्र बदल करावा अशी संकल्पना मांडण्यात आली. एमआरटीपी ॲक्टचे पुनर्विलोकन करून त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी संचालक, नगर रचना यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आलेली आहे. ही समिती तीन महिन्यांत आपला अहवाल सादर करेल. त्याच बरोबर अ, ब आणि क नगरपालिकांचे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करून त्यामध्ये एफएसआय, टीडीआर आणि पार्किंग यांचा समावेश करण्यात येईल. त्याचप्रमाणे भूकंप प्रतिवर्धक तरतुदीचा देखील समावेश करण्यात येईल. ही बाब छोट्या शहरांकरिता अत्यंत महत्त्वाची आहे कारण छोट्या शहरांचा आराखडा तयार करताना या गोष्टींचा विचार केला गेला नाही.

[ श्री. पृथ्वीराज चव्हाण ]

अध्यक्ष महाराज, या ठिकाणी मोबाईल टॉवर्स आणि त्यापासून निघणारे रेडिएशन डॅमेजबद्दल मुद्दा उपस्थित करण्यात आला. मोबाईल टॉवर्स उभारण्या संदर्भात एक नवीन नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्यामध्ये पुढील तरतुदींचा समावेश आहे. टॉवर उभारण्यासाठी वाढीव फी आकारण्यात येईल त्यामुळे स्थानिक उत्पन्न वाढेल. सुरक्षा आणि सुरक्षिततेकरिता स्थापत्य नियमावली, स्ट्रक्चरल रेग्युलेशन्स फॉर सेफ्टी आणि सेक्युरिटी हे देखील त्यामध्ये अंतर्भूत असतील. मोबाईल टॉवर्सच्या ॲन्टीना शाळा व हॉस्पीटल्सच्या दिशेने नसतील जेणेकरून किरणोत्सर्गाचा स्वास्थ्यावर त्याचा काही परिणाम होणार नाही. मोबाईल टॉवर्समुळे खरोखरच स्वास्थ्यावर परिणाम होतो किंवा कसे याबद्दलची निश्चित शास्त्रोक्त माहिती आलेली नाही. परंतु सावधगिरीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याबद्दलचे आदेश लवकरच निर्गमित करण्यात येतील.

अध्यक्ष महाराज, नगर विकास विभागा संदर्भात काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित करण्यात आले. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी महानगरपालिकेच्या वर्गीकरणा संदर्भात मागणी केलेली आहे. सन २०११ च्या शहर जनगणनेचे आकडे लवकरच उपलब्ध होणार आहेत. त्यामध्ये लोकसंख्या आणि दरडोई उत्पन्न या दोन्ही बाबींचा विचार करून संबंधित महानगरपालिकेच्या वर्गीकरणात बदल करण्याचा प्रस्ताव आहे. त्याचबरोबर त्यांनी हद्दवाढ प्रस्तावा संदर्भात सत्वर निर्णय घेण्याची मागणी केली होती. दिनांक ३१ मार्च २०११ पर्यंत प्रशासकीय हद्दीमध्ये बदल करण्याकरिता जनगणना महानिबंधक यांनी मनाई केली होती. त्यामुळे आता ३१ मार्च नंतर आकडे येतील त्यामुळे बदल करणे शक्य होईल तेव्हा त्यासंदर्भात लवकरच कार्यवाही करण्यात येईल.

अध्यक्ष महाराज, नगरपरिषदांमध्ये मुख्याधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत, असा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. राज्यात एकूण २२६ नगरपालिका आहेत. सन २००९-२०१० आणि सन २०१०-२०११ मध्ये राज्य लोकसेवा आयोगामार्फत नवीन उमेदवारांची यादी प्राप्त झाल्यानंतर १४५ नवीन मुख्याधिकाऱ्यांच्या नियुक्त्या झालेल्या आहेत. सध्या ७ नगरपरिषदांमध्ये मुख्याधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. परंतु त्या ठिकाणचा अतिरिक्त कार्यभार दिला गेलेला आहे. ही रिक्त पदे देखील लवकरच भरण्यात येतील. नगरपरिषदांमध्ये मुख्याधिकारी म्हणून बदली होऊन त्या पदावर रुजू न झाल्यामुळे ४ ठिकाणी ती पदे रिक्त राहिलेली आहेत. या सर्व पदांबाबत राज्य लोकसेवा आयोगाकडे रिक्त पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव पाठविलेला आहे.

अध्यक्ष महाराज, मुंबई महानगरपलिकेला राज्य शासनाकडून देय रकमेबाबतचा मुद्दा माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केला होता. दिनांक ३० नोव्हेंबर २०१० अखेर महाराष्ट्र शासनाच्या विभागाकडून तसेच विविध उपक्रमांकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस १५४४ कोटी रुपये रक्कम देणे होते. त्याच बरोबर महानगरपालिकेकडून शासनास २६० कोटी रुपये येणे आहे. शासनाचे विविध विभाग आणि विविध उपक्रमांकडून करापोटी महानगरपालिकेस देणी असलेली रक्कम व महानगरपालिकेकडून शासनास येणी असलेली रक्कम याबाबत सातत्याने देवाणघेवाण होत राहत. सदर रकमेचा ताळमेळ

होऊन समायोजन करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. महानगरपालिकेस उर्वरित देय रकमा अदा करण्यासाठी शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांमार्फत अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतूद करून सदर रकमेचे लवकरात लवकर प्रदान करण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. मुंबईची पाणीपुरवठा व्यवस्था व पाणी गळती हे अतिशय महत्त्वाचे मुद्दे सर्वश्री. नवाब मलिक व नितीन सरदेसाई यांनी उपस्थित केले आहेत. मुंबईमध्ये सध्या एकूण ३३५० एमएलडी पाणीपुरवठा करण्यात येतो. भविष्यकालीन वाढत्या गरजांचा विचार करता आणि शासनाने नियुक्त केलेल्या चितळे समितीच्या शिफारशीप्रमाणे टप्प्या टप्प्याने नवीन स्त्रोताचा विकास करण्याचा प्रयत्न होत आहे.

त्याच बरोबर, अध्यक्ष महोदय, जेएनएनयुआरएम अंतर्गत अर्थसहाय प्राप्त करून मध्य वैतरना प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. मार्च, २०१२ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वाढीव ४५५ एमएलडी पाणीपुरवठा होणार आहे. गारगई पाणीपुरवठा प्रकल्पाची सुसज्जता तपासण्याचे काम करण्यात येत आहे. सदर प्रकल्पातून ४४० एमएलडी पाणीपुरवठा शहराला होईल. तसेच, पिंजाळ पाणीपुरवठा प्रकल्पाची फिजिबिलिटी तपासण्याचे काम एमएमआरडीएकडून होत आहे. सदर प्रकल्पाची क्षमता ८३५ एमएलडी असणार आहे. पाणी गळतीचे प्रमाण कमी करण्याकरिता अनेक प्रयत्न केले जात आहेत. सदर प्रयत्नांमध्ये जुन्या जलवाहिन्यांचे पुनर्वसन करणे, ते शक्य नसल्यास नवीन जलवाहिन्या टाकणे हा एक मार्ग आहे. काही मुख्य जलवाहिन्या जुन्या झाल्या आहेत, त्या ठिकाणी भूमिगत बोगदे घेण्याची कल्पना आहे, त्यामुळे ३-४ बोगदे घेतले जात आहेत. गळती थांबविण्याकरिता, प्रवाह मोजण्याकरिता एका पथदर्शी प्रकल्पाची अंमलबजावणी देखील प्रस्तावित आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नवाब मलिक यांनी आरोग्याच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला होता. मी त्याबद्दल सांगू इच्छितो की, मुंबई महानगरपालिकेने उपनगरातील प्रमुख रुग्णालयांमध्ये विशेषत: शताब्दी रुग्णालय, कांदिवली या रुग्णालयाचा पुनर्विकास करून तीनशे बेडचे नवीन रुग्णालय तयार करणे, ओपीडीमध्ये सन २०११ अखेर, इन पेशंट डिपार्टमेंट सन २०१२ पर्यंत कार्यान्वित करणे, कूपर रुग्णालयाचा पुनर्विकास करणे आणि या रुग्णालयाची क्षमता ५८० पर्यंत वाढविणे, ही सर्व कामे डिसेंबर, २०११ पर्यंत पूर्ण होतील, अशी अपेक्षा आहे. त्याचबरोबर, अध्यक्ष महोदय, नवीन ट्रॉमा रुग्णालय जोगेश्वरी येथे स्थापन करणे आहे आणि त्याची क्षमता २६० बेडची असेल अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) यांनी महानगरपालिकांच्या उत्पनाच्या बाबतीतील मुद्दा उपस्थित केला. ज्या शहरांतील महानगरपालिकांमध्ये ऑक्ट्रोय बंद केला आणि लोकल बॉडी टॅक्स म्हणजे स्थानिक संस्था कर लागू केलेला आहे, त्या संस्था, महागनरपलिकेच्या उत्पन्नात घट होऊ नये याकरिता २-३ उपयोगी योजना केलेल्या आहेत. स्टॅम्प ड्युटीवर १ टक्का अधिभार लावून त्याची समतुल्य रक्कम शहरात प्रदान करून देणे आहे. त्याचबरोबर, १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून १५ टक्के निधी संबंधित शहरांना एलबीटी लागू केल्याच्या पहिल्या वर्षी, मागील वर्षीचे जकातीचे उत्पन्न आहे, त्याच्या १५ टक्के देणे आणि महानगरपालिकेच्या पायाभूत सुविधांसाठी विशेष अनुदान या सगळ्या बाबी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदीतून एलबीटी लागू

केलेल्या शहरांना पहिल्या वर्षी अनुदान देणे, हे त्यामध्ये सामील आहे. त्यामुळे कोणत्याही नगरपालिकेला, तेथील ऑक्ट्रॉय थांबविला आहे आणि स्थानिक संस्था कर लावलेला आहे, त्यांचे उत्पन्न घटणार नाही, असे मी आश्वासन देऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय सावकारे यांनी नागरी क्षेत्रामध्ये सांडपाण्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर यांची अंमलबजावणी करण्याकरिता विनंती केली होती. शहरात एकूण सांडपाण्याच्या किमान २० टक्के सांडपाण्याचे पुनर्चक्रीकरण, पुनर्वापर व्हावा अशी शासनाची भूमिका आहे अणि त्यासंदर्भात राज्य शासनाने शहरातील किमान २० टक्के सांडपाण्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर होण्याकरिता स्पष्ट निर्देश १५ ऑक्टोबरला दिले आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. धैर्यशील पाटील यांनी असा मुद्दा उपस्थित केला आहे की, युआयडीएसएसएमटीअंतर्गत मंजूर पाणीपुरवठा योजनेचा पैसा नगरपरिषदेने पेण अर्बन नागरी सहकारी बँकेमध्ये ठेवला होता. परंतु, बँकेत झालेल्या अपहारामुळे व गैरव्यवहारामुळे ही योजना अडचणीत आली आहे. अध्यक्ष महोदय, पेण अर्बन नागरी सहकारी बँकेत अडकलेली अनुदानाची रक्कम २ कोटी ४० लाख रुपये अग्रक्रमाने बँकेकडून नगरपरिषदेस मिळावी, यासाठी आरबीआयला विनंती करण्यात आली आहे. दरम्यान पाणीपुरवठा योजनेचे काम रखडू नये, यासाठी पेण नगर परिषदेने सवलतीच्या कर्जाची मागणी एमयुआयडीसीएल या शासनप्रणित कंपनीकडे केली आहे. त्याचाही अग्रक्रमाने विचार होत आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य, डॉ. अनिल बोंडे यांनी शेंदूरजनाघाट नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम निधीअभावी अपूर्ण असल्यामुळे तेराव्या वित्त आयोगातून मिळालेल्या निधीतून हे काम पूर्ण करण्याची परवानगी मागितली आहे. तेराव्या वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे दिनांक २५ ऑक्टोबर, २०१० चा शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यानुसार अपूर्ण बांधकाम पूर्ण करण्यासाठी तेराव्या वित्त आयोगाच्या निधीमधून अनुदान देण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, गृहनिर्माण विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी काही मुद्दे मांडले आहेत. मुंबईच्या काही सन्माननीय सदस्यांनी महत्त्वाचा असा मुद्दा उपस्थित केला होता की, झोपडपट्टीमध्ये सन १९९५ नंतर आलेल्या हस्तांतरकाला नियमित करण्याबाबतचे धोरण राज्य शासनाने ठरवावे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम १९९५ मधील कटऑफ डेट झोपडपट्टीकरिता आणि झोपडपट्टीधारकाकरिता वाढविता येणार नाही, असे स्पष्ट आदेश न्यायालयाने दिलेले आहेत. या आदेशाविरुध्द महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेत सन १९९५ ची कटऑफ डेट झोपडीकरिता तथा झोपडपट्टीमध्ये वास्तव्य करणाऱ्यांकरिता वाढविण्याचे अधिकार विधीमंडळाला असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. मात्र जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येत नाही तोपर्यंत याबाबत धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही.

[ श्री. पृथ्वीराज चव्हाण ]

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अबू आझमी यांनी जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित केलेल्या रकमेमधून निदान १० टक्के रक्कम अल्पसंख्यांकांसाठी ठेवण्याची मागणी केली आहे. सदर योजना ही समूह योजना आहे. सर्व झोपडपट्टीमध्ये, सर्व जातींचा, जातविरहित विकास या योजनेमधून अपेक्षित आहे. तथापि, सदर योजना मालेगाव आणि भिवंडी शहरामध्ये लागू होईल त्यावेळी जास्तीत जास्त अल्पसंख्यांकांना त्याचा लाभ होईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. एकनाथ शिंदे यांनी ठाणे शहराला बीएसयुपी आणि एसआरए योजना लागू करावी, अशी विनंती केली होती. ठाणे शहरात बीएसयुपीच्या २ प्रकल्पांची अंमलबजावणी सुरू असून केंद्र शासनाच्या प्रस्तावित राजीव गांधी आवास योजनेअंतर्गत झोपडपट्टीमुक्त शहरामध्ये ठाणे शहर प्रस्तावित आहे.

अध्यक्ष महोदय, गिरणी कामगारांच्या घरांबाबतचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. त्यामध्ये शासनाला फार कमी जागा मिळालेली आहे. गिरणी कामगारांची मागणी मान्य करावी, याबद्दल सन्माननीय सदस्य श्री. मधू चव्हाण यांनी विनंती केली होती. यामध्ये ३३ गिरण्यांची ११ हेक्टर जमीन म्हाडाला प्राप्त होणार आहे. त्यापैकी २३ गिरण्यांची ७.६८ एकर जमीन म्हाडाला प्राप्त झाली असून १० गिरण्यांची ३.५४ एकर जमीन प्राप्त व्हावयाची आहे. घरांची किंमत ठरविण्याबाबत किंवा त्यांच्या मागण्यांबाबत मी बैठक घेतली होती. याबद्दल विचारविनिमय करून लवकरच अंतिम निर्णय घेण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, बीडीडी चाळीच्या विकासाचे धोरण ठरविण्याबाबत नोव्हेंबर, २०१० मध्ये मंत्रिमंडळासमोर पुनर्बांधणीचा प्रस्ताव आला होता. त्यामध्ये नवीन निर्णय लवकरच कॅबिनेटपुढे जाऊन घेण्यात येईल. अजूनही धोरणाबद्दल एकमत करण्याचा प्रयत्न चालला आहे. लवकरच एकमत करून हा निर्णय कॅबिनेटपुढे आणता येईल.

अध्यक्ष महोदय, सीआरझेडबद्दल सन्माननीय सदस्य श्री. मंगलप्रभात लोढा यांनी काही क्लॅरिफिकेशन मागितले होते. केंद्र सरकारच्या दिनांक ६ जानेवारी, २०११ च्या अधिसूचनेनुसार उपकरप्राप्त जुन्या इमारती, त्याचबरोबर झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाच्या बाबतीत सर्वसाधारण सूचना दिलेल्या आहेत. केंद्र शासनाच्या एनव्हॉयरमेन्ट इम्पॅक्ट ॲसेसमेंटच्या नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार सीआरझेडमधील पुनर्विकासाची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. सीआरझेड मधील नव्या नियमाचा फायदा घेत मुंबईत शक्य असेल त्या ठिकाणी समुद्रकिनारी भराव घालून रिंग रुट उभारण्याची शासनाची योजना आहे. मुंबईत समुद्रकिनारी भराव घालून चार ते सहा पदरी रस्ते तयार करण्याची राज्य सरकारची योजना आहे. सीआरझेडमधील नव्या नियमामुळे ते शक्य होणार आहे. स्टिल्टवर रस्ते बांधण्यास परवानगी असली तरी ती खर्चिक बाब असल्यामुळे समुद्रकिनारी भराव घालून रस्ते केल्यास मुंबईतील वाहतुकीची समस्या सुटण्यास मदतच होईल. यासंदर्भात गेल्या आठवड्यात माझी माननीय केंद्रीय पर्यावरणमंत्री श्री. जयराम रमेश यांच्याशी नवी दिल्ली येथे सविस्तर चर्चा झाली असून ते लवकरच मुंबईला भेट देणार आहेत. पर्यावरण मंत्री आणि या खात्याचे अधिकारी मुंबईत येऊन पाहणी करणार आहेत. त्यांना राज्य शासनाच्या वतीने सादरीकरण केले जाईल व यावर महिनाभरात निर्णय होईल, हेही मी सभागृहास सांगू इच्छितो. मरीन ड्राईव्हसारख्या ठिकाणी चार-चार, सहा पदरी नवी कोस्टल हायवे तयार करण्याची राज्य सरकारची योजना आहे.

[ श्री. पृथ्वीराज चव्हाण ]

अध्यक्ष महोदय, यंत्रमाग कामगारांच्या घरकुल योजनेचा मुद्दा काही सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला. ज्याप्रमाणे विडी कामगारांसाठी केंद्र शासनाची घरकुल योजना आहे त्याप्रमाणे यंत्रमाग कामगारांकरिता योजना अस्तित्वात नाही. परंतु केंद्र शासनाची विडी कामगारांसाठी योजना राबविण्यासाठी शासनाचे प्रयत्न चालू आहेत. केंद्र शासनाकडून याबाबतीतही अनुदान प्राप्त होईल. राजीव गांधी आवास योजनेमध्ये ३ लाख लोकसंख्या असलेल्या शहराबद्दल केंद्र सरकारची काही मार्गदर्शक तत्त्वे आहेत. सन २००१ च्या जनगणनेनुसार काही शहरामध्ये योजना प्रस्तावित केलेली आहे आणि इतर शहरांचा दुसऱ्या टप्प्यात समावेश करण्यात येणार आहे. यामध्ये लाभार्थ्यांना पैसे देण्याचीही योजना आहे. बीएसयुपी आणि राजीव गांधी आवास योजना या केंद्र सरकारच्या योजना असून राज्य शासन त्या राबविण्याचा प्रयत्न करीत आहे. बीएसयुपी मध्ये पाच नागरी समूह आहेत. आणि आयएचएसडीपी अंतर्गत ८३ शहरांचा समावेश असून त्यामध्ये १०३ प्रकल्प हाती घेतलेले आहेत. राजीव गांधी आवास योजनेमध्ये २४ शहरांचा झोपडपट्टी मुक्त शहर नियोजन आराखडा तयार करण्यात येत आहे. यात पहिल्यांदा ११ शहरांमध्ये त्याचे काम होणार आहे. या योजनेकरिता म्हाडाला स्वीकार ॲथॉरिटी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. अनेक प्रश्न सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत. परंतु मी आपणा सर्वांचा अधिक वेळ न घेता, मी माझे उत्तर येथेच थांबवितो. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांची मी नोंद घेतलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांसंदर्भात मी त्यांना लेखी उत्तर कळवीन किंवा त्याबद्दल निर्णय घेतले जातील. सर्व सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केल्याबद्दल मी आपणा सर्वांना धन्यवाद देतो आणि या विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात, अशी विनंती करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, मी आपणांकडे एक कॉपी दिलेली आहे, पुन्हा आपल्याकडे त्या कॉपीची प्रत देतो. मी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविली होती. ती माहिती देताना त्यामध्ये असा उल्लेख केला आहे की, माहितीच्या अधिकाराचा हक्क म्हणून माहिती देण्यात आली असून त्याचा उपयोग फक्त माहितीसाठीच करावा अशा तऱ्हेची नक्कल पुरावा म्हणून उपयोग करायला नको अशी टीप दिलेली आहे. यासंदर्भात मला असे म्हणावयाचे आहे की, हे कायद्यानुसार नसेल तर ज्या अधिकाऱ्यानी ही माहिती दिली आहे, त्याच्याविरुद्ध शासनाने कायदेशीर कारवाई केली पाहिजे. यासंदर्भात जी काही कारवाई केली जाईल ती सभागृहाच्या पटलावर ठेवली पाहिजे, अशी माझी सूचना आहे.

अध्यक्ष महोदय, अफझलपूरकर समिती ही म्हाडाच्या इमारतीमधील भाडेकरूंच्या समस्यांसंदर्भात शासनाने नियुक्ती केली होती. त्या शिफारसी मुंबई उपनगरासाठी सुद्धा मान्य करण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश महेता यांनी सूचना केलेली आहे. त्या शिफारसी मुंबई उपनगरासाठीही लागू करण्यात याव्या, अशी माझी मागणी आहे. मी आपल्याकडे दोन प्रकरणे दिलेली आहेत. त्या प्रकरणांची चौकशी करून कारवाई करावी अशी माझी मागणी आहे. कागदोपत्री पुरावे आपल्याकडे दिलेली आहेत.

**[ श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) ]**

अध्यक्ष महोदय, पुणे विकास आराखड्यासंदर्भातील एक महत्त्वाचा विषय आहे. गेल्या सात वर्षांपासून विकास आराखड्यावर चर्चा होते, परंतु तो मंजूर केला जात नाही, त्यामुळे पुणे शहरातील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. सात-सात वर्षे विकास आराखडा अंतिम होत नाही, ही बाब संयुक्तिक नाही. त्यामुळे हे अधिवेशन संपण्याच्या आत विकास आराखडा मंजूर करण्यात यावा. पुणे विकास आराखडा मंजूर न केल्यामुळे पुणे शहराच्या विकास प्रक्रियेत अडचणी निर्माण होतात. सन्माननीय सदस्य श्री. अशोक जाधव यांनी एक महत्त्वाचा विषय उपस्थित केला होता. लहान नगरपालिका व महानगरपालिकांना मोठ्या प्रमाणात केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध होत आहे. निधीच्या संदर्भात वेगवेगळ्या ठिकाणावरुन तक्रारी येत आहेत. यामध्ये गैरव्यवहार व अनियमितता होत आहेत. याबाबत तपासणी करण्याची कोणतीही यंत्रणा नाही. त्यांचे ऑडिट होते त्यावर पुढे काय होते ते माहिती नाही. माननीय श्री. बाबासाहेब कुपेकर अध्यक्ष होते त्यावेळी दोन वेळा असे निर्देश दिले आहेत की, पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधानमंडळाची समिती असावयास पाहिजे. त्यांनी निर्देश दिले की, यासंदर्भात आपण नियम समितीसमोर जाऊ. नियम समितीकडून विधानमंडळाची एक समिती नियुक्त करून यावर नियंत्रण ठेवता येईल. पूर्वीच्या कालखंडात स्वत:च्या उत्पन्नातून नगरपालिकांकडे कमी पैसा येत होता. आता नगरपालिका व महानगरपालिकांना २०० ते ५०० कोटी रुपये सहजरित्या केंद्र शासनाच्या माध्यमातून कर्ज रुपाने किंवा अनुदानाच्या माध्यमातून उपलब्ध होत आहेत. यासंदर्भात शासनाने कार्यवाही करावी. मी ज्या सूचना केल्या आहेत, त्याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी विचार करावा. त्यांना आता विकास आराखडा व पुणे येथील घोटाळ्याच्या संदर्भात सांगता आले किंवा समितीच्या संदर्भात उत्तर मिळाले तर मला आनंद होईल.

**श्री. बाबा सिद्दिकी :** अध्यक्ष महोदय, सम्माननीय मुख्यमंत्री जी ने मुंबई मेट्रो के बारे में कहा कि, शहरी इलाके में अंडर ग्राऊड काम होगा. मैं बताना चाहता हूं कि, सबर्ब का जो डेफिनेशन युरोप में था, अब यह सबर्ब नहीं रहा है. सबर्ब के साथ सौतेला व्यवहार करना, मैं समझता हूं कि, जन आंदोलन शुरु हुआ है. जन आंदोलन होने के पहले हमको एक रिव्ह्यू लेना चाहिए. जहां आवश्यकता है वहां पर अंडर ग्राऊंड होना चाहिए. मैं समझता हूं कि, १७१ करोड़ रुपये हैद्राबाद में पर किलोमटर दिया गया है. मुंबई में ३५४ करोड़ रुपये पर किलोमीटर दिया गया है. एक महीने के अंदर हैद्राबाद और मुंबई में टेंडर हुआ है. ५९५० करोड़ रुपये का जो डिफरेन्स है, ये सीटीजन्स लोग पूछ रहे है. ३०० करोड़ रुपये में अंडर ग्राऊंड का काम होता है. चेन्नई में ३०० करोड़ रुपये में काम हुआ है. इस बारे में रिव्ह्यू कीजिए. जहां आवश्यकता हो वहां पर अंडर ग्राऊंड करने का प्रयास कीजिए. यह मेरी माननीय मुख्यमंत्री जी से नम्र विनंती है.

(अनेक सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी उभे राहतात)

**अध्यक्ष :** आता प्रश्नोत्तरे होत नाहीत. सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. अगोदरच आपण वेळेचे नियोजन करावयास पाहिजे होते. असे करणे बरोबर नाही. आता किती वाजले याचा विचार करावा.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना दोन तीत प्रश्न विचारु द्यावेत, आम्ही मागण्या मंजूर करण्यास तयार आहोत. अकरा जरी वाजले तरी मागण्या मंजूर करण्यात येतील. सत्ताधारी सदस्य कमी आहेत, विरोधी सदस्य जास्त आहेत तरी मागण्या मंजूर करण्यात येतील.

**श्री. प्रकाश महेता :** अध्यक्ष महोदय, माझे दोन मुद्दे आहेत. जनतेचा महत्त्वाचा प्रश्न आहे. अफझलपूर समितीने शिफारस केल्याप्रमाणे शासनाने चार शासन निर्णय काढले आहेत. त्यांची अंमलबजावणी होत नाही. दुसरे असे की रमाबाई आंबेडकरनगर एकत्रित विकासासंबंधी मुख्यमंत्री महोदयांनी निर्णय घेऊन कार्यवाही होत नाही. रमाबाई आंबेडकरनगरमध्ये ५० हजार झोपड्या आहेत. दलित व नवबौद्ध समाजाचे लोक तेथे राहतात. एकत्रित विकास करण्यासाठी ते तयार आहे, याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी.

**अध्यक्ष :** सर्व सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी हात वर करीत आहेत हे बरोबर नाही. मागण्यांवर प्रश्नोत्तरे होणार नाहीत. ही पध्दत चुकीची आहे, ज्यावेळी मागण्यांवर उत्तर होते त्यावेळी एखाद्या मुद्द्यांचा खुलासा राहिला असेल तर, तर तेवढा प्रश्न विचारण्याची अनुमती देता येईल. परंतु सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य हात वर करीत असतील आणि प्रत्येकाला संधी देऊन त्यावर जर पुन्हा प्रश्नोत्तरे होणार असतील तर हे बरोबर नाही, असे मला वाटते.

**श्री. नवाब मलिक :** अध्यक्ष महोदय, मुंबई शहरात भारतीय क्रिकेट संघाने वर्ल्ड कप जिंकला आहे. मुंबई शहरात जी खेळाची मैदाने आहेत, त्यावर मुंबईच्या मार्केट व गार्डन कमिटीने क्रिकेट खेळण्यास बंदी घातली आहे. याबाबत स्थगितीचा निर्णय दिलेला आहे. ती स्थगिती रद्द करून तातडीने खेळाची मैदाने उपलब्ध करून देण्याबाबतचा निर्णय करण्यात यावा.

**अध्यक्ष :** ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी स्वरूपात प्रश्न द्यावेत. मुख्यमंत्री महोदय, सन्माननीय सदस्यांना लेखी उत्तरे पाठवतील.

**श्री. पृथ्वीराज चव्हाण :** अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये पुन्हा काही प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत. मी माझ्या उत्तराच्या सुरुवातीलाच माहितीच्या अधिकाराच्या संदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्याचा उल्लेख केलेला आहे. कोणत्याही कायद्यामध्ये अशा प्रकारची तरतूद नाही. आपल्याला पुणे जिल्ह्यातील जी माहिती मिळालेली आहे त्याची मी निश्चितपणे चौकशी करून यासाठी कोण जबाबदार आहे हे बघेन. कारण कायद्यामध्ये असे अभिप्रेत नाही. माहितीच्या अधिकारात जी माहिती मिळते ती माहिती आपण वापरतो, ती माहिती वापरण्याचे काहीही चूक नाही. तसेच, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी काही घोटाळ्यांच्या संदर्भात माहिती दिलेली आहे. मी त्या सर्व प्रकरणांची नोंद घेतलेली आहे. त्यासंदर्भात निश्चितपणे चौकशी करून कार्यवाही करण्यात येईल आणि आदेश वगैरे रद्द करण्यासंदर्भात निश्चितपणे घोषणा करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, पुणे नगर विकास आराखडा प्रलंबित आहे. पुणे नगर विकास आराखडा लवकरात लवकर मंजूर करण्यात येईल. (...अडथळा...) हा आराखडा ५-६ वर्षांपासून प्रलंबित आहेत. आपण मला काही महिन्यांची तरी मुदत द्यावी. मी बैठक घेऊन यासंदर्भात लवकरच निर्णय घेईन. तसेच,

[ श्री. पृथ्वीराज चव्हाण ]

अफजलपूरकर समितीच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. रिहॅबिलिटेट बिल्डींगच्या संदर्भात विशेषत: उपनगराच्या संदर्भात जो अहवाल आलेला आहे त्याबद्दल शासन विचार करीत आहे आणि त्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल. अफजलपूरकर समितीने जे सूचविलेले आहे त्यामध्ये थोडा बदल करून आम्ही यासंदर्भात निर्णय घेऊ.

अध्यक्ष महोदय, नगर विकास विभागाबद्दल विधिमंडळाची एक समिती असावी, अशी मागणी करण्यात आलेली आहे. आपण असा तर्क दिलेला आहे की, आता नगरपालिकांना भरपूर अनुदान मिळते. नगरपालिकांना भरपूर अनुदान मिळण्याचे कारण असे आहे की, दिल्लीमध्ये युपीए सरकार आणि राज्यात आघाडी सरकार सत्तेवर असल्यामुळे राज्याचे उत्पन्न वाढलेले आहे आणि ते उत्पन्न ग्रामीण भागाला आणि नागरी भागालाही जास्त मिळत आहे. ही समिती नियुक्त करावयाची किंवा नाही हा माननीय अध्यक्षांचा निर्णय आहे. ही समिती नियुक्त करण्यासंदर्भात आपण काही निर्णय घेतलेले आहेत. विधिमंडळाची समिती नियुक्त करण्यासंदर्भात नियम समितीमध्ये निर्णय होईल किंवा माननीय अध्यक्ष जो निर्णय घेतील तो निर्णय शासन मान्य करेल.

अध्यक्ष महोदय, मी सांगू इच्छितो की, मी रमाबाई आंबेडकरनगराच्या संदर्भात बैठक घेईन. रमाबाई आंबेडकरनगराच्या संदर्भात काही निर्णय घेण्यात आलेले आहेत. आपल्याला माहिती आहे की, काँग्रेस पक्षाचे काही नेते रमाबाई आंबेडकरनगरमध्ये गेले होते आणि त्यांनी काही घोषणा केल्या होत्या. मी त्याचा नुकताच आढावा घेतलेला आहे. फार समाधानकारक काम झालेले नाही, हे मी मान्य करतो. ते काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे मी आश्वासन देतो.

अध्यक्ष महोदय, मेट्रो अंडर ग्राऊंड असावी का जमिनीवरुन असावी असा मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. आपल्याला माहिती आहे की, दिल्ली मेट्रो हे जगातील उत्कृष्ट उदाहरण आहे. लंडन येथील मेट्रोपेक्षाही दिल्ली मेट्रोची लांबी जास्त आहे. मेट्रोमुळे दिल्लीचे सर्व सांस्कृतिक कल्चर, वर्क कल्चर बदललेले आहे. शासनाने दिल्ली मेट्रोकडून अहवाल तयार करून घेतला होता आणि त्यांनी जे सूचविले होते त्याप्रमाणे आपण मेट्रो प्रकल्प कार्यान्वित करीत आहोत. टेंडरमध्ये एकच निविदा आली होती, किती लोकांना काम दिले होते, हे झालेले आहे. यापुढे असे घडू नये याची मी काळजी घेईल. मी निश्चितपणे आढावा घेईन. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हैद्राबाद येथील मेट्रो प्रकल्प कमी किंमतीत झालेला आहे. हैद्राबाद येथे मोकळी जागा आहे. मुंबई शहरासारखी दाट वस्ती जगामध्ये कोठेही नाही. त्यामुळे मुंबईचे प्रश्न वेगळे आहेत आणि इतर राज्यांचे प्रश्न वेगळे आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नवाब मलिक यांनी क्रिकेट खेळण्यावर बंदी घालण्यात आलेली आहे असे सांगितले. त्याची मी माहिती घेईन. असे होऊ नये. खेळावर कोणतेही निर्बंध घालण्याचे काहीही कारण नाही. मी यासंदर्भात निश्चितपणे माहिती घेईन.

अध्यक्ष महोदय, आज उशिरापर्यंत सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्यांनी मागण्यांवर अतिशय उपयुक्त चर्चा केलेली आहे त्याबद्दल मी सर्व सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो आणि सभागृहाने सामान्य प्रशासन विभाग, नगर विकास विभाग, गृहनिर्माण विभाग, मराठी भाषा विभागाच्या मागण्या मान्य कराव्या, अशी विनंती करतो.

**अध्यक्ष :** आता मी सामान्य प्रशासन विभाग, नगर विकास विभाग, गृहनिर्माण विभाग व मराठी भाषा विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक ए-१, ए-२, ए-३, ए-४, ए-५, ए-६, ए-७, ए-८, ए-९, एफ-२, एफ-३, एफ-४, एफ-५, एफ-७, एफ-८, क्यू-२, क्यू-३, क्यू-४, क्यू-६, झेडएफ-१, झेडएफ-२, झेडएफ-३, झेडएफ-४ आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबत सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

**अध्यक्ष :** मी सभागृहाच्या एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आता अर्धा-तास चर्चा घ्यावयाच्या आहेत. परंतु सभागृहात कोरम असल्याशिवाय अर्धा-तास चर्चा होऊ शकणार नाहीत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सभागृहात उपस्थित राहणे अत्यावश्यक आहे.

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** ठीक आहे.

(काही सन्माननीय सदस्य माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या आसनाजवळ येऊन त्यांच्याशी बोलत असतात.)

**अध्यक्ष :** मी सभागृहाच्या एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सभागृहाचे कामकाज सुरू असताना, सन्माननीय सदस्यांनी माननीय मुख्यमंत्री महोदयांना त्यांच्या आसनाजवळ येऊन भेटण्याची पद्धत योग्य नाही.

---

## पोंभुर्णा (जिल्हा चंद्रपूर) येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय सुरू करण्याबाबत या विषयावरील अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ५७ मधील प्रश्न क्रमांक ४४१५ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१० रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. राजकुमार बडोले, वि. स. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

**श्री. सुधीर मुनगंटीवार** (बल्लारपूर) **:** अध्यक्ष महाराज, पोंभुर्णा (जिल्हा चंद्रपूर) येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय सुरू करण्याबाबत या विषयावरील अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ५७ मधील प्रश्न क्रमांक ४४१५ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१० रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम ९४ अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघात पोंभुर्णा तालुका येतो. पोंभुर्णा हा आदिवासी तालुका असून, तो अतिशय संवेदनशील आहे. सन १९९९ मध्ये पोंभुर्णा तालुक्याची निर्मिती झाली....

(काही सन्माननीय सदस्य लॉबीत बसलेल्या अधिकाऱ्यांशी बोलत असतात.)

**अध्यक्ष :** मी सभागृहाच्या एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सभागृहाचे कामकाज सुरू असताना सन्माननीय सदस्य अधिकाऱ्यांशी बोलू शकतात का ? ही बाब योग्य नाही.